डॉ. हेडगेवार स्मृती विशेषांक

# माणूस

वर्षारंभ २९
२१ जून १९८९
सहा रुपये





## दिल्लीतील प्रज्ञाभारतीचे विचारमंथन

— डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

## समाजसुधारणा करावी तर हिंदुत्वनिष्ठांनीच

— प्रा. शेषराव मोरे





सोनेरी भविष्याचे वरदान
RUPEE
जनता बँकेची कॅश सर्टिफिकेट्स/पुनर्गुंतवणूक योजना .
घर बांधावे, मुलाला शिकवावे-परदेशी पाठवावे ,
अशी सोनेरी स्वप्ने बचतीच्या जादूनेच साकार होतात .
दरमहा २५ पासून कितीही रक्कम ठराविक काळ
गुंतवत रहा आणि मुदतीनंतर हाती कशी घसघशीत
सव्याज रक्कम येते, पाहात रहा !
तुमची दरमहाची बचत हीच खरोखर आयुष्यात
सोन्याचे अंडे देणारी ठरते .
सहकाराचा परिस
जनता सहकारी बँक लि.. पुणे.
(शेड्युल्ड बँक)
१४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव रस्ता, पुणे : ४११ ००२. फोन : ४४३२५८.

# माणूस

वर्ष : एकोणतिसावे
अंक : एक
किंमत : सहा रुपये


डॉ. हेडगेवार स्मृती विशेषांक


संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
अविनाश कोल्हे

मुखपृष्ठ व चित्रे
राजीव देशपांडे

व्यंगचित्रे
अभिमन्यू कुलकर्णी

लेझर टाईपसेटिंग
आलेख
१३६० भारतभवन, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

मुखपृष्ठ छपाई
साप्ताहिक मुद्रण, पुणे


डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी वर्ष नुकतेच संपले.
२१ जून हा डॉक्टरांचा पुण्यतिथी दिवस.
त्यानिमित्ताने संघ आणि संघाचा विचार यासंबंधी अधिक
मोकळेपणाने केलेले हे मूल्यमापन वाचकांना उद्बोधक वाटावे.

\- सं.

या नंतरचा अंक दिवाळी अंक


संपर्क :
'माणूस'
१०२५, सदाशिव पेठ,
पुणे : ४११ ०३०.
फोन : ४४३४५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे
हक्क स्वाधीन

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक
सहमत असतीलच असे नाही.

# माणूस

अनुक्रम


**विशेष लेख :**

दिल्लीतील प्रज्ञाभारतीचे विचारमंथन
दत्तप्रसाद दाभोळकर / ५

**मुलाखती :**

एम. व्ही. कामत
रफिक झकेरिया
कॉ. मोहित सेन
वसंत मून
नीळकंठ खाडिलकर
आर. व्ही. पंडित
शब्दांकन : अविनाश कोल्हे / १७

**ललित :**

मणिपूरला असताना
फिरोझ रानडे / ४८

**लेख :**

सहकार भारती : परिवर्तनाचे नवे पाऊल
विनय सहस्त्रबुद्धे / ३०

रा. स्व. संघाची पंचपदी शिक्षणपद्धती
लक्ष्मीकांत जोशी / ३५

समाजसुधारणा करावी तर
हिंदुत्वनिष्ठांनीच अशी प्रतिमा व्हावी.
प्रा. शेषराव मोरे / ३८

डॉ. हेडगेवार : एक स्थितप्रज्ञ योगी
विद्याधर गोखले / ४५


ख्रिश्चन धर्म : वैचारिक परिवर्तनाच्या वाटेवर
डॉ. फेलिक्स मच्याडो / ५१


संघधर्माचे निर्माते — डॉ. हेडगेवार
रत्नाकर महाड / ५९

# दिल्लीतील प्रज्ञाभारतीचे विचारमंथन

डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर

‘...खरा प्रश्न आणखीनच वेगळा आहे. आपल्या भोवतालचे सारे जग, सारे संदर्भ झपाट्याने बदलताहेत. ‘ग्लोबल व्हिलेज’ आणि ‘ग्लोबल कल्चर’ या गोष्टी आपल्यासमोर साकार होत आहेत. या बदलत्या परिस्थितीत संघाचे योगदान काय असेल याचाही विचार आपण करावयास हवा...’





वीस पंचवीस वर्षापूर्वीची गोष्ट. 'समाज प्रबोधन पत्रिकेच्या' पहिल्याच अंकात संपादकांनी नेमके वर्मावर बोट ठेवले होते. त्यांनी लिहिले होते -

'उसात पैसा आहे. व्यापारात पैसा आहे. द्राक्षात पैसा आहे. तसा पैसा विचारात नाही. आणि विचार हे ज्यांच्या उपजीविकेचे साधन आहे त्याही मंडळींच्या मनात आज पैशालाच महत्त्व आहे. समाजातील या मंडळींचा स्वतःवरील विश्वास उडाला हे आपल्या आजच्या अवनतीचे एक प्रमुख कारण आहे'

आता समाज प्रबोधन पत्रिका बंद पडूनही दशक ओलांडले आहे. साऱ्याच नद्यातून भरपूर पाणी वाहून गेलय. - पाणी कसले वाहून गेलय. साऱ्याच नद्या नुसत्या कोरड्या ठणठणीत पडल्यात! विचार ही विचारात घेण्याची गोष्ट आहे असे सुद्धा आपण आज मानत नाही. घोषणा, आवाज, मनगटी सामर्थ्य यांनी आपण प्रश्न सोडवतो. रिडल्स पासून गांगल, बेहरे, महात्मा फुले, सोबत प्रत्येक गोष्टीत आपण हे करतोय. मी सोबत परिवारातला नाही. सोबत फारसा वाचत पण नाही. महात्मा फुलेंना पण मी फार मानतो. - पण सोबत जाळणे,

आपल्याला न पटणारी मते मांडली म्हणून जाळणे, हा एक महाभयंकर प्रकार आहे असे मला प्रामाणिकपणे वाटते. लोकशाही मूल्ये आणि व्यक्तीस्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य याचे महत्त्व आम्हाला समजावून देण्यात स्वतःची हयात घालवलेले महाराष्ट्रातील थोर थोर वृद्ध विचारवंत नेते या विरुद्ध आवाज उठवत नाहीत त्यावेळी गुदमरुन जायला होते. लोकशाहीची एक सहज सुंदर प्रतिज्ञा असते. - 'तुझे मत माझ्याविरुद्ध असेल तर ते मी जरुर खोडून काढीन. पण तुझे मत तुला मांडावयास अधिकार नाही असे कोणी म्हणाले तर त्याविरुद्ध तुझ्या बाजूने प्राणपणाने लढेन!' - पण आज सारेच बदललेय. माणसे लोकशाहीचा जयघोष करतात. मात्र त्याच वेळी खोमेनी आणि सोबत जाळणारे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे विसरुन जातात. मला न पटणारी मते हा माणूस कशी मांडतो ते पाहतो ही थरकाप उडविणारी, लोकशाहीचा, विचारस्वातंत्र्याचा गळा घोटणारी प्रवृत्ती या दोन्हीत गुणात्मक दृष्ट्या सारखीच आहे हे आपण विसरलोय. आपल्या लोकशाहीच्या व्याख्या पण आज बदलल्यात. दिवस फार दूर नाहीत. लोकप्रतिनिधी निवडतांना, त्याचे चारित्र्य, बुद्धिमत्ता, वादविवाद कौशल्य यापेक्षा त्यांना कुस्ती, मुष्टीयुद्ध, हुतूतू, कराटे या गोष्टी किती चांगल्या येतात ते आपण तपासायला लागू! - प्रथमच सांगितल्या प्रमाणे विचार ही विचार करावयाची गोष्ट आहे असे आपण मुळी आज मानतच नाही. आपण सारेच जण आज बनलोय होळीचे होळकर. टळटळीत सूर्य डोक्यावर आहे आणि रणरणीत वाळवंटातून आपण चाललोय.

☐

उन्हात जीव गुदमरत असतानाच अचानक वळवाची एक छान सुरेख सर येते. हा वळवाचा पाऊस, मृगाचा पाऊस की हे स्वातीचे थेब याचा सुद्धा विचार करावासा वाटत नाही. हे सारे हिशेब नंतरचे. - प्रज्ञा भारतीचे दिल्लीतले एक दिवसाचे विचार मंथन कसे छान ताजेतवाने नवे करुन जाते. आपण का आणि कसे मोहरुन गेलो हे शब्दात झेलता येईलच असे नाही. पण हे शब्दात झेलून इतरत्र पोचवण्याचा प्रयत्न केला नाही तर आपणही संपूर्णपणे मनातल्या मनात होळीचे होळकर बनलोय असे होईल. आणि खरे सांगायचे तर दिल्लीतील होळीही वेगळी असते. ती गुलाल आणि रंग उधळत येते. दोन द्यावेत, दोन घ्यावेत. दिलखुलासपणे एकमेकांना मिठ्या पण माराव्यात आणि चिमटे पण काढावेत. - एप्रिल फूल आणि रंगपंचमी हे दोन दिवस एकाच दिवसात बसवून दिल्लीतील होळी रंगांची आतषबाजी करते. होळी संपलीये. पण अजून ती मनात आणि हवेत भरुन उरलीये. दिल्लीतील हवा कशी छान आहे. दिल्लीतले सांस्कृतिक कार्यक्रम धुमधडाक्यात सुरु आहेत. विझताना दिवा मोठा होतो ना तसा हा प्रकार आहे. आता काही दिवसांनी दिल्लीतील भाजून काढणारी भट्टी धगधगून पेटेल. त्यापूर्वीच्या या छान हवेत जमतील तेवढे कार्यक्रम झपाट्याने उरकले जातात. मग कोणत्या कार्यक्रमाला जायचे याची पंचाईत होते. २२ मार्चला होळी संपलीये. २६ मार्च हा त्यानंतरचा पहिला शनिवार. या एकाच दिवशी मलाच काय कोणालाही आवडतील असे किमान तीन छान कार्यक्रम आहेत. - हवामानाचा अंदाज १५ दिवस आधी अचूक सांगू शकणाऱ्या बलभीम संगणकाचे (Super Computer) आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन आहे. डॉ. वसंतराव गोवारीकर भेटतात त्यावेळी या कार्यक्रमाला अगत्याने बोलवतात. एरवी मला या कार्यक्रमाला जायला खूप आवडले असते. पण आज हे होणे नाही. काल काही वेगळ्या संदर्भात मधू लिमयेशी फोनवर बोललोय. त्यात नकळत समजलय की लोहिया जन्मशताब्दी निमित्त दिवसभर चाणक्यपुरीत विचार मंथन आहे. प्रकृती फारशी बरी नसताना पण लिमये दिवसभर तेथे असणार. लोहिया हा मला मनापासून महापुरुष वाटतो. मधू लिमयेंच्या पेक्षा नानाजी देशमुखांच्याकडून त्यांच्या कर्तृत्वाचे पोवाडे अधिक ऐकलेत. त्यातून लोहिया मला अजूनही हिमखंडासारखे आहेत. फार थोडे समजलेत. खूप समजावून घ्यावयाचे आहेत. माझ्या दृष्टीने तो आहे अजून फारसा न वापरला गेलेला, पण या देशाचे प्रश्न सोडवू शकणारा बलभीम संगणक. पहिल्या कार्यक्रमापेक्षा या कार्यक्रमाला जाणे नक्कीच खूप अधिक महत्त्वाचे आहे. पण मी या कार्यक्रमाला पण न जाण्याचे ठरवलय. कारण दोन दिवसापूर्वी एक मजेशीर फोन आलाय. कॉन्स्टिट्युशन क्लबमधे प्रज्ञाभारतीचा हेडगेवार जन्मशताब्दी निमित्त 'राष्ट्राचे नवनिर्माण, राष्ट्राची पुनर्रचना आणि संघ' यावर एक परिसंवाद आहे. या विचार मंथनात संघ पठडीतले नामवंत पत्रकार के. आर. मलकानी, मोरेश्वर तपस्वी, एकवेळ म्हणजे ४७-४८ साली दिल्लीवर राज्य करणारे संघाचे वसंतराव ओक वगैरे लोक बोलणार आहेत. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ दुभाषी आणि डॉ. विद्यासागर विचार मांडणार आहेत. त्याचप्रमाणे संपूर्ण वेगळी मते मांडणारे वा मांडू शकणारे लोक आहेत त्यात नवभारत टाईम्सचे संपादक माथूर आहेत. मला आश्चर्य वाटते. मी तेथे येऊन भाषण द्यावे म्हणून मंडळी मला आग्रह करतात. मनापासून आग्रह करतात. मला खरे तर तेथे जाऊन भाषण द्यावयास काहीच हरकत नाही. - कारण मी काही महाराष्ट्रातला कुलगुरु नाही! त्यांनी कोठे आणि काय बोलावे हे महाराष्ट्रातले, व्यक्तीस्वातंत्र्य आणि विचार स्वातंत्र्य याचे महत्त्व सांगण्यात हयात घालवलेले वृद्ध विचारवंत ठरवतात. आणि ही कुलगुरु म्हणवून घेणारी मंडळी पण ते ऐकतात! पण तरीही मी भाषण द्यावयाचे प्रयत्नपूर्वक नाकारतो. मी या विषयावर अभ्यास केलाय असे मला वाटत नाही. मात्र माझ्या मनात अनेक प्रश्न आहेत. त्याची उत्तरे मिळाली तर पहायचय. खुल्लमखुल्ला आडवे तिडवे प्रश्न विचारायचेत. त्या मंडळींनी त्याला मनापासून परवानगी दिली आहे. मला हे सारेच नवीन आहे. बालपणी मी संघात होतो. पण कॉलेजात जाण्याच्या फार आधीच मी संघ सोडला. कॉलेजात असताना नकळत माझे एक मत पक्के झाले. संघात वैचारिक चर्चा नसतेच. - गुळगुळीत शब्दावरुन घरंगळत जाउ शकणारी मने तयार करणारी बौद्धिके असतात! मला मनातल्या मनात हसू येते. आता दिवसभर ध्वजवंदन करताना मान किती अंशातून झुकली तरी चालेल आणि संघस्थानावर हुतूतू बरोबर व्हॉलीबॉल पण खेळावा की नाही यावर खुल्लमखुल्ला चर्चा होणार. एकूण मजा येणार. मी संपूर्ण दिवस या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे ठरवलय.

## दोन

पण मनापासून प्रयत्न करुनही मी संपूर्ण दिवस या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकत नाही. आयुष्यात मिळालेले अनुभव किवा पदरात पडलेले धडे आपण लौकर विसरतो. माझा या मंडळींशी शेवटचा संबंध पाच वर्षापूर्वी आला होता. 'प्रकाशवाटा' या माझ्या पुस्तकात मी त्यावर एक विस्तृत लेख पण लिहिलाय. पण त्यावेळी मी जे शिकलो म्हणून लिहिलय ते विसरलोय. आणि आफत ओढवली. झाले काय, मी घरुन कधी नव्हे ते अगदी वेळेवर निघालो. कार्यक्रम ९।। वाजता सुरु होणार आहे. संध्याकाळी सात वाजेपर्यंत चालणार आहे. सारी गणिते मनात आहेत. पण दिल्लीतली वाहनव्यवस्था हा अभिमन्यूला सुद्धा भेदता येणार नाही असा चक्रव्यूह आहे. दिल्लीच्या पोलिस कमिशनरनेच मुळी काल परवा सांगितलय. मुंबई, मद्रास, कलकत्ता या तीन शहरात मिळून जेवढी वाहने आहेत त्यापेक्षा अधिक वाहने एकट्या दिल्लीत आहेत. बैलगाडी, हातगाडी, सायकल, सायकल रिक्षा, स्कुटर रिक्षा, मारुती, अॅबेसेडर, आणि इंपाला आणि टोयोटा सारे एकाच वेळी चाकाला चाक घासत रस्त्यात खोळंबून उभे आहेत. - आम्ही कोणीच काही करु शकणार नाही? - अशा वेळी माणसाने १०-१५ मिनिटे उशीरा पोचणे हा दिल्लीतला आज राजमान्य रीतीरिवाज आहे. मी फक्त मोजून पाच मिनिटे उशीरा पाचलोय! पण कार्यक्रम सुरु झालाय. कॉन्स्टिट्युशन क्लबमधला हॉल भरलाय. गोलमेज परिषदेसारखे लंबवर्तूळाकार मेंज आहे. त्याच्या भोवती खुर्च्यांच्या तीन-चार रांगा, शंभर एक माणसे मावतील येवढी जागा. हॉलमधील बहुतेक सर्व जागा भरल्यात. टेबलाला लागून असलेल्या खुर्च्यांत तर फक्त एक जागा मोकळी आहे. दारावरचा माणूस, मला यापूर्वी कधी पाहिलेले नसूनही परिचयाचे हास्य देत हसत हसत ओळखतो. नेमके माझ्या जागेवर नेऊन ठेवतो. मी बसण्यापूर्वीच पावलांचा आवाज न करता आणखी कोणी येऊन माझ्या समोर गरम गरम कॉफीचा कप ठेवून पसार होतो. - या येवढ्या लोकांना दिल्लीसारख्या ठिकाणी नेमक्या वेळेवर येऊन वेळेवर कार्यक्रम सुरु करावयास कसे जमते? न पाहिलेल्या लोकांना हे लोक नावावरुन कसे ओळखतात? मनात हे प्रश्न येतच नाहीत. सहजपणे आठवते - लहानपणी संघात शिकवलेली एक ओळ - 'संघात हाय काय, संघात हाय काय? संघात गेल्याबिगर कळायचं नाय नाय!'

□

पण कविता वगैरे आठवावयास वेळ नाही. कार्यक्रम सुरु झालाय. संघाचे अखिल भारतीय बौद्धिक विभाग प्रमुख आहेत. इंदर मल्होत्रा सारखा पत्रकार आहे. सुशीला नय्यर आल्यात. प्रास्ताविक संपते आणि मलकानी बोलावयास उठतात. हे एकवेळचे ऑर्गनायझरचे संपादक. संघ स्वयंसेवकांच्या दोन तीन पिढ्या निर्माण करण्यात यांची हयात गेली. पण त्यांचे भाषण सुरु होते आणि कार्यक्रम किती वेगळा आहे, विचार मंथन किती प्रामाणिक आहे याचा प्रत्यय येतो. अस्वस्थ होऊन विचार करत ते प्रश्न विचारतात. संघाने आपल्या आत्तापर्यंतच्या वाटचालीत राक्षस पैदा केले नाहीत तर सद्गृहस्थ, चांगली माणसे तयार केली हे सहजपणे सांगत असतानाच, जणू ते संघाचे सामर्थ्य कोणते आणि मर्यादा कोणत्या, त्या मर्यादा ओलांडून संघ कसा पुढे जाऊ शकेल हे त्यांना सांगायचय. हे काम किती कठीण आहे, म्हणजे हे असे समजावून सांगणे सुद्धा किती कठीण आहे हे ते ओळखत असावेत असे सारखे वाटत राहते. कारण ते काही विवेचन करतात, विवेचनाच्या आधारे प्रश्न विचारतात आणि त्या प्रश्नाला तसेच सोडून ते पुढच्या प्रश्नावर जातात. साऱ्या प्रश्नातून एक विचार किती सहजपणे, समर्थपणे समोर येत असतो. त्यांचे हे प्रश्न तसे क्रमवार सांगावयाचे म्हटले तर असे असतात. १) संघ राष्ट्रीय जीवनातील प्रमुख प्रवाह केव्हाही का बनला नाही? गांधीजीच्या काळात कॉंग्रेस अशी होती. त्या काळी अस्तित्वात असून संघाला ते त्यावेळी व आजही का जमले नाही? २) संघाच्या प्रचारकांनाही आज याची जाणीव होते आहे किवा ते नकळत त्या दृष्टीने विचार करताहेत ही चांगली गोष्ट आहे. मध्यंतरी माझ्याकडे पंजाबचा एक प्रचारक आला होता. तो म्हणाला पंजाबमधील २८ टक्के लोक संघाला आपला मानतात. तो संघातील उपस्थितीबद्दल बोलत नव्हता. त्याच्या बाहेर जाऊन विचार करत होता. माहिती गोळा करत होता ही स्वागतार्ह गोष्ट आहे. पण पंजाबसारख्या ठिकाणी पण फक्त २८ टक्के लोकांनाच आज संघ आपला का वाटतो? - पंजाबात तर मुसलमान नाहीत. आणि शिखांना आपण मनापासून हिंदूच मानत आलोय. ३) याला कारणे अनेक असतील. मी मध्यंतरी मथुरेला गेलो होतो. तेथील एक गोस्वामी मला म्हणाले, संघाबरोबर फक्त लाठीकाठीच का? कला, नृत्य, साहित्य, संगीत सारे हवे; जीवनाचा आणि संस्कृतीचा हा महत्त्वाचा भाग आहे. ४) ते सारे राहू देत. साऱ्या लोकांना आपली वाटेल, त्यांच्या ओठावर बसेल अशी एखादी ओळ सुद्धा आपण देऊ शकलो नाही. गांधीजीच्या 'रघुपती राघव राजाराम' मधे ही जादू (deep appeal) होती. ५) गांधीनी स्त्रियांना सहजपणे चळवळीत आणले. आपणाला ते जमले नाही. संघ वाढला. समिती का वाढली नाही? खरे पाहता समिती अधिक वाढणे जरुरीचे आहे. ६) हे वरवरचे मुद्दे आहेत. आपण आणखी खोलवर गेले पाहिजे. विचारात, विचारधारेत सच्चाई, खरेपण हवे. ७) खरे प्रश्न कोणते? धर्म म्हणजे काय? धर्माचे इतिहासात महत्त्व काय होते? आपण एकेक गोष्टी विचारात घेऊ. मध्ययुगात धर्मासाठी नव्हे प्रामुख्याने सत्तेसाठी लढाया झाल्यात हे आपण विसरलोय. ८) चंगीजखान मुसलमान नव्हता. आपण आपले खान म्हणून मुसलमान म्हणून मोकळे होतो. चंगीजखान बौद्धधर्मीय होता. प्रश्न धर्माचा नव्हता, सत्तेचा होता! ९) १८५७ पूर्वी ब्रिटीशांनी बंगाल, बिहार अशा रेजिमेंट्स ठेवल्या होत्या आणि त्यावेळी स्वातंत्र्ययुद्धात हिंदु-मुसलमान अगदी बरोबरीने लढले. १०) त्यावेळी एक प्रक्रिया ब्रिटीशांनी सुरु केली. ४७ साली हिंदू आणि मुसलमान दोघेही कापले गेले. आणि दोघांनीही एकमेकांवर आरोप केले. अगदी प्रामाणिकपणे केले. ११) पण अजुनही आपण एक लोक आहोत. तुम्ही पाकिस्तान बंगाल मधील लोकांशी बोला, दूरदर्शनवरील त्यांच्या सिरिअल्स पहा. - आयुष्य तेच आहे. प्रश्न तेच आहेत. मनापासून जपत आणलेली जीवनमुल्ये पण नेमकी तीच आहेत. १२) थोडा विचार केला तर हे या देशाच्या

इतिहासातले बुडबुडे आहेत हे समजते. या कायम टिकणाऱ्या गोष्टी मुळीच नाहीत. झगडे काय भावाभावात होत नाहीत? आपण जोडणार कसे ते पहावयास हवे. आज सुद्धा पाकिस्तान हा पश्चिम आशिया आणि हिंदुस्तान यांना जोडणारा सेतू बनू शकतो. १३) हिंदुस्तान, पाकिस्तान व हिंदू, मुसलमान यांना आपण जवळ कसे आणू शकू आणि त्यात संघ काय योगदान देऊ शकेल हे आपण पाहिले पाहिजे. हे काम संघ अधिक चांगल्या प्रकारे करेल. संघ हिंदुंच्यावर अन्याय होणारी कोणतीही गोष्ट करणार नाही, अशी आपली जनमानसात प्रतिमा आहे. त्यामुळे संघाने मुसलमान, पाकिस्तान यांना समजावून घेण्यासाठी काही केले तर लोकांचा गैरसमज होणार नाही - रिपब्लिकन रशियाशी बोलणी करतात तेव्हा अमेरिकन जनतेला त्यात वाईट वाटत नाही व म्हणून रिपब्लिकन लोकांना हे जमले, त्यातला हा प्रकार आहे. १४) खरा प्रश्न आणखीनच वेगळा आहे. आपल्या भोवतालचे सारे जग, सारे संदर्भ झपाट्याने बदलताहेत. 'ग्लोबल व्हिलेज' आणि 'ग्लोबल कल्चर' या गोष्टी आपल्यासमोर साकार होताहेत. या बदलत्या परिस्थितीत संघाचे योगदान काय असेल त्याचाही विचार आपण करावयास हवा.

□

'पेरिस्ट्रॉइका' आज जगभर सर्वत्र अपरिहार्यपणे घडतोय याची आठवण करुन देणारे मलकानीचे भाषण संपले. जगभर आज काही तरी विलक्षण घडतय. रशियात आणि संघात मोकळी चर्चा आणि विचार हवा म्हणून आग्रह धरला जातोय आणि त्याचवेळी आणखीपण काही वेगळे घडतय. व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी मंडळी मते मांडली म्हणून वृत्तपत्रे जाळा असे महाराष्ट्रात सांगताहेत! व्यक्ती म्हणून तुम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य आहे. तुमचे खाजगी जीवन हे तुमचे खाजगी जीवन आहे. तुमच्या सार्वजनिक जीवनाशी त्याचा काही संबंध नाही म्हणणाऱ्या अमेरिकेत लग्नबाह्य थोडा वाह्यातपणा केला म्हणून माणसाला मंत्री होता येत नाहीये. जगभर काहीतरी नवे घडते आहे. एक गोष्ट तर उघड आहे. संघाची मंडळी पण मनातल्या मनात अस्वस्थ आहेत. परराष्ट्रमंत्री असताना वाजपेयीचे पाकिस्तान जवळ जाणे, सरसंघचालकांनी राजीव, कॉंग्रेस बद्दल काही धक्कादायक मते मांडणे, संघ-शिवसेना युती वाटते तितक्या सहजपणे न होणे, या साऱ्या गोष्टी वरवर वाटतात तेवढ्या वरवरच्या नसणार. आणखी पण एक शक्यता आहे. पण विचार वगैरे करावयास वेळ नाही. कारण हिंदुस्तान टाईम्सचे संपादक राजेन्द्र माथूर भाषण द्यायला उठलेत. महाराष्ट्राला पटेल अशा शब्दात सांगायचे तर हे उत्तरेतले गोविंदराव किंवा गडकरी. - एका मोठ्या उद्योगपतीच्या खांद्यावर ही मंडळी उभी असतात. त्या उद्योगपतीला किंवा त्यांच्या उद्योगांना बाधा येणार नाही याची काळजी घेत या मंडळीना पाहिजे त्या विषयावर पाहिजे ते बोलायचे स्वातंत्र्य असते. या खांद्याचा किंवा खुर्चीचा आधार असतो तोवर ही मंडळी विचारांच्या क्षेत्रात मजा मजा करतात. या मंडळीचे राहू देत, अगदी अरुण शौरीला माझ्या एका जवळच्या मित्राने विचारले होते, गोएंकांच्याबद्दल माझ्याकडे काही माहिती आहे. ती वापरुन त्यांच्या आर्थिक व्यवहाराबाबत काही शोधयात्रा वगैरे लिहिशील का? हे अडचणीत पकडणे नव्हे. खरे तर आपण सारेच जण आयुष्यात कोठेतरी, अधिक करुन नोकरीच्या क्षेत्रात, फार तडजोड करत असतो. या मंडळीनी असे केले तर काही ओरडावयाचा, त्यांना नावे ठेवण्याचा आपणाला अजिबात अधिकार नाही. त्यातून या लोकांचा अभ्यास नसतो, त्यांच्याकडे विचार नसतो असे मुळीच नाही. या गोष्टी तर यांच्याकडे तर असतातच. मात्र खुर्चीचा आधार जातो त्यावेळी ही मंडळी आणि त्यांचे विचारही आपोआप बाजूला पडतात. अगदी पां. वा. गाडगीळ आणि ह. रा. महाजनी अशा थोर अभ्यासकांबद्दल हे झालेले आपण पाहिलय. पण खुर्चीवर असतात त्यावेळी या लोकांचे नाव व त्यांचे विचार घरोघर आणि ऑफीसा ऑफीसातून दिवसातून तीन चारदा चहाबरोबर घेतले जाते! त्यामुळे आणखी एक पंचाईत असते. या मंडळीना खुर्ची चढली तर एखाद्या सत्प्रवृत्त माणसापासून कोणाचीही लोक खिल्ली उडवतात. यांना विचारणारे त्यावेळी समाजात फारसे कुणी नसते आणि मग हे लोक- 'अत्रे उणे कर्तृत्व' म्हणून समाजात दहशत फिरवत हिंडतात. - हे विषयांतर नव्हे. पण या देशात वृत्तपत्रस्वातंत्र्य असावे, त्यामुळे लोकशाही वगैरे सुरक्षित रहावयास मदत होते असे आपण का म्हणतो हे आपण केव्हातरी तपासले पाहिजे. आणि सोबत सारखे साप्ताहीक जाळताना आपण नक्की कोठे जात आहोत याचा विचार केला पाहिजे. कारण या लोकांच्यावर अंकुश ठेवावयाची हिमत व ताकद थोडीफार असेल तर ती शेवटी सोबत, माणूस, साधना, विवेक, सत्यशोधक मार्क्सवादी यांच्याकडेच असते!

तर ते असो. आता बोलणार आहेत राजेन्द्र माथूर. माथूरांना मी अद्याप कधी भेटलेलो नाही. त्यांचे भाषण पण ऐकलेले नाही. मात्र त्यांचे सडेतोड, भेदक, चिमटे घेणारे अग्रलेख वाचलेत. त्यांच्या बद्दल ऐकलय पण खूप. नुकतीच एक कुजबुज झाली होती. काहीजण म्हणाले होते, राज्यसभेचे त्यांना मिळणारे सदस्यत्व त्यांनी रोखठोक भेदक अग्रलेख लिहिल्यामुळे त्यांना मिळाले नाही. त्याचवेळी दुसऱ्या मित्रांनी सांगितले होते, राज्यसभेचे खासदारपद मिळत नाही म्हटल्यावर त्यांनी चिडून तसे अग्रलेख लिहिले! - म्हणजे एकूण मला त्यांना ऐकायचय. त्यातून हे येथे बोलताहेत म्हणजे उत्तरेत अजून महाराष्ट्रासारखी वैचारिक अस्पृश्यता पाळणे सुरु झालेले नाही!

□

माथूर छान स्पष्ट आणि मुद्देसूद बोलतात. प्रथमच ते सांगतात, 'गेले वर्षभर तुम्ही मला पुन्हा पुन्हा बोलावताय. मी पण येतोय. याचा अर्थ तुम्ही माझे मतपरिवर्तन किंवा बुद्धिभेद (brain wash) कराल असे तुम्हाला वाटतय! आणि मी अजूनही तुमचे मतपरिवर्तन करु शकेन असे मला वाटतय. - हे असे वाटणे आणि बौद्धिक झटापटी सुरु असणे जरुरीचे असते, म्हणून तर इतर अनेक कामे बाजूला टाकून तुम्ही आणि मी गेले वर्षभर असे पुन्हा पुन्हा जमतोय. आपणा दोघांपैकी प्रथम कोण दमतोय आणि थांबतोय हे आता पाहायचय!'

सभेत हास्याचा एक खळखळता प्रवाह उठतो. सर्वांना तो छान ताजातवाना करुन जातो. या संधीचा फायदा घेत माथूर म्हणतात - 'मध्ययुगातील युद्धे प्रामुख्याने धर्मासाठी नव्हे तर सत्तेसाठी झाली हा मलकानीचा विचार

मला पूर्णपणे पटत नाही. माझा विचार त्याच्याही पुढे जाणारा आहे. त्याच्या संदर्भात तुम्हाला स्वातंत्र्यापूर्वी संघाची जरुरी का होती व संघाने स्वातंत्र्यापूर्वी काय केले हे तपासावे लागेल. स्वातंत्र्यानतर संघाची जरुरी आहे का? संघ काय करतो? आणि संघाने नेमके काय करायला हवे हे शोधायला हवे. अफगाणिस्तानात जे घडतय आणि व्हिएतनाम मधे जे घडले त्याचा धर्म, समर्थ शक्तीसंपन्न राष्ट्रे, जीवन पद्धती, विचार धारा, सर्वसामान्य माणूस या सर्वांशी असलेला संबंध आपणाला एकदा अभ्यासावा लागेल. हे पुन्हा पुढे केव्हातरी नीटपणे करावयास जमावे म्हणून माथूर मग एकेक मुद्दे पुढे मांडू लागतात. १)मध्ययुगात भारतातच नव्हे तर जगभर राष्ट्रवाद म्हणून काही गोष्टच अस्तीत्वात नव्हती. त्यावेळी फक्त बदलणारी राज्ये होती. - राष्ट्रवाद म्हणून काही गोष्ट अस्तीत्वात आली, युरोपात नवजागरण झाले, त्यावेळी. २) हिदू हा धर्म नाही तर जीवन शैली आहे (way of life) असे मी मानतो. अर्थात प्रत्येक धर्म नेमके हेच म्हणतो असे तुम्ही म्हणू शकाल व काल दूरदर्शनवर मुलाखत देताना आगाखान नेमके हेच म्हणालेत. ३) पण मी याच्या पुढे जातो. हिंदूधर्म म्हणजे एक 'समन्वय यंत्र', 'समन्वय मशीन' असे काही आहे. वैदिक, उत्तरवैदिक, गौतम बुद्ध, चंद्रगुप्त, विक्रमादित्य, हर्षवर्धन, संतकवी प्रत्येक कालखंडात हिंदुधर्म म्हणजे एक सुंदर समन्वय यंत्र काम करत आलय. ४) मी जे म्हणतो आहे त्याचा अर्थ नीट समजावून घ्या. दोनशे वा चारशे वर्षापूर्वीच्या हिंदूंच्या हिंदूस्तानात ठेवले तर अगदी संघाच्या स्वयंसेवकांचा सुद्धा जीव गुदमरेल. सतराशे नव्वद, तेराशे नव्वद, नऊशे नव्वद या काळातील हिंदुस्तानची, हिंदुधर्माची कल्पना करुन त्यात स्वत:ला उभे करत मागे चला. प्रत्येक कालखंडात तुमचा जीव गुदमरु लागेल. ५) हिंदूधर्मात हिदुस्तानात नक्की काय काय झालय ते समजावून घ्या. - हर्षवर्धनाच्या काळात बाजारात नरमांस विकले जात असे व ते घेऊन लोक स्मशानात वा कालीमातेची पूजा करावयास जात असत! ६) हिंदुस्तानने वा हिंदुधर्माने तीन फार मोठी आक्रमणे झेललीत व पचवलीत. त्यातले पहिले बुद्धाचे वा बौद्धधर्माचे आक्रमण मुळी हजार वर्षाचे होते. त्यानंतर इस्लामचे आक्रमण होते. त्यानंतर तिसरे पाश्चिमात्य विचारांचे आक्रमण होते. ही आक्रमणे केवळ राजकीय नव्हती. राजे वा राज्ये बदलणारी नव्हती. या गोष्टींचा विचार करावयास लागलात तर इस्लामचे आक्रमण हे समानतेचा विचार (Culture and Equlity). आग्रहाने अमलात आणणारे एक आक्रमण होते, या गोष्टीचा पण आपणाला विचार करावा लागतो. ७) हिदु मुसलमान झगड्याहून शैव वैष्णव झगडे पण अधिक भयंकर होते. म्हणजे या भांडणात या युद्धात धर्म नेमका कुठे होता हे पुन्हा तपासावे लागते. ८) मुसलमान या देशातून वेगळे झाले पण विघटनवादी सर्वत्र असतात. तुम्ही मुसलमानांच्या बद्दल जे म्हणता तेच सिलोनमधील बौद्धधर्मीय तामिळ हिंदू वा हिंदू धर्माबाबत म्हणू शकतात. विघटन म्हणजे न थांबणारी प्रक्रिया. विघटन म्हणजे अराजक! या देशात किमान चारशे पाचशे वर्षे ज्याचा इतिहास माहीत नाही असा भयंकर काळा कालखंड आहे. छोट्या छोट्या टोळ्या हिंडत असतील हव्या त्या भागावर हवा तेवढा वेळ हुकमत गाजवून पुढे जात असतील. १०) आज या देशात पुन्हा समन्वय आणि विघटन याची शर्यत सुरु आहे. या शर्यतीत विघटन जिकले तर दिल्लीत व देशात अराजक माजेल. ११) विघटन थांबवावयास किंवा समन्वय यंत्र कार्यक्षम ठेवण्यात संघाने पूर्वी काही केले का व आज संघ काय करु शकतो हा खरा प्रश्न आहे. १९२० ते १९४६ या कालखंडात गांधीच्या कॉंग्रेसने समन्वय यंत्र अंमलात आणले असे मी मानतो. या कालखंडात गावागावात संघ व हेडगेवार असताना संघाने समन्वय यंत्र अंमलात आणले का? १२) माझा शेवटचा प्रश्न वेगळा आहे. मी अनेक कारणामुळे देशाची अखंडता (unity) ही सर्वात महत्त्वाची मानतो. या देशाचे विघटन होण्यापेक्षा मला हुकुमशाही चालेल, लष्करी हुकुमशाही चालेल, साम्यवाद चालेल वा साऱ्या लोकांना गोमांस खावयास लागले तरी चालेल - देश तुटावयाची वेळ आली तर अशा वेळी, म्हणजे ही विघटनाची प्रक्रिया थांबविण्यात इतर सारे मार्ग अयशस्वी झाले (If everything fails) तर संघ उभा असेल व तो हे विघटन थांबवेल, किमान त्यासाठी सर्वस्वाची बाजी लावून प्रयत्न करेल असे मला वाटते. माझा हा विश्वास खरा आहे का हे मला माहीत नाही. पण मला संघ, संघस्थानावर जाणे, तुमच्या कार्यक्रमात येऊन वेळ देणे हे विम्याचा हप्ता देण्यासारखे वाटते. संघ हा या राष्ट्राच्या दृष्टीने विमा (Insurance policy) आहे. तू थोडाथोडा हप्ता देत रहा. राष्ट्राच्या एकतेच्या दृष्टीने मर्मान्तिक प्रश्न पुढे येईल त्यावेळी मी तुझ्या मदतीला आहे हा विश्वास संघ देणार असेल तर हेडगेवारांपासून त्या क्षणापर्यंत संघाने केलेले काम - म्हणजे तुम्ही आणि मी देत असलेले हप्ते (Premium) कारणी लागतील.

माथुरांचे सारे म्हणणे तेथे जमलेल्या अनेकांना काय मलासुद्धा पूर्णपणे पटण्यासारखे नव्हते. मलातर वाटले माथुरांना पण ते पटलेले नाही! म्हणजे त्यांना नेमके असे काही म्हणावयाचे नाही. त्यांना जरा वातावरण तापवायचंय. समोरची मडकी कच्ची का पक्की हे ते जरा ठोकून बघताहेत. पण मडकी पक्की होती. वातावरण तापले वगैरे अजिबात नाही. पहिलवानांनी अंगाला अंग घुसळवत एकमेकांच्या अंगावर लाल माती उडवत प्रेमाने चार-दोन चापट्या माराव्यात तसे काही जुजबी प्रश्न झाले. माणसाच्या शरीरातील सारे रक्त सात वर्षात बदलले म्हणजे माणूस बदलत नाही. मग दर चारशे वर्षांनी हिंदू धर्म बदलला असे आपण का म्हणता? युरोपात राष्ट्रवाद नेपोलिअनच्या लढाईनंतर आला हे फक्त युरोपच्या बाबत खरे आहे, भारताबाबत नव्हे. नंतर हिंदुधर्म-संघ याबाबत अस्तित्व, बोध, अस्मिता वगैरेही काही बोलणे झाले. पण खरे पाहता चर्चा रंगली नाही किंवा चर्चा तशी झालीच नाही. कदाचित यापूर्वी माथूर आणि या मंडळीच्या बऱ्याच झटापटी झाल्याने त्याची आता तशी जरुरी नसेल. आजकाल भारतभर परिसंवादात एक अनिष्ट प्रवृत्ती बळावली आहे. चर्चा, प्रश्नोत्तरे वेळ नाही म्हणून करत

## संघ म्हणजे राष्ट्राच्या दृष्टीने विम्याची पॉलिसी

नाहीत व चहापानाच्या सुट्टीत वक्त्याशी बोलून शंकासमाधान करुन घ्या म्हणून सांगतात. परिसंवादांना जाणे आणि परिसंवाद आयोजित करणे हाच माझा दिल्लीतील प्रमुख धंदा असल्याने किमान नव्वद टक्के ठिकाणी असे घडतय हे मी खात्रीलायकपणे सांगू इच्छितो. माझे राहुदेत, खरे पाहता दिल्लीत सध्या कामे कोणीच करत नाहीत. शास्त्रज्ञ, प्रशासक, साहित्यिक - विचारवंत सारे आपले वर्षभर परिसंवाद भरवण्यात आणि परिसंवादाला जाण्यात गुंतलेले. आता या परिसंवादालासुद्धा सवाल जवाब करायचे नाहीत तर मग छापील भाषणे आणि प्रश्नोत्तरे देण्यासाठी जोडपोस्टकार्ड एवढ्या गोष्टी लोकांच्याकडे पाठवून भागणार नाही का?

तर ते असो. पण येथे चहापानाच्या वेळी वक्त्याशी चर्चा करा असे पण काही सांगितले नाही. कारण या लोकांनी मुळी चहापानाची सुट्टीच दिली नाही. खरे पाहता चहापान आणि जेवण हे भारतातील परिसंवादांचे प्राण असतात. परदेशात, कोणत्याही देशात परिसंवादाच्या वेळी जेवण देत नाहीत. जेवणाच्या सुट्टीत मंडळीना आपापले जेवण घेऊन यावे लागते. पण आपल्या विचारवंतांची बौद्धिक भूक एवढी आहे की कोणताही परिसंवाद लग्नातील वा पंचतारांकीत जेवणाची आठवण करुन देणारा असतो. खरे पाहता या जेवणाची पण जरुरी नसते. कारण सर्वत्र चहापानाच्या वेळचे खाणे पण पेशवाईची आठवण करुन देणारे असते.

पण या मडळीनी चहापानाची सुट्टीच दिली नाही आणि बिस्किटाशिवायचा चहा प्रत्येकाच्या समोर आणून ठेवून दुसऱ्या सत्राला प्रारंभ केला! प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ व स्तंभलेखक जे. दुभाषी सत्राचे संचालन करीत होते. या सत्रात एकूण दोन भाषणे झाली. पहिले भाषण झाले प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ. विद्यासागर यांचे. देश, शेती आणि उद्योग यात गेली चाळीस वर्षे प्रगती करत असताना व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनात मानवी मूल्यांचे मात्र अवमूल्यन का घडतंय, राष्ट्रविरोधी व विघटनवादी शक्ती का वाढताहेत यांचा विचार आपण केला पाहिजे हे त्यांनी आग्रहाने सांगितले. आपल्या प्रगतीचा आलेख आखतानाच आपण काही मूलभूत चुका केल्याने हे घडतंय का ते तपासत असतानाच नेहरू पहिल्यापासून अनेक गोष्टीत कसे चुकत होते ते त्यांनी त्यांच्या पद्धतीने साधार मांडले. राजकारणी माणसाला उद्या जे घडणार ते आज पहाता यावे लागते. नेहरूंच्याकडे याचा खडखडाट होता. त्यांनी एक उदाहरण दिले. सर्वपल्ली गोपाळ यांनी लिहिलेल्या जवाहरलाल नेहरू या पुस्तकाच्या दुसऱ्या खंडात पान 14 वर 1946 मध्ये नेहरूंनी ब्रिटीश पत्रकार जेम्स मार्स यांच्याकडे ठामपणे केलेली विधाने दिलीत. ती तीन विधाने अशी आहेत. (१) कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तान होणार नाही. (२) ब्रिटिश या देशातून गेल्यावर या देशात जातीय दंगली अजिबात होणार नाहीत. (३) भारत कधीही प्रभुसत्ता बनणार नाही. हे सारे सांगत असतानाच संघ काय सांगतो ते पण डॉ. विद्यासागर यांनी सांगितले. ते म्हणाले, 'संघ या देशातील साऱ्यांनाच हिंदू समजतो. सारे स्वतःला हिंदु समजतात की नाही एवढांच खरा प्रश्न आहे. आणि संघ काही नवे सांगत नाही. ही या देशाची परंपरा आहे. 'The RSS rightly belives, "Irrespective of their way of workship, creed or language, Indians all through the *history been called hindus or* Bharatiya and their country as Hind, Hindostan or Bharat. The word Hindu does not refer to any religious sect or creed, it is synonym for nation. Bharat is Hindu nation" But muslims and Christains consistantly refuse to call themselves as Hindus and *emphasise their distinct character.*

दुसरे भाषण माजी खासदार प्राध्यापक सोधी यांचे झाले. नेहरूंच्या शेवटच्या दिवसात नेहरूंबरोबर परदेशात हिंडताना मनातून उध्वस्त झालेले व आतबाहेर हादरलेले नेहरू आपण कसे पाहिले, खान अब्दुल गफारखान यांनी संघाबद्दल कसे प्रशंसोद्गार काढले होते वगैरे त्यांनी सांगितले. खरे पाहता या दोन्ही भाषणात तसे नवे काही नव्हते. संघाचे स्वयंसेवक नेहमी जे बोलतात वा बौद्धिकात ऐकतात ते त्यात होते. कौतुक वाटले जे. दुभाषीचे. त्यांनी फार कुशलतेने सत्राचे संचालन केले. त्यांना दाद द्यावीशी वाटली

या सत्रानंतर चर्चेला वेळ नव्हता. मंडळी सकाळपासून चार-साडेचार तास खुर्चीवर बसून होती. आता जेवणाचा फक्त अर्धा तासाचा विश्राम होता. त्यात विचाराचे आदान प्रदान करावे अशी अपेक्षा होती. - हा विचारवंतांना किंवा वैचारिक झटापटी करणाऱ्या मंडळीना अक्षरशः काट्यावर तोलून पिळण्याचा प्रकार होता. माझ्या आत्तापर्यंतच्या माहितीप्रमाणे यापूर्वी असा प्रकार फक्त माओने केला होता. परिसंवादास येताना वा विमानातून प्रवास करताना प्राध्यापक, शास्त्रज्ञ, प्रशासक यांनी आपापले डबे बरोबर ठेवावेत असे त्याने फर्मान काढले होते. मंडळी अजून माओपेक्षा एक पाऊल मागे होती. जेवण अगदी साधे पण चेवदार होते. एक भाजी, एक आमटी, साधा भात, तंदुरी रोटी असा दिल्लीतील धाब्यावर असतो ना तसा बेत होता.

मी माथुरांना गाठले. त्यांना म्हटले तुमचा विचार मला पटला. किंवा तो माझाच विचार आहे असे मला वाटले. पण कोणत्याही गोष्टीपेक्षा देशाच्या अखंडतेला आपण अधिक महत्व देतो म्हटल्यावर, १९४७ साली जीनांच्या हातात अखंड भारत देऊन चालते व्हा म्हणून *ब्रिटीशांना सहजपणे सांगणारे* गांधी आणि कोणतीही किमत मोजून फाळणी नाकारा म्हणणारे सावरकर यांच्यापुढे आपण एक पाऊल जातो. म्हणजे तुमच्या म्हणण्याचा अर्थ फाळणी स्वीकारण्यापेक्षा या देशात ब्रिटिश आणखी काही दशके राहिले असते तरी चालले असते असा होतो. याबाबत तुम्हाला नक्की काय वाटतय ते मला समजावून घ्यायचंय. माथूर म्हणाले, तुमचा मुद्दा नवा आहे. एकदा सवडीनं या, सविस्तर बोलू. मला पण तेथून सटकायचेच होते. मला खरे प्राध्यापक सौधीना भेटावयाचे होते. त्यांची आग्रही मते मला पटली नव्हती. एकांगी वाटली होती. पण तो माणूस, त्याची सांगण्याची पद्धत, त्याची कळकळ फार भावली होती. उंच, सडपातळ, खादीचा पायजमा, नेहरू शर्ट, जॅकेट घातलेले सौधी फार जवळचे वाटले होते. जवाहरलाल नेहरू विद्यापीठासारख्या मान्यवर आणि डाव्यांचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या ठिकाणी हा माणूस आपला झेंडा घेऊन न चिडता हसत हसत कसा उभा असेल हे समजावून घ्यावयाचे होते. पण तो योग

नव्हता. सौधी दीनदयाळ केंद्राचे नवे सचीव प्राध्यापक महेश वर्मा बरोबर गप्पा मारत उभे होते. महेश त्यांच्याच शरीरयष्टीचा, त्यांच्यासारखेच कपडे घातलेला. महेशला मी वर्षापूर्वी एकदा भेटलोय. सौधीसारखाच दिसणारा महेश मला पहिल्याच भेटीत आवडला होता आणि मनमोकळा वाटला होता. त्यावेळी नानाजींनी त्याची आणि माझी ओळख करून दिली होती. त्यावेळी नानाजी त्यांचे आंतरप्रांतीय, आंतरभाषिय लग्न लावण्यात गुंतले होते. वर्ष होऊनही महेशने मला लगेच ओळखले. ही माणसे हे शिक्षण कसे घेतात हा पुन्हा एकदा प्रश्न पडला - समाजात आणि माणसात माणसांना गुंतवल्यावर हे होते का? मी गेल्या वर्षात दीन दयाळ केंद्रात अजिबात का फिरकलो नाही याची तो चौकशी करतो. तो म्हणतो, 'आणखी काही वर्षांनी आपणासर्वांनाच तेथे भेटायचंय. नानाजींनी सध्या वृद्धाश्रमाची नवी कल्पना पुढे मांडलीय. म्हातारी माणसे घरापासून व समाजापासून दूर फेकली जाताहेत. त्यांना एकत्र आणून आपुलकीचे जग द्यावयाचे व त्यांची ताकद समाजासाठी वापरावयाची अशी काहीशी ती योजना आहे. तो हसतो, म्हणतो, 'अजून तुला मला त्यासाठी खूप वर्षे आहेत. पण योजना समजावून घ्यावयास तरी एकदा नक्की ये. पण बोलणे तसेच राहते. नेमकी २९ मिनिटे आणि साठ सेकंदे संपलेली असतात आणि नवे सत्र सुरु होते!

□

भारतभरच्या विचारवंतांनी केलेला एक अलिखीत करार आहे. जेवणानंतर कोणत्याही परिसंवादाला आलेले निम्मे लोक निघून जातात. उरलेल्यापैकी काही बेरके लोक कोपऱ्यातील जागा अडवून छान डुलक्या काढतात. येथे पण जेवणानंतर लोक निघून गेले नाहीत असे नव्हे. पण फार थोडे लोक निघून गेले. डुलकी वगैरे काढण्याचा फारसा प्रश्न नव्हताच. कारण वातावरण छान वादळी बनले होते. संघ पठडीतील माणसांची दोन प्रमुख भाषणे होती. एक मो. ग. तपस्वी यांचे. दुसरे वसंतराव ओक यांचे. तपस्वी माझे जवळचे मित्र आहेत. पण त्यांचे भाषण मी प्रथमच ऐकत होतो. ते इतके छान बोलत असतील याची मला कल्पनाच नव्हती. परिसंवादामधील सर्व भाषणात त्यांच्या भाषणाला भाषण म्हणून पहिला क्रमांक द्यावासा वाटला. मोजके-नेमके विचार व ओघवती भाषा याच्या सहाय्याने संघाची सनातन भूमिका त्यांनी समजावून दिली. रामायण-महाभारत काळापासून धर्म, राष्ट्र याबाबतच्या कल्पना कशा या भूमीत स्पष्ट आहेत आणि संघ त्याच गोष्टी पुन्हा का सांगतो हे त्यांनी पटवून देण्याचा प्रयत्न केला. संघाचे नेमके कार्य सांगताना ते म्हणाले, 'संघ हा वृक्षाच्या जमिनीत असलेल्या मुळ्यांसारखा आहे. याचा अर्थ संघ भूमिगत आहे असे नव्हे; पण संघ ज्या क्षणी बाहेर दिसेल त्याच क्षणी संघ संपेल कारण झाडाची मुळे जेव्हा जमिनीवर येतात त्यावेळी काय होते हे आपणाला माहीत आहे मात्र आज ती मुळे खोलवर जमिनीत पसरलीत आणि एक विशाल वटवृक्ष तुमच्यासमोर उभा आहे. तो वृक्ष आज फळांनी डवरलाय. छाया देतोय. संघ परिवारातील प्रज्ञा भारती, दीन दयाळ प्रतिष्ठान, विवेकानंद केंद्र, अनेक ठिकाणी तुम्ही ते पाहचलयं. त्यानंतरचे भाषण श्री वसंतराव ओक यांचे झाले. ते भाषण माझ्या दृष्टीने तसे महत्त्वाचे होते. ४७ साली दिल्ली वसंतराव ओकांच्या हाताच्या इशाऱ्यावर हालत असे. नेहरूंनी त्यावेळी त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळातील जागा देऊ केली होती. पण त्याचवेळी ते नागपूरच्या नजरेतून उतरले. त्यानंतर काही काळ ते तसे अज्ञातवासातच होते. या संघटनेत मधोकपासून ओकांच्यापर्यंत अनेक माणसांचे क्षणात असे कसे करता येते, हे चांगले की वाईट, त्या माणसांना नंतर त्या संघटनेबाबत काय वाटते, हे त्यांच्या भाषणातून समजावून घ्यावयाचे होते. पण तसे काही झाले नाही. स्वगृही परतलेले यशवंतराव व शरदराव जसे समजून छान बोलत तसे ते बोलत होते. मात्र छापील भाषणाच्या पलीकडे जाऊन ४६-४७ साली काँग्रेसच्या साऱ्या प्रमुख नेत्यांना भेटून त्यांनी फाळणीला विरोध करावा व संघ त्यांच्याबरोबर राहील, हे संघाचे मत सांगण्याचा आपण कसा प्रयत्न केला होता ते त्यांनी सविस्तर सांगितले. गांधी आणि हेडगेवार यात मुलभूत फरक नव्हते. गांधीजी पण हेडगेवारांच्याप्रमाणे या देशाला सनातन (Ancient) राष्ट्र समजत आणि म्हणून त्यांनी जिनांना या देशाची फाळणी कधीच संभवत नाही हे कसे सांगितले होते हे त्यांनी सांगितले. पण गांधींनी या देशाच्या गौरवशाली परंपरेच्या विरुद्ध असलेल्या काही गोष्टींशी समन्वय करण्याचा प्रयत्न केला असे त्यांचे म्हणणे होते.

नंतरचे भाषण जनसत्ताच्या संपादकांचे होते. जनसत्ता हे लोकसत्तेचे हिंदी भावंड. म्हणजे सकाळी गोविंदरावांचे भाषण झाले होते व आता माधवरावांचे भाषण होते. ते भाषण ऐकताना मला नकळत एक गोष्ट जाणवली. संघाला विरोध करणारे आम्ही सारेच पण नकळत पुन्हा पुन्हा एका गोल वर्तुळात मनातल्या मनात चकरा मारत असतो. त्यातून पुन्हा नकळत आमच्या मनात एक आधार तयार होतो. संघाने हिंदूंची संघटना बांधण्यास सुरुवात केली. हिंदू असे एकत्र येताहेत, संघटित होताहेत म्हणून, त्याची प्रतिक्रिया म्हणून मुसलमान एकत्र आले व देशाची फाळणी झाली!

पण आपापल्या वर्तुळात छानपणे फिरणाऱ्या या तीन भाषणांपेक्षा खरी लक्षात राहिली ती वादळी चर्चा. या चर्चेतही संघाच्या स्वयंसेवकांपेक्षा संघावर रागावून बाहेर पडलेले स्वयंसेवकच अधिक बोलले. ही जुगलबंदी किंवा झटापट अगदी छान झाली आणि आमच्यासारख्या बाहेरच्या लोकांच्यासमोर पण खुल्लमखुल्ला झाली. या चर्चेत खूप काही बोलले गेले. ते सारेच काही बाहेरच्या लोकांना सांगणे खरे नाही. पण ही चर्चा वरवरची नव्हती तर आत खोलवर कुठेतरी सलणारी होती हे समजावून द्यावयास एक-दोन उदाहरणे पुरेशी आहेत. पंचवीशीतील एक निष्ठावान स्वयंसेवक म्हणाला, आमच्या

---

**गांधीजी हेडगेवारांप्रमाणे या देशाला सनातन राष्ट्र समजत.**

---

आधीच्या पिढीने कोणत्याच गोष्टीना विरोध का केला नाही हा आम्हाला प्रश्न पडतो. या देशात अल्पसंख्यांकांच्यासाठी जास्ती सवलती का ठेवल्या गेल्यात? देशाची फाळणी अखेर या अल्पसंख्यांकांनीच केली होती. संघातून बाहेर पडलेल्या पन्नाशीकडे झुकलेल्या एका स्वयंसेवकाने त्याला तेवढ्याच छद्मीपणे उत्तर दिले. - अरे, 'झाले ते चांगलेच झाले. आम्ही ते मुद्दामच केले. आमच्या मनात हिंदू राष्ट्राची जी संकल्पना होती त्यात सिलोन, ब्रह्मदेश, थायलंड, इंडोनेशिया हे सारे भारताचे एकवेळचे भाग येतात. त्या विशाल हिंदू राष्ट्रात आम्ही अल्पसंख्य होतो म्हणून आम्ही अल्पसंख्यांकांच्या साठी ह्या सोई करून ठेवल्यात.' संघातून बाहेर पडलेला, पन्नाशी उलटलेला एक स्वयंसेवक तर आणखी अधिक बोलला. तो म्हणाला, 'एकनाथजी रानडेनी बोट धरून मला संघात नेले. आम्ही प्रांत, भाषा मानत नव्हतो. हिंदुत्वाची मशाल हातात घेऊन पुढे जात होतो. प्रांत, भाषा यांचे बोट धरुन पुढे आलेल्या आणि काल हिंदुत्वाचा नारा देणाऱ्या एखाद्या प्रांतीय संघटनेचे बोट धरून आम्हाला आज पुढे जावे लागतेय. आणि आम्ही अभिमानाने आमचे संस्थापक हेडगेवार यांची जन्मशताब्दी साजरी करतोय. आणि संघाने काय कार्य केले याची आकडेवारी देताना सध्या संघ मुडदे जाळण्यासाठी किती अंत्यसंस्कार संस्था चालवतो आणि संघाच्या स्वयंसेवकांनी एकूण कुठे कुठे आणि किती पाणपोया उघडल्यात हे सांगतोय. आम्ही यासाठी संघात आलो नव्हतो.'

माझ्या मनात पण खूप प्रश्न होते. पण प्रश्न मनातच ठेवले. वेळ झाला होता. त्यातून आपला फारसा अभ्यास नसताना वातावरण आणखी तापवण्यात पण अर्थ नव्हता. एक मात्र जाणवले होते. प्रत्येक वक्ता, प्रत्येक प्रश्नकर्ता, कळत-नकळत पुन्हा पुन्हा धर्मावर येऊन धडकत होता. धर्म हा या देशातला यक्षप्रश्न आहे. त्या प्रश्नाचे उत्तर शोधणे किंवा उत्तर मनाशी गृहीत धरुन संघाने वाटचाल केली. अंदमानातून बाहेर आल्यावर, एकांतातील प्रदीर्घ चिंतनानंतर सावरकरांनी पण नेमके बोट ठेवले ते धर्मावर. महात्मा गांधी पण 'ईश्वर अल्ला' म्हणून काहीतरी सांगत पुढे आले. तरीही या देशाची पहिली फाळणी धर्मामुळे झाली. दुसरी फाळणी पण धर्मामुळेच होण्याची वेळ आली आहे. या लोकांनी धर्माबद्दल नक्की काय चिंतन केले? आज लोक पुन्हा धर्म म्हटल्यावर इतर सारे काही विसरुन झपाट्याने झुंडीत का उभे राहतात? आज आपणाला नक्की काय करावे लागेल?

## तीन

काही योगायोग असतात. २५ मार्चचा सबंध दिवस हा असा गेला. रात्रभर मला धर्माबद्दलच विचित्र विचित्र स्वप्ने पडत होती. धर्म हा एक गुगली गोलंदाज आहे आणि तो भल्याभल्यांच्या विकेटस् अगदी सहजपणे काढून मोकळा होतोय अशी काही मजेशीर स्वप्ने! २६ मार्चला रविवार होता. सकाळी उठलो तर बलराम नंदांचा फोन. आज संध्याकाळी सहा वाजता त्यांचे इंडिया इंटरनॅशनलमध्ये 'गांधी आणि धर्म' या विषयावर भाषण आहे, जमेल तर ये म्हणून सांगणारे! त्यांच्या फोनने मी उडालोच. बलराम नंदा हा एक फार दादा माणूस आहे. ते पद्मभूषण आहेत. त्यांनी गांधीजींचे लिहिलेले चरित्र जगभर फार गाजतय. त्यांनी गोपाळकृष्ण गोखलेचे चरित्र वसंतराव पळशीकरांनी अनुवाद करून मराठीत आणलय. ते राहुदेत. मध्यंतरी मला दुर्गा भागवतांचे पत्र आले होते. नंदांचा तू पाठवलेला लेख मला फार आवडलाय. मला त्याचे भाषांतर करावयाचे आहे. त्यांना भेटून मला भाषांतर करावयाची परवानगी मिळवून दे!'

नंदांना मी एक-दोनदा भेटलोय. पण हा दादा माणूस मला भाषणाला का बोलावतोय, मला समजत नाही. एक शक्यता होती, मी नरेंद्र दाभोळकरचा थोरला भाऊ हे त्यांना माहीत असावे आणि नरेंद्र आता महाराष्ट्राच्या सीमा सोडून बाहेर पडला असेल. त्याला नाहीतर किमान मला तरी धर्म म्हणजे काय ते समजावे अशी त्यांची इच्छा असेल! दुसरी एक वाईट शक्यता होती. रविवारच्या दूरदर्शन सिनेमाने विचारवंतांचा आणि विचारावर प्रेम करणाऱ्या आपणा सर्वांचाच त्रिफळा उडवलाय. एक गंमत सांगतो. सध्या दिल्लीत वसंतराव साठे, साठे गणपती उत्सव, साठे सांस्कृतिक समिती, साठे सत्कार समिती अशा मजेशीर मजेशीर गोष्टी करत असतात. दोन महिन्यापूर्वी त्यांनी यशवंतराव जन्मदिनानिमित्त उपराष्ट्रपतीचे भाषण त्रिमूर्तीमध्ये ठेवले होते. रविवार आल्याने भाषण सहा ऐवजी चार वाजता ठेवले. निम्मा हॉल तरीही मोकळा राहिला. कालपरवा 'साठे सहकार समितीने' कुसुमाग्रजांचा दिल्लीत रविवारी सहा वाजता सत्कार ठेवला. लोक येतील न येतील याची काळजी पडल्याने चक्क निमंत्रणपत्रिकेवर या सत्कार समारंभाला येणाऱ्या माणसांना दुसऱ्या दिवशीच्या नटसम्राट नाटकाची तिकीटे मोफत मिळतील म्हणून छापलं. आपण सारेच थोर आहोत.

पण गांधी आणि धर्म या सर्वांना पुरुन उरलेत. कार्यक्रम संघाचा नसूनही बरोबर सहा वाजता सुरु होतो आणि इंडिया इंटर नॅशनलचा हॉल तुडुंब भरलाय. त्यात समाजवादी आहेत, सर्वोदयवादी आहेत, साम्यवादी आहेत आणि काल मला प्रथमच भेटलेले दोन्ही बाजूंनी बोललेले स्वयंसेवकही आहेत. नंदांची भाषणाची शैली चांगली नाही. पण त्यांचा अभ्यास प्रत्येक वाक्यातून समजतोय. नंदा नेमके एकेक मुद्दे मांडत आम्हाला पुढे घेऊन जातात.

(१) गांधीजीचे आयुष्य आणि त्यांचे कार्य नीटपणे समजावून घ्यावयाचे असेल तर गांधीजीच्या मनात धर्माबद्दल काय कल्पना होत्या, गांधीजीचा धर्माबद्दलचा दृष्टिकोन काय होता हे समजावून घेतले पाहिजे. पण गांधीजीचे टीकाकार आणि गांधीजीचे मित्र, गांधीजीचे अनुयायी या सर्वांनीच या गोष्टीकडे दुर्लक्ष केलय. (२) एम्. एन्. रॉय, आर. पी. दत्ता, नंबुद्रिपाद या गांधीजीच्यावर टीका करणाऱ्या साऱ्याच डाव्या विचारवंतांनी एक गोष्ट पुन्हा पुन्हा सांगितली आहे. गांधीजीनी जनसमूहाला संघटित व उत्तेजित करण्यासाठी धर्माचा अक्कल हुषारीने उपयोग केला. आणि नंतर त्याच्या जोरावर त्या जनसमुदायाचे राजकीय व आर्थिक समस्यांचे ज्ञान वाढू दिले नाही. कारण गांधीजीना अखेर 'आहेरे' वर्गाच्या हितसंबंधाचे रक्षण करावयाचे होते. (३) काही विचारवंत तर गांधीजींच्यावर टीका करताना त्याच्याही पुढे गेले आहेत. राम, रामराज्य, अहिंसा या हिंदू संकल्पना गांधी पुढे मांडत होते. मुसलमान त्यामुळे दुखावले गेले. दोन समाजांचे गांधीजीच्या या कामामुळे ध्रुवीकरण झाले व त्यामुळे अखेर

देशाची फाळणी झाली. (४) गांधीजीचे आफ्रीकेतले पहिले दिवस पाहिले तर काय दिसले. गांधीजीचे धर्माचे ज्ञान फारसे नव्हते.पण धर्म ही त्यावेळीही त्यांना एक भावनात्मक गरज (Vague bond of Sentiment) वाटत होती. त्यासंदर्भात गांधी आणि ख्रिश्चन मिशनरी कोटस यांचा झालेला संवाद बघण्यासारखा आहे. गांधीच्या गळ्यात रुद्राक्षांची माळ पाहून त्याला हसू आले. तुमचा असल्या धर्मातील भाकड गोष्टीच्यावर विश्वास आहे का व तुम्ही ती माळ काढली का नाही म्हणून त्याने विचारले. गांधीजी म्हणाले या गोष्टीत खरेच काही सामर्थ्य आहे का हे मला माहीत नाही. ही माळ वापरली नाही तर मला काही त्रास होईल, माझे काही नुकसान होईल असेही मला वाटत नाही. पण तू काही खास कारण सांगत नसशील तर ती माळ मी काढावी असे मला मुळीच वाटत नाही. माझ्या आईने माझ्या गळ्यात ती प्रेमाने बांधली. ही माळ ही मला त्या प्रेमाची, माझ्या संस्कृतीशी जोडणारी खूण वाटते. गांधीजींनी रुद्राक्षाच्या माळेबाबत जी गोष्ट सांगितली तीच त्यांनी हिदू धर्माबाबत सांगितली. या गोष्टी त्यांच्या प्रिय, पूज्य आईवडिलांकडून वारसा म्हणून मिळाल्या होत्या. आणि कोणतेही खास कारण नसताना त्याचा त्याग करणे त्यांच्या दृष्टीने चुकीचे होते. (४) गांधीजीच्यावर ज्या ग्रंथाने सर्वात मोठा परिणाम केला आणि जो ग्रंथ गांधी आणि हिदुधर्म यांना जोडणारा सर्वात भक्कम दुवा बनला असा ग्रंथ म्हणजे अर्थातच भगवत्‌गीता. पण गीतेला आपला धर्मग्रंथ मानत असतानाच कोणत्याही ग्रंथातून एकाहून अनेक अर्थ निघतात आणि काळाच्या प्रवाहात कोणत्याही ग्रंथातील ज्ञानाला बदलावे लागते, विकसित व्हावे लागते हे गांधीजींनी पुन्हापुन्हा सहजपणे सांगितले. धर्मग्रंथातील ज्ञान विचारांच्या कसोटीवर पारखून घेण्याचा म्हणून त्यांनी आग्रह धरला. (५) हिदू महासभेचे नेते डॉ. बा. शि. मुंजे यांनी ज्यावेळी हिंदू धर्मातील अस्पृश्यतेला धर्मग्रंथांचा आधार आहे हे गांधीजींनी दाखवून दिले, त्यावेळी गांधी म्हणाले, 'संस्कृतमध्ये लिहिलेला प्रत्येक श्लोक म्हणजे मी हिदूधर्म मानत नाही. तुमचे शास्त्रांचे ज्ञान मी मानतो. पण ही बिघडलेली शास्त्रे आहेत. मी अस्पृश्यता पाळत नाही आणि मी हिदू म्हणून जगत आलोय (I claim in all humility to have lived Hinduism all my life) (६) 'मी हिंदू आहे' हा गांधीजींनी १९२७ साली लिहिलेला लेख म्हणूनच नीट समजावून घेतला पाहिजे. त्या लेखात गांधी म्हणतात, 'सर्व धर्मांच्यात हा धर्म अधिक सहिष्णू आहे. 'बाबा वाक्यम् प्रमाणम्' मानावयास हा धर्म सांगत नाही तर स्वत:चे विचार पुढे मांडण्याची व आचरणात आणण्याची मुभा हा धर्म देतो. आपण जगातील एकमेव धर्म आहोत असे हा धर्म मानत नाही. म्हणून हा केवळ इतर धर्मांचा आदर करावयासच शिकवत नाही तर इतर धर्मातील चांगल्या गोष्टीचा संग्रह करण्यास सांगतो. समन्वय हा हिंदू धर्माचा पाया आहे. हा धर्म याच्याही पुढे जातो. मानव तेवढा एक येवढ्यावरच हा धर्म थांबत नाही तर साऱ्या सजीवांना तो एक मानतो'. (७) आपल्या त्यानंतरच्या आयुष्यात निरनिराळ्या धर्मांच्या समन्वयावर आणि सहजीवनावर गांधीजी भर देत आले. (८) १९३७ मध्ये गांधीजींनी एका अमेरिकन मिशनऱ्याला सांगितले की येशू हा परमेश्वराचा एकमेव पुत्र आहे हे मला मान्य नाही. राम, कृष्ण, महंमद यांच्यासारखाच तो पण अवतार आहे. बायबल, कुराण, गीता हे सारेच माझे धर्मग्रंथ आहेत. (९) या धर्मग्रंथांच्यात आपापसात मतभेद असतील तर तुम्ही काय कराल याला पण गांधीनी उत्तर दिले होते. सत्य मी सर्वात श्रेष्ठ मानतो. आणि सत्याच्या विरुद्ध असलेले व सत्याशी मतभेद असणारे सारेच मी नाकारतो. त्याचप्रमाणे अहिंसेशी मतभेद असणारे सारे पण मला अमान्य आहे. आणि विचारांच्या कसोटीवर जे पारखून घेता येत नाही ते पण आपण नाकारले पाहिजे. (१०) ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मांतराच्या कार्यक्रमाला तर त्यांनी उघड विरोध केला आणि त्यासाठी त्यांची कान उघडणी केली. गांधीजींनी धर्मांतर ही एक अधार्मिक गोष्ट आहे म्हणून सांगितले. धर्मांतराला असलेला त्यांचा विरोध काही तत्त्वांच्यावर आधारित होता. ते दक्षिण आफ्रिकेत असताना आर्य समाजी मंडळींनी तेथे मिशनरी चाळे सुरु केल्यावर गांधीजींनी त्यांची पण कानउघडणी केली होती. त्यांची इंग्लिश शिष्या मिस स्लेड हिचे नाव त्यांनी तिच्या इच्छेवरून मिराबेन असे ठेवले. पण तिचे धर्मांतर करून तिला हिदू बनविले नाही. त्याचप्रमाणे गांधीजीच्या आश्रमात राहून अहिंसेवर खूप लिखाण केलेल्या रिचर्ड ग्रेगचे नाव त्यांनी बदलून गोविंद ठेवले पण त्याचे धर्मांतर केले नाही. आपल्या आश्रमात सारे धर्म बंधूभावाने आहेत. सारेच धर्म ईश्वरी आहेत आणि साऱ्याच धर्मांचे अपूर्ण माणसांनी केलेल्या अपुऱ्या व चुकीच्या विवेचनांमुळे नुकसान झालेले आहे. (११) काही हिंदूंनी, गांधी हिदू धर्मावर अधिक टीका करतात व इतर धर्माबाबत बोलताना सौम्य भाषा वापरतात असे त्यांना सांगितल्यावर गांधीजींनी आपली चूक, किंवा आपला हा गुन्हा मान्य केला. पण हिदू धर्माची आपणाला जेवढी जवळून व चांगली माहिती आहे तेवढी ख्रिश्चन व मुसलमान धर्मांची नाही हे त्याचे एक कारण आहे व आपण टीका केल्यास हे लोक गैरसमज करून घेण्याची शक्यता आपणाला वाटली, म्हणून आपण असे वागलो म्हणून सांगितले. (१२) मौलाना शौकत अल्लींनी ज्यावेळी गांधीजीना दाखवून दिले की तलवारीचे उत्तर तलवारीने द्या आणि गुन्हेगाराला दगडाने ठेचून मारा अशी आमची धर्माज्ञा आहे, त्यावेळी गांधीजींनी आपले मतभेद वेगळ्या प्रकारे नोदवले. ते म्हणाले, कुराणात धर्माचरण म्हणून अहिंसेचाच आग्रह धरलेला आहे. अपरिहार्य परिस्थितीमधील गरज म्हणून हिंसेला परवानगी दिलेली आहे. त्याच संदर्भात धर्मग्रंथातून आपण कोणते अर्थ काढतो हे महत्त्वाचे आहे, हे त्यांनी पुन्हा एकदा सांगितले. खान अब्दुल गफारखान यांना कुराण अहिंसेची शिकवण देतो. लंडनचा बिशप हिंसा बायबलमधून शिकतो. मला गीता अहिंसेचा संदेश देते तर काही जणांना गीता हातात शस्त्र घे म्हणून सांगते. पण याचा अर्थ कुराण, गीता, बायबल चुकीचे आहेत व एक ग्रंथ दुसऱ्याहून श्रेष्ठ आहे वा महमद आणि

**धर्म हा सगळ्यांची विकेट घेणारा गुगली गोलंदाज आहे.**

कृष्ण यात एक छोटा एक मोठा आहे असे सांगावयाचा आपणा कोणालाच अधिकार नाही. माणसाचा स्वधर्म हा धर्मग्रंथांच्या ज्ञानावर पण स्वतःच्या अंतःप्रेरणेवर अवलंबून आहे. आणि माझी अहिंसेवरची श्रद्धा *धर्मग्रंथांच्या अनुमतीवर अवलंबून आहे असे मी* मानत नाही. (१३) हे सारे सांगत असतानाच गांधी प्रथम पासून एक गोष्ट आग्रहाने सांगत होते. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीच्या लोकांनी एकमेकांबाबत बंधुभाव ठेवणे, एकमेकांना समजावून घेणे जेवढे जरुरीचे आहे त्यापेक्षा अधीक जरुरी हिंदू मुसलमान बंधुभावाची आहे. ही गोष्ट सहज शक्य आहे. हे असे या देशात मुळी घडत आलय. राजकीय शक्ती आणि हितसंबंध यांना आपण दूर ठेवू शकलो तर हिंदू मुसलमान सहजीवन सहज शक्य आहे. महत्त्वाचे म्हणजे गांधीजी ४७ साली नव्हे तर १९०५ पासून पुन्हा पुन्हा सांगत आलेत. (१४) मात्र गांधीना या सर्वांची जाणीव असतानाही गांधीजीनी वापरलेले स्वराज्य, अहिंसा, सत्याग्रह, रामराज्य या *शब्दांचा उपयोग करुन गांधीजीना* हिंदू राष्ट्र अभिप्रेत आहे हे मुसलमानांना पटवून देण्याचा मुस्लीम लिगने प्रयत्न केला. (१५) ब्रिटीशांना या देशाचा नकाशा बदलण्याचा काडीमात्र अधिकार नाही हे गांधी आग्रहाने सांगत होते. ठरलेल्या तारखेला वा त्यापूर्वी ब्रिटीशांनी निघून जावे. हे सत्तांतर सुव्यवस्था ठेऊन झाले तर चांगले पण नाहीतर अव्यवस्था, गोधळ माजला तरी चालेल पण सत्तांतर देशाचा नकाशा न बदलता झाले पाहिजे हे त्यांचे सांगणे होते. - ब्रिटीश असे निघून गेले तर देशात यादवी माजेल, खूप हिंसा व रक्तपात होईल या नेहरु पटेलांच्या सांगण्याला गांधीजीचा विरोध होता. कारण याचा अर्थ हिंसा समोर आली तर घाबरुन आपण आपले मत बदलावे असा होत होता. - राजकीय हितसंबंधांना धर्मापासून दूर ठेवले तर हिंदू मुसलमान बंधूभावाने राहतील यावर गांधीचा विश्वास होता. आणि हिंसेचे भय दाखवून हिंदू मुसलमान तेढ वाढवून आपले राजकीय मतलब साधता येतील, हे हितसंबंधी लोकांनी ओळखले आहे, हे गांधीना फाळणीच्या वेळी जाणवले होते. कारण गांधीच्या अनुयायांचे अहिंसा आणि सत्याग्रहाबाबतचे ज्ञान धर्मावर आधारलेले नव्हते. गांधीनी आपल्या विचारांना धर्माचा आधार दिला होता. गांधीचे विचार म्हणून अधिक पक्के होते. - सत्याग्रह आणि *अहिंसा यावर विश्वास ठेवण्यासाठी माणूस धर्म* मानणारा असलाच पाहिजे अशी पूर्वअट नाही हे खरे. पण धर्मावर विश्वास असलेला माणूस *स्वधर्मासाठी मरणे म्हणजे काय हे अधिक* चांगले ओळखतो --- 'Gandhi's religious quest helped to mould not only his personality, but his political technique. One can be an atheist or agnostic and still practice satyagraha. But it is easier for men or relogion to accept the basic assumptions of satyagraha that it is worth even dying for cause, principle or swadharma, and every human being, however wicked, he may appear to be, has a hidden nobility, a divine spark which can be ignited.' - फाळणी ही एका दुष्ट चक्राची सुरुवात होती. कारण आपले राजकीय *हितसंबंध सुरक्षित ठेवावयाचे तर हिंदू* मुसलमानात व धर्माधर्मात भांडणे ठेवणे आता मतलबी राजकारणी मंडळीच्या दृष्टीने कायमचे आवश्यक होते. *हिंसेचे भय दाखवले* की अहिंसा मानणारे आणि तत्त्वाच्या गोष्टी करणारे लोक नमतात हे पण मतलबी मंडळी कायमचे लक्षात ठेवणार होती.

## चार

नंदांचे भाषण संपले होते.

गांधीचे सहज सुंदर मोठेपण सांगताना नंदांनी न राहवून गोखलेंचा गांधीचे गुरु म्हणून आदराने उल्लेख केला होता. न्यायमूर्ती रानडेंच्या बद्दल तर ते भारावून बोलले. ते म्हणाले, '..अर्थशास्त्रज्ञ, न्यायाधीश, समाजसुधारक, विचारवंत म्हणून प्रत्येक क्षेत्रात या माणसाने येवढे प्रचंड कार्य केलय की आधुनिक काळात भारतात येवढा मोठा दुसरा माणूस निर्माणच झाला नाही असे वाटते.'

माझ्या मनात क्षणभर प्रश्न पडला. फुले, आंबेडकर फार मोठे आहेत. त्यांचा गौरव आपण पुन्हा पुन्हा करतो. त्यांचे विचार समजावून घेण्याचा प्रयत्न करतो. मग गोखले रानडे यांच्यासारख्या मोठ्या माणसांच्या बद्दल आपण असे काहीच का करत नाही? *नंदांसारख्या अभ्यासकाला आणि विचारवंतांना* न्यायमूर्ती रानडे आधुनीक भारतातला सर्वात मोठा माणूस वाटतो. पण रानडेंनी वृद्ध आईला दुखवू नये म्हणून का होईना पण पुनर्विवाह करताना विधवा विवाह केला नाही म्हणून आपण मात्र त्यांच्यावर टीका करतो. मग महात्मा फुलेच्या काही वाक्यांवर, विधानांवर कोणी काही टीका केली तर त्याचा मात्र आपण आगरकर का करतो? गोखले, रानडे यांचे नाव, विचार आणि कार्य समजावून घेण्यासाठी महाराष्ट्र काय करणार आहे? माणसांना, विचारांना समजावून घेतानाही ही ब्राह्मणी वृत्ती आणि छुवाछूत का? का ब्राह्मणांच्या पासून आपण येवढच शिकलोय?

पण हे प्रश्न खरोखरच फक्त क्षणभर मनात आले आणि गेले. माझ्या मनात नंदांच्या भाषणातील वाक्ये प्रतिध्वनी करत ऊठत होती -- 'Gandhi took little part in the final negotiations for the transfer of *power. But his opposition to* partition was an open secret. He declared 'Function of British power *is not to change the map of India.* All it has to do is to withdraw and leave India, carrying out the withdrawal, if possible, in an orderly manner, may be even in chaos, on or before the promised date.' - The very violence, which in the opoinion of Neharu, Patel and other Congress leaders and that of the British Government provided a compelling motive for partition, was for him a strong argument against it. To accept partition because of the fear of civil war was to acknowledge that everything was to got "if the violence was *perpetrated in sufficient measures.* Gandhi believed that communal tension, however serious it *seemed in 1947 was a temporary* phase, and the British had no right to impose partition on an India

temporarily gone mad.'

माझ्या मनात प्रश्न पडला. याचा अर्थ फाळणीच्या त्या अगतिक क्षणी संघ, गांधी, सावरकर एकाच विचारावर येऊन थांबले होते. मग या तिघांनी एकत्र मिळून फाळणी टाळण्यावर काही विचार केला होता का? - का हे सारे पण हिंदू संस्कृतीतून पुढे आल्यामुळे मनातल्या मनात विचारांची संघटनेची अस्पृश्यता मानत एकमेकांना टाळत होते? एक मात्र खरे. कोणतीही किमत देऊन फाळणी टाळावी असे त्या क्षणी या तिघांनाही वाटत होते. गांधी आणि सावरकर आज आपणात नाहीत. या दोन विचारांचा मूळ गाभा बरोबर घेऊन त्यांच्या बरोबरच पण समांतर पणे वाटचाल करणारा संघ मात्र पुढे आलाय. फाळणीचे शल्य बरोबर असेल आणि एक दिवस या देशाची फाळणी नाहीशी करावयाची आहे याची मनाशी पक्की खुणगाठ असलेली ही भारतातील एकमेव संघटना असेल. - गांधी धर्म ही गोष्ट मानवी जीवनात आवश्यक मानत होते. जन्माने मिळालेला धर्म बदलणारे धर्मांतर गांधीना मान्य नव्हते. धर्म मानणाऱ्या मंडळीचा मतलबी राजकारणात, वा राजकारणात रस नसेल तर वेगवेगळे धर्म अखंड भारतात बंधुभावाने राहू शकतील हा गांधीचा विश्वास होता. संघ धर्म मानतो, जन्माने मिळालेला धर्म मानतो, संघाचे संघ म्हणून राजकारणाशी काही कर्तव्य नाही. मनापासून संघाला त्यात रस नाही. - संघ आज नक्की कुठे उभा आहे? संघाने आज नक्की काय करावयास हवे?

□

नंदांच भाषण संपले होते. हिरवळीवरील चहापानाचा कार्यक्रम सुरु होता. आणि माझ्या मनात अशी असंबद्ध विचारांची भेंडोळी उठत होती. गेल्या दोन दिवसातले हे वेगळे पण नकळत एकमेकात गुंतलेले कार्यक्रम ताप चढावा तसे मला चढले असण्याची पण शक्यता होती! येवढ्यात माझ्या खांद्यावर थाप बसते. पाठीमागे दीन दयाळ केंद्राचे भूतपूर्व संचालक प्रा. देवेनस्वरुप उभे होते. ते अगत्याने विचारतात, 'कालच्या प्रज्ञाभारतीच्या विचार गोष्टीत तुम्ही प्रश्न पण का विचारले नाहीत? - आम्हाला तुमची महाराष्ट्रीयन समाजवादी मते व विचार खरेच ऐकावयाचे होते! तुम्हा मंडळीची मते मजेशीर, वेगळी, कुठेतरी दुखावणारी असतात. पण ती मते विचार करावयास लावतात. या क्षणी आम्हाला खरेच मंथन हवे आहे'


मी हसतो, म्हणतो, 'मी महाराष्ट्रीयन समाजवादी नाही. कारण महाराष्ट्रात समाजवादी म्हणून सध्या काही अस्तित्वातच नाही. तुम्हाला एक मजेशीर किस्सा सांगतो, जवाहरलाल नेहरु विद्यापीठातील प्राध्यापकात एकदा चर्चा सुरु असते. खलिस्तानबद्दल बोलताना एकजण म्हणाला ही चळवळ आता हळुहळु नाहीशी होईल. कारण हे लोक निर्दयपणे आपापसात लढून स्वतःचेच लोक मारताहेत. फार मोठी शक्यता जवळ असताना आपल्याच लोकांचा काटा काढून, आपापसात भांडून नाहीशी होणारी जगातील ही पहिली चळवळ आहे! दुसरा प्राध्यापक त्याला म्हणाला म्हणजे तुला अजून काहीच माहीत नाही! महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीचा इतिहास तू अजून समजावून घेतलेला नाहीस! या बाबतीत ते पहिले, बाकी सगळे नंतरचे!'

पण देवेनस्वरुप तुम्ही आग्रहाने सांगत आहात तर प्रश्न विचारतोच. कारण मी काल प्रा. मलकानी यांनी संघ परिवारात येणाऱ्या ज्या २८ टक्के लोकांची माहिती दिली त्यात पण मेत नाही. पण या लोकात आज न येणाऱ्या पण उद्या येण्याची शक्यता असलेला, या देशात आज जो फार मोठा जनसमुदाय आहे त्यात येतो. मला जे वाटते ते पुढे मांडतो. (१) फाळणीची जबाबदारी संघाने पण स्वीकारली पाहिजे. संघटना म्हणून स्वीकारली पाहिजे. कारण संघटना म्हणून, संघ म्हणून, संघाने फाळणी टाळण्यासाठी काही केले नाही. स्वतःवर बंदी आली त्यावेळी ४८ साली संघाने फार मोठा शांततामय सत्याग्रह केला. पण त्या आधी एक वर्ष फाळणीला विरोध करण्यासाठी, विरोध नोंदविण्यासाठी सुद्धा संघाने सत्याग्रह केला नाही. याचा अर्थ स्वतःचे अस्तित्व हे संघाला देशाच्या अखंडतेपेक्षा अधिक जवळचे वाटले. किंवा फाळणीच्या वेळी सावरकर, गांधी यांच्याप्रमाणेच संघ पण भांबावून होणाऱ्या घटनांच्या बरोबर वाहत गेला. या गोष्टीवर संघात विचार होणे जरुरीचे आहे. कारण या देशात असे धोके यापुढेही संभवतात. आणि त्यावेळी तरी आपण काय करणार याचा विचार संघाजवळ हवा. (२) गांधीजीची आपल्या संघटनेवरची, आपल्या अनुयायांवरची आणि आपण तयार केलेल्या नेत्यांवरची पकड त्या वेळी सुटली आणि म्हणून गांधी फाळणीला निर्णायक विरोध करु शकले नाहीत असे आज वाटते. संघात त्यावेळी त्याच्या नेमकी उलटी परिस्थिती असेल असे वाटते. - महत्त्वाच्या प्रश्नाच्या वेळी नेते वा अनुयायी यांनी एकमेकांच्या बरोबर फरफटत ओढत न जाता परस्पर विचारांच्या आदान प्रदानाने निर्णय घेण्याची क्षमता कोणत्याही संघटनेजवळ असावी लागते. आज संघाजवळ अशी क्षमता आहे का? (३) मतलबी राजकारणी मंडळीनी स्वार्थासाठी या देशातील धर्माधर्मामधील भांडणे सुरु केली हा गांधीच्या विचारांचा गाभा आहे. म्हणजे याचा अर्थ या देशातील धर्माधर्मातील तंटे थांबविण्यासाठी राजकारणात रस नसलेले हिंदूंचे समर्थ संघटन जरुरीचे आहे. संघाला नेमके तेच करावयाचे आहे. पण खरी गोष्ट अशी आहे की संघाला ते फारसे जमलेले नाही. संघ मनापासून सर्व हिंदूना आपले मानून एकत्र आणण्याचा प्रयत्न करतो. पण अजूनही बहुसंख्य दलित संघाला आपला मानत नाहीत वा त्याला आपला शत्रू समजतात ही माझ्या मते खरी वस्तुस्थिती आहे. (४) हे असे का या प्रश्नाला सरळ सोट उत्तर नाही. या परिस्थितीला कारणे पण अनेक आहेत. महत्त्वाचे कारण म्हणजे धर्माधर्मात भांडणे ठेवून आपले राजकीय स्वार्थ साधता येतात हे मतलबी मंडळीच्या लक्षात आले आहे. त्याचप्रमाणे दलीत उच्चवर्णीय यात तेढ ठेवून आपले स्वार्थ साधता येतील हे या मंडळीनी ओळखले आहे. (५) पण या प्रश्नाला दुसरी

**त्या अगतिक क्षणी संघ, गांधी, सावरकर एकाच विचारावर येऊन थांबले.**

एक महत्त्वाची बाजू आहे. उच्चवर्णीयांनी खरोखरच दलितांना अनेक शतके अमानुष असंस्कृत वागणूक दिली आहे. त्याचे परिमार्जन आपण करत आहोत हे दाखवून देईपर्यंत या वर्गाचा उच्चवर्णीय जेथे मोठ्या प्रमाणावर आहेत, अशा धार्मिक संघटनेवर विश्वास बसणार नाही. (६) दलितांचे धर्मावर प्रेम आहे. धर्म हा त्यांचा जीवनाचा आधार आहे. पण धर्माचा विचार करताना नकळत ही माणसे दुभंगलेल्या व्यक्तिमत्त्वात जातात. या भयानक परिस्थितीला आपण उच्चवर्णीय जबाबदार आहोत आणि एखादा मानसशास्त्रज्ञ जेवढ्या हळुवारपणे, कौशल्याने दुखावलेल्या माणसांना समजावून घेतो तेवढ्या कौशल्याने आणि मनापासून त्यांना आपले मानत आपण त्यांना समजावून घेतले पाहिजे. (७) संघाने, संघाच्या स्वयंसेवकांनी, उच्चवर्णीय दलितवर्गीय, आंतरजातीय विवाह, कार्यक्रम म्हणून मोठ्या प्रमाणावर हातात घेतले तर हे काम होईल असे मला वाटते. हे सांगावयास सोपे आहे. करावयास अनेक कारणामुळे कठीण आहे. नंदांनी आपणाला फारशी माहीत नसलेली गांधीजीच्या आयुष्यातील एक गोष्ट आत्ता सांगितली. सेवाग्रामला आपल्या आश्रमात गांधीजीनी भंग्याची एक मुलगी आपली मुलगी मानून आपल्या बरोबर आणली. कस्तुरबांनी भंग्याची मुलगी आपल्या बरोबर राहणार असेल तर आपण येथे राहणार नाही म्हणून सांगितले. गांधी म्हणाले, तू जाऊ शकतेस. पाहिजे तर तू रहा मी या मुलीबरोबर जातो. गोष्ट येवढ्यावरच थांबली नाही. आश्रमात भंग्याची मुलगी आहे समजल्यावर अहमदाबादच्या उद्योगपतीनी आश्रमाला मदत देणे बंद केले. मदत थांबली म्हणून कस्तुरबा आणि त्या मुलीबरोबर अहमदाबादच्या झोपडपट्टीत जाऊन राहण्याचा निर्णय त्या क्षणी गांधीजीनी घेतला. (८) या अशा गोष्टी आपणा सर्वांना माहीत असल्यामुळे संघाने या गोष्टी कराव्यात असे म्हणणे सोपे आहे. प्रत्यक्षात व्यवहारात कार्यक्रम म्हणून एखाद्या संघटनेने असा कार्यक्रम हातात घेणे किती कठीण आहे हे आपण समजू शकतो. संघाने संघस्थानावर व घराघरात स्वयंसेवकांच्यामधे पन्नास वर्षापूर्वी रोटी व्यवहार सुरु करुन सुद्धा केवढी मोठी कामगिरी त्यावेळी केली हे मान्य करावे लागेल. पण पन्नास वर्षानंतर आज संघ कोणते पुढचे पाऊल टाकणार हा प्रश्न उरतोच. गांधीजीना भंग्याची एक मुलगी या देशाची राष्ट्रपती झालेली पहावयाची होती. पन्नास वर्षानंतर आज संघाला भंग्याचा एक मुलगा वा एक दलीत संघाचा सरसंघचालक झालेला पहावासा का वाटू नये? संघ या गोष्टी मानतच नाही असे म्हणणे ही स्वतःच स्वतःची केलेली फसवणूक आहे. कारण या गोष्टी समाजात आहेत. या अशा गोष्टीने दुखावलेल्या दलितांना फार मोठा दिलासा मिळेल. दलितांनी संघाला मनापासून आपला मानणे हे हिंदू संघटनेच्या दृष्टीने सर्वात आवश्यक आहे. त्यासाठी या वा अशा मार्गांचा प्रामाणिकपणे शोध घेणे जरुरीचे आहे. शताब्दीच्या या वर्षात असे काही विचार मंथन संघाने खरेच केले आहे का? (९) भारत पाकिस्तान सामंजस्य निर्माण करण्यात संघ पुढाकार घेईल, घेऊ शकेल असे जे मलकानी म्हणतात ते विधान वरवर विसंगत वाटते. पण मला ते विधान पटते. - प्रा. सौधीच्या जवळ बोलताना १९७० साली खान अबदुल गफार खान म्हणाले होते 'की संघ हिंदूस्तानात जे काम करतोय तेच काम माझे खुदाई खिदमतगार त्यावेळी हिंदुस्तानात व आज पाकिस्तानात करत आहेत'. हे विधान माझ्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. कारण खुदाई खिदमतगारांना पण संघाप्रमाणेच मतलबी राजकारणात अजिबात रस नव्हता. आणि मतलबी राजकारणात रस नसलेले स्वधर्म ओळखून पाळणारे लोक ही हिंदू मुसलमान ऐक्याच्या व या देशाच्या ऐक्याच्या दृष्टीने आवश्यक गोष्ट आहे हे गांधीचे विचार खान अबदुल गफार खानांना पटलेले असणार. (१०) पण याचा अर्थ राजकीय स्वार्थासाठी धर्माचा उपयोग करणाऱ्या लोकांपासून संघाने दूर राहिले पाहिजे. (११) भारत पाकिस्तान सामंजस्य निर्माण करण्यात संघ पुढाकार घेऊ शकेल असे जे मलकानी म्हणतात ती पुढची गोष्ट आहे. आज भारतातच हिंदू मुसलमान सामंजस्य निर्माण करण्यासाठी संघ असा पुढाकार घेऊ शकतो व त्याने घेतला पाहिजे असे मला वाटते. आज भारतातच आपले मतलबी राजकारण साधण्यासाठी धर्माधर्मात भांडणे लावण्याच्या गोष्टी मतलबी राजकारणी मंडळी करतात. मशीदीवरुन सवाद्य मिरवणूक नेणे वा न नेणे आणि रामजन्मभूमी बाबरी मसजीद या अशा गोष्टी आहेत. हिंदूधर्मातील समन्वयवाद वापरुन संघाने या प्रश्नांना उत्तरे दिली पाहिजेत. १८५७ च्या पूर्वी त्या वेळच्या हिंदू मुसलमान नेत्यांनी ब्रिटीशांना हा वाद वाढवावयास न देता कल्पकतेने या प्रश्नाला उत्तर शोधले होते. - आज संघ असे काही उत्तर शोधू शकेल. आणिबाणीच्या वेळी तुरुंगात संघ, जमाते इस्लाम हे लोक एकमेकांना मनापासून आवडले होते. ते जवळ आले होते. देवरस, जामा मसजीदीचे बुखारी, जमाते इस्लामचे लोक यांनी एकत्र बसून या प्रश्नांना उत्तरे शोधली पाहिजेत. हे काम खूप कठीण आहे..पण आज फक्त संघच करु शकेल. कारण संघाला संघ म्हणून या साऱ्या प्रश्नातून कोणताही राजकीय स्वार्थ साधावयाचा नाही, त्यामुळे समन्वयाची भूमिका संघ घेऊ शकेल.

देवेनस्वरुप शांतपणे माझे म्हणणे ऐकून घेत होते. मला त्यामुळे थोडा धीर आला. म्हटले, 'काल प्रश्न विचारले नाहीत. पण कुठेतरी लिहीन. हे बोलताना आणि लिहिताना माझ्या विचारात काही मूलभूत उणीवा असतील. मी मुळातच कोठेतरी चुकत असेन ही शक्यता मी अजिबात नाकारत नाही. पण मला मंथन हवय. खुले आम्र.प्रामाणिक चर्चा, विचारांचे आदान प्रदान, विचारातील मतभेदामुळे अस्पृश्यता पाळण्याची महाराष्ट्रातील व्यक्तीस्वातंत्र्यवादी मंडळीनी आज जी भयंकर नवी अस्पृश्यता निर्माण केली आहे त्यामुळे जीव घुसमटलाय! मला हे व्यासपीठ पण चालेल. कारण आज हे तेवढेच व्यासपीठ समोर आहे. आता वारे कुठून तरी वाहू देत. चर्चा म्हणजे शिवराळपणा नव्हे. व्यक्तिगत मैत्री व संबंध दुखावणे नव्हे. मते पटली नाहीत म्हणून त्या माणसाचा आगरकर करुन मग त्या वृत्तपत्राची होळी करणे नव्हे, हे भान समोर ठेवले तर मग तुम्ही किंवा मी पूर्णपणे वा प्रत्येकाने थोडेफार चुकल्याने काही बिघडणार नाही. चर्चा करताना हे भान मात्र जरुर ठेवावयाचे. नाहीतर होईल काय, जवाहरलाल नेहरु विद्यापीठातले प्राध्यापक पुन्हा जेव्हा क्रमांक ठरवायला बसतील त्यावेळी तिसऱ्या क्रमांकावर कुणाला बसवावयाचे हा प्रश्न त्यांना पडणार नाही!



माझी वाढ संघाचा तिरस्कार करतच झाली. ही संघटना फॅसिस्टांची आहे असे मला सांगण्यात येत असे...

— सुप्रसिद्ध पत्रकार एम. व्ही. कामत.

रा. स्व. संघाचे मूल्यमापन आजवर संघाचा द्वेष करणारे किंवा संघावर भक्ती करणारे यांच्या वर्तुळातच बंदिस्त राहिले होते. परंतु आता परिस्थिती बदलत आहे. वेगवेगळी वैचारिक बांधिलकी मानणाऱ्या विचारवंतांनाही संघ आणि संघाची भूमिका याविषयी साचेबंद आरोप करत राहण्यापेक्षा पुनर्विचार करावासा वाटत आहे.

मुलाखती व शद्बांकन

अविनाश कोल्हे.

एम्. व्ही. कामत
रफिक झकेरिया
कॉ. मोहित सेन
वसंत मून
नीळकंठ खाडिलकर
आर. व्ही. पंडित

# आजची हिंदू जागरुकता म्हणजे धर्मांधता नव्हे

## एम. व्ही. कामत

आज शिवसेना / भाजप वगैरेसारखे पक्ष हिंदू समाजाला धार्मिक पातळीवर संघटित करण्याचा प्रयत्न करत आहेत. पण हिंदू धर्मासारखा अ-संघटित धर्स संघटित करता येऊ शकतो का?

हिंदू धर्म अ-संघटित आहे. हेच मुळी मला मान्य नाही. हिंदू धर्म म्हणजे वेगवेगळे आणि समांतर जाणारे विचार - प्रवाह, जे कधी कधी एकमेकांना स्पर्श करतात.

मी 'संघटित धर्म' म्हणालो, तेव्हा मला इस्लाम, ख्रिश्चन धर्मासारखे संघटित धर्म अभिप्रेत होते.

हिंदू धर्म म्हणजे जात, उच्च - जात वगैरेचा संच. प्रत्येक जात स्वतःच्या आवडीनिवडी प्रमाणें धर्मोपासना करु शकते आणि गुण्या गोविंदाने नांदू शकते. असे जर आहे, तर हिंदू *धर्म अ-संघटित आहे, असे म्हणताच येणार नाही.* रामकृष्ण मिशनवगैरेसारख्या सस्थांचा विचार केला तर हिंदू धर्माच्या संघटनाचा विचार येतो. या संस्था त्यांना अभिप्रेत असलेला, भावलेला हिंदू धर्माचा विचार प्रसारित करत असतात. हा विचार जास्तीत जास्त लोकांना सुचावा, मान्य व्हावा, असे त्यांना वाटते. पण त्याचबरोबर तुम्ही स्वत.ची हिंदू धर्माची संकल्पना त्याज्य मानावी, असा आग्रह नसतो. ही भूमिका मूलतः अनाग्राही आणि अतिशय सहिष्णू आहे. हेच हिंदू धर्माच्या मोठेपणाचे रहस्य आहे. ज्यामुळे हिंदू धर्म नष्ट करता येत नाही.

अशा तऱ्हेच्या धार्मिक संघटनांमुळे आपल्या घटनेने स्वीकारलेल्या तत्त्वाला धक्का बसत नाही का?

मला नाही वाटत की आज हिंदू धर्मामध्ये जी जागरुकतेची भावना दिसते त्यामुळे आपला निधर्मीवाद धोक्यात आला आहे. एवढे मात्र निश्चित की आज हिंदू आक्रमकरित्या जागरुक झाला आहे. उदा. बाबरी मशिद राम जन्मभूमीवाद. या जागरुकतेला मी धर्मांधता म्हणणार नाही. पण त्याचबरोबर हे ही लक्षात ठेवले पाहिजे की या देशात श्रीरामाची, भगवान श्रीकृष्णाची निंदानालस्ती कोणी करु नये. ते सहन केले जाणार नाही. आमच्या सहनशक्तीला सुद्धा मर्यादा आहेत. आम्ही असहिष्णू निश्चितच नाही. केवळ People of book (उदाहरणार्थ ख्रिश्चनांचे बायबल, मुस्लिमांचे कुराण) हे धर्मांध, असहिष्णू असू शकतात. पण हिंदू धर्म स्वभावतः असहिष्णू होऊ शकत नाही. म्हणूनच हिंदूंची जागरुकता आपल्या देशातील निधर्मीवादाला धोका उत्पन्न करणार नाही.

धर्मसत्ता आणि राजसत्ता वेगवेगळ्या असाव्यात का? आपल्या देशासारख्या ठिकाणी जेथे धर्माचा प्रभाव गाढ असतो, तेथे त्या वेगळ्या ठेवता येतील का?

या दोन गोष्टी वेगळ्या असायलाच पाहिजेत. त्यात शंका नाही. आपल्या देशातही त्या वेगळ्या ठेवण्याचा सतत प्रयत्न केला जातो. आजही इंग्लंडसारख्या देशामध्ये त्यांचा प्रमुख धर्मगुरु आर्च बिशप ऑफ कॅंटरबरी ब्रिटिश लोकसभेसमोर भाषण करतो. अशी तेथे प्रथाच आहे. पण आपल्या देशात आपण शंकराचार्य किंवा इमाम यांना लोकसभेत भाषण करण्यासाठी बोलवत नाही.

प्रः हिंदूच्या या प्रचंड संघटनामुळे अल्पसंख्यांकांच्या मनात चलबिचल सुरु झाली का?

उः हा प्रश्न जास्त स्पष्ट शब्दात मुसलमानांच्या संदर्भात उपस्थित करायला पाहिजे. काय आहे की मुसलमान समाजाला अजूनही त्याची मुळं (Roots) सापडलेली नाहीत. चार-पाचशे वर्षे त्यांची साम्राज्ये होती. १८५७ नंतर मात्र त्यांचा *या देशावरील प्रभाव ओसरला.* देशाची फाळणी करुन त्यांनी परत एकदा प्रभाव प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. पण आज पाकिस्तानपेक्षा भारतात मुसलमान जास्त आहेत.

प्रः जातीय दंगे जे होतात ते सहसा हिंदू-मुसलमान यांच्यातच का होतात? हिंदू-पार्शी; हिंदू - ख्रिश्चन असे दंगे का होत नाहीत?

उः मोगली सत्तेच्या काळात हिंदू-मुस्लिम दंगे होत नसत. कारण तेव्हा तेच राज्यकर्ते होते. पण आता मात्र परिस्थिती आमूलाग्र बदलली आहे. हा बदल ते मान्य करतांना दिसत नाहीत.

प्रः आधुनिक काळात, आजच्या या तंत्रवैज्ञानिक काळामध्ये धर्माचा जनमानसावरील प्रभाव कमी होईल का?

उः सर्व समाजाच्या प्रगतीची दिशा आधुनिकतेकडे दिसते. सामाजिक बदलाची गती प्रत्येक समाजाप्रमाणे कमी-जास्त असेल. त्याचबरोबर ज्या भविष्याकडे आपण मार्गक्रमण करत आहोत, ते काय आणि कसे असेल याचा निश्चित अंदाज कोणालाच नाही, त्यामुळे काही प्रमाणात मनांत असुरक्षिततेची भावना असते, त्या त्या बदलाची गती बळजबरी करुन वाढविता येत नाही. आणि ही गती वाढवू नये, नाही तर मग इराणसारखी तीव्र प्रतिक्रिया होते. अशी प्रतिक्रिया निश्चितच प्रगती विरोधी असते.

प्रः ही बदलाची गती (pace of change) ठरवायची कशी व कोणी?

उः विज्ञानातील प्रगती ही गती ठरवेल. एके काळी पितृश्राद्ध करावयाचे म्हणजे किती वेळ लागायचा. पूजा अर्चा वगैरे फार करावे लागत. आत्ताच्या आधुनिक काळामध्ये एखाद्या देवळात रु. १००/- दक्षिणा दिली की तुमच्यावतीने हे सोपस्कार ते करतात. हा केवढा मोठा बदल आहे.

प्रः आजच्या काळात 'धर्म' ही व्यक्तीची खाजगी बाब असावी का?

उः अर्थातच धर्म खाजगी बाब आहेच. जेव्हा ती सार्वजनिक बाब होते, तेव्हा मात्र सामाजिक शांततेला धोका उत्पन्न होऊ शकतो. काही वर्षांपूर्वीची गोष्ट. सुप्रसिद्ध कवी डॉम मोरेस यांचे घर कुलाब्यास आहे. शेजारीच मशिद आहे. दर शुक्रवारी मुसलमान नमाज पढायला तेथे जातात. आणि मशिद रस्त्यावरच असल्याने वाहतूकीचा बट्ट्याबोळ होतो. डॉम मोरेस यांनी याविरुद्ध आवाज उठविला. तेव्हा दंगल होण्याची वेळ आली होती. असे प्रसंग टाळायचे असतील तर धर्म व्यक्तीची खाजगी बाब मानली पाहिजे. मात्र अशा प्रकारची दादागिरी सहन केली जावू नये. मुसलमान आधुनिक काळात जगायला तयारच होत नाही, म्हणून असे प्रकार घडतात. सरकारने मात्र अशा बाबीमध्ये दखल देवू नये. चर्चा करुनच प्रश्न सोडवावेत.

प्रः RSS सारख्या संघटनेविषयी काय मत आहे?

उः माझी वाढ संघाचा तिरस्कार करतच झाली. ही संघटना फॅसिस्टांची आहे, असे आम्हाला सांगण्यात येत असे. त्यात गांधीचा खून झाला. तेव्हा तर संघाविषयीच्या तिरस्काराने, द्वेषाने परमोच्च बिंदू गाठला होता. आता मात्र तसे वाटत नाही. आजचा संघ बराच बदलल्याचे जाणवते. मला नाही वाटत की आता त्यांच्यावर फॅसिस्ट वृत्तीचा आरोप करता येईल. काही वर्षांपूर्वी संघाने मला कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. मी त्यांच्या कार्यकर्त्यांना सांगितल की माझी संघाबद्दलची बरीचशी मते प्रतिकूल आहेत. ते म्हणाले काही हरकत नाही. तरी तुम्ही यावे, अशी आमची इच्छा आहे. मी गेलो. भाषणात बरीच टीका संघावर होती. ती त्यांनी शांतपणे ऐकून घेतली. माझा सत्कार वगैरे केला. माझ्या मते ही फार महत्त्वाची गोष्ट आहे.

प्रः ज्या हिंदू राष्ट्राच्या वैभवासाठी संघ जन्मास आला, त्या हिंदू राष्ट्राची फाळणी संघ रोखू शकला नाही. या अपराधीपणाच्या भावनेतूनच आजची आक्रमकता जन्मास आली, असा आरोप करता येईल का?

उः राष्ट्राच्या फाळणीची जबाबदारी संघावर नाही. फाळणी रोखणे त्यांच्या ताकदीबाहेरचे होते.

प्रः महाराष्ट्राच्या आगामी राजकारणाच्या संदर्भात शिवसेना - भाजप युतीबद्दल तुम्हाला काय वाटते?

उः माझा या युतीला पूर्ण विरोध आहे. भाजपसारख्या पक्षाने शिवसेनेच्या नादी लागू नये. अहो, शिवसेनेला काही तत्त्वज्ञान तरी आहे का? आज हिंदूंचे राजकारण करणे फायद्याचे आहे, म्हणून श्री. बाळ ठाकरे हिंदू राजकारणाच्या गोष्टी बोलत आहेत. यात त्यांचा राजकीय संधिसाधूपणा दिसून येतो. अशा पक्षाशी भाजपसारख्या काही एक बांधिलकी मानणाऱ्या पक्षाने युती करावी, हे फार धक्कादायक आहे.

प्रः धर्म प्रतिगामी असतो का?

उः नाही. मुळीच नाही. माझ्या मते मोक्ष प्राप्तीचे खूप मार्ग आहेत. आपआपल्या अंतःप्रेरणेने जो तो निवड करतो. धर्माची सगळ्यात जास्त बदनामी मध्ययुगीन काळात झाली. काही घोर अन्याय, अत्याचार झाले खरे पण आपण बरीच प्रगती केलेली आहे, हे निश्चित.

प्रः मग सलमान रश्दी किंवा देवराला सती प्रकरणाची जी लोकांची प्रतिक्रिया, ते जलसे, उत्सव दिसले, ते निश्चितच काळजी करण्यासारखे होते.

उः खरं तर हे मलासुद्धा बुचकळ्यात टाकणारे आहे. याचे उत्तर समाजशास्त्रज्ञांनी द्यावे.

प्रः सुरक्षिततेची भावना, (back to roots) वगैरे ...

उः असेल, असेल तसेही असेल. शिवाय एक गोष्ट लक्षात घ्या. देवराला सतीसारख्या घटना किती घडतात? लाखामध्ये एखादी. अशा घटनांचा प्रभाव आपोआपच ओसरेल. त्याने घाबरुन जाण्याचे कारण नाही.

# जाती व्यवस्थेमुळे हिंदू धर्म विस्तारवादी झाला नाही

डॉ. रफिक झकेरिया

प्रः आज राजकारणामध्ये, समाजजीवनामध्ये धर्मांध शक्तीचा प्रभाव वाढलेला का दिसतो?

उः मला वाटत नाही की, आज धर्मांध शक्तीचा जोर वाढत आहे. माझा स्वतःचा अशा शक्तीविरुद्ध लढाईचा पवित्रा असतो. अशा शक्ती डोके वर काढत असल्यास त्या ठोकून काढल्याच पाहिजेत. माझ्या आगामी पुस्तकात Struggle within Islam (पेंग्विन प्रकाशन) मी दाखवून दिले आहे की जेव्हा जेव्हा मुल्ला मौलवीचा, जातीयवादाचा प्रभाव वाढला, तेव्हा तेव्हा सामाजिक शांतता धोक्यात आली. अगदी तुरळक अपवाद वगळता जातीयवादी शक्तीना कधीही राजकीय सत्ता मिळाली नाही, आणि जेव्हा त्यांनी सत्ता मिळविली, तेव्हा त्यांना लवकरच ती सोडावी लागली. ११ वर्षांच्या जुलमी राजवटीनंतर बेनझीर भुट्टो निवडून येते. पाकिस्तानसारख्या देशाची पंतप्रधान होते. हा याचाच पुरावा आहे, की धार्मिक भावनेचे आकर्षण समाजाला फार काळ वाटत नाही. नाहीतर इस्लामी राजवट आणण्याचे वचन देणारे पक्ष पराभूत झालेच नसते. मुस्लिम समाज काय किंवा इतर धर्मबांधव काय, लवकरच जातीयवादी शक्तीचा कट ओळखतात. हे मला मान्य आहे की, जातीयवादी लढा इस्लाममध्ये जास्त तीव्र आहे. त्याचे कारण म्हणजे धर्मतत्त्व लवचिक नसणे, हे होय. आपण हे समजून घेतले पाहिजे की कुराण देवाचा शद्ब आहे. त्यामुळे बंधनकारक आहे.

तरीही हा धर्म फार पुरोगामी आहे. H. G. Wells यांच्या शद्वात, "It is the freshest, cleanest social, political order that ever came to this world". हा धर्म देवाचा शद्ब असल्याने तेथे फक्त अन्वयार्थ लावायलाच जागा आहे. आणि म्हणूनच इस्लामचे खूप अन्वयार्थ आहेत. उदा. एकापेक्षा जास्त बायका करण्याचा अधिकार घ्या. या बाबतीत जगभर दोन प्रणाली दिसतील. एका प्रणालीमध्ये हा अधिकारच नाही. तर दुसऱ्या प्रणालीप्रमाणे अधिकार आहे पण त्या व्यक्तीने त्याच्या बायकांना समानतेने वागवायला पाहिजे, सारखेच प्रेम दिल पाहिजे वगैरेसारख्या अटी आहेत.

प्रः हिंदू धर्माविषयी काय?

उः हिंदू त्या अर्थाने धर्मच नाही. हे जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. कारण वेद, आणि इतर धर्मग्रंथ म्हणजे देवाचा शद्ब, अशी योजना नाही. शिवाय हिंदू धर्मामध्ये जाती व्यवस्थेमुळे अंतर्गत धर्मांतराला वाव नाही. याच जाती व्यवस्थेमुळे हिंदू धर्म विस्तारवादी झाला नाही. म्हणूनच जेव्हा हिंदू राजे राज्यावर आले, तेव्हा त्यांनी राजसत्तेचा वापर करुन धर्मप्रसार केला नाही आपोआपच हिंदू धर्म सहिष्णू बनला.

प्रः हा मुद्दा उदाहरण देऊन स्पष्ट कराल का?

उः तुम्हाला सांगतो, काही वर्षांपूर्वी माझे मित्र श्री. बलराज मधोक यांनी सांगितलेली ही गोष्ट. इस्लामच्या आक्रमणानंतर काश्मिरमध्ये प्रचंड प्रमाणात धर्मांतर झाले. नंतर काही वर्षांनी हिंदूंचे राज्य आले. तत्कालीन राजाला वाटले की मुस्लिम राज्याच्या काळात ते मुसलमान झाले, त्यांना परत हिंदू करुन घ्यावे. त्याने मुसलमान झालेल्या कुटुंबियांच्या प्रमुखांना भेटायला बोलाविले. ते सगळे परत हिंदू व्हायला तयार झाले. पण ब्राह्मणांनी याला जोरदार हरकत घेतली. पण राजाचा शोध होऊ नये म्हणून विचार करण्यासाठी वेळ मागून घेतला. त्यांनी बरेच धर्मग्रथ पालथे घातले. पण व्यर्थ. शेवटी धीर धरुन त्यांनी राजाला सांगितले की एकदा म्लेच्छ झालेल्याला परत हिंदू करुन घेता येत नाही. तरीही राजा हटेना. म्हणून मग ब्राह्मणांनी काशीला जाण्याची परवानगी मागितली. काशीला आल्यावर इतर धर्मगुरुंशी चर्चा केली. पण निर्णय तोच. परत हिंदू होण्याचा मार्ग नाही. ब्राह्मण घाबरले; राजाची इतराजी होईल, ही भीती. त्यांनी धर्मगुरुंना विनंती केली की तुम्ही स्वतः येऊन हा निर्णय राजाला सांगा. ते ब्राह्मण, धर्मगुरुंना घेऊन काश्मिरला आले. राजाला भेटले. धर्मांतराविरुद्ध निर्णय सांगितला. तरीही राजा ऐकेना. तेव्हा ब्राह्मणांनी, धर्मगुरुंनी राजाला सांगितले की तुम्ही जर हट्टाने म्लेच्छांना परत हिंदू करुन घेतले की आम्ही समोरच्या तलावामध्ये स्वत.ला बुडवून घेऊ. राजा घाबरला. आणि स्वत.चा आग्रह सोडला (समजा राजा तेव्हा घाबरला नसता, तर कदाचित आज काश्मिरचा प्रश्नच नसता)

प्रः या संदर्भात मला सांगा की धर्मांतराला उत्तेजन दिल्याचा परिणाम काय झाला?

उः असे बघा की मुस्लिम सत्तेची केंद्र म्हणजे दिल्ली, आग्रा येथे अगदी मुस्लिम सत्तेच्या सर्वोच्च काळात सुद्धा मुसलमानांचे प्रमाण १५ ते २० टक्क्यांपेक्षा जास्त नव्हते. या उलट सिंध, बंगाल जेथे मुस्लिम सत्ता कधीही बळकट नव्हती, तेथे जास्त मुसलमान होते. ए. थॉमस नावाच्या अभ्यासकाचे पुस्तक (Preaching of Islam) त्यात सांगितले की, 'आता ही बाब पुराव्यानिशी सिद्ध झाली की सुफी संत जेथे स्थिरावले तेथे फार मोठ्या प्रमाणात धर्मातर झाले'. शिवाय सुफी तत्त्वज्ञान म्हणजे हिंदू, मुस्लिम धर्मांचा समन्वय. (त्या दृष्टीने बघितल्यास धर्मांतरित मुसलमान खरे मुसलमान नाहीतच)

प्रः मग हा समन्वय फार मोठ्या प्रमाणात का झाला नाही? आज सुद्धा आपल्यासमोर हिंदू-मुस्लिम प्रश्न का आहे?

उः मुसलमान एकेश्वरवादी आहेत. शिवाय मूर्तिपूजेविरुद्ध आहेत, कारण पैगंबर महंमदाने काबामधील मूर्तिपूजेविरुद्ध बंड केले होते. पण याचा अर्थ महंमद सर्व प्रकारच्या मूर्तिपूजेविरुद्ध होता, असा नव्हे शिवाय हे हिंदू विरुद्ध जाऊ शकत नाही, कारण हिंदूसुद्धा एका ब्रह्माला मानतात. इमाम अबू हनिफा ज्यांना बहुसंख्य सुन्नी मुसलमान मानतात त्यांच्या मते हिंदू सुद्धा (People of book) आहेत म्हणजे असे लोक ज्यांना देवाने योग्य मार्ग दाखविण्यासाठी देवदूत पाठविले आहेत भारतातील किती तरी मान्यवर उलेमांनी राम, श्रीकृष्ण यांना देवदूत मानले आहे.

प्रः हिंदू मुस्लिमाचा एकमेकाविषयीचा अविश्वास सुरुवातीपासून होता का?

उः मोगल सत्तेच्या काळात कधी जातीय दंगे झाले नाहीत. शिवाजी महाराजांनी मोगल सत्तेविरुद्ध बंड केले. त्यांनी सुद्धा राज्य स्थापन करण्यासाठी त्याच तऱ्हेने धर्माचा वापर केला, ज्या तऱ्हेने औरंगजेबाने सत्ता बळकट करण्यासाठी धर्माचा वापर केला. केवळ या दोन राज्यकर्त्यांनीच नव्हे तर सर्वच तत्कालिन राज्यकर्त्यांनी धर्माचा वापर केला. एक लक्षात ठेवले पाहिजे की तो काळ मध्ययुगीन काळ होता.शिवाजीच्या सैन्यात ३० टक्के मुसलमान होते. त्यांचा नाविक दलप्रमुख मुसलमान होता. शिवाजीने कडक हुकूम दिला होता की मुस्लिम स्त्रिया, कुराण वगैरेचा मान राखलाच गेला पाहिजे. शिवाजीची लढाई इस्लामविरुद्ध जर असती तर त्याने असा हुकूम दिलाच नसता. शिवाय हेही लक्षात घेतले पाहिजे की औरंगजेब जेव्हा शिवाजीशी लढत होता तेव्हाच तो इतर पाच मुस्लिम सत्तांशी लढत होता. एक मराठ्यांची सत्ता सोडल्यास औरंगजेबाने इतर मुस्लिम सत्ता बुडविल्या. तो लढा जर हिंदू मुस्लिम असा होता, तर मग या ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ कसा लावायचा? वस्तुतः तो लढा केंद्रीय सत्ता विरुद्धस्थानिक सत्ता असाच होता.

प्र. दुर्दैवाने तेव्हा सरकारिया आयोग नव्हता, असो. हे जर मान्य

केले तर औरंगजेबाने मूर्तिभंजन का केले?

उः औरंगजेबाने काही प्रमाणात मंदिरे उध्वस्त केली. जरा काळजीपूर्वक पाहिले तर असे दिसेल की त्याने श्रीमंत असलेली देवळेच लुटली, मोडली. त्यात धर्मांधतेपेक्षा संपत्तीचा मोहच जास्त होता. जेव्हा तुम्ही एखादे अनैतिक कृत्य करता, तेव्हा त्या कृतीचे समर्थन धर्मामध्ये मिळविण्याचा प्रयत्न करता. तसा प्रयत्न औरंगजेबाने केला. भंगलेल्या देवळावर बांधलेल्या मशिदीसुद्धा धार्मिक कारणापेक्षा राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी होत्या. असे असूनसुद्धा जनमानसामध्ये औरंगजेबाची प्रातिनिधिक प्रतिमा डागाळलेलीच आहे; औरंगजेब कर्मठ होता. तो शरियतनुसार वागण्याचा आग्रह करत असे. त्याने हिंदूंवर जिजिया कर लादला. त्यामुळे प्रजेमध्ये असंतोष धुमसत होता. हा असंतोष मंदिरासारख्या प्रार्थनेच्या जागी प्रकट होत असे. म्हणूनच औरंगजेबाने अशी मंदिरे तोडून टाकली. कारण त्याच्या दृष्टीने ती मंदिरे नव्हतीच तर त्याच्या विरुद्ध बंडाची केंद्र होती. (आजसुद्धा सुवर्ण मंदिरात अतिरेकी मंदिराचा वापर अशाच कारणासाठी करताहेत) अन्यथा औरंगजेबाच्या काळात सरकारी नोकरीत हिंदूंचे प्रमाण ३८ टक्के (जे अकबराच्या काळात केवळ १८ टक्के होते) कसे झाले? औरंगजेब व्यक्तिशः हिंदूंच्या विरुद्ध नव्हता.

प्रः भारतासारख्या अनेक धर्म असलेल्या देशात, जेथे धर्माचा जनमानसावर प्रचंड प्रभाव आहे, तेथे राजसत्ता आणि धर्मसत्ता वेगळी ठेवता येतात का?

उः जेथे जेथे धर्मसत्तेने राजसत्तेमध्ये ढवळाढवळ केली तेथे तेथे प्रचंड गोंधळ झाला. पण भारतात ते शक्य नाही, कारण हिंदूंचा दृष्टिकोन, जीवनदृष्टी एवढी व्यापक आहे की, कोणा एका धर्मावर आधारित राज्य निर्माणच होऊ शकत नाही. शिवाय हिंदू धर्मावर आधारित राज्य निर्माण करण्यासाठी मुळात 'हिंदू'ची व्याख्या करावी लागेल. महात्मा गांधीसारख्या धार्मिक माणसानेसुद्धा भारतामध्ये धर्मातीत राष्ट्र असावे, असा आग्रह धरला. पण अशा धर्मातीत राष्ट्रात सुद्धा सांस्कृतिक प्रभाव (जो धार्मिक वारशाचा एक महत्वाचा भाग आहे) बहुसंख्य गटाचाच असतो. आणि अल्पसंख्यांक समाजाने ही बाब मान्य केली पाहिजे. यातूनच समन्वय साधू शकेल.

प्रः अल्पसंख्यांक समाजाला मिळणाऱ्या विशेष दर्जा, अधिकाराबद्दल बहुसंख्यांक समाजाला राग का येतो?

उः देश दुभंगण्याचे काम स्वतंत्र मतदार संघाने केल्याचे आपण म्हणतो. स्वातंत्र्यानंतर मुसलमानांसाठी असलेले स्वतंत्र मतदारसंघ रद्द केले गेले. आज किती खासदार, आमदार मुसलमान आहेत? मुसलमानांच्या लोकसंख्येच्या एक दशांश सुद्धा लोकनियुक्त प्रतिनिधी नाहीत. या संदर्भात बघता मनात प्रश्न येतो की मग कोण बरोबर होतं-एकत्र मतदार संघ मागणारे की विभक्त मतदार संघ मागणारे? जो विशेष दर्जा, अधिकारांविरुद्ध ओरड केली जाते, ते आहेत कुठे? मुसलमानांचे सरकारी, निम-सरकारी, खाजगी, लष्करी, मुलकी सेवेत प्रमाण काय आहे? श्रीमती इंदिरा गांधींनी या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक उच्चपदस्थ समिति स्थापन केली होती, त्या समितीचा मी सभासद होतो. जी माहिती, आकडेवारी आम्ही गोळा केली त्यावरुन असे दिसून आले की या सर्व महत्वाच्या क्षेत्रातून मुसलमानांची संख्या दिवसेदिवस कमीच होत आहे. मुसलमान फक्त आरडाओरड करण्यात प्रवीण असतात. त्यामुळेच इतरांचा गैरसमज होतो की यांना विशेष दर्जा आहे, अधिकार आहेत. तसं काही नाही.

प्रः आपल्या देशात आज प्रचंड धार्मिक गोंधळाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर आपल निधर्मीवाद अपयशी ठरला, अस म्हणता येईल का?

उः निधर्मीवाद वाढण्यासाठी, आणि तो वाढलाच पाहिजे, निधर्मी शक्तींनी एकत्र यावे. स्वातंत्र्याप्रमाणे निधर्मीवादासाठी सतत जागरुक राहावे लागते. शिवाय १० टक्के असलेले मुसलमान ८५ टक्के हिंदूंना काय करु शकणार आहेत? जातीय दंग्यामध्ये काय होते? मारल्या गेल्यापैकी ९५ टक्के मुसलमान असतात. असे जातीय दंगे थांबण्यासाठी निधर्मी शक्तीचा प्रभाव वाढला पाहिजे. गेली २५ वर्षे मी माझ्या लिखाणातून, भाषणातून हेच मुसलमानांना सांगत आलो आहे की कोणतेही आणि कितीही बळकट सरकार तुम्हाला संरक्षण देऊ शकत नाही. तुम्ही सुरक्षित आहात कारण बहुसंख्यांक समाज शांतताप्रिय, सहिष्णू आहे म्हणून.

प्रः एक मुसलमान म्हणून तुमचा वैयक्तिक अनुभव काय आहे?

उः फारच चांगला. तुम्हाला माहित आहेच की मी महाराष्ट्र सरकारमध्ये १७ वर्षे मंत्री होतो. मी औरंगाबादचा. तेथे एक शैक्षणिक संस्था मला स्थापावयाची होती. त्या संस्थेत ७० टक्के विद्यार्थी मुसलमान आहेत पण ८० टक्के अनुदान हिंदूंनी दिले आहे.

प्रः भारतावर मुसलमानांनी राज्य केले आणि ब्रिटिशांनी राज्य केले. असे असूनसुद्धा ब्रिटिशांविषयी तितकीशी रागाची भावना आढळत नाही, जेवढी मुसलमानांविषयी आढळते, असे का?

उः त्यासाठी इतिहास मांडावा लागेल. इस्लामचे भारतावर आक्रमण मध्ययुगात झाले. जेव्हा जगभर समाजजीवनावर, राज्यसत्तेवर धर्माचा गाढ प्रभाव होता. या उलट ब्रिटिश येथे आले ते मुळात व्यापार करण्याच्या हेतुने आणि नंतर त्यांनी साम्राज्य स्थापन केले. शिवाय ब्रिटिश भारतात आले तेव्हा तिकडे प्रबोधनाचे युग आलेले होते. फ्रेंच राज्यक्रांती झालेली होती. राज्यसत्ता आणि धर्मसत्ता यांची फारकत झालेली होती. म्हणूनच मिशनऱ्यांना फारसा पाठिंबा सरकारकडून मिळाला नाही.

प्रः शिवसेना - भाजपा यांच्या युतीबद्दल काय मत आहे?

उः ज्या तऱ्हेने शिवसेनेची वाढ झाली, हा प्रकार काहीसा अनाकलनीय आहे. बाळ ठाकरे अत्यंत हुशार माणूस आहे.

हा माणूस योग्य वेळेस योग्य भूमिका (म्हणजे लोकप्रियतेच्या लाटेवर आरुढ होण्यासाठी योग्य भूमिका) घेत असतो. बाळ ठाकरे खरोखरच किती प्रमाणात मुस्लिम - विरोधी आहेत, हेही समजून घ्यायला हवे. परवाच त्यांनी एका मुलाखतीत सांगितले की बॅ. अंतुले परत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले तर शिवसेना त्यांना पाठिंबा देईल. त्यामुळे शिवसेनेविषयी ठोक विधान करता येणार नाही. माझ्या मते हा सर्व सत्तेचा खेळ आहे. भाजपचे उदाहरण घ्या. अटलबिहारी वाजपेयी इतका कोणताही परराष्ट्रमंत्री पाकिस्तानचा इतका चांगला मित्र नव्हता. त्यांच्या कारकिर्दीत व्हिसाचे नियम शिथिल करण्यात आले. कित्येक वेळा असे वाटते की हिंदू राष्ट्र वगैरे घोषणा केवळ मते मिळविण्यासाठी असतात. उद्या श्री. बाळ ठाकरे यांना वाटले की हिंदू - मुस्लिम ऐक्याची घोषणा दिल्यास जास्त जागा जिकता येतील, तर ते तशी घोषणा देतील. त्यात राजकीय तत्त्वज्ञानाचा भाग किती आणि जागा जिकण्याचे राजकारण किती हे सूज्ञास लक्षात येते.

प्रः असे नेतृत्त्व बेजबाबदार नेतृत्व नाही का?

उः मी तर असे म्हणेन की केवळ बेजबाबदारच नव्हे तर अत्यंत स्वार्थीसुद्धा. तात्पुरत्या फायद्यासाठी हव्या तशा घोषणा द्यायच्या, लोकांच्या भावना भडकावयाच्या, हीच माझ्या मते आधुनिक राजकारणाची शोकांतिका आहे.

---

## मार्क्सवाद आणि धर्म एकमेकांना पूरक आहेत

### कॉ. मोहित सेन

प्रः आजच्या समाजजीवनात जातीयवादी शक्तीचा प्रभाव वाढताना का दिसतो? आपण स्वीकारलेला निधर्मीवाद पराभूत झाला का?

उः धर्मांध शक्तीचा प्रभाव वाढत आहे, हे जरी खरं असलं तरी निधर्मी शक्ती पराभूत होत आहेत, असं नव्हे. शिवाय आपण धर्म आणि धर्मांध शक्ती यांची गल्लत करता कामा नये. धर्मांधता (Fundamentalism) म्हणजे *धर्माचे एकांगी दर्शन तर जातीयवाद* (Communalism) म्हणजे धर्माचा राजकीय वापर! धार्मिक प्रवृत्तीचा माणूस धर्मांध नसतो. उदा. खान अब्दूल गफार खान यांच्यावर धर्माचा गाढ प्रभाव होता. पण तरी ते पूर्णपणे राष्ट्रवादी होते. या उलट बॅ. जिना. त्यांना इस्लामची फारशी माहिती नव्हती, कुराण त्यांना वाचता येत नसे, पण तरीही त्यांनी धर्माचा वापर करुन देशाची फाळणी केली. भारतीय समाजावर धर्माचे प्राबल्य आहे तरी हा समाज जातीय, धर्मीय आहे, असे मुळीच नाही. पंजाबचे उदाहरण घ्या. इतकी माणसं मारली गेली तरी जातीय दंगे किंवा धार्मिक पातळीवर आणि मोठ्या प्रमाणात मारामाऱ्या झाल्या नाहीत. अगदी ताजे उदाहरण म्हणजे राम जन्मभूमी - बाबरी मशिद प्रकरण घ्या. खुद्द अयोध्या गावात त्या प्रकरणाविषयी काहीही वातावरण नाही, स्थानिक जनता पूर्णपणे उदासीन आहे. बाहेर मात्र या प्रकरणावरुन किती मोर्चे काढले जातात. ज्यांचे अशा प्रकरणात हितसंबंध गुंतले आहेत, ज्यांना त्याचा राजकीय वापर करावयाचा आहे, तेच फक्त हे प्रकरण जागे ठेवतात.

प्रः कॉ. सेन, तरी माझी शंका अनुत्तरित राहते की आज जातीयवादी शक्तीचा प्रभाव का वाढतो?

उः प्रभाव वाढतो आहे, असं म्हणण्यापेक्षा त्यांच्या मागण्या जास्त तीव्र स्वरुपात समाजासमोर येत आहेत. त्यांना आज prominence मिळत आहे, पण म्हणून ते popular आहेत, असं नव्हे. शिवाय भांडवलशाही व्यवस्थेतून निर्माण होणारा परात्मभाव समाजाला अशा शक्तीकडे लोटत आहे. भांडवलशाही व्यवस्था अत्यंत क्रूर, निर्दय असते. या व्यवस्थेचे एकच उद्दिष्ट आणि ते म्हणजे फायदा, जास्त फायदा. त्यामुळे परात्मभाव वाढतो. माणसाची नैसर्गिक सर्जनशीलता मारली जाते. आजची *डाव्या चळवळीची शोकांतिका म्हणजे कामगारसुद्धा* भांडवलदार होऊ बघताहेत. आपल्या देशाची परिस्थिती विचारात न घेता हवी तेवढी पगारवाढ मागताहेत. कॉ. डांगे म्हणतात त्याप्रमाणे आजचा कामगार भिकारी झाला आहे. केवळ जास्त पगाराची, सवलतीची भीक मागणारा भिकारी. आज कामगाराला राजकीय सत्तेची काहीही ओढ नाही. कामानी ट्युब लि. बंद पडलेली कंपनी कामगारांनी सहकारी संस्था स्थापन करुन सुरु केली आहे. या प्रयोगाकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. आणि म्हणूनच मला कामानी ट्युब लि. मध्ये चाललेल्या प्रयोगाविषयी विलक्षण आत्मियता आहे.

प्रः भारतासारख्या धर्माचा खोलवर प्रभाव असलेल्या देशात, जिथे अनेक जाती, धर्म आहेत, तेथे राजसत्ता आणि धर्मसत्ता वेगवेगळी ठेवता येणे शक्य आहे का?

उः हो. शक्य आहे. शिवाय आवश्यकही आहे. मुख्य म्हणजे एक समजून घेतले पाहिजे की, निधर्मीवाद धर्माविरुद्ध नाही. धर्मसत्ता, राजसत्तेपासून वेगळी राहिलीच पाहिजे. शिवाय धर्मावर आधारलेल्या राज्यांची काय परिस्थिती आहे? बांगला देशकडे बघा. इराणमध्ये काय चालतं आहे, याचा विचार करा.

प्रः अल्पसंख्यांकांच्या प्रश्नाचे काय? वारंवर होणारे जातीय दंगे कसे थांबविता येतील?

उः आजकाल होणारे दंगे राजकीय - धार्मिक हितसंबंध

जपणाऱ्या समाजकंटकांनी घडवून आणलेले असतात. अशा दंग्यांमध्ये सामान्य माणसांचा यत्किंचितही सहभाग नसतो. पण . त्याचबरोबर हेही लक्षात घेतले पाहिजे की सामान्य माणूस असे दंगेधोपे थोपविण्यासाठी काहीही करायला तयार नाही. हे अपयश डाव्या, पुरोगामी शक्तींचं आहे. सत्तारुढ काँग्रेस पक्षाने लोकांमध्ये काम करणे केव्हाच सोडले आहे. त्यांचा जनता संपर्क केवळ निवडणुका जवळ आल्यावर सुरु होतो. कॉंग्रेस पक्षाची ही गत, तर डावे पक्ष केवळ कॉंग्रेसला विरोध करण्यात मग्न आहेत. जनतेचे प्रश्न सोडवायचे कोणी?

प्र: शिक्षणाचा प्रसार, आर्थिक सुबत्ता इत्यादीमुळे धर्माचा माणसावरील प्रभाव कमी होईल का?

उ: धर्माचा समाजावरील परिणाम कमी होणे अवघड आहे. मार्क्सवादसुद्धा धर्मविरोधी नाही. मार्क्सवादाचे शत्रू नेहमी मार्क्सचे एक वचन उधृत करतात की 'धर्म ही अफूची गोळी आहे'. पण हे वचन अर्धवट उधृत केल्यामुळे मार्क्सवाद धर्म विरोधी आहे, अशी भावना पसरली. मार्क्सचे म्हणणे आहे,

"Religion is the sigh of oppresed creature; It is a heart of heartless world; it is the soul of soulless condition; it is the spirit of spiritless situation. It is the opium of people".

यावरुन स्पष्ट होईल की मार्क्स धर्मविरोधी नव्हता. खरं तर मार्क्सवाद आणि धर्म एकमेकांना पूरक असे कार्य करु शकतात. हिंदू धर्माचे उदाहरण घ्या. वेदांत, गीतेमध्ये सांगितले आहे की सर्व प्राणिमात्रांचा आत्मा एक आहे. याचाच अर्थ प्रत्येक माणूस समान आहे आणि प्रत्येकाला मोक्षाची समान संधी उपलब्ध आहे. मग वादाचा मुद्दा आहे कोठे? मार्क्सवाद आणि धर्म यांचा समन्वय साधावयाला हवा. धर्माला मार्क्सच्या जडवादाची जोड आणि मार्क्सवादाला धर्माची नैतिकता यांची जोड द्यायला हवी. धर्माने अंधश्रद्धा, जाती व्यवस्था, शोषण याविरुद्ध लढावयाला हवें तर मार्क्सवादाने स्टालिनशाहीविरुद्ध बंड करावयाला हवे. जी स्टालिनशाही नीतिमत्तेचा गळा दाबते.

प्र: कॉ. सेन, हे जे तुम्ही सांगत आहात, हे फार खळबळजनक वाटते, कारण एवढी वर्षे असे वाटत होते की, मार्क्सवाद धर्मविरोधी आहे.

उ: याचे कारण मार्क्सवादाच्या शत्रूंनी सातत्याने केलेला प्रचार एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला डाव्यांनी केलेल्या काही चुका. यांचा एकत्रित परिणाम म्हणजे मार्क्सवाद धर्मविरोधी आहे, अशी चुकीची प्रतिमा निर्माण झालेली आहे. आज तर आम्हाला असे वाटते की स्वामी विवेकानंदासारखे कार्य करायला हवे. स्वामी विवेकानंदाना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने पळवून नेला आहे. त्यांना परत डाव्या गटात आणावयाचे आहे.

प्र: याचा अर्थ तुम्हाला धर्म आणि जडवाद यांच्यातील दरी बुजवायची आहे.

उ: अलबत. हे केवळ भारतीय कम्युनिस्ट करु पाहताहेत असे नव्हे. कॉ. गोर्बाचोव्ह रशियात हेच साधू पाहत आहेत. त्यांनी चर्चवरील बरीच बंधने शिथिल केली आहेत. समन्वयाचे वारे जगभर वाहत आहेत, ते भारतीय कम्युनिस्टांनी नीट समजून घेतले पाहिजे.

प्र: ही समन्वयाची वैचारिक बैठक भारतीय कम्युनिस्टांमध्ये सुरुवातीपासून होती की हळूहळू उत्क्रांत होत गेली?

उ: हळूहळू उत्क्रांत होत गेली. १९५६ च्या आसपास जाणवायला लागले. १९६० च्या आसपास इटालियन कम्युनिस्टांचे बरेच साहित्य वाचनात आले. Togliatti या थोर इटालियन मार्क्सवाद्याने सांगितले की कम्युनिझम आणि कॅथॉलिसिझम या दोन महत्त्वाच्या विचारप्रणाली आहेत आणि या दोन्ही विचारप्रणाली मुक्ती-वादी आहेत त्यांच्यात विरोध स्थलापेक्षा साम्यस्थळे जास्त आहेत. वगैरे वगैरे विचार वाचून आम्हीही विचार करायला लागलो. कम्युनिझम आणि कॅथॉलिसिझम यांच्या संदर्भात एक गंमतीदार उदाहरण आठवते, ते सांगतो. कॅथॉलिकांचा धर्मगुरु पोप याने फतवा काढला की जो कोणी कम्युनिस्ट असेल त्याला, त्याच्या नातेवाईकांनी चर्चमध्ये बाप्तिस्मा दिला जाणार नाही, त्यांची लग्नं चर्चमध्ये लावली जाणार नाहीत, त्यांची प्रेते चच आवारामध्ये पुरु दिली जाणार नाहीत. थोडक्यात जे स्वतःला कम्युनिस्ट म्हणवून घेतील, त्यांना वाळीत टाकण्यात येईल. इटालियन कम्युनिस्टांनी सरळ चर्च आणि चर्चचे आवार व्यापून टाकले आणि जाहीर केले की जोपर्यंत हा फतवा मागे घेण्यात येत नाही, तोपर्यंत आम्ही येथून जाणार नाही. सामान्य इटालियन नागरिकांना वाटले की ही मंडळी कम्युनिस्ट जरी असली तरी त्यांना चर्चमध्ये यावयाचे आहे, देवाची करुणा भाकावयाची आहे, त्यांना चर्चची दारं कशी काय बंद करता येतील? सामान्य माणसांनी निदर्शनं केली आणि शेवटी पोपला तो फतवा मागे घ्यावा लागला. अशा तऱ्हेने ही भूमिका उत्क्रांत होत गेली. ग्रॅहम ग्रीन या सुप्रसिद्ध कादंबरीकाराची The Power and the glory नावाची अत्यंत प्रसिद्ध कादंबरी आहे. त्यातील एक प्रसंग सांगतो म्हणजे मार्क्सवादाला नैतिकतेची बैठक का हवी, हा मुद्दा स्पष्ट होईल. या कादंबरीत एक प्रसंग असा आहे की एका तरुण क्रांतिकारकाची आणि एका म्हाताऱ्या फादरची (ख्रिश्चन धर्मगुरु) गाठ पडते. हा फादर अत्यंत व्यसनी वगैरे असतो. तो तरुण क्रांतिकारक त्या फादरला विचारता की, 'तुमच्यासारखा व्यसनी, पापी माणूस धर्मगुरु कसा होऊ शकतो?' तो फादर त्याला उत्तर देतो की 'तरुण माणसा, माझा देवावर विश्वास आहे. देव चांगलाच आहे. पण मी वाईट असू शकतो. माझी व्यसनं,

पापं यांच्यामुळे देवाच्या चांगुलपणावर मुळीच परिणाम होणार नाही. पण तुझी गोष्ट वेगळी आहे. तुझा देवावर विश्वास नाही. त्यामुळे चांगले काम करण्यासाठी तू स्वतः चारित्र्यवान असावयाला हवे. तू माझ्यासारखा वागून चालणार नाही.' याचाच अर्थ क्रांतिकारकाने नैतिक वागणूक, माणूसकीची वागणूक अंगिकारलीच पाहिजे. महात्मा गांधी म्हणतच असत, 'वैष्णव जन तो तेणें कहिये पीड परायी जाने...'

प्रः ज्या महात्मा गांधीचा तुम्ही आत्ता उल्लेख केला त्या महात्मा गांधीना डाव्यांनी साम्राज्यसत्तेचा हस्तक वगैरे विशेषणं बहाल केली आहेत.

उः कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (CPI) ने १९६४ सालीच ही भूमिका सोडली. आज या भूमिकेला फक्त (CPIM) चिकटून आहे. आमच्या मते महात्मा गांधी केवळ साम्राज्य विरोधीच नव्हते तर भांडवलदारांविरुद्धही होते.

प्र. पण महात्मांजीची आणि बिर्ला शेटजीची चांगली मैत्री होती.

उः बरोबर आहे. ती केवळ स्वातंत्र्य मिळेपर्यंत. तुम्हाला एक प्रसंग सांगतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महात्माजी एकदा दिल्लीत होते. त्यांच्या संध्याकाळच्या प्रार्थनेला त्यांच्या बाजूला बिर्ला शेट बसले होते. एका पत्रकाराने महात्माजीना प्रश्न केला की 'महात्माजी आता तर ब्रिटिश हा देश सोडून गेलेत. आता तुम्ही कोणाविरुद्ध लढे उभारणार?. महात्माजी शेजारीच बसलेल्या बिर्ला शेटजींकडे बोट दाखवून म्हणाले, 'यांच्याविरुद्ध'. दुःखाची बाब अशी की येथील मार्क्सवाद्यांनी हे समजूनच घेतले नाही. हे ही लक्षात ठेवले पाहिजे की महात्मा गांधींनी स्वत.चा राजकीय वारसदार म्हणून साम्यवादी विचारांच्या पंडित नेहरूंची निवड जाहिर केली. राजाजी किंवा सरदार पटेलांची नव्हे. आपल्या देशातील कितीतरी मार्क्सवाद्यांपेक्षा महात्माजी जास्त मार्क्सवादी होते.

प्रः आपल्याकडे आर्थिक लढ्यापेक्षा धार्मिक लढे तीव्रपणे आणि दीर्घकाळ लढविण्यात येतात. आर्थिक लढे मागण्या मान्य झाल्यावर ओसरतात. याचाच अर्थ असा करावा की लोकांची एकी टिकवून धरण्यासाठी आर्थिक लढ्यापेक्षा धार्मिक लढे महत्त्वाचे असतात.

उः धर्म जसा लोकांना एकत्र आणू शकतो त्याचप्रमाणे दुही पसरवू शकतो. आपल्याकडील संत कवींनी समाज एकत्र आणण्यासाठी धर्मांचा छान वापर केला होता. एवढे निश्चित की आर्थिक लढ्यापेक्षा धार्मिक लढे दीर्घकाळ चालतात. उदा. रामजन्मभूमी - बाबरी मशिद प्रकरण. आर्थिक मागण्या, लढे स्वभावतः अल्पजीवी असतात. शिवाय आर्थिक लढे माणसाला त्याच्यापासून दूर, स्वतःपासून बाहेर नेऊ शकत नाहीत. याचाच अर्थ आर्थिक लढे आत्मकेंद्रीत असतात. या उलट धार्मिक चळवळी माणसाला नैतिक पातळीवर पोहोचवू शकतात.

प्रः रामजन्मभूमी - बाबरी मशिद प्रकरणी तुमचे काय मत?

उः प्रा. बिपिन चंद्रा, प्रा. रोमिला थापर वगैरेसारख्या नामवंत इतिहासकारांच्या संशोधनावरुन हे सिद्ध झाले आहे की बाबरी मशिद जेथे आज आहे तेथे फार पूर्वी बुद्ध विहार होता. मग तेथे मंदिर आले आणि नंतर मशिद. याचाच अर्थ ही जागा बुद्धांना दिली पाहिजे. आमचे म्हणणे असे की १५ ऑगस्ट १९४७ रोजी जी परिस्थिती होती ती तशीच चालू ठेवावी. लखनौमध्ये अमिनाबागमध्ये असाच प्रकार आहे. मंदिर की मशिद वाद तेथेही घातला जाऊ शकतो. पण तेथे सामंजस्याने हिंदूंसाठी आणि मुसलमानांसाठी प्रार्थनेच्या वेळा ठरवून दिलेल्या आहेत. आणि हे सुद्धा १९३० सालापासून काहीही गडबड न होता सुरु आहे. तसेच काहीतरी रामजन्मभूमी प्रकरणी करायला पाहिजे. कम्युनिस्ट पार्टीचा मुळी ठरावच तसा आहे.

---

## संघामध्ये किती दलित आहेत याची यादी संघाने जाहीर करावी

**वसंत मून**

प्रः आज आपल्याला धार्मिक प्रभाव वाढल्याचे जाणवते का ?

उः सामान्यतः व्यक्ती धार्मिक असते. पण हिंदूंच्या धार्मिक प्रतिक्रिया संघटितपणे समाजासमोर येत नसत. पूर्वीच्या काळी हिदू-मुसलमान दंगल झाली तर मुसलमान विरुद्ध हिदुतील एखादी जात असा सामना होत असे. आज मात्र दंगल झाल्यास सर्व हिदू एकत्र आल्याचे आढळते.

प्रः म्हणजे आज हिंदू धर्मामध्ये एकी झाली की काय?

उः नाही. ही ऐक्याची भावना क्षणिक असते. धार्मिक भावनांना आवाहन केले तरच सर्व हिंदू आज एकत्र येतात. अन्यथा दरी कायम असते. पण आज धार्मिक राजकारण आहे, हे निश्चित.

प्रः मग आपल्या धर्मातीत राज्यव्यवस्थेचा हा पराभव मानायचा का?

उः इंग्रजांनी येथे कायद्याचे राज्य आणले. त्यांनी मानवतेच्या मूल्यांचे संगोपन केले. ख्रिस्ती मिशनरीसुद्धा त्या अर्थाने इतरांवर आक्रमण करीत नसत. इंग्रजी राज्यातच सतीचा कायदा, बालविवाह कायदा, विधवा पुनर्विवाह कायदा आला. हे कायदे त्यांनी सर्वांना लागू केले. पण स्वतंत्र भारतात मात्र वेगळीच परिस्थिती दिसते. हे राज्य आमच्या धर्माचे आहे. ही हिंदूंची भावना झाली आणि

इतर धर्मियांकडे Subject race म्हणून बघितले जात आहे. सतत धार्मिक भावनेला खतपाणी घालण्यात येते. त्यामुळे आपोआपच धर्मातीततेचा प्रभाव ओसरला.

प्र: हा मुद्दा जरा स्पष्ट करुन सांगा.

उ: पंढरपूरच्या विठोबाची महापूजा सरकारी खर्चाने करण्याची काय गरज आहे? ही महापूजा कोणी ना कोणी मंत्री करतो. आशीर्वादासाठी पुजाऱ्यासमोर वाकतो. समाजाला काय दृश्य दिसते? जनतेचा प्रतिनिधी, जो आज मंत्री आहे, तो एका पुजाऱ्यासमोर पाया पडण्यासाठी वाकला. म्हणजे मग सामान्य माणसाला काय वाटते की राज्यसत्तेपेक्षा धर्मसत्ता श्रेष्ठ, प्रबळ आहे. दुसरे उदाहरण सांगतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सोमनाथच्या मंदिराचा जीर्णोद्धार सरकारी पैशाने झाला. सरदार वल्लभभाई पटेल या बाबतीत आघाडीवर होते. डॉ. राजेन्द्र प्रसादांनी एका पुजाऱ्याचे पाय धरले होते. स्वतंत्र भारताचा राष्ट्रपती एका पुज्याऱ्याचे पाय धरतो, हे दृश्य कसे दिसते, ते तुम्हीच सांगा. दक्षिण भारतात कितीतरी हिंदूंचे धार्मिक Trust आहेत ज्यांना सरकारीमदत मिळते. या सगळया गोष्टीमुळे धर्मातीततेचा पराभव झाल्यासारखा दिसतो.

प्र: अल्पसंख्यांकांचे लाड होत असल्याची भावना आहे : यावर आपले काय मत आहे?

उ: जेव्हा सत्ताधारी सर्व स्वतःच्या धर्माला मदत करतो, तेव्हाच तो वर्ग धार्मिकतेचा आरोप टाळण्यासाठी अल्पसंख्यांकांना प्रसंगी बेकायदेशीर (म्हणजे कायद्याच्या कक्षेबाहेर जाऊन) मदत करतो. जेव्हा मुसलमान रस्त्यावर नमाज पढतात, तेव्हाच त्यांना प्रतिबंध करावयाला हवा. तेव्हा शासकीय अधिकारी गप्प राहतात. रस्त्याने जाणाऱ्या हिंदू समाजाला याचा त्रास होतो. तो हिंदू म्हणतो, 'अल्पसंख्यांकांचे लाड चालले आहेत. पण तो हिदू हे विसरतो की शासकीय कार्यालयात तो सार्वजनिक गणपती बसवतो, सार्वजनिक सत्यनारायण करतो. हे सर्व सरकारी जागेवर होत असते. यातील विसंगती हिंदूंच्या लक्षातच येत नाही.

प्र: यामुळे राज्यसत्ता कमकुवत होईल.

उ: अर्थातच. आणि कमकुवत होईल नव्हे होत आहेच. पण ही बाब आजची नाही. अगदी सुरुवातीपासून हिंदू धर्ममार्तंडांनी भारतीय घटना नाकारली आहे. त्यांना घटनेतील धर्मातीतता (Secularism) मान्यच नाही. हाच प्रकार मुसलमानांचा आहे. त्यांनासुद्धा कुराणाप्रमाणे राज्य हवे आहे. फक्त बुद्ध अशी मागणी करत नाही. इतिहास असा आहे की जेथे जेथे बुद्ध धर्म गेला तेथे तेथे त्यांनी राज्यसत्तेत ढवळाढवळ केली नाही. बुद्धांना फक्त सामाजिक न्याय, समता, व्यक्तिविकास हवा होता.

प्र: शिक्षण, आर्थिक प्रगती झाल्यावर धर्माचा प्रभाव कमी होईल का?

उ: आपल्या देशातील जे तीन प्रमुख धर्म आहेत, ते अंधश्रद्धा जोपासतात, सतत धार्मिक अंधश्रद्धेला खतपाणी घालतात. जो पर्यंत हे धर्म पुरोगामी होत नाहीत, तो पर्यंत धार्मिकतेचा प्रभाव कमी होणार नाही. त्यासाठी भारतीय संविधानाबद्दल आदर वाढला पाहिजे.

प्र: अशी अंधश्रद्धा बुद्ध धर्मात नाही का?

उ: काही प्रमाणात आहे. अगदीच नाही, असे नाही. पण बुद्ध धर्माची मुलभूत तत्वे बुद्धिवादी आहेत. माणसाच्या सद्सद्विवेकबुद्धीला आवाहन करणारी आहेत. मी सांगतो म्हणून असे वागा, असे बुद्ध कधीही सांगत नाही, तर तुमच्या बुद्धीला कौल लावा, आणि मग निर्णय घ्या, असे सांगतो. अशी चिकित्सेची प्रक्रिया ज्या धर्मात झाली, ते धर्म विकास पावले, उदा. ख्रिस्ती धर्मात अनेक ग्रंथ निर्माण झाले, अनेक पंथ निघाले. प्रॉटेस्टंट बाहेर पडले.

प्र: असा प्रकार हिंदू धर्मातही आहे. उदा. चार्वाकिचार्य

उ. फार थोडा. हिंदू पुरोगाम्यांनी (म्हणजे फुले, आगरकर) हिंदू धर्मावर आतून प्रचंड हल्ले चढविले. त्यामुळे थोडीफार सुधारणा झाली. आज जी धर्मांधतेची लाट आलेली दिसते, त्यात हिंदू धर्माचीच हानी होणार आहे. कारण या लाटेचे आवाहन धार्मिक अंधश्रद्धेत आहे. त्यामुळे नवीन विचारांचे स्वागत होत नाही.

प्र: राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आज दलितांना आपल्यामध्ये आणण्याचे जाणिवपूर्वक प्रयत्न करतांना दिसतो. असे का? आणि या प्रयत्नांचे समतेच्या लक्ष्यावर काय परिणाम होतील?

उ: मुख्य कारण आज दलित समाजात फार मोठ्या प्रमाणात जागृती दिसून येते. आजचा दलित समाज दुर्बळ, लाचार राहिलेला नाही. या आधी अन्याय, अत्याचार करणे सोपे होते. आता हा समाज प्रतिकाराला, प्रतिटोला देण्यासाठी तयार आहे. त्यामुळे या दलित समाजाला आपलेसे करुन स्वतःची शक्ती वाढवावी, असा हा डावपेचाचा भाग आहे.

प्र: म्हणजे हा सगळा डावपेचाचा भाग आहे, असे तुम्हाला वाटते.

उ: अगदी बरोबर. आजपर्यंत कोणत्याही हिंदूंच्या संघटनेने अस्पृश्यांना मंदिराचे पुजारी करतो, पौरोहित्य देतो, किंवा आमच्या संघटनेचे नेतृत्व देतो असे म्हटले नाही. १९३६ साली बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराची घोषणा केली. त्यानंतर बाबासाहेब एकदा वसईच्या दौऱ्यावर होते. तेथे त्यांची मसुरकर महाराजांशी भेट झाली. तेव्हा मसुरकर महाराजांनी बाबासाहेबांना विचारले की, 'बाबासाहेब हिंदू समाज अस्पृश्यांना समानतेची वागणूक देतो, हे तुम्ही केव्हा मान्य कराल?' तेव्हा बाबासाहेब म्हणाले की, 'पुण्याला के. के. सकट नावाचे मातंग समाजातील एक फार धार्मिक प्रवृत्तीचे सामाजिक पुढारी आहेत. ते माटे मास्तरांचे सहकारी आहेत. त्यांना तुम्ही शंकराचार्यांच्या गादीवर बसवा आणि पुण्याच्या चित्तपावन ब्राह्मणांच्या

१०० कुटुंबियांकडून त्यांची पाद्यपूजा करवा. म्हणजे मग मी समजेन की आता हिंदू समाज समानता मान्य करायला तयार आहे. हे सुद्धा तुम्ही आजच करा, असे नव्हे. हे होण्यासाठी सुद्धा मी १० वर्षे थांबावयाला तयार आहे'. मसुरकर महाराज आपोआपच गप्प बसले.

प्र: राष्ट्रीय स्वयंसेवक संघात इतके दलित कसे?

उ: असा संघाचा दावा आहे. संघामध्ये किती दलित आहेत, त्यातील किती अधिकारपदावर आहेत, कोणत्या अधिकारपदावर आहेत, याची यादी संघाने नावानिशी प्रसिद्ध करावी.

प्र: धर्मांतराबद्दल तुमचे काय मत आहे?

उ: समजा एखादा कोळी, गोंड, दलित ख्रिस्ती झाला तर काही कालावधीनंतर तो मूळ ख्रिस्ती समाजात मिसळून जातो. पण तोच माणूस परत हिंदू व्हायचा असल्यास त्याला त्याच्या जातीतच जावे लागते, तेव्हा ब्राह्मण होत नाही. बुद्ध धर्मात तसे होत नाही. उत्तर प्रदेशात किंवा महाराष्ट्रात जे बौद्ध झाले, मग ते कोणत्याही जातीचे असोत म्हणजे ते महार, मांग, भंगी असोत, त्यांना बुद्ध कुटुंबात ब्राह्मणाइतकाच मान मिळतो. हीच बाब ढोबळमानाने सर्व धर्मात आहे - एक हिंदू धर्म सोडल्यास. भंगी, मांग वगैरेना 'गर्वसे कहो ,हम हिंदू हैं' यात गर्व वाटण्यासारख काय आहे?

प्र: अशा धर्मांधतेच्या वातावरणात अल्पसंख्यांक समाजाला असुरक्षित वाटत असेल?

उ: ते असुरक्षित आहेतच. पण हे लक्षात ठेवले पाहिजे की, कोणत्याही देशात दडपशाहीने अल्पसंख्यांक समाजाला दाबता येत नाही. कारण अशी दडपशाही केली तर बहुसंख्यांकांना सुखाने जगता येत नाही. बाबासाहेब आंबेडकर म्हणत असत, 'घरात स्वयंपाक केला आणि तो एकट्यानेच खाण्याचे ठरविले तर इतर मंडळी तसे होऊ देणार नाहीत. सगळ्यांनाच त्यांचा न्याय्य वाटा मिळाला पाहिजे'. या देशात लोकशाही टिकविण्याची, वाढविण्याची जबाबदारी हिंदूंची आहे. ते बहुसंख्य असल्याने अल्पसंख्यांक समाज त्याचेच अनुकरण करतो. बहुसंख्यांकामध्ये जर धर्मांधता वाढली तर आपोआपच अल्पसंख्यांक समाजातसुद्धा वाढीला लागेल. या देशात हिंदू इतकाच बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लिम यांना राहण्याचा अधिकार आहे.

# संघ पारंपारिक धर्माची भलावण करत आहे

## नीळकंठ खाडिलकर

प्र: आज आपल्या समाजजीवनावर धार्मिक शक्तीचा प्रभाव वाढताना दिसतो असे का झाले?

उ: या शक्तीचा प्रभाव वाढलेला दिसतो, एवढेच नव्हे तर हा प्रभाव आणखी वाढणार आहे. कारण आजच्या जीवनात माणसाला काही गोष्टी हव्या आहेत, पण त्या त्याला मिळत नाहीत. उदा. भौतिक सुखसोयी - कलर टिव्ही, फ्रिज वगैरे. याच बरोबर चिंतन मननासाठी जो वेळ हवा असतो, तो टिव्ही, व्हिडीओसारख्या गोष्टीमुळे मिळत नाही. सुखाची साधनं वाढली आहेत, त्या प्रमाणात त्यांची गरज वाढली आहे. या सर्व गरजा पूर्ण करण्यासाठी माणसाच्या मनावर एक प्रकारचा ताण असतो, असुरक्षिततेची भावना असते. अशा परिस्थितीत धर्म, धार्मिक बाबी माणसाला सुरक्षिततेची भावना देत असेल.

प्र: भारतीय संविधानात धर्म आणि राजकारण वेगवेगळे ठेवण्याची तरतूद आहे. हे तत्त्व कसे पाळलं जाईल?

उ: अशा वातावरणात धर्मातीतता काही प्रमाणात क्षीण होईल, एवढे नक्की. भविष्य काळात धर्म आणि राजकारण यांची टक्कर होत राहणार.

प्र: भारतासारख्या Multi religious देशात लोकशाहीचे भवितव्य काय?

उ: आपल्या लोकशाहीला धोका वाढत जाणार आहे. लोकशाहीची, धर्मातीततेची तत्त्वं बळकट करण्यासाठी कोणीही प्रयत्न करत नाही. जो तो आपली तुंबडी भरण्यात गर्क आहे.

प्र: साक्षरता, आर्थिक विकास, तंत्रवैज्ञानिक प्रगती इत्यादी मुळे धर्माचा प्रभाव कमी होईल का?

उ: बुद्धिवादी जीवनदृष्टी फार प्रखर असते. जनसामान्यांना ही जीवन दृष्टी पचत नाही. लाखात एखाद्याला तर्कशुद्ध जगता येते. सामान्य माणसांच्या दैनंदिन जगण्यामध्ये बुद्धिवादाला फारसा वाव नसतो.

प्र: R S S सारख्या संघटनेचे भवितव्य काय?

उ: R S S सुद्धा पारंपारिक धर्माची भलावण करत आहे. त्यामुळेच तर संघाला ओहोटी लागली आहे, शाखेवरची उपस्थिती रोडावत चालली आहे. आता रविवार संध्याकाळी टिव्हीवरचा सिनेमा सोडून शाखेवर कोण जाईल? हे अगदी वरवरचे उदाहरण आहे. खोलवर जाऊन हिंदू धर्माचा वस्तुनिष्ठ अभ्यास करावयाला हवा. पुनर्मुल्यांकन करावयाला हवे. उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केलेला बुद्ध धर्म आणि आधीचा बुद्ध धर्म बराच वेगळा आहे. जुन्या बुद्ध धर्माला बाबासाहेबांनी आधुनिकता, विज्ञाननिष्ठा, मार्क्सवादाच्या अभ्यासाची जोड दिली. त्याचप्रकारे संघाने हिंदू धर्माची पुनर्मांडणी करावी.

प्र: काही प्रमाणात संघ हे कार्य करतच आहे. उदा. समाज सेवा हे तत्त्व घ्या. वनवासी कल्याण आश्रम वगैरेसारख्या संस्था

चांगलं कार्य करत आहेत.

उ: यात नवीन काही नाही. संघाकडे एकेकाळी कडवे कार्यकर्ते होते. अत्यंत प्रयत्नपूर्वक कार्यकर्ते तयार केले होते. त्याकाळी मैदानावर संध्याकाळी एकत्र जमणे हीच एकमेव करमणूक होती त्यामुळे संघाकडे तरुणांचा ओढा होता. आजच्या काळात भौतिक प्रगतीमुळे करमणुकीची साधनं वाढली. सामाजिक परिस्थितीत आमुलाग्र बदल झाला. माणसाजवळ उपलब्ध असलेला मोकळा वेळ तो कसा घालवतो, त्यावर त्याची संस्कृती ठरते.

प्र: या वाढत्या धार्मिकतेचा आगामी राजकारणावर, निवडणुकीवर काय परिणाम होईल?

उ: मत मिळविण्यासाठी प्रत्येक पक्ष धार्मिकतेचे लाड करेल. त्यामुळे या शक्तीना खतपाणीच मिळेल. एके काळी अशी धारणा होती की वैज्ञानिक प्रगतीमुळे धर्माचा प्रभाव कमी होईल. पण हा समज खोटा ठरला, असे दिसते. माणूस जास्तीत जास्त धार्मिकतेकडे झुकतो आहे, असे दिसते.

प्र: भेदरलेला, घाबरलेला माणूस धार्मिकतेकडे गेला, तर ही नकारात्मक प्रतिक्रिया नाही का?

उ: अगदी बरोबर. भेदरलेल्या समाजाचे हे लक्षणच आहे. एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे - माणूस २४ तास धर्माप्रमाणे वागत नाही. कारण तो वर्तनाने धार्मिक न बनता भावनिक गरज म्हणून धार्मिकतेकडे ओढला जात आहे.

प्र: भारतात अनेक जाती - धर्म आहेत. काही धर्माची तत्त्वे परस्परविरोधी आहेत. अशा वातावरणात सामाजिक शांतता कशी टिकवायची?

उ: हा प्रश्न फारसा उग्र नाही. शिवाय सर्व धर्म इतर धर्माबरोबर राहायला शिकतात. समाजवादी विचारसरणीचा प्रसार आणि प्रभाव हा प्रश्न सोडविण्यासाठी मदत करेल. शास्त्रशुद्ध समाजवाद अशा प्रश्नाची उकलच करत नाही, तर मार्गही दाखवतो. पण दुर्दैवने आजचे समाजवादी नेतृत्व (ना. ग. गोरे, कै. एस. एम. जोशी) आपल्या परिस्थितीचे खोलवर चिंतन न करता वरवरचा विचार मांडत राहतात. त्यांचे विचार ऐकणारी मंडळी तीच, भाषणं ही तीच - काहीही नवीन नाही. आजच्या काळाची मुख्य गरज आहे. सार्वत्रिक परिक्षणाची. समाजवादाची, मार्क्सवादाची, धर्माची इ. सर्वांची परखड चिकित्सा झाली पाहिजे. बदललेल्या परिस्थितीत या विचारप्रणालीपैकी काय घ्यायचं, काय स्वीकारायचं हे बघितलं पाहिजे. या तऱ्हेचे हिंदू धर्माचं परीक्षण करायला संघ तयार नाही. पुनर्जन पूर्वजन्म, पाप, पुण्य वगैरे सारख्या संकल्पना परत प तपासायला हव्यात.

प्र: तुमच्या मते चिकित्सा केलेल्या धर्माचं स्वरूप कसं असेल

उ: विज्ञाननिष्ठ धर्मासारखं स्वरूप असेल, जो धर्म आधुनिक पचवून आजच्या जीवनाशी संवादी असेल. या उलट आ आढळणारा हिंदू धर्माचा अभिमान बचावात्मक आहे. हि धर्म म्हणजे काय याचे उत्तर शिवसेना काय, भाजप का किंवा संघ काय, कोणीही द्यायला तयार नाही. हिंदू धर्माच रक्षणार्थ उभे राहिलेल्यांचं पूर्वायुष्य तपासल्यास बरी मनोरंजक, उद्बोधक माहिती उजेडात येऊ शके शिवसेनेच आघाडीचे नेते प्रि. मनोहर जोशी गेल्या का वर्षातच कोट्याधिश कसे झाले? असा चमत्कार हिंदू ध करत असेल तर मी सुद्धा हिंदू धर्म पालन करावयाला तया आहे.

प्र: भारतात ८० टक्के हिंदू असून सुद्धा आजचा भाजप किं त्याचा जुना अवतार जनसंघ कधीही सत्ता मिळवू शक नाही. असे का?

उ: सत्ता त्यांना मिळणारही नाही. कारण Other Backwa Classes (OBC) मतदार भाजपला कधीही मतं देणा नाहीत. ज्या हिंदू धर्माचे रक्षण करण्यासाठी भाजप / सं निर्माण झाले, त्या हिंदू धर्माने या OBC वर्गाला का दिले? त्यांनी का म्हणून 'गर्वसे कहो, हम हिंदू है' अ म्हणावे? हिंदू धर्माच्या नेतृत्वामध्ये, माझ्या मते, फ सावरकर महत्वाचे होते. हिंदू धर्म सुधारावा, अशी त्यां खरोखरच तळमळ होती. त्यांनी हिंदू धर्माचे पुनर्मुल्यांक करण्याचा प्रयत्न केला.

प्र: सावरकरांना कितीसे यश मिळाले? त्यांना अनुयायी किती मिळाले?

उ: एक म्हणजे सावरकरांना वेळ फार कमी मिळाला. शिवा ते इतके तर्कनिष्ठ आणि बुद्धिवादी होते की तेअंधश्रद्ध प्रिय हिंदू धर्माला पचनी पडणे शक्यच नव्हते. आजचे हि धर्माचे नेते सुद्धा कितीसे हिंदू आहेत? शिवसेनेने आज हिं धर्म रक्षणाचा पवित्रा घेतला आहे. धर्माच्या नावाव समाजाला सहज भडकवता येते, त्यामानाने आर्थि प्रश्नावर, आर्थिक मागण्यांवर लोकांना फार काळ एक ठेवता येत नाही; हे जाणून शिवसेनेने आज हा शॉर्ट क घेतला आहे.


**अब्राहम लिंकन: फाळणी टाळणारा महापुरुष**

वि. ग. कानिटकर : १५० रुपये

'या लढ्यातले माझे मोठ्यातले मोठे उद्दिष्ट देशाची फाळणी टाळणे हे आहे. गुलामगिरीचे रक्षण वा उच्चाटन नाही.'

- अब्राहम लिंकन.

१९४७ मध्ये भारताने फाळणी पाहिली, सहन केली. आज पुन्हा देशात शोकात्म इतिहासाची पुनरावृत्ती घडणार का?
लोकांनी लोकांसाठी चालवलेल्या, लोकांच्या राज्याचे जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे अभग जतन करायला मार्गदर्शक ठरणारे
एका शककर्त्या लोकनेत्याचे चरित्र

# हिंदू धर्म समाजाला एकत्र आणू शकत नाही

## आर. व्ही. पंडित

प्र: जातीय दंग्यांचा इतिहास पाहिला तर असे दिसते की हिंदू मुस्लिम दंगे जास्त होतात. पण हिंदू - पारशी; हिंदू - ख्रिश्चन दंगे सहसा होत नाहीत. असे का?

उ: याची कारण ऐतिहासिक आहे. मुस्लिमांना हे विसरता येत नाही की कधीकाळी त्यांचे या देशावर प्रचंड मोठे साम्राज्य होते. ते येथे राज्यकर्ते होते. बदललेल्या परिस्थितीत हिंदूंनी आणि इतर धर्मियांनी स्वतःला बदलले; बदलेलेल्या परिस्थितीची आव्हाने स्वीकारली आणि स्वतःची प्रगती केली. त्या मानाने मुस्लिम समाज मागासलेला राहिला. आता त्याला स्वतःतील आणि इतरांतील दरीची जाणीव व्हायला लागली. आपण बरेच मागे पडलो आहोत, याचे त्यांना भान आले. त्यामुळे तो समाज काहीसा बिथरला, बावचळला आहे. अशा मानसिकतेची प्रतिक्रिया मग दंगे होण्यात होते. त्या मानाने इतर समाज आणि विशेषतः हिंदू समाजाने ही आधुनिकता, शिक्षण, तंत्रविज्ञान आत्मसात केलेले आहे. त्यामुळे त्यांची प्रगती झाली.

प्र: जसे मुस्लिमांनी येथे राज्य केले, तसे ब्रिटिशांनी (म्हणजे ख्रिश्चनांनी) राज्य केले. मग हिंदू - ख्रिश्चन असे दंगे होत नाहीत किंवा ख्रिश्चन समाजाविषयी रागाची भावना आढळत नाही.

उ: ब्रिटिश येथे धर्मप्रसारासाठी आले नव्हते. ते व्यापार करण्यासाठी आले होते आणि मग त्यांनी साम्राज्य स्थापन केले. शिवाय सत्तेमुळे येथे 'आधुनिकता' आली. न्यायमूर्ती रानड्यांसारखे विचारवंत इंग्रजी सत्तेला Divine dispensation म्हणत असत. इंग्रजांनी न्यायव्यवस्था आणली, कायदा, सुव्यवस्था, कायद्याचे राज्य वगैरे आणले. दळणवळणांच्या साहाय्याने देश एक केला. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मांतरे केली असतीलही, पण त्यांनी समाजाची सेवाही खूप केली. जाण्या येण्याच्या दृष्टीने अत्यंत त्रासदायक अशा भागात जाऊन मिशनऱ्यांनी शाळा चालविल्या, इस्पितळं बांधली, गोरगरीबांची सेवा केली. या सर्वांमुळे इंग्रजी सत्तेविरुद्ध तितकीशी रागाची भावना नाही. काही मराठी विचारवंत इंग्रजी भाषेच्या ज्ञानाला वाघिणीचे दूध म्हणत असत.

प्र: जेव्हा जेव्हा हिंदूस्तानवर परकीय सत्तेची, धर्मियांची आक्रमणे झाली, तेव्हा कधीही स्थानिक हिंदू राजे आपापसातील मतभेद विसरुन, एक होऊन या परकीय आक्रमणाविरुद्ध लढले नाहीत. थोडक्यात या देशात कधीही crusades झाली नाहीत. का?

उ: कारण हिंदू धर्म या अर्थाने समाजाला एकत्र आणू शकत नाही. ते हिंदू धर्माच्या मुलतत्त्वातच बसत नाही. म्हणून हिंदू राजे कधीही एकत्र आले नाहीत, आणि त्यांचा पराभव झाला.

प्र: भारतासारख्या देशात, जेथे अनेक धर्म तर आहेतच शिवाय समाजावर धर्माचा गाढ प्रभाव आहे, तेथे राज्यसत्ता आणि धर्मसत्ता वेगवेगळी ठेवता येईल का?

उ: राज्यसत्ता आणि धर्मसत्ता वेगवेगळी ठेवता तर येतीलच शिवाय ठेवलीही पाहिजेत. अन्यथा आपल्यासारख्या देशात कोणा एका धर्माचे राज्य स्थापन करावयाचे? तर इतर धर्मियांनी काय करायच? म्हणूनच मला असे वाटते की, भारतामध्ये या दोन संस्था वेगवेगळ्या पाहिजेतच. कारण धर्म ही खाजगी बाब आहे. धार्मिक ताण - तणाव टाळण्यासाठी काही उपाययोजना मात्र केल्या पाहिजेत. उदा. मिरवणुकीत लाऊडस्पिकर्सचा वापर, ज्यामुळे सार्वजनिक शांतता धोक्यात येते. गणपतीची मिरवणूक किंवा सत्यनारायणाची पूजा वगैरेसारख्या ठिकाणी एवढ्या मोठ्याने लाऊडस्पिकर्स लावतात की आजूबाजूच्या रहिवाश्यांना राहणे नकोसे होते. किंवा मुसलमान सकाळी चार वाजता लाऊडस्पिकर वरुन नमाज पढण्यास सुरुवात करतात. असे प्रकार ताबडतोब थांबले पाहिजेत. तुमच्या पूजा - अर्चेचा, उपासनेचा इतर धर्मियांना मुळीच त्रास होता कामा नये. हीच खरी धर्मातीतता.

प्र.: मुळातच समाजाला धर्माची गरज काय?

उ: धर्म नीतीची शिकवण देतो, हे धर्माचे महत्त्वाचे कार्य आहे.

प्र: नीतीची शिकवण धर्माचा आश्रय न घेता सुद्धा देता येते.

उ: पण असे कशासाठी करावयाचे? का म्हणून धर्माचा त्याग करावयाचा? जेव्हा तुमच्याकडे शतकानुशतकापासून गोळा झालेले शहाणपण येते, त्याला का नकार द्यायचा? राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे उदाहरण घ्या. ही संस्था समाजिक कार्य करते. मोरवीसारख्या ठिकाणी जेथे सरकारी यंत्रणा मदत कार्य पुरविण्यात मागे पुढे पाहात होती, तेव्हा संघाच्या कार्यकर्त्यांनी प्रचंड मोठ्या प्रमाणात सेवाकार्य सुरु केले आणि समाजाची वाहवा मिळविली. नानाजी देशमुखांसारखा माणूस घ्या. गोंडा जिल्ह्याचा कायापालट घडवून आणला या माणसाने, आणि आजही १० बाय १० च्या खोलीत राहतात. या संस्काराचा उगम कशात आहे? त्यांचे काहीच महत्त्व नाही का?


प्र: आजच्या तंत्रवैज्ञानिक समाजात धर्मावरील विश्वास कमी होणार नाही का?

उ: मुळीच नाही. उलट आइनस्टाईन सारखे शास्त्रज्ञ देवावर विश्वास ठेवणारे होते. ग्रॅहम ग्रीन, टी. एस. इलियट सारखे पाश्चात्य लेखक उत्तर आयुष्यात धर्माकडे वळले. माल्कम

मर्गरिज यांनी कलकत्त्याला मदर तेरेसा यांचे कार्य बघितले आणि ते म्हणाले "I started believing in something beautiful called God."

प्र: काही धार्मिक बाबी व्यक्तीला असहिष्णु बनवितात, त्याचे काय?

उ: ते धर्माधर्मावर अवलंबून आहे. सलमान रश्दी यांचे सध्या गाजत असलेले प्रकरण घ्या. या लेखकाने इस्लाम धर्मियांना राग येईल अशा स्वरुपाची कादंबरी लिहीली. इराणच्या खोमेनीने लगेच त्याला मारण्याचा फतवा काढला. हे चूक आहे. Last Temptation of Christ विरुद्ध ख्रिश्चनां विरोध नोंदविला होता. जेथे जेथे त्यांचे प्रयोग होते, ते तेथे ख्रिश्चनांनी शांतपणे, सभ्यपणे मार्चे नेले, मूक निदर्श केली. पण म्हणून काही पोपने त्या लेखकाला मारण्या हुकूम दिला नाही. Last Temptation of Chri व्हिडीओ वर उपलब्ध आहे. बऱ्याच ख्रिश्चनांनीसुद्धा सिनेमा बघितला. आणि त्याकडे दुर्लक्ष केले. तसेच दुर्ल सलमान रश्दीच्या पुस्तकाबद्दल करावयाला हवे होते.




इंटरेस्टिंग!.......रश्दी इकडे आले की एक परिसंवाद ठेवायला हवा!

# सहकार भारती : परिवर्तनाचे नवे पाऊल

**विनय सहस्त्रबुद्धे**

सतीश काशिनाथ मराठे. वय ४०. शिक्षण बी. कॉम., एल. एल. बी. मुंबईत दादरला राहतात आणि डोंबिवली नागरी सहकारी बँकेत सरव्यवस्थापक (जनरल मॅनेजर) म्हणून काम पाहतात. सदासतेज, प्रसन्न चेहरा, आर्जवी पण तरीही काहीशा आग्रही थाटाचं बोलणं, वागण्यात एक प्रकारची ऋजुता आणि डोळ्यात What is what हे आपल्याला छान ठाऊक आहे हे सांगणारी आत्मविश्वासाची लकेर....! अशा प्रसन्न आणि समोरच्यावर छाप टाकणाऱ्या व्यक्तिमत्वाचे मराठे सहकार भारतीचे सरचिटणीस आहेत.

अर्थात, पदाधिकाराच्या हिशेबात ते केवळ सरचिटणीस असले तरी सहकार भारतीच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून आजतागायत तिच्या विकासक्रमात मराठ्यांचा मोठा वाटा आहे. सतीश मराठे पूर्वी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे एक ज्येष्ठ कार्यकर्ते होते. तिथेही, वेगवेगळ्या पदांवर वेगवेगळ्या जबाबदाऱ्या सांभाळल्यानंतर मराठे सहकार भारतीचं काम करु लागले. आणीबाणीत सुमारे १८ महिने ते नासिकच्या कारागृहात राजबंदी होते.

मराठ्यांचे अनेक निकटवर्ती मित्र त्यांचं वर्णन एक चांगला योजक, एक systematiser अशा पद्धतीने करतात. विचारांची स्पष्टता, कामातली शिस्त आणि व्यक्तिमत्वाचा लोभसपणा या बळावर मराठ्यांनी सहकार भारतीला आज अशा एका टप्प्यावर उभं केलं आहे की तिथे एक आंदोलन म्हणून किंवा एक चळवळ म्हणून तिचा विकास होणं हे क्रमप्राप्तच आहे.

सहकार भारतीच्या कार्याची सर्वंकष ओळख करून घेण्याच्या प्रयत्नात मराठ्यांची सविस्तर भेट घेतली. त्या भेटीत झालेल्या प्रश्नोत्तरांच्या अनुषंगाने व्यक्त झालेली त्यांची ही काही मते, काही निरिक्षणे इ.

**सहकार क्षेत्राच्या राजकीयीकरणा (politicisation) बाबत.**

ही गोष्ट खरी आहे की फार झपाट्याने सहकारी चळवळीचं राजकीयीकरण झालं आहे व अद्यापही ते सुरूच आहे. राजकारणात प्रवेश करण्यापूर्वीची पहिली पायरी म्हणूनही अनेकजण सहकार क्षेत्राचा उपयोग करून घेतात. सहकार हे एक सत्ताकेंद्र आहे व राजकीय साठमारीत एक शस्त्र म्हणून त्याचा उपयोग आहे हेही सर्वजण जाणून आहेत. अर्थात, अगदी सुरूवातीला ही स्थिती निश्चितच नव्हती. विशेषत: १९६७ साली, अनेक राज्यांमधून सत्ताधारी कॉंग्रेस पक्ष पराभूत झाल्यानंतरच सहकाराच्या क्षेत्राचा राजकीय सत्तेच्या Consolidation साठी उपयोग करण्याच्या संदर्भात हालचाली सुरू झाल्या आणि अर्थातच त्या कॉंग्रेसने सुरू केल्या. या हालचाली वेगवेगळ्या स्वरूपात आजही सुरूच आहेत. सहकार क्षेत्राची स्वायत्तता नष्ट करण्याचे या ना त्या प्रकारचे प्रयत्न सरकारकडून सुरूच असतात. ऑर्डिनन्सेस काढून प्रशासकांच्या नियुक्त्या करणे, सहकारी संस्थांच्या परिनियमांमध्ये (बायलॉज) काही सक्तीच्या दुरुस्त्या सुचवून एक प्रकारची एकाधिकारशाही प्रस्थापित करणे, पर्यायी रचनेच्या नावाखाली सोयीच्या गोष्टी करवून घेणे अशा अनेक प्रकारातून सहकारी संस्थांच्या स्वातंत्र्याची गळचेपी सुरू आहेच.

**सहकार क्षेत्रातील अपप्रवृत्तीविरुद्धच्या संघर्षाबाबत.**

सहकार क्षेत्रात अनेक अपप्रवृत्तीचा सुळसुळाट झाला आहे हे तर उघडच आहे. या अपप्रवृत्तीमुळे हे संपूर्ण क्षेत्रच आज बदनाम झाले आहे. सर्वसामान्य माणसाच्या आर्थिक विकासाचं हे एक प्रभावी साधन या पद्धतीने वापरले जात असताना, आम्हाला निश्चितपणे असं वाटतं की एक ना एक दिवस आम्हाला संघर्ष हा करावा लागणारच. सहकार म्हणजे स्वाहाकार हे समीकरण पुसून टाकण्यासाठी दंड थोपटण्याची वेळ आमच्यावर येणार हे उघड आहे. आणि हा संघर्ष सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांना छेडावा लागेल सहकार क्षेत्रात नोकरी करणारे कर्मचारी तो करणार नाहीत याचीही आम्हाला पुरेपूर जाणीव आहे.

**सहकार क्षेत्राची आज जनमानसात असलेली प्रतिमा उंचावण्याच्या संदर्भात**

आमच्या माध्यमातून, आमच्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून ही प्रतिमा उंचावण्याचा खटाटोप आम्ही सुरूच ठेवला आहे. अर्थात, यात अडचणी आहेत. यातली महत्त्वाची अडचण सहकार क्षेत्राच्या राजकीयीकरणाची आहे, हे ओळखून सुरूवातीपासूनच आम्ही एक सांगत आलो आहोत की राजकीय पक्षबाजीपासून (Partisan Politics) सहकारक्षेत्र हे वेगळे रहायला हवे. हा विचार अनेकांना रूचत नाही. पण हळूहळू त्यालाही मान्यता मिळेल असा आमचा विश्वास आहे. कॉंग्रेस संस्कृतीतच वावरलेले अण्णासाहेब शिंदे आता हीच मागणी करीत आहेत.

आणखी एक प्रयत्न आम्ही करीत आहोत व तो म्हणजे सर्व सहकारी कार्यकर्त्यांसाठी एक आचार-संहिता असावी यासाठीचा. कारण शेवटी कार्यकर्ते, त्यांची राहणी, त्यांचा व्यवहार यातूनच सहकार क्षेत्राची जनमानसातील प्रतिमा घडेल अथवा बिघडेल!

**व्यापक राष्ट्रीय संदर्भात सहकार क्षेत्राची जबाबदारी आणि भूमिका याबद्दल**

नित्याच्या परिस्थितीत सहकारक्षेत्र हे आर्थिक विकासाच्या संदर्भात किती प्रभावी आणि किती विधायक भूमिका बजावू शकतं हे नव्यानं सांगण्याची गरज नाही. पण विद्यमान राष्ट्रीय परिस्थितीच्या संदर्भात एक गोष्ट निश्चितपणे अशी वाटते की येती काही वर्षे राजकीय अस्थिरतेची असणार हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ असताना या राजकीय अस्थिरतेचा फटका आर्थिक क्षेत्राला बसायचा नसेल तर आवश्यकता आहे ती सहकारक्षेत्र अधिक मजबूत करण्याची. सहकारक्षेत्र मजबूत असेल तर अस्थिरतेची आर्थिक झळ, जनसामान्यांना कमी बसेल अशी आमची

धारणा आहे.

हे होण्यासाठी आवश्यकता आहे ती सहकार क्षेत्राला, देशाच्या अर्थरचनेत एक महत्त्वाची भूमिका मिळण्याची, आमचे त्याही दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

**व्यापक चळवळीतील प्रवाह**

'समृद्धीचा मार्ग सहकारातून जातो' किंवा अशा सुभाषित छाप वाक्यावर सर्वसाधारण पगारदार, मध्यमवर्गीय व्यक्तीची काय प्रतिक्रिया होईल? 'असेलही कदाचित, पण तूर्त तरी सर्वसाधारण सुखी, शांत आणि कटकट-विरहीत जीवनाचा मार्ग देखील सहकारातून जाण्याविषयी माझ्या मनात शंका आहेत, आणि याचं महत्त्वाचं कारण म्हणजे सहकारी हाऊसिंग सोसायट्या व त्यातल्या कटकटी,' अशीही प्रतिक्रिया अनेकांकडून येईल.

अर्थात, अशा प्रतिक्रियेबद्दल फारसं आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. कारण पुण्या-मुंबईकडे सर्वसामान्य लोकांच्या, दैनंदिन जीवनापर्यंत पोचणारी 'सहकारी चळवळ' ही सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांपर्यंतच सीमित राहिल्याचे बहुश: जाणवते. (सहकारी बँका आणि पतपेढ्यांचीही संख्या कमी नसली तरी सर्वसामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी सख्खा संबंध येण्याइतका त्यांचा व्याप मोठा नाही.) या सोसायट्यांमधला सहकार हा अर्थातच लादलेला सहकार ठरतो आणि प्रत्यक्ष व्यवहारात दिसते ते सहकाराचे निष्प्राण कलेवर. मुंबई-पुण्याबाहेर, सहकारी सोसायट्या, अगदी गृहनिर्माणाच्या बाबतीतसुद्धा, अस्सल सहकाराच्या भावनेतून काम करतांना दिसतात, कारण तो सहकार 'व्हाया बिल्डर' आलेला नसतो.

अर्थात हे झाले शहरी लोकांच्या व्यक्तिगत जीवनाबद्दल. ग्रामीण भागात व सार्वजनिक जीवनात, निदान महाराष्ट्राच्या संदर्भात तरी, सहकाराने मोठी कामगिरी बजावल्याचे मान्य करावे लागेल. सहकाराला स्वाहाकाराचा वास येण्याचे दिवस तेजीत असतांनाही सहकारी क्षेत्राचे या राज्यातले महत्त्व नाकारता येणार नाही.

सहकार क्षेत्राचा आणि सहकारी संस्थांचा संबंध नसलेली सार्वजनिक व्यक्ती महाराष्ट्रात सापडणे अवघड आहे. सहकाराची चळवळ महाराष्ट्रात रूजली, वाढली तशी ती देशव्यापीही बनली. देशाच्या अर्थकारणात एका स्वायत्त क्षेत्राचे (sector) स्थान मिळविण्यापर्यंत सहकार क्षेत्राने केलेली प्रगती खरोखरच नेत्रदीपक म्हणावी लागेल.

आकडेवारीच्या भाषेत बोलायचं तर वानगीदाखल केवळ नागरी सहकारी बँकांच्या वाढत्या जागांचे चित्र पाहणेही उद्बोधक ठरेल. नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतपेढ्या यांच्या कामांमुळे देशात आज नागरी पतपुरवठ्याची सशक्त, सुदृढ व्यवस्था उभी आहे हे नाकारता येणार नाही. देशात आजमितीस एकूण १३४५ नागरी सहकारी बँका आपल्या ३०६४ शाखांच्या माध्यमातून कार्यरत आहेत, शिवाय सुमारे २५,४०० नागरी पतपुरवठा संस्था आपल्या २ कोटी ४० लाख सदस्यांसह काम करीत असून या पतपुरवठा संस्थांकडे असलेल्या खेळत्या भांडवलाची एकत्रित रककम सुमारे ७,८०० कोटी रुपयांच्या घरात आहे.

सहकारी चळवळीचा व्याप असा वाढत असताना एक महत्त्वाची गोष्ट कोणाच्याही लक्षात आल्यावाचून रहात नाही व ती म्हणजे ही सारी चळवळ महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक व तमिळनाडू या चार राज्यात नको इतकी एकवटलेली दिसते. देशातील नागरी सहकारी बँकांचेच उदाहरण पुढे चालवायचे तर नागरी सहकारी बँकांच्या एकूण संख्येपैकी ७६% त्यांच्या ठेवींच्या एकूण रकमेपैकी ८९% आणि देशभरात या बँकांनी केलेल्या एकूण रु. ५२०७ कोटी रुपयांच्या कर्जपुरवठ्यापैकी ९३% एवढा या चार राज्यांचा वाटा आहे.

सहकारी चळवळीत नित्य अग्रेसर राहिलेल्या या चारही राज्यात सहकाराचा विकास झाला तो अर्थातच केवळ बँकांमुळे नव्हे. ग्रामीण तारणाबरोबरच ग्रामीण विकास, कृषि उत्पादन आणि पणन, रोजगाराभिमुख कामगार सहकारी सोसायट्या, आणि सार्वजनिक वितरणासाठीच्या सहकारी सोसायट्या अशी या राज्यांमधल्या सहकारी चळवळीची चौफेर प्रगती दिसून येते.

सहकारी क्षेत्र असे सर्वव्यापी बनत असताना आणि व्यक्तिवादी व समाजवादी अशा दोन्ही आर्थिक रचनांमधील उणीवा व दोष बाजूला सारून त्यातल्या निखळ गुणांच्या आधारे सहकाराभिमुख अर्थरचनेचा तिसरा, मनुष्यकेंद्री आणि समुत्कर्षवादी पर्याय




मलकापूर (जि. बुलढाणा) येथे सहकार भारतीच्या एका मेळाव्यात बोलताना राष्ट्रवादी विचारवंत श्री. दत्तोपंत ठेंगडी.

निखळपणे पुढे येत असतांनाच, दुर्देवाने यात अपप्रवृत्तीचा शिरकावही झाल्याने दिसते. सहकाराच्या मूलत: अतिशय प्रभावी, आदर्श साधनाचा उपयोगही व्यक्तिगत वा गटाच्या स्वार्थासाठी करून घेतल्याची कितीतरी उदाहरणे आज सर्वदूर दिसतात ही वस्तुस्थिती आहे.

हे थोपविण्यासाठी सहकारी कायदा बदलून तो अधिक कठोर करण्याची गरज अनेकांनी, अनेकवेळा प्रतिपादली आहे. पण कायद्याच्या मर्यादा सर्वजण जाणतात. साहजिकच या मर्यादा ओलांडून सहकारी चळवळीच्या गुणात्मक परिवर्तनासाठी आणि मुख्य म्हणजे देशाच्या आर्थिक उन्नतीत सहकारी क्षेत्राची एक महत्त्वपूर्ण भूमिका मान्य करून, सहकार हे एक अधिक अर्थपूर्ण माध्यम बनविण्याची गरज अनेकांना भासली. सहकार भारतीचे संस्थापक कार्यकर्ते हे त्यांच्यापैकीच काही.

☐

ही सहकार भारती हा काय प्रकार आहे? याचे उत्तर एकप्रकारे सहकाराच्या व्यापक चळवळीतलाच हा एक परिवर्तनवादी प्रवाह आहे, अशा शब्दात देता येईल. पण व्यवहारत: सहकार भारती ही सहकारी चळवळ निरोगी रहावी यासाठी काम करणारी एक व्यासपीठवजा संघटना आहे आणि सहकारी चळवळीत काम करणारे कार्यकर्ते हेच सहकार भारतीचे कार्यकर्ते आहेत.

ज्यांच्या जन्मशताब्दीचा सोहळा सर्व देशभर नुकताच साजरा झाला त्या डॉ. केशव बळिराम हेडगेवारांनी स्थापन केलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काही स्वयंसेवकांनीच पुढाकार घेऊन १९७८ मध्ये सहकार भारतीची मुहूर्तमेढ रोवली.

संघ ही संघटना आर्थिक विषयावरील काही मुलभूत मांडणीसाठी प्रसिद्ध नसली तरी संघाच्या स्थापकांनी संघाच्या स्थापनेच्याही आधी काही एक सूत्ररूप अर्थविचार मांडला होता ही वस्तुस्थिती आहे. १९२० मध्ये नागपूरला झालेल्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या संयोजनात अग्रभागी असलेल्या डॉ. हेगडेवारांनी या अधिवेशनात देशाला पूर्ण स्वातंत्र्य मिळावे व भांडवलशाही जोखडातून जगाची मुक्तता व्हावी अशा आशयाचे दोन ठराव विषय नियामक समितीकडे पाठवून दिले होते.

याच डॉ. हेडगेवारांच्या विचारांची कास धरून सांगली शहरात संघचालक म्हणून काम पाहणारे श्री. माधवराव गोडबोले यांनी १९३५-३६ च्या सुमारास सांगली अर्बन को. ऑपरेटिव्ह बॅंकेची स्थापना केली. माधवराव गोडबोले आजही सहकार क्षेत्रात एक मातब्बर व्यक्ती आहेत. अनेक वर्षे ते महाराष्ट्र राज्य सहकारी बॅंकेचे संचालक म्हणूनही काम करीत होते.

माधवरावांनी सांगली अर्बन बॅंकेची स्थापना केली. ती सामूहिक आर्थिक विकासाचं एक प्रभावी माध्यम म्हणून. सहकारी बॅंकांची उपयुक्तता लक्षात आल्यावर. दूरदृष्टीच्या माधवरावांनी विलक्षण परिश्रमपूर्वक बॅंकेच्या स्थापनेच घाट घातला. सुरुवातीला नोकर ठेवण्याची ऐपत नव्हती तेव्हा माधवराव स्वत: ऑफिस उघडत, झाडून काढत आणि आवराआवर करून मागाहून चेअरमनच्या खूर्चीवर बसून कारभार चालवित.

सहकाराचे मर्म गोडबोल्यांनी पुरेपूर जाणले होते आणि त्यामुळेच सामाजिक कार्याला पूरक अशा या उपक्रमात संघाच्या अधिकाधिक स्वयंसेवकांनी सहभागी होण्याची गरज ते वारंवार प्रतिपादन करीत. संघाच्या नेतृत्वाचाही या प्रयत्नांना अशिर्वादच होता.

पुढे १९४९ मध्ये दत्तोपंत जमदग्नीनी सुरु केलेली पुण्याची जनत सहकारी बॅंक ही संघवाद्यांची दुसरी सहकारी बॅंक. पुढे १९६५ ते ७० या काळात संघाच्या स्वयंसेवकांनी सुरु केलेल्या कित्येक सहकारी बॅंका नावारुपाला येण्यास सुरुवात झाली. डोबिवली, कोल्हापूर, अकोला, बुलढाणा, नागपूर, सोलापूर, भंडारा, ठाणे अशा अनेक गावी जनता सहकारी बॅंका स्थापन करण्यात संघाच्या स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला. सहकारी बॅंकाच्या क्षेत्रात, समाजाविषयी सच्च्या कळकळीनं काम करणाऱ्या संघ स्वयंसेवकांचा पुढाकार राहण्यासाठी सर्व प्रकारची अनुकुलता होती. रिझर्व बॅंक, राज्य सहकारी बॅंक, सर्वत्र बॅंकेचा प्रस्ताव घेऊन येणाऱ्या स्वयंसेवकांचं स्वागतच होतं. अन्य कोणाहीपेक्षा संघाचे स्वयंसेवक अधिक प्रामाणिकपणे सचोटीने आणि कार्यकर्त्याच्या भूमिकेतून काम करतात हा रिझर्व बॅंक अधिकाऱ्यांचा अनुभव होता व त्यातूनच संघ प्रयत्नांना प्रोत्साहन मिळालं.

याचा अर्थ एकजात सर्वदूर बॅंका उघडण्याची मोहीम संघ स्वयंसेवकांनी उघडली होती, असा निश्चितच नाही. पण तेही उघड्या डोळ्यांनी पहात होतेच. सहकारात सेवा करण्यासाठी आलेली मंडळी मेवा खाण्यापलिकडे फारसे काही करत नसताना आपण स्वस्थ बसून रहावे हे त्यांनाही रुचणारे नव्हते. शिवाय लोकांना सर्व ती मदत करण्याचं प्रभावी साधन म्हणून बॅंकांची उपयुक्तता त्यांच्याही लक्षात आली होती. १९४८ च्या संघबंदीनंतर नोकऱ्या गेल्यामुळे आर्थिक आपत्तीत सापडलेल्या अनेक स्वयंसेवकांना नव्या नोकऱ्या शोधून देताना या क्षेत्राची रोजगारक्षमताही संघाच्या लोकांना जाणवली होती. या सगळ्यातूनच सहकारी बॅंकांचे उपक्रम गावोगावी सुरु होण्यास अनुकूल अशी मानसिकता सर्वदूर उत्पन्न झाली.

शिवाय, या विषयातला जो काय थोडाथोडका पूर्वानुभव होता तोही प्रोत्साहकच होता. व्यापारी क्षेत्रातल्या स्वयंसेवकांच्या पुढाकारानं स्थापन झालेल्या व्यापारी सहकारी बॅंकांनी नेत्रदीपक यश मिळविले होते. कोकणातही, अगदी सुरुवातीच्या काळात कित्येक सहकारी बॅंकातून अग्रेसर होते ते संघाचेच स्वयंसेवक.

आजमितीस सहकारी चळवळीला योग्य ती दिशा देण्याची भाषा करणारे संघ कार्यकर्ते या चळवळीत नेमक्या किती प्रमाणात आहेत? निदान संख्येच्या हिशेबात तरी एक प्रभावी गट म्हणून संघ कार्यकर्त्यांचे अस्तित्व आहे हे नक्की. देशातील एकूण सुमारे १४[illegible] सहकारी बॅंकांपैकी २५० पेक्षा जास्त बॅंकांमधून आज संघाचे स्वयंसेवक सक्रीय आहेत. महाराष्ट्रातील सहकारी बॅंकांची संख्या सुमारे ३५० च्या आसपास असून त्यापैकी सुमारे १०० बॅंकांमधून संघाचे कार्यकर्ते व्यवस्थापनात काम करीत आहेत. याशिवाय गृहनिर्माण, दूध, ग्रामीण विकास, ग्राहक, नागरी पतपुरवठा, कर्मचारी, मच्छिमार, आदिवासी व मागासवर्गीय अशा विविध क्षेत्रातील मिळून एकूण आठ हजार सोसायट्यांमधून संघ कार्यकर्त्यांचा संचार आहे.

## प्राथमिक संकल्पना

सहकाराच्या क्षेत्रात संघस्वयंसेवकांचा प्रभाव असा वाढत असतांनाच १९७४ मध्ये माधवराव गोडबोल्यांनी बोलविलेल्या एका बैठकीच्या निमित्ताने सहकार भारतीमागच्या प्राथमिक संकल्पनेच्या प्रारंभिक विचाराला सुरुवात झाली. १९७५ च्या आणीबाणीकालीन कारावासात संघकार्य विस्ताराच्या ज्या अनेक योजना पुढे आल्या, त्यातूनच सहकार भारतीच्या कल्पनेला नेमका आकार मिळाला. गुजरातेत सर्वत्र 'वकीलसाहेब' म्हणून परिचित असलेले महाराष्ट्र व गुजरातचे क्षेत्रीय प्रचारक कै. लक्ष्मणराव इनामदार यांच्यावर या संपूर्ण कामाची जबाबदारी देण्यात आली. अर्थात, लक्ष्मणराव काही एकटे नव्हते. त्यांच्याबरोबरीने सांगलीचे माधवराव गोडबोले, मधुकरराव भागवत, डोबिवली, शिवराय तेलंग, सतीश मराठे, अनंतराव कुलकर्णी (सर्व मुंबई) तात्या देशमुख, बिपीन नाईकवडी, बार्शी इ. कार्यकर्त्यांच्या एकत्रित विचारातून सहकार भारती या नावाने चालविल्या जाणाऱ्या प्रयोगाचे व्यावहारिक तपशील ठरत गेले.

या चळवळीचा सैद्धान्तिक आधारही सुनिश्चित करण्यात आला. सहकाराच्या माध्यमातून लोकशाही जीवनपद्धतीचे दृढीकरण, आर्थिक विकेंद्रीकरणासाठी प्रयत्न, विकास सोसायट्या व दूध सोसायट्यांच्या मार्फत लहान उद्योगांना चालना व त्यातून स्वयं-रोजगाराला प्रोत्साहन आणि ग्रामीण रोजगार व्यवस्थेचा कणा असलेल्या बलुतेदारी पद्धतीला संपूर्णसंरक्षण या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी सहकारी आंदोलन राबवावं अशा विचारातून कामाची दिशा नक्की करण्यात आली. सहकारी चळवळ, या प्रकारे अधिकाधिक जनहिताभिमुख करायची असेल तर त्यासाठी सुसंस्कारित आणि काही नैतिक जबाबदारीची जाणीव बाळगणाऱ्या कार्यकर्त्यांचा समुच्चय उभा करावा, आणि अद्याप ज्या भागात सहकारी चळवळ पोचलेली नाही तिथे ती पोचवावी अशीही प्रयत्नांची व्यावहारिक दिशा ठरविण्यात आली.

पत्रव्यवहाराच्या माध्यमातून व्यापक प्रमाणावर संपर्क, सहकार परिषदांचे आयोजन, अभ्यासवर्ग अशा कार्यक्रमांच्या स्तरावरच सहकार भारतीचे सुरुवातीचे काम राहिले. हळूहळू कामाचा विस्तार होऊ लागला तशी विधिवत स्थापनेसाठी आवश्यक त्या घटनेचा विचार सुरु झाला आणि घटना अस्तित्वात आली.

हे सर्व सुरु झालेलं असूनदेखील मुख्यत्वे सहकारी कार्यकर्त्यांना सल्ला, माहिती, मार्गदर्शन देणारं केंद्र यापलिकडे सहकार भारतीच्या शाखानिहाय कामाची झेप गेली नव्हती. मुंबई-पुण्याच्या बरोबरीनं जळगाव, नांदेड, औरंगाबाद या ठिकाणी शाखा सुरु झाल्या खऱ्या, पण त्याही या एका चौकटीतच वावरत होत्या.

पण हळूहळू ही चौकट मोडून सहकार भारतीच्या कामानं नवनव्या मिती प्राप्त करायलाही सुरुवात केली. वेगवेगळ्या सहकारी संस्थात परस्पर समन्वय साधावा, लहान व मोठ्या बॅकामध्ये सहकार्य वाढीला लागावे यासाठीही प्रयत्न सुरु झाले आणि त्यांना यशही आलं. उदाहरणार्थ ग्राहक खरेदी विक्री संघ आणि ग्राहक सोसायट्या, महिलांच्या आर्थिक व औद्योगिक सहकारी संस्था आणि ग्राहक सोसायट्या यात सहकार भारतीच्या माध्यमातून समन्वय उत्पन्न करण्याचे प्रयत्न सुरु झाले. सर्वच सहकारी बॅंका सारख्याच सशक्त नसतात त्यामुळे छोट्या बॅंकांना मोठ्या बॅंकांनी कंसॉर्टियमच्या प्रकारे मदत करावी यासाठी सहकार भारतीने पुढाकार घेतला व अशा अनेक छोट्या - मोठ्या बॅकांमधून सहकार्याचे अर्थपूर्ण प्रयोग राबवले.

आज हाउसिंग सोसायट्या खूप निघाल्या आहेत, पण वायरिंगपासून प्लंबिंगपर्यंत वेगवेगळी कामे करणाऱ्या सेवा (सर्व्हिसेस) देऊ करणाऱ्यांच्या सोसायट्या अभावानेच आढळतात. सहकार भारतीने अशा प्रकारच्या सोसायट्या निघाव्यात यासाठीही प्रयत्न केले.

## नव्या वाटांचा शोध

आता, सुमारे दहा वर्षांची वाटचाल पूर्ण होत असतांनाच सहकार भारती संपूर्ण सहकारी चळवळीला नव्या वाटा शोधण्यासाठी प्रवृत्त करण्याच्या प्रयत्नात आहे. हरिजनांच्या आर्थिक उन्नतीसाठीचा म्हैसाळ मार्ग अनुसरुन सांगलीजवळच नांद्रे व आणखी काही गावातून सहकारी तत्वावर नवनवे प्रयोग सुरु आहेत. म्हैसाळच्या एकात्म समाज केंद्राशी सुरुवातीपासून संबंधित असलेले बापुसाहेब पुजारी आणि एम. एन. कांबळे हे दोघेही सहकार भारतीच्या आधारस्तंभांपैकी एक झाले आहेत, व त्यांच्याच परिश्रमातून आता विदर्भातही म्हैसाळ मार्ग पोचण्याची चिन्हे आहेत. सहकार क्षेत्रानं मळलेल्या वाटा न चोखाळता आता गरज - अभिमुख पद्धतीने विचार करुन नव्या, अभिनव मार्गांचा अवलंब करायला हवा असं सहकार भारतीचं ठाम मत आहे. आपला हा मुद्दा अधिक स्पष्ट करतांना सहकार भारतीचे सरचिटणीस सतीश मराठे म्हणतात - 'गृहनिर्माणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्यांनी निर्मिती किमत कशी आटोक्यात राहील याचा विचार करावा यासाठी आम्ही वारंवार प्रयत्न करीत असतो. बॅंका कृषि उत्पादनांना कर्ज देतात, पण त्यांच्या पिकांच्या यादीत पपारंपारिक पिकांबरोबरच डाळिंबे, बोरे यांचाही समावेश व्हावा यासाठी आमचे प्रयत्न सरु आहेत. दक्षिण महाराष्ट्रात वारंवार उस लागवडीने निकस झालेल्या जमिनी पुन्हा कसदार करण्यासाठी छोट्या व मध्यम शेतकऱ्यांना अर्थसहाय्याची गरज आहे. केवळ एवढ्या एकाच उद्देशाने काम करणारी सहकारी सोसायटी आम्ही आता सुरु केली आहे.'

सहकार भारतीच्या संलग्न संस्थांपैकीच एक असलेल्या बार्शीच्या भगवंत सहकारी संस्थेची आर्थिक स्थिती आज तितकीशी बरी नाही. पण एकेकाळी याच संस्थेचा तिच्या प्रयोगशीलतेबद्दल मोठा लौकिक होता. मुद्रणालय, पेट्रोल पंप, डाळ प्रक्रिया केंद्र, अशा अनेक गोष्टी या संस्थेनं सहकारी तत्वावर चालविल्या आणि यशस्वी केल्या.

प्रयोगशीलतेला असं खतपाणी घालत असतानाच सहकार भारतीने आपला संघटनात्मक व्यापही लक्षणीयरित्या वाढविला आहे. सहकार भारती या मध्यवर्ती संस्थेशी संलग्न अशा एकूण १५० सहकारी संस्था आज महाराष्ट्रात आहेत. शिवाय व्यक्तिगत सदस्यता आहे, ती वेगळीच. रत्नागिरीतील मच्छिमार सोसायट्या, कोकणातील नागरी सहकारी बॅंका, विदर्भातील जमिन विकास सोसायट्या यांच्या फेडरेशन्स (महासंघ) स्थापन करण्यात सहकार भारतीचा मोठा वाटा राहिलेला आहे. सांगली (१९२१) राहुरी (१९८४) व नागपूर (१९८९) अशी सहकार भारतीची तीन अधिवेशनेही यशस्वीरित्या पार

पडली आहेत.

हा सगळा व्याप मांडताना सहकार भारती, आपल्याशी संलग्न बॅकांना काही मार्गदर्शक तत्वेही सांगते काय? 'आमच्या बँका मुळातच समाजाभिमुख पद्धतीने ' काम करीत असल्यामुळे आणखी काही मार्गदर्शक तत्वे वगैरे तूर्त तरी आम्ही सांगतलेली नाहीत' असा सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांचा दावा आहे व तो पटण्यासारखा आहे. कर्जवाटप व आर्थिक सहाय्याच्या संदर्भात रिझर्व्ह बँकेने समाजातल्या आर्थिक मागासांचा जो प्राधान्य गट ठरविला आहे व त्यासाठीचे जे लक्ष्य ठरविले आहे, त्या लक्ष्याची पूर्ती करणाऱ्या बँकात सहकार भारतीच्या बॅका आघाडीवर आहेत, हे विशेष उल्लेखनीय. सहकार भारतीशी संलग्न अनेक सहकारी बॅकांनी संचालकांनी कर्जे घेऊ नयेत असा दंडक आपण होऊनच घातला आहे. अनेक बॅकांचे संचालक तर बैठक - भत्ता दखील स्वीकारीत नाहीत.

सहकार भारतीचा विचार मान्य करुन तिच्या कामात सहभागी होणाऱ्यांमध्ये एकेकाळी केवळ संघ स्वयंसेवकांचेच प्राबल्य होते. पण आता तसे राहिलेले नाही. सहकार भारतीच्या मागासवर्गीय जमिनी प्रकल्पाचे अध्यक्ष म्हणून काम पाहणारे सांगलीचे जोतीराम पाटील हे कट्टर कॉंग्रेसवादी आहेत. कै. राजारामबापू पाटील यांचे निकटवर्तीय म्हणून श्री. जोतीराम पाटील हे सर्व परिचित आहे. डहाणूचे आणखी एक कॉंग्रेस कार्यकर्ते नानासाहेब करंदीकर हेही सहकार भारतीचे समर्थक आहेत. माजी मंत्री, श्री. अण्णासाहेब शिंदे यांनीही सहकार भारतीची वैचारिक भूमिका उचलून धरली आहे.

एकीकडे सहकार भारतीचे काम असे सर्वसमावेशक होत असतांनाच तिचा भौगोलिक विस्तारही वाढता आहे. बिहार, म. प्रदेश, गुजरात, दिल्ली इ. ठिकाणीही सहकार भारतीच्या प्राथमिक कामाची सुरुवात झाली आहे.

१९१५ मध्ये मॅकलागून कमिटीने दिलेल्या अहवालात सहकाराच्या आर्थिक दर्जात सुधारणा घडवून आणण्याबरोबरच या क्षेत्रात नैतिक जबाबदारीच्या ' पालनाची सवय वृद्धिगत होण्यावर भर दिला होता. आज, ६० वर्षांनंतरही ही गरज अधिक तीव्रतर होत चालली आहे. नैतिक मूल्यांचे अधिष्ठान असलेल्या प्रवृत्ती निर्माण करणे व त्या वाढीला लावणे ही सहकार भारतीच्या समोरची खरी आव्हाने आहेत.

ही आव्हाने पेलण्याविषयीचा सहकार भारतीच्या कार्यकर्त्यांचा विश्वास सार्थ ठरविणाऱ्या पावत्या आता मिळू लागल्या आहेत. सप्टेंबर १९८८ मध्ये पुण्यात, 'अर्थव्यवस्थेचा आधार - व्हावा सहकार' या विषयावर सहकार भारतीने एक परिसंवाद योजला होता. सहकार क्षेत्रातले कितीतरी या परिसंवादाला हजर होते. त्यात पुण्याच्याच वैकुंठभाई मेहता संस्थेचे एक मान्यवर अधिकारी, सहकार विषयातील तज्ञही हजर होते. आपल्या भाषणात त्यांनी सहकार भारतीच्या 'संस्कार' संकल्पनेची, सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेची, काहीशी खिल्लीच उडवली. हे सर्व स्वप्नरंजन आहे, असंही त्यांनी आग्रहानं सांगितलं. याच परिसंवादाला हजर असलेले 'बुकोई' चळवळीचे टेक्सास गायकवाड यांनी आपल्या भाषणात या भूमिकेला आक्षेप घेतला. एकेकाळी स्वप्नवत वाटणाऱ्या गोष्टी आता वास्तवात उतरु लागल्याचं त्यांनी मोठ्या आत्मविश्वासानं सांगितलं.

हा आत्मविश्वास वांझोटा नव्हता. परिवर्तनाच्या चळवळीतल्या अनुभवांचं, सच्च्या समाधानाचं पाठबळ, पुर्वानुभव, हे सारं त्या मागे होतं. स्वाहाकारानं निर्माण केलेल्या अंधःकारात परिवर्तनाची चाहूल जागविणारा तो साक्षात्कार होता.

The Summer Vacation is on, It's time to get away!
Goa has it all for you :
- long stretches of cool, Sandy beaches;
lots of summer fruits :
mangoes, cashews, pineapples, jackfruits, etc.;

Accommodation to suit everyone : from Rs. 5 to5-Star luxury; well organised sightseeings; in short, anything you need for a good holiday,....GOA has it.

The rush is on. Do ensure confirmed hotel and to & fro journey reservations well in advance to avoid inconveniences and disappointments.

**Issued by:**
**Directorate of Tourism,**
**Government of Goa, Tourist Home, Patto,**
**Panaji, - GOA, 403 001.**
**Phone : 5583, & 4757.**

# संघाची पंचपदी शिक्षण पद्धती

लक्ष्मीकांत जोशी

**आम्ही सर्वत्र मनुष्य निर्माण करणारी शिक्षणपद्धती असावी अशी इच्छा बाळगून आहोत. त्यातून शारिरीक, बौद्धिक आणि आध्यात्मिकदृष्ट्या तुम्ही दुर्बल होत असाल त्या गोष्टी विष समजून ताबडतोब टाकून द्या. त्यात कोणत्याही प्रकारचे जीवन नाही, त्यात कोणतेही सत्य असू शकत नाही, परंतु सत्य हेच बलप्रद असते, सत्य पवित्र आणि सर्वज्ञानस्वरुप आहे**

**- स्वामी विवेकानंद**

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. अशी वाक्ये आपण नित्यनेमाने ऐकत असतो. परंतु केवळ साधन प्रभावी असून चालत नाही तर त्या साधनांचा सुबुद्धपणे वापर करणारेही हवे असतात. शिक्षण या साधनाचे प्रभावीपण लक्षात घेऊन त्याचा भारतीय वातावरणाला शोभेल असा वापर कसा करता येईल वाचाही विचार आवश्यक ठरतो. आणि याच उद्देशाने सुमारे २२ वर्षापूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काही प्रज्ञावान आणि समर्पणशील कार्यकर्त्यांनी शिक्षण क्षेत्राकडे मोर्चा वळविला. त्या अथक परिश्रमाला फळ मिळाले, त्याचेच नाव विद्या भारती!

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची निरनिराळ्या क्षेत्रात चाललेली कामे, त्यालाच 'संघ परिवार' असे संबोधले जाते. त्या परिवारातील एक घटक म्हणून विद्या भारतीने आपले जाळे संपूर्ण देशभर पसरविले आहे. महाराष्ट्रात विद्या भारतीचे उपांग म्हणून विद्या प्रतिष्ठानमार्फत कार्य चालू आहे.

विद्या भारतीच्या स्थापनेमागील उद्देश फारच सुस्पष्ट आहे. म्हणजे ज्ञानपीठ मानकरी कवी कुसुमाग्रज यांनी काल - परवा जे जाहीररित्या प्रतिपादन केले त्या ब्रिटिश शिक्षण पद्धतीची गुलामगिरी नष्ट व्हावी यासाठी विद्या भारतीने २२ वर्षापूर्वीच प्रत्यक्ष कामाला सुरुवातही केलेली आहे. पारतंत्र्याच्या काळात जी शिक्षण पद्धती होती त्यामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर काही मौलिक फरक पडला नाही, किबहुना त्याचा प्रभाव वाढतच गेला. त्यात स्वत्वाचा तर विसर पडतच गेला. परंतु भारतीयत्वही नाहीसे होत गेले. एकूणच पाश्चात्यांचा पगडा असलेल्या शिक्षण पद्धतीत बदल करण्याची सरकारची इच्छा दिसत नसल्याने त्याला विरोध करण्यात शक्तीचा अपव्यय करण्यापेक्षा भारतीयत्व जपणाऱ्या शिक्षण पद्धतीचाच प्रचार करण्याचा, प्रसार करण्याचा संकल्प विद्या-भारतीने सोडला. आणि त्या कार्याचे यश म्हणा किवा मिळालेला प्रतिसाद म्हणा परंतू देशभरात हे कार्य विस्तारले गेले.

ज्या आधारावर विद्या भारतीने आपले कार्य विस्तारले तो, म्हणज तिने मांडलेली पंचपदी शिक्षण पद्धती. यात सस्कृत शिक्षा, योगशिक्षा, शारिरीक शिक्षण, नैतिक शिक्षण आणि संगीत शिक्षण या पाच बाबीचा अंतर्भाव आहे. आज भारतातील निरनिराळ्या प्रांतात वेगवेगळ्या नावाने विद्या भारती या केंद्रीय संस्थेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्य चालु आहे, उत्तर प्रदेशात जन्माला आलेल्या विद्या भारतीचे उत्तर प्रदेशात 'विद्या भारती' या नावानेच कार्य चालू आहे, तर गुजरात; महाराष्ट्रात अनुक्रमे 'संस्कार गुर्जरी, विद्या प्रतिष्ठान या नावाने कार्य चालू आहे याशिवाय, पंजाब, दिल्ली, हरयाणा, मध्य प्रदेश, बिहार, राजस्थान, ओरिसा, पूर्वांचल बंगाल इ. प्रदेशात कार्य चालू आहे. केरळात 'भारतीय विद्या निकेतन', तामिळनाडून 'देसिया कलवी कझगम', कर्नाटकात 'शिक्षण विकास परिषद', आंध्रात 'सरस्वती विद्या पीठम', 'भारतीय विद्या केंद्रम', मध्य प्रदेशात 'सरस्वती शिक्षा परिषद', राजस्थानात 'भारतीय शिक्षण समिती', नवी दिल्लीत 'समर्थ शिक्षा समिती', 'हिदू शिक्षा समिती', हरयाणातही 'हिदू शिक्षा समिती' नावाने कार्य चालू आहे. पंजाबात 'सर्वहितकारी शिक्षा समिती', हिमाचल प्रदेशात 'हिमाचल शिक्षा समिती', जम्मू काश्मिर मध्ये 'भारतीय शिक्षा समिती', बिहारात 'शिक्षा विकास समिती', 'वनांचल शिक्षा विकास समिती', अशा नावाने तर ओरिसात 'शिक्षा विकास समिती', पश्चिम बंगालमध्ये 'विवेकानंद विद्या विकास परिषद', आसामात 'शिशू शिक्षा समिती', मणिपूरमध्ये 'शिक्षा विकास समिती' या नावाने विद्या भारतीचा पंचपदी शिक्षा पद्धतीचा प्रचार आणि प्रसार सुरू झालेला आहे.

## वाढते कार्य

देशभरातील या विविध संस्थांच्या माध्यमाने विद्या भारतीने ८ लाख विद्यार्थी, ३० हजार शिक्षकांशी संबंध प्रस्थापित केले आहेत. गेल्या ५ वर्षात नागरी शिक्षणाबरोबरच विद्या भारतीने ग्रामीण, वनवासी, गिरीजन व उपेक्षित वस्त्यांमध्येही शिक्षण प्रसाराचे कार्य हाती घेतले आहे. आसामातल्या हाफलाँग क्षेत्रातील वसतिगृहात ५० गावातील २० जनजातीचे विद्यार्थी शिकत आहेत. मणिपूर येथे स्थापन केलेल्या बालमंदिराच्या प्रकल्पाला तर विशेष यश प्राप्त झाले. अरुणाचलम मध्ये कन्याकुमारीच्या विवेकानंद शिक्षण संस्थेमार्फत चालू असलेल्या विद्यालयांनाच मान्यता आहे. नव्या निर्बंधामुळे विद्या भारतीला या ठिकाणी विद्यालये सुरु करता आलेली नाहीत. शेवटी या प्रदेशाच्या सीमावर्ती प्रदेशात विद्या भारतीने काही विद्यालये सुरु केलीत.

विद्या भारतीचे पंचपदीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच कर्नाटकातील परिषदेमार्फत १०० उपेक्षित वस्त्यांत

बालवाड्या सुरु करण्यात येणार आहेत. ग्रामीण भागातील शिक्षणाची व्यवस्था नागरी व्यवस्थेशी अनुरुप ठेवण्याच्या उद्देशाने विद्या भारतीने गाझीयाबाद येथे ग्राम भारतीची स्थापना करुन येथे शिक्षकांचे प्रशिक्षण केंद्र सुरु केले आहे. मुलींच्या शिक्षणाकडेही पुरेसे लक्ष देता यावे यासाठी नारी विद्या निकेतन ही संस्था विद्या भारतीशी जोडण्यात आली आहे.

आदिवासी किवा वनवासीना शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक सवलती आदिवासीपर्यंत पाहोचतच नाहीत. परिणामी या भागातील साक्षरतेचे प्रमाण अत्यल्पच राहाते आहे. याबाबत विद्या भारतीने 'उपेक्षित जन शिक्षा निधी' ची कल्पना मांडली आणि तिला जनतेकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसादही मिळाला. आदिवासी भागात शिक्षण प्रसाराचे काम करावयाचे असल्यास प्रचंड निधीची आवश्यकता लक्षात घेऊन ही योजना कार्यान्वित झाली आहे.

विद्या भारतीच्या देशभर चाललेल्या या कार्याचे सतत मूल्यमापन व्हावे यासाठी लखनौ येथे भारतीय 'शिक्षा शोध संस्थान' तर जयपूरला 'आदर्श विद्या मंदिर शिक्षा महाविद्यालयाची' स्थापना करण्यात आली. नामांकीत शिक्षणतज्ञ या संस्थांतून विद्या भारतीला सहकार्य देत असतात.

महाराष्ट्रातील विद्या भारतीच्या कार्याचा विचार करतांना त्याचे प्रमाण अल्प असले तरी विद्या प्रतिष्ठानने विद्या भारतीच्या मार्गदर्शक तत्वानुसार आपली धौडदौड सुरु ठेवली आहे असे म्हणता येईल. आजच्या घटकेला विद्या प्रतिष्ठान म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील एक उपक्रमशील व्यासपीठ असा लौकीक प्राप्त करुन आहे.

महाराष्ट्राचे विद्या प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुंबईचे श्रीराम मंत्री यांनी महाराष्ट्रातील काम खूपच अल्प आहे असे सांगता सांगता बरेच नवनवीन उपक्रम राबवित असल्याचे दाखवून दिले. विद्या प्रतिष्ठानने सुरु केलेल्या, वाचन साधना, शंभर दिवसांची शाळा, श्रमसंस्कार शिबिरे, संस्थेची ज्ञान परीक्षा, संस्कृत भाषा सुगम, या प्रकल्पांना चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. यातील वाचन साधना या प्रयोगानुसार लघुकथा, नाटक, काव्य, ललित साहित्य, याचे वाचन करावे याचा एक नमूना सादर केला होता. तर शंभर दिवसांची शाळा या प्रयोगात चार भितीमधल्या आणि वेळापत्रकाच्या चौकटीत बसविलेल्या अभ्यासाव्यतिरिक्त केवळ शंभर दिवसात संपूर्ण अभ्यासक्रम बसवून तो शहरी भागातील शिक्षकांच्या मदतीने वनवासी भागात जाऊन पूर्ण करण्याची कल्पना मांडण्यात आली होती. रायगड जिल्ह्यात पाली गावात हा प्रयोग करण्यात आला आणि त्याला चांगले यशही

## 'वैशिष्ट्ये'

शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदलाची इच्छा मनात ठेवून प्रचंड यश संपादन करणाऱ्या अशा संस्थातर्फे चालविल्या जाणाऱ्या एखाद्या शाळेची उदाहरण स्वरुप माहिती दिली तर ती वाचकांच्या दृष्टीने अधिक उपयुक्त ठरु शकेल विद्या भारतीशी संलग्न असलेल्या महाराष्ट्राच्या विद्या प्रतिष्ठान या संस्थेचे अध्यक्ष रामभाऊ मंत्री यांनी तर स्वतःच अशा शाळेचा विशेष अभ्यास केला आहे. महाराष्ट्रातही पंचपदी शिक्षण पद्धती विकसित करणारी शाळा रा. स्व. संघाच्या प्रेरणेतून मुंबईजवळ येथे उभारण्याचा प्रयत्न केला जात आहे. यासाठी रामभाऊ मंत्रीनी ही माहिती एकत्र केलेली आहे. यासाठी स्वतः त्यांनी काही शाळांना भेटीही दिल्या आहेत.

अशाच, विद्याभारतीच्या प्रयत्नाने कर्नाटकातील बंगलोरपासून २० कि. मी. अंतरावर सुरु असलेल्या चेन्नहल्ली येथील निवासी शाळेविषयी सांगतांना रामभाऊ म्हणाले की, शासकीय अनुदानाशिवाय एवढ्या सूत्रबद्धतेतून सुरु झालेल्या या निवासी शाळा म्हणजे एक अभिनव प्रयोगच म्हटला पाहिजे.

चेन्नहल्ली येथील जनसेवा ट्रस्टमार्फत या शाळेचे व्यवस्थापन केले जाते. एकेकाळी संघाचे प्रचारक असलेले टी. एस. कृष्णस्वामीराव हे या शाळेचे काम प्रामुख्याने बघत असतात. ५० एकर जमीन संस्थेच्या मालकीची आहे. त्यांतील १५ एकर जमीनीवर शाळेची इमारत, वसतिगृह, भोजनगृह, विशाल सभागृह, अध्यापकांसाठी निवास, समृद्ध असे ग्रंथालय, जलतरण तलाव, प्रार्थना मंदिर, अतिथीगृह बांधण्यात आलेले आहे. तर उरलेली ३५ एकर जमीन कृषी उत्पादकांसाठी वापरलेली आहे. सध्या आंब्याच्या लागवडीपासून संस्थेला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळत असते.

या निवासी शाळेत पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण दिले जाते. सेवाभाव आणि समर्पण भावनेने काम करणारी शिक्षक मंडळी असल्याने शाळेतील तीनशे विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक विद्यार्थी याशिवाय पाल्य आणि पालक असे नाते नकळत निर्माण होते. संस्कार देणारे शिक्षण असाही एक उद्देश यात अभिप्रेत आहे. उपजिविकेचे साधन म्हणजे प्रकाशातून अंधाराकडे असाच प्रवास म्हणता येईल. शिक्षणाकडे केवळ उपजिविकेचे साधन म्हणून न पाहाता शारिरीक, मानसिक आणि आध्यात्मिक-दृष्ट्या पूर्णपणे विकसित झालेल्या मनुष्याची निर्मिती करण्याचा हा उपक्रम आहे हे या शाळांची कार्यपद्धती बघितल्यावर जाणवते.

सकाळी प्रातःस्मरणाने या शाळांतील दैनंदिन कार्यक्रमाला सुरुवात होते. अभ्यासाचा कालावधी, शाळेचा कालावधी वगळता आठवड्यातून एकदा विशेष चर्चा,

प्राप्त झाले.

### थोर परंपरेचे भान

साखळी श्रमसंस्कार शिबिराला असाच नाविन्यपूर्ण प्रयोग विद्या प्रतिष्ठानने राबविला होता. ३० - ३५ शाळातील विद्यार्थ्यांनी दोन - दोन दिवस एका ठराविक ठिकाणी येऊन त्यांनी श्रमदान करावे अशी कल्पना यात आहे.उज्वल भविष्याच्या वाटचालीत गौरवशाली भूतकाळाचे विस्मरण होऊ नये या उद्देशाने आणि सध्याच्या पिढीत आपल्या थोर परंपरेचे भारताच्या गणिती, साहित्यिक, वैज्ञानिकांविषयी घोर अज्ञान दिसून येत असल्याने संस्कृती ज्ञान परिक्षेचा उपक्रमही विद्या प्रतिष्ठान तर्फे राबविला जातो. म्हणूनच विद्या प्रतिष्ठान आपली स्वतःची ओळख करुन देताना म्हणते की, 'हे आहे-व्यासपीठ ... अशा प्रयत्नशील कार्यकर्त्यांचे जे समजधारणेसाठी लागणाऱ्या चिरंतन मूल्यांची जपणूक करतात. हा आहे मंच ... अशा धडपड्या शिक्षकांचा, जे दिशा हरविलेल्या शिक्षणाला त्याच्या मार्गावर आणतात. थोडक्यात, हा आहे, उपक्रमशील कृतिवीर शिक्षकांचा मंच! आज महाराष्ट्रातील १५० शाळा विद्या प्रतिष्ठानशी संलग्न आहेत. याचाच अर्थ प्रतिष्ठानने दिलेला स्वतःचा परिचय सार्थ म्हटला पाहिजे.

सारांशाने असे म्हणता येईल की, स्वातंत्र्याच्या ४० वर्षातही शिक्षणाची गाडी अद्याप व्यवस्थित चालू शकलेली नाही, पदव्या देणारे कारखाने अशी आमच्या महाविद्यालयांची वर्णने केली जातात. हे असेच होणार कारण, जी शिक्षण पद्धती आपली नाही, इथल्या वातावरणाला जी पोषक नाही ती इथे राबवून यापेक्षा वेगळे चित्र तरी कसे दिसणार? हे चित्र बदलण्यासाठी इथल्या मातीला अनुरुप अशी शिक्षण पद्धती विश्वाच्या प्रगतीचे भान ठेवून विकसित करण्याची आवश्यकता निर्माण झाली. ती विद्याभारती सारख्या संस्थेमार्फत विकसित होत आहे.

रा. स्व. संघाने एकात्म समाज निर्मितीचे जे सूत्र मांडले आहे त्या प्रक्रियेतील विद्या भारती हा एक घटक आहेच. याशिवाय शिक्षण क्षेत्रात-विद्यार्थी क्षेत्रात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद असेल, शिक्षकांच्या संदर्भात शिक्षक क्रांतीदल असेल अशा संस्थाही कार्यरत आहेतच.

परंतु परिवर्तनाच्या प्रक्रियेस शिक्षणाचे महत्व ध्यानी घेऊन विद्या भारतीचा कृतिशील उपक्रम म्हणजे शिक्षणातून सुसंस्कार व सुसंस्कारातून इष्ट ते परिवर्तन अशा साखळी पद्धतीचे यशस्वी उदाहरण म्हणता येईल.

●

---

परिसंवाद, बौद्धिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. संध्याकाळी संघशाखा भरते. त्यात स्वदेशी, परदेशी खेळांचे प्रशिक्षण दिले जाते. त्यानंतर येथील सभागृहात सर्व विद्यार्थी एकत्रितपणे सायंप्रार्थना म्हणतात. सुविचार दर्शन होते. संपूर्ण दिवसात काही विशेष घटना घडली असेल तर त्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली जाते. या सर्व एकूण कार्यक्रमात विद्यार्थी आणि त्याचा पूर्ण विकास असा प्रधान हेतू असल्याने कोठेही विस्कळीतपणा आढळून येत नाही.

एवढा मोठा प्रकल्प राबविताना सरकारकडून कोणतेही अनुदान न घेता व्यवस्थापन कसे केले जात असावे? असा स्वाभाविक प्रश्न उभा राहणे शक्य आहे. विद्यार्थ्यांकडून वार्षिक शुल्क घेतले जाते. याशिवाय देणग्या स्वीकारल्या जातात. स्वतःचे उत्पादनाचे साधन म्हणून कृषी उत्पादनांची लागवड शाळेच्या परिसरात केली जाते. संस्थेत काम करणाऱ्या व्यक्तीचा उद्देश केवळ नोकरी आणि पगार असा नसल्याने बराचसा खर्च कमी होत असतो.

या संख्या अनुदान घेत नाहीत, त्याची कारणे म्हणजे शाळेतील उपक्रम राबविण्यासाठी पुरेशी स्वायत्तता मिळावी म्हणून. केंद्रीय माध्यमिक विद्यालयाने ठरवून दिलेला सर्व अभ्यासक्रम चोखपणे पार पाडला जातो. परंतु या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना नैतिक, धार्मिक, सांस्कृतिक संदर्भात शिक्षण देण्यावर विशेष भर दिला जातो. अनुदान घेत नसल्याने या संदर्भातील मर्यादा पाळण्याचे बंधन शाळेवर राहात नाही. या बाबी आपल्या पद्धतीने राबविण्यासाठी शाळा मुक्त राहू शकते. याच उद्देशाने हे अनुदान स्वीकारले जात नाही. चेन्नल्ली ही निवासी शाळा तर अनुदानाशिवाय अतिशय व्यवस्थितपणे कार्य करीत आहे.

साधारणपणे याच स्वरुपात सर्वत्र शाळेच व्यस्थापन केले जाते. शाळेतून बाहेर पडलेली मुलं काही वेळ आसपासच्या परिसरात शिक्षण प्रसारासाठी देत असतात. इतर शाळांप्रमाणेच अभ्यासक्रम पूर्ण केलेला असल्याने नोकऱ्या किंवा व्यवसाय मिळविण्यात तेही यशस्वी ठरतात. परंतु या शाळातून जाणारा विद्यार्थी राष्ट्रप्रेमाने सस्कारित झालेला असतो. याची एक वेगळी जाणीव मनात ठेवूनच तो समाजामध्ये व्यवहार करीत असतो. आपण जेवढे काही मिळविले त्याचे आपण देणेकरी आहोत असाच व्यवहार त्याच्याकडून होतांना दिसतो. हेच जीवन आहे. जे सत्य आहे, पवित्र आहे आणि सर्वज्ञानस्वरुप आहे. हीच विद्या भारतीची फलश्रुती म्हणता येईल.

# समाजसुधारणा करावी तर हिंदुत्वनिष्ठांनीच अशी प्रतिमा तयार व्हायला हवी

प्रा. शेषराव मोरे.

**हिंदुत्वाचा प्रसार करण्यासाठी सावरकर, हेडगेवार, गोळवलकर गुरुजी या आकाशाएवढ्या माणसांनी जीवाचे रान केले. तरीही सर्वसामान्य माणसांपर्यंत हा विचार अद्याप का पोहोचू शकला नाही?**

**नांदेडचे प्रा. शेषराव मोरे यांचा हा लेख या प्रश्नाची परखड मीमांसा करणारा आहे.**

**लेखकाचा 'सावरकरांचा बुद्धिवाद : एक चिकित्सक अभ्यास' हा ग्रंथ अलिकडेच प्रसिद्ध झाला आहे. अनेक वाचकांनी व समीक्षकांनी तो नावाजला आहे.**

१९२३ साली सावरकरांचा 'हिंदुत्व' ग्रंथ प्रसिद्ध झाला. १९२५ साली संघाची स्थापना झाली. तेव्हापासून हिंदुत्वाचा प्रचार भारतामध्ये केला जात आहे. स्वातंत्र्यपूर्व कालातील पाकिस्तान निर्मितीचे १९०६ पासून चाललेले राजकारण हिंदुत्वाच्या प्रसाराला अत्यंत पोषक होते. हिंदुत्वाचा प्रसार करण्यासाठी सावरकर, डॉ. मुंजे, डॉ. हेडगेवार यांच्यासारखी आकाशाएवढी माणसे जीवाचे रान करीत होती. वातावरण त्या विचाराला अत्यंत अनुकूल होते. असे असतानाही हिंदुत्वाचा विजय झाला नाही. एक पराभूत तत्वज्ञान वा विचारसरणी म्हणून राहणे हिंदू समाजाच्या नशिबी आले, ही विचारसरणी हिंदूसमाजाने नाकारली. हिंदू समाजानेच हिंदुत्व नाकारावे, हा काय प्रकार आहे व हे असे कसे घडले याचे कोडे जगातील इतर लोकांना समजणारच नाही. पण हे येथे घडले हे खरे आहे. हे असे का घडले? हिंदुत्व हे या देशात १०-२० टक्क्यापुरतेच मर्यादित का राहिले हा प्रश्न माझ्या चिंतनाचा व अभ्यासाचा एक विषय आहे.

या प्रश्नाचा आपण शोध घेतला पाहिजे; आत्मनिरीक्षण केले पाहिजे, असे मला वाटते. हिंदू समाजाला हिंदुत्व समजून सांगण्यात आपले काही चुकले काय, याचाही शोध घेतला पाहिजे. हिंदू समाजाचा याबाबत खरोखरच काही गैरसमज झालेला आहे काय, याचीही तपासणी केली पाहिजे. नुसती तपासणी नव्हे, तर कठोर चिकित्सा केली पाहिजे, असे मला वाटते.

ही चिकित्सा करताना हिंदुत्ववाद न स्वीकारलेल्या बहुसंख्य हिंदू लोकांच्या मनाशी व भूमिकेशी आपल्याला एकरुप व्हावे लागेल. त्यांच्या ठिकाणी आपणच आहोत, असे समजून या प्रश्नाचा विचार करावा लागेल. हिंदुत्वावरील त्यांचे आक्षेप ऐकून घ्यावे लागतील, त्यांच्या भूमिकेतून ते समजून घ्यावे लागतील. त्या आक्षेपांची चिकित्सा करावी लागेल. हिंदुत्वाचा प्रसार करताना आपली भाषा चुकली, की आपली मांडणी चुकली, की हिंदुत्वाचा आशयच चुकला याची कठोर चिकित्सा करावी लागेल. हिंदू समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत हिंदुत्व गेले पाहिजे, असे ज्यांना ज्यांना वाटते, त्या प्रत्येकाला ही चिकित्सा, कितीही अप्रिय असली तरी, करावीच लागेल.

हिंदुत्वाच्या विरोधकांनी हिंदुत्व हे पुरते बदनाम करुन टाकलेले आहे. हिंदू समाजासाठीच हिंदुत्व हे वाईट आहे ही गोष्ट ते हिंदू समाजाला पटवून देत राहिले आहेत. हिंदुत्ववाद्यांच्या प्रसारापेक्षा या हिंदुत्व विरोधकांचाच प्रभाव हिंदू समाजावर अधिक पडला. असे का झाले? विरोधकांनाही आक्षेप घेता येईल, असे विचार हिंदुत्ववादी मांडत आले आहेत काय, याचीही तपासणी करावी लागेल. विरोधकांच्या टीकेतील काही मुद्द्यात काही तथ्य खरेच आहे काय हे थंड डोक्याने आपल्याला तपासावे लागेल.

या दृष्टीतून आम्ही अनेक वर्षापासून विचार व अभ्यास करीत आहोत. हिंदूसमाजातील विविध जातीपंथांच्या लोकांपर्यंत जावून त्यांचे मोकळे मनोगत जाणून घेण्याचा आम्ही आमच्या परीने यथाशक्ती प्रयत्न करीत आलो आहोत. या साऱ्या प्रयत्नातून आम्ही अशा निष्कर्षाला आलो आहोत की, हिंदुत्वाच्या पराभवाचे एक मुख्य कारण हिंदुत्व विचाराची केलेली चुकीची मांडणी, हे होय. आणि हे असे कारण आहे की, त्याची दुरुस्ती आपल्याला करता येऊ शकते.

हिंदुत्वाच्या चुकीचा मांडणीचा प्रश्न मी जेव्हा उपस्थित करतो, तेव्हा हिंदुत्व म्हणजे काय, हा प्रश्न प्रथमतः आपल्यासमोर उभा ठाकतो. आजच्या हिंदुत्वनिष्ठांना अभिप्रेत असणारे हिंदुत्व कसे आहे? सर्वच हिंदुत्वनिष्ठांचे हिंदुत्व हे सारखे नाही, हे प्रथमतः लक्षात घेतले पाहिजे. हिंदुत्वाबाबतीत विविध मते आज सर्वांना ऐकायला मिळतात. हिंदुत्व म्हणजे हिंदू धर्मच होय, असे अनेक हिंदुत्वनिष्ठ मांडतात. हा हिंदूधर्म कोणता आहे, याचा तपशील देताना त्यासाठी ते वैदिकधर्माचाच सारा तपशील देतात. वैदिक धर्माने थोर तत्वज्ञान या जगाला दिले आहे. यालाच वेदांत असे म्हणतात. या वेदांतालाच हिंदुत्व म्हणणारेही काही हिंदुत्वनिष्ठ आहेत. हिंदुत्व हे हिंदुधर्मापेक्षा व्यापक असून हिंदुधर्म हे हिंदुत्वाचा एक अंश आहे, असे काहीजण मानतात. हिंदुत्व हे हिंदू संस्कृतीचेच दुसरे नाव आहे, असे यांना वाटते.

याही पुढे जावून, हिंदुंची उदात्त व चिरंतन अशी जी सनातन सांस्कृतिक 'जीवनमूल्ये आहेत, त्यालाच हिंदुत्व मानणारेही कित्येक हिंदुत्वनिष्ठ आहेत. हिंदुंच्या उदात्त व चिरंतन अशा जीवनमूल्यांवर आधारित जीवनपद्धती म्हणजेच हिंदुत्व होय, अशीही हिंदुत्वाची व्याख्या केली जाते.

आजच्या हिंदुत्वनिष्ठांना हवे असणारे हिंदुत्व हे सामान्यतः वर सांगितल्याप्रमाणे असते. ते हिंदुत्व एक तर हिंदू धर्माशी किंवा हिंदू संस्कृतीशी किंवा हिंदुंच्या जीवनपद्धतीशी एकरुप असते. हे हिंदुत्व आपण जतन केले पाहिजे, असे या सर्व हिंदुत्वनिष्ठांना वाटते. त्यासाठी हिंदू संघटन केले पाहिजे, असे त्यांना तीव्रतेने वाटते. हिंदुत्वनिष्ठांना हवे असणारे हे जे हिंदुत्व आहे, त्या बद्दल बहुसंख्य हिंदू लोकांना काय वाटते याबाबत मते मांडण्यापूर्वी या हिंदुत्वाचा आशय व त्याचा तपशील आपण थोडक्यात समजून घेवू.

हिंदुंचा धर्म, संस्कृती व जीवनमूल्ये जगातील कोणत्याही लोकांच्या धर्म - संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ आहेत, याचा आपल्याला सार्थ अभिमान वाटत असतो. हिंदुंची ही संस्कृती श्रेष्ठ असून पाश्चिमात्यांची त्या मानाने कनिष्ठ आहे, याचा आपल्याला अभिमान वाटतो. आम्हा हिंदुंचे श्रेष्ठत्व कशात आहे, असा प्रश्न उपस्थित करुन ते श्रेष्ठत्व आमच्या संस्कृतीत आहे, आमच्या उदात्त जीवन मूल्यात आहे असे आपल्याला वाटत असते. जगाला देण्यासारखा व जगाने घेण्यासारखा आमच्याजवळ भरपूर सांस्कृतिक ठेवा आहे, असे आपण म्हणतो. जगाने जर आमची सांस्कृतिक जीवनमूल्ये स्वीकारली तर विज्ञानाने निर्माण केलेले कितीतरी प्रश्न त्यामुळे मिटतील, असा आपला दावा असतो. विज्ञानामध्ये पुढे गेलेले, अमेरिकादी देश आता आपल्या हिंदुंच्या सांस्कृतिक मूल्यांकडे आकर्षू लागले आहेत, हा आपला कौतुकाचा विषय असतो. हिंदुंचे हे जे वैशिष्ट्य आहे, त्यांचे जे 'त्व' आहे ते हेच हिंदुत्व होय असे आपल्याला वाटत असते. हे आमचे 'त्व' टिकविण्यासाठीच आम्हाला हिंदू संघटन हवे असते.

ज्या सांस्कृतिक जीवनमूल्यांचा आपण गौरव करतो व ज्याला हिंदुत्व ही नवी संज्ञा आपण देतो, त्या सांस्कृतिक मूल्याच्या तपशीलात जाणे येथे स्थलाभावी मला जमणार नाही. आपल्या चर्चेचा सारा हेतू बहुजन समाजात हिंदुत्व का जात नाही, हा आहे; व त्या दृष्टीनेच जितके आवश्यक तितकेच या सांस्कृतिक जीवनमूल्यांचे विवरण येथे आपल्याला करायचे आहे. कारण या जीवनमूल्यांच्या तपशीलामध्येच बहुजनसमाजाचा हिंदुत्वाविषयीचा गैरसमज दडलेला असण्याची एक शक्यता आहे. ही शक्यता तपासून पाहण्यासाठी या सांस्कृतिक मूल्यांचे थोडेसे विववरण येथे करणे भाग आहे.

## बहुसंख्यांकांना काय वाटते?

हिंदुत्वाशी एकरुप असलेल्या ज्या सांस्कृतिक मूल्यांचा आपण गौरव करतो, ती मूल्ये आहेत तरी कोणती? या मूल्यांचा महत्वाच्या क्रमाने काही नावे देवून उल्लेख करता येईल काय? एक, दोन.... पाच, सहा अशा पद्धतीने ती सांगता येतील काय? ती मूल्ये आपल्या मनाला समजतात; त्या सर्व मूल्यांचा एकूण परिणाम लक्षात येतो, पण नेमके त्याला नाव देवून क्रमाने ती मूल्ये मांडता येत नाहीत, ही आपल्या समोरील एक अडचण आहे. पूज्यनीय व वंदनीय थोर पुरुषांच्या चरणावर डोके ठेवण्याची आपली पद्धत आहे. द्रोणाचार्याला गुरुदक्षिणा म्हणून उजव्या हाताचा अंगठा कापून देणारी शिष्य परंपरा भावणारी ही संस्कृती आहे. माणसाप्रमाणेच सापावरही सारखेच प्रेम करायला शिकविणारी ही संस्कृती आहे. हे सारे आपणाला कळते. पण नाव देवून ही मूल्ये क्रमाने मांडायची कशी, ही आपली खरी अडचण आहे.

या अडचणीतूनही ही जीवनमूल्ये मांडण्याचा प्रयत्न अनेक थोरामोठ्यांनी केलेला आहे. विवेकानंदांनी जीवनमूल्ये आपल्या व्याख्यानातून मांडलेली आहेत. श्रीगुरुजींनी आपल्या 'विचार धन' मध्ये ती मांडलेली आहेत. मा. दत्तोपंत ठेंगडी, प्रा. अशोक मोडक, मा. गो. वैद्य, नित्यनारायण बॅनर्जी आदींनी ही जीवनमूल्ये मांडण्याचा प्रयत्न केला आहे. ही मूल्ये समजून घेण्याच्या सोईसाठी या मूल्यांची काही कसोटीवर वर्गवारी करणे योग्य राहील. डॉ. स. ह. देशपांडे यांनी 'धर्मभास्कर'च्या गेल्या दिवाळी अंकात लिहिलेला 'हिंदु संस्कृतीचा आशय कोणता?' हा लेख या दृष्टीने अत्यंत उद्बोधक आहे. आपल्या विवेचनाच्या सोयीसाठी त्यांनी त्या लेखात केलेली मूल्यांची वर्गवारी तशीच घेवून सांस्कृतिक जीवनमूल्यांचा म्हणजेच हिंदुत्वाचा आशय आपण थोडक्यात समजून घेवु.

आमच्या हिंदुसंस्कृतीची वैशिष्ट्ये पाश्चात्य संस्कृतीच्या तुलनेत कशी श्रेष्ठ आहेत. हे दाखविण्याच्या दृष्टीतून डॉ. स. ह देशपांडे काही महत्त्वपूर्ण विधाने करतातः

(१) हिंदुसंस्कृती अध्यात्मवादी आहे उलट पाश्चात्य संस्कृती भोगवादी आहे.

(२) हिंदुसंस्कृती सहयोगावर भर देते उलट पाश्चात्य संस्कृती स्पर्धेवर भर देते.

(३) आमची संस्कृती समष्टिवादी आहे उलट पाश्चात्य संस्कृती व्यक्तीवादी आहे याचाच दुसरा अर्थ आमची संस्कृती कर्तव्यावर जोर देते, तर पाश्चात्य संस्कृती हक्कावर जोर देते.

(४) आमची संस्कृती चराचर सृष्टीवर प्रेम करण्यास शिकविते; ती भूतदयावादी आहे. उलट पाश्चात्य संस्कृती मानव-केंद्री आहे, व्यक्तीकेंद्री आहे.

(५) आमची संस्कृती सहिष्णू व स्वातंत्र्यप्रेमी आहे.

(६) आमची संस्कृती स्त्रीला माता म्हणून गौरविते.

(७) आमची समाजरचना आदरणीय आहे.

या पैकी एकेक मुद्दा घेवून हिंदू संस्कृतीबद्दलचा आपला हा अभिमान एका दृष्टीने कसा असत्य आहे व दुसऱ्या दृष्टीने समाज व राष्ट्रासाठी कसा अहितकारक आहे, हे डॉ. स. ह. देशपांडे यांनी त्या लेखात दाखवून दिले आहे. जिज्ञासूंनी तो लेख मुळातून वाचला पाहिजे. आपल्याला येथे हिंदुत्वाच्या पराभवाची काही बीजे या वैशिष्ट्यात सापडतात काय या दृष्टीतून फक्त विचार करायचा आहे.

वर सांगितलेली हिंदू संस्कृतीची वैशिष्ट्ये ही हिंदुत्वाची वैशिष्ट्ये होतात. आम्हा हिंदुत्वनिष्ठांना जे हिंदुत्व राखायचे आहे, त्या हिंदुत्वाला या वरील वैशिष्ट्यापासून अलग करता येत नाही, हे उघड आहे. ही वैशिष्ट्ये राखण्यासाठीच आम्हाला हिंदुत्व हवे आहे व त्यासाठी हिंदू संघटन पाहिजे अशी आमची मूलभूत भूमिका आहे.

वरील हिंदुत्वाच्या वैशिष्ट्यांच्या

कोणत्याही तपशीलात न जाताही आपण सर्वांनी एक गोष्ट निर्विवादपणे मान्य केलीच पाहिजे की, ज्या हिदुंचे आपल्याला संघटन करायचे आहे, त्या सर्वच हिदुंना ही वैशिष्ट्ये काही एकमताने मान्य होणारी नाहीत. ही मूल्ये किती उदात्त आहेत, या मुद्द्यावर आपण खूप चर्चा करु शकतो; आजवर अशी चर्चा खूप झालेली आहे. पण प्रश्न तो नाही. आपण या उदात्त जीवनमूल्याच्या प्रसाराला निघालो आहोत का हिंदू संघटन करायला निघालो आहोत, हा खरा प्रश्न आहे. ज्यांचे आपण संघटन करायला निघालो आहोत, त्यांनाच ही जीवनमूल्ये मान्य नसतील, तर आपण त्यांचे संघटन या मूल्यांच्या आधारावर कसे करणार?

हिदू समाजातील अनेक लोकांचे या जीवनमूल्यांसंबंधी काय आक्षेप आहेत, हेही तपशीलाने व पुराव्यासह मांडता येईल. दलित साहित्यामध्ये या जीवनमूल्यांवर किती घणाघाती प्रहार आहेत, हे सांगण्याची गरज नाही. ज्यांना आपण उदात्त जीवनमूल्ये म्हणून गौरवितो, त्या मूल्यांच्या नावाखालीच आम्हाला 'कुत्र्यासारखे' जीवन जगायला भाग पाडले गेले आहे, असा दलितांचा आक्रोश आहे. ज्यांच्यावर हिदुंच्या समाजरचनेने शतकानुशतके अन्याय केला व त्या अन्यायाच्या समर्थनार्थ याच जीवनमूल्यांचा आधार घेतला, तेच लोक या जीवनमूल्यांच्या विरोधी विद्रोह करुन बंड करुन उठले, तर ते आपण समजून घेणार नाही काय? हिदू समाजाचे विघटन झाले याचे एक कारण या वरील जीवनमूल्यातच आहे, ही समाजशास्त्रीय चिकित्सा आपण मानणार नाही काय? डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी 'हिदुसमाज : संघटना आणि विघटना' या ग्रंथात हीच गोष्ट पटवून सांगितलेली आहे. तेव्हा या उदात्त मूल्यांचा आधार घेवून व त्यासाठीच हिदू संघटन करता येण्याची शक्यता नाही, हे एकदा शांत मनाने आपण समजून घेतले पाहिजे.

आध्यात्मिक जीवनमूल्यांसंबंधी आपण हिदुत्वनिष्ठ फारच हळवे बनलेलो आहोत. आध्यात्मिक मूल्यांचा प्रसार संत - महात्म्यांनी, धार्मिक आचार्यांनी, मा. अनंत महाराज आठवले, आदीनी केलेला धार्मिक हिदुंना मान्य असतो; मात्र संघाने तो केला तर त्या हिदुंना तो मान्य नसतो, ही गोष्ट आमचे हिंदुत्वनिष्ठ लक्षात घ्यायलाच तयार नाहीत. अध्यात्म हा धर्मप्रवचनाचा विषय असला की तो धार्मिक हिदूंना मान्य असतो; तो जर राष्ट्रप्रवचनाचा विषय झाला, तर मात्र त्याला तो नको असतो.परलोकाशी, पारलौकिक सुखाशी, ईश्वराशी संबंध असणारे धर्माचे तत्वज्ञान अैकण्यात हिदुंना रुची आहे; त्यासाठी सारे हिदू धावत येतात. पण या इहलोकाशी, या इहलोकातील प्रत्यक्ष सुखाशी व मानवा मानवातील संबंधाशी निगडीत असणारे कोणते धर्म तत्वज्ञान ऐकण्यात हिदुंना रस नसतो, हा हिंदुच्या मनाचा एक स्वभाव आहे. ते हिदुंचे मन जर हिदुत्वनिष्ठांनी नीट समजून घेतले नाही, तर पांडुरंगशास्त्रीनी, अनंत महाराजांनी, धुंडामहाराजांनी धार्मिक हिदुंच्या अंतःकरणात स्थान मिळविले; त्याच्या सभांना लोक हजारोच्या संख्येने भक्तिभावाने येतात, मात्र त्याच अध्यात्माचा आधार घेणाऱ्या कोणत्या हिंदुत्वनिष्ठ संघटनेकडे हेच का येत नाहीत, याचे उत्तरच त्यांना सापडणार नाही.

## जातीचा, वर्णाचा अहंकार

हिदुत्व हे अहिदुंच्या विरोधात आहे म्हणून जातीय आहे हा विरोधकाचा एक आक्षेप. त्यात फारसा अर्थ नाही म्हणून बाजूला ठेवू. त्यांचा दुसरा आक्षेप असा असतो की, हिदुत्व हे हिदुलोकांच्याच हिताच्या विरोधी आहे. त्यांच्या या दुसऱ्या आक्षेपाचा विचार केला पाहिजे. याच आक्षेपाचा प्रचार त्यांनी हिदू समाजात केला आहे. या समाजात अनेक वर्णाचे, जातीचे, पंथाचे लोक राहतात. आपल्या वरील वर्णातील व जातीतील लोकांच्या विरोधी बोलत असतानाच त्यांना स्वतःच्या वर्णाचा व जातीचा अहंकार वाटत असतो, ही वस्तुस्थिती आहे. या अहंकाराचा वापर करुन व त्याला फुंकर घालून बहुसंख्य हिदू समाजाला असे दाखवून देण्यात विरोधक यशस्वी झालेले आहेत की, हिदुत्वावर आधारलेले हिदू राष्ट्र म्हणजे एक प्रकारची पेशवाईच आहे. बहुसंख्य हिदू लोकांच्या डोळ्यात हीच गोष्ट पक्की ठासून बसलेली आहे, हे आम्ही स्वतः हिदू समाजातील विविध जातीतील लोकात जावून अनुभवले आहे. सामान्य हिदुंकरिता हिदुत्व म्हणजे चातुर्वर्ण्याधिष्ठित अशी एक राज्यव्यवस्थाच आहे. हिदू राष्ट्र हे या व्यवस्थेला दिलेला कायदेशीर राष्ट्रीय आधार होय. हा लोकांच्या मनातील गैरसमज कितीही खोटा व चुकीचा असो, पण तो आहे वस्तुस्थिती आपण एकदा थंड मनाने समजून घेतली पाहिजे.

चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजरचनेला आपल्या हिदू परंपरेने सातत्याने अध्यात्माचा आधार दिलेला आहे. आत्मा, मुक्ती, जीवाचे बंध, पुनर्जन्म, कर्म फलाचा सिद्धांत या साऱ्या गोष्टीचा चातुर्वर्ण्याधिष्ठित समाजरचनेला आधार मिळालेला आहे. हा जन्म, या जन्मात आपल्या वाट्याला आलेले समाष्टिधर्मातील कर्तव्य, अगदी स्पष्टच सांगायचे तर ज्या शूद्र वर्गात तुम्ही जन्माला आलात तो वर्ण - हा या कर्मफलाचा भाग होय. पूर्वजन्माच्या फळाचा परिणाम म्हणून हा जन्म असा मिळाला आहे. पुढील जन्म चांगला मिळण्यासाठी या जन्मी धर्माने नेमून दिलेले नियत कर्म निमूटपणे करत जाणे, आपल्याला कर्तव्य आहे. अशा प्रकारे या समाजरचनेला आंध्यात्मिक तत्वज्ञानाचा आधार दिला गेलेला आहे. विवेकानंदांसारखा थोर पुरुषही या तत्वज्ञानापासून फारसा मुक्त नाही. तत्वज्ञानाची - अध्यात्माची परिभाषा सामान्य लोकांना कळत नाही. संघटन तर आपल्याला सामान्य लोकांचेच करायचे आहे. चातुर्वर्ण्य नावाचा प्रकारच आज शिल्लक नाही. जो जातिभेद नावाचा प्रकार आज शिल्लक आहे, तो एकतर निवडणुका जिकण्यासाठी सर्वांनाच हवा आहे. आणि दुसरीकडून हिदुत्वाचा पराभव करण्यासाठी विरोधकांना तो हवा आहे. एकीकडे जातीपातीचा आधार घेवून निवडणुका जिकायच्या नि दुसरीकडे अस्तित्वात नसणाऱ्या चातुर्वर्ण्यावर, त्याला हिदुत्व हे नाव देवून, प्रहार करुन चातुर्वर्ण्य निर्मूलनाचे पुण्य जोडायचे, अशी आमची आजची पुरोगामी नीती आहे.

आपल्या समोरचा खरा प्रश्न या गैरसमजाच्या भोवऱ्यात जो बहुजन हिदूसमाज आज सापडला आहे, त्याला हिंदुत्व हे कसे पटवून द्यायचे हा आहे. त्याचे गैरसमज कसे दूर करायचे हा आहे. त्यांचा गैरसमज व्हावा असे हिदुत्वनिष्ठांकडूनही काही घडलेले आहे, हे आपल्याला मान्य करावे लागेल. आध्यात्मिक परिभाषेने या गैरसमजाला कारणे पुरविली आहेत, हेही जाणून घेणे भाग

आहे. हा त्यांचा गैरसमज दूर झाल्याविना हिंदू संघटन होणार नाही, हेही जाणून घ्यावे लागेल. आध्यात्मिक विचारावर आधारलेली जीवनमूल्ये याचा हिंदुत्वाशी संबंध जोडल्यास, त्या आधारावर हिंदुसंघटन झाले पाहिजे असा हेतू असल्यास हिंदू संघटन होण्याचा संभव नाही, हे शांत मनाने आपण एकदा समजून घेतले पाहिजे.

जाता जाता आणखी एका मुद्द्याचा येथे उल्लेख करणे भाग आहे. हिंदुंच्या व्याख्येमध्ये आपण वैदिक, बौद्ध, जैन, शीख आदीचा मोठ्या गौरवाने समावेश करतो. हिंदुंची व्यापक व्याख्या करण्यापुरते हे सारे ठीक असते. तपशीलात जावून जेव्हा या हिंदुंचे' 'त्व' म्हणजेच हिंदुत्व ठरवित असतो, हिंदूंच्या जीवनाची मूल्ये ठरवित असतो, तेव्हा मात्र आपल्यासमोर फक्त वैदिकांचेच तत्वज्ञान असते. आपण जी जीवनमूल्ये पाहिली ती स्पष्टपणे वैदिकांचीच आहेत. वैदिकांची जीवनमूल्ये, ती उदात्त आहेत असा दावा करुन, हिंदुत्वाच्या व्यापक नावाखाली अवैदिकांवर लादण्याचा हा प्रकार आहे, असे एखाद्या अवैदिकाला वाटणे अगदी साहजिक आहे. ही गोष्ट आपण हिंदुत्वनिष्ठ कधीही गंभीरपणे विचारातच घेत नाही. उदात्तमूल्ये वा आदर्श जीवनपद्धती मानायचीच तर भगवान गौतमबुद्धाचा अष्टांग मार्ग हा वैदिकाच्या जीवनपद्धतीपेक्षाही श्रेष्ठ आहे, असा रास्त दावा एखादा बौद्ध करु शकतो. बुद्धांनी जी चार कार्यसत्ये सांगितली, ती सत्येच नव्हेत असे आपण मानणार आहोत काय? बौद्धांनी सांगितलेली जीवनपद्धती उदात्त का मानू नये असा सवाल बौद्धधर्मीय करणारच व त्यालाच हिंदुत्व माना असाही आग्रह धरणार. त्यांच्या या सवालातील व आग्रहातील तथ्य आपण समजून घेणार नाही काय? हिंदू समाजातील 'वैदिक' हा एक पंथ आहे. या पंथाच्या तत्वज्ञानाला, जीवनपद्धतीलाच हिंदुत्वाच्या स्थानी प्रतिष्ठापित करणे, याचा अर्थ अवैदिकांचा या हिंदुत्वावरील हक्क नाकारणे होय, याचा गंभीरपणाने आपण विचार करणार नाही काय? वैदिक, बौद्ध, शीख आदींचा समावेश हिंदू शब्दाच्या व्याख्येत कसा होईल, याची जेवढी बौद्धिक कसरत आपण करतो व तसे करताना जेवढे आपल्या उदारतेचे व व्यापकतेचे दर्शन घडवितो, त्याच्या अल्पांशानेही हिंदुत्वाचा आशय ठरविताना आपण करत नाही ही वस्तुस्थिती आहे. हिंदू समाजातील कोणत्याही पंथाला केवळ आशयाच्या दृष्टीनेच नव्हे, तर भाषेच्या दृष्टीनेही मान्य होणार नाही, असा कोणताही भाग सर्वांकरिता म्हणून मांडल्या जाणाऱ्या हिंदुत्वात असता काम नये, हे फार महत्वाचे पथ्य आपण पाळणार आहोत का नाही हा प्रश्न आहे. हिंदू शब्दाची व्याख्या करण्यात आपण यशस्वी झालो, पण हिंदुत्वाचा आशय ठरविताना मात्र वैदिकत्वाच्या पलिकडे आपण अद्याप जावू शकलो नाही, या कटुसत्याची चिकित्सा व आत्मनिरीक्षण हिंदुत्वनिष्ठांना गंभीरपणे करावेच लागेल.

तेव्हा या वरील विवेचनाच्या प्रकाशात काही कटुसत्ये आपण स्वीकारु या. हिंदूसंघटन हवे असेल तर हिंदुच्या तथाकथित उदात्त जीवनमूल्याचा आधार घेणे आपल्याला सोडावे लागेल. हिंदुत्वावर जर हिंदू संघटन करायचे असेल तर त्या हिंदुत्वाचा नि या जीवनमूल्यांचा संबंध तोडावा लागेल. जर हा संबंध कायमच राहावा असे वाटत असेल तर मग हिंदू संघटन सोडून द्यावे लागेल. हिंदू संघटन आणि सांस्कृतिक जीवनमूल्यांवर आधारित हिंदुत्व हे एकत्र राहूच शकत नाहीत, हीच आजच्या समाजकारणाची, राजकारणाची शोकांतिका आहे. या शोकांतिकेबद्दल दु.ख वाटले तरी शोक करुन उपयोग नाही. जे आहे ते समजून घेतल्यावाचून पुढे पाऊलच टाकता येणार नाही. तेव्हा दु.ख गिळून, शोक आवरुन, विवेक व तारतम्य ठेवून, हिंदू संघटन झाले पाहिजे या ध्येयासाठी डॉ. हेगडेवारांना स्मरुन, साक्षी ठेवून, कदाचित क्षमा मागून वरील दोन पर्यायांपैकी योग्य पर्यायाची निवड आपल्याला केली पाहिजे. ज्याचा संबध कोणत्याही धर्माशी, पंथाशी, सस्कृतीशी, कोणत्याही विशिष्ट जीवनमूल्यांशी वा आचारसरणीशी येणार नाही व सर्व हिंदुंना समानतेने लागू होईल, त्यांना एकत्र आणील, त्यांना एकसंध बनवील असे हिंदुत्व आपणाला हवे आहे.असे हिंदुत्व कशा स्वरुपाचे असू शकेल, त्याची मांडणी कशी करता येईल याचा विचार गंभीरपणाने आपण केला पाहिजे.

त्यासाठी आपल्याला सुदैवाने फारशी शोधाशोध करावी लागणार नाही. असे हिंदुत्व कसे असावे हे स्वतः सावरकरांनीच सांगून ठेवलेले आहे. हे त्यांनी सांगितलेले हिंदुत्व कोणते आहे, त्याचे स्वरुप काय हे थोडक्यात आपण समजून घेवू.

## समान पूर्वज, समान इतिहास

त्यांच्या मते हिंदुत्व हे एका दृष्टीने हिंदुंच्या भावनिक एकत्वाला दिलेले नाव आहे. या दृष्टीने हिंदुत्व ही एकात्मतेची भावना आहे. हिंदुंना एकसंघ करण्याची अशी भावना आवश्यकच असते.ही एकात्मतेची भावना, अेकत्वाची जाणीव निर्माण करण्यासाठी सावरकर हिंदुंच्या इतिहासाकडे पाहतात. आमचे पूर्वज समान आहेत; इतिहास एक आहे; परंपरा, संस्कृतीचा विकास, सुखदु.खे, ही सारखीच आहेत. आमची भूमी, आमच्यातील रक्त एकच आहे. इतिहासातून या समान घटकांच्या आधारावर भावनिक अेकत्व येते. यालाच सावरकर हिंदुत्व म्हणतात. 'भारताचा शोध' मध्ये याच घटकांचा पं. नेहरु उल्लेख करतात व या इतिहासातील स्मृतीतून भावनिक एकत्व येते असे म्हणतात. एकत्वाला पं नेहरु 'भारतीयत्व' असे नाव देतात, एवढाच फरक आहे. आशयाच्या दृष्टीने सावरकरांच्या या हिंदुत्वात व पं. नेहरुंच्या भारतीयत्वात काहीच फरक नाही. मतभेद फक्त शब्दाच्या वापराबद्दलचाच आहे. तेव्हा हिंदुत्व ही हिंदुंच्या समाईक इतिहासांतून आलेली हिंदू लोकांतील एकत्वाची भावनात्मक जाणीव आहे, असे सावरकरांचे म्हणणे आहे. त्यांच्या 'हिंदुत्व' ग्रंथाचा हेतू व स्वरुपच या एकत्वाची व्याख्या करणे, त्याची लक्षणे शोधणे, त्या लक्षणांची हिंदुंना जाणीव करुन देणे व त्यासाठी हिंदुंच्या इतिहासाचा मागोवा घेणे, हा आहे! या पलिकडे त्यांच्या 'हिंदुत्व' ग्रंथाने सांस्कृतिक मूल्यांच्या वा आचारपद्धतीच्या क्षेत्रात कुठेही पाऊल टाकलेले नाही!!

सावरकरांच्या भूमिकेप्रमाणे वर्तमानकाळात आपण कोणती जीवनमूल्ये पाळावीत, कोणती आचारपद्धती स्वीकारावी यासाठी विज्ञाननिष्ठेचा उपयुक्ततावादाचा आधार हिंदुंनी घेतला पाहिजे. कोणतेही मूल्य हे सनातन वा चिरंतन नसते, तर ते विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून असते, अशी त्यांची भूमिका आहे. त्यामुळे हिंदुंची कोणती सनातन

चिरंतन वा आदर्श सांस्कृतिक जीवनमूल्ये आहेत अशी भूमिका घेण्यापेक्षा आपली मूल्ये आजच्या नव्या परिस्थितीच्या सदर्भात आपणच ठरविली पाहिजेत, अशी भूमिका सावरकर घेतात. त्यामुळे सावरकरांच्या लेखनात, भाषणात वा इतर कोणत्याही ठिकाणच्या विचारात वरीलपैकी कोणत्याही हिंदुंच्या सनातन जीवनमूल्यांचा गौरव, प्रसार वा उल्लेखही असलेला, आपल्याला सहसा आढळणार नाही. त्यांच्या विचारात हिंदुंचे उदात्त तत्वज्ञान, त्यांची थोर संस्कृती वा आदर्श जीवनमूल्ये याचा गौरव वा उल्लेख येतो, तेव्हा तो भुतकाळातील इतिहासाच्या सदर्भात व हिंदुंच्या मनामध्ये आत्मगौरव, आत्मविश्वास व एकत्वाची भावना निर्माण करण्यासाठी आलेला असतो, हे काळजीपूर्वक लक्षात घेतले पाहिजे. या दृष्टीकोनातून सावरकरांचे सारे साहित्य व विचार कुणीही वाचून पहावे, म्हणजे त्याला आम्ही काय म्हणतो त्याची सत्यता पटेल.

याचा अर्थ, हिदुत्व ही भूतकाळातील इतिहासाशी निगडीत असणारी भावनात्मक संकल्पना आहे, तर विज्ञाननिष्ठा व उपयुक्ततावाद ही वर्तमानात आचारावयाच्या जीवनपद्धतीचा आधार व कसोटी आहे, अशी सावरकरांची हिदुत्वनिष्ठा व विज्ञानिष्ठा याची कालाप्रमाणे विभागणी केलेली आहे. सावरकरांची ही विभागणी सावरकरांच्या भक्तांसहीत बहुसंख्य हिदुत्वानिष्ठांना मानवणारी नाही., पटणारी नाही याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. सुरुवातीला आम्हालाही ती पटली नव्हती, पण वास्तवाची जाणीव झाल्यावर ती मन घट्ट करुन पटवून घ्यावी लागली. सावरकरांनी अशी विभागणी केलेलीच नाही असाही युक्तिवाद त्यांचे अनुयायी करण्याची शक्यता आहे. सावरकरांना न मानणारे हिदुत्वनिष्ठ याच कारणासाठी आम्ही सावरकरांना मानत नाही, असेही म्हणण्याची शक्यता आहे. तेव्हा या शक्यतेतून निर्माण होणाऱ्या वादविवादात व विवरणात येथे स्थलाभावी आपल्याला जाता येणार नाही. 'सावरकरांचा बुद्धिवाद' या आमच्या ग्रंथात याविषयीचे साधार व तपशीलवार विवेचन आम्ही केलेले आहे. आमच्या अभ्यासाचा हा सावरकरांविषयीचा निष्कर्ष एक वस्तुस्थिती म्हणून आम्ही येथे गृहीत धरत आहोत.

याचा अर्थ, वर्तमानामध्ये 'हिदुत्व' राखणे म्हणजे इतिहासातून आलेली एकत्वाची भावना राखणे एवढाच मर्यादित अर्थ सावरकरांना अभिप्रेत होता, असे समजायचे काय? एवढाच मर्यादित अर्थ नव्हता, हे त्यांचे उत्तर आहे. हिदुत्व म्हणजे हिंदुंचे स्वत्व असा वर्तमानासाठी सावरकरांचा अर्थ होता. हे हिंदुंचे स्वत्व म्हणजे काय? हिंदुंचे स्वत्व म्हणजे हिंदुंचा धर्म, त्या धर्माचे उदात्त तत्वज्ञान, हिंदुंची संस्कृती, त्या संस्कृतीतील उदात्त जीवनमूल्ये वा हिंदुंची विशिष्ट जीवनपद्धती असा कोणताही अर्थ सावरकरांना अभिप्रेत नव्हता, हे प्रथमतः समजून घेतले पाहिजे. हिंदुंचे स्वत्व म्हणजे त्यांच्या दृष्टीने हिदू लोकांचे न्याय्य हक्क होते. या न्याय्य हक्कांमध्ये राजकीय, समाजिक, धार्मिक, सांस्कृतिक; आर्थिक आदी जीवनाच्या क्षेत्रातील न्याय्य हक्कांचा समावेश आहे हे न्याय्य हक्क ठरविण्याची सावरकरांची कसोटी कोणत्या धर्म व संस्कृतीवर आधारित नव्हती, यासाठी कोणतीही आंतरराष्ट्रीय मान्यता पावलेली कसोटी सावरकर मानायला तयार आहेत. राष्ट्रसंघ (लीग ऑफ नेशन) चा संघटनेनी न्याय्यहक्काची जी कसोटी कोणत्याही देशातील नागरिकांसाठी ठरविलेली आहे, ती सावरकर मानायला तयार आहेत.

भारतात हिंदू हे बहुसंख्य आहेत. ते बहुसख्य आहेत एवढ्याखातर त्यांच्यावर अन्याय होवू नये असे त्यांना वाटते. अल्पसंख्य आहेत म्हणून कुणाला विशेषाधिकार देवू नयेत; सर्वांना समान हक्क असावेत हीच त्यांची भूमिका होती. दरडोई एकमत, जातपात, धर्म, भाषा, लिग न पाहता प्रत्येकाला समान हक्क, कोणालाही धर्माच्या आधारावर जादा हक्क नकोत, सर्वांना समान कायदा - ही सावरकरांची न्याय्य हक्कांची कसोटी होती. राष्ट्रसंघाने देशातील बहुसंख्याकांचे जे हक्क मान्य केले आहेत तेवढेच हिंदुंना मिळावेत, त्याहून अधिक काहीही नको - अशी त्यांची भूमिका होती. थोडक्यात सांगायचे म्हणजे या देशात कोण हिदू, कोण मुसलमान, कोण ख्रिश्चन, कोण पारशी हे पाहू सुद्धा नये व हे सारे या देशाचे समान हक्कांचे समान नागरिक आहेत, असे मानून सर्व व्यवहार चालावा, असे सावरकरांनी आकांत करुन सांगितले आहे. यालाच ते हिंदुंचे न्याय्य हक्क राखणे म्हणतात; हिदुत्व राखणे म्हणतात. हिदू या देशात बहुसंख्य आहेत. तसे राहण्याचा त्यांना हक्क आहे. कृत्रिमपणे व वेगवेगळे कायदे करुन ते तसे राहू नयेत, याची व्यवस्था करणे याला ते हिदुत्व गमावणे म्हणतात. बहुसंख्य लोकांच्या जीवनपद्धतीचा राष्ट्रजीवनावर स्वाभाविक परिणाम होत असतो. हा स्वाभाविक परिणाम राखण्याचा हिंदुंना हक्क आहे. हा परिणाम कृत्रिमपणे कमी केला जावू नये असे त्यांना वाटते. वेगवेगळे कायदे, पक्षपाती राजदंड, अल्पसंख्याकांची संघटनशक्ती, सत्तेच्या लोभामुळे होणारा अल्पसंख्यांकांचा अनुनय, हिंदुंची सद्‌गुणविकृती इत्यादी कारणांमुळे बहुसंख्याकांच्या या स्वाभाविक न्याय्य हक्कांवर आक्रमण होवू शकते. ते तसे होवू नये याची सावधगिरी हिंदुंनी बाळगली पाहिजे, असे त्यांना वाटते. यालाच ते हिदूत्व राखणे म्हणतात. यासाठीच हिंदुंची एकी झाली पाहिजे, हिदू संघटन झाले पाहिजे, असे त्यांना वाटते.

सावरकरांच्या या हिदुत्वामध्ये धर्माचा, संस्कृतीचा जीवनमूल्यांचा जो संबंध येतो, तो या धर्म - संस्कृती संबंधातील हिंदूच्या न्याय्य हक्क रक्षणाच्या संबंधात येत असतो. जसे राजकीय, समाजिक वा आर्थिक संबंधातील न्याय्य हक्क हिंदुंना असतात, तसेच धर्म - संस्कृतीच्या संबंधातही काही न्याय्य हक्क त्यांना असतातच. या देशातील अहिंदुंना ते जसे असतात त्या न्यायाने हिंदुंनाही असतात. हिदुत्वाचा संबंध या न्याय्य हक्कांशी आहे. तो धर्म, ती संस्कृती, ती आचारपद्धती याच्या तपशीलात जावून त्यातील नेमके काय हवे नि काय नको, काय चांगले नि काय वाईट, कोणते हिदुत्वाला पटणारे नि कोणते न पटणारे याच्या निवडीचा वा तपशीलाचा प्रश्न सावरकरांच्या हिदुत्वाच्या कक्षेतच येत नाही. हा प्रश्न त्यांच्या मते विज्ञाननिष्ठेच्या व उपयुक्ततावादाच्या कक्षेत येतो. अन्यायाने हिंदू लोकांचे हक्क डावलले जाऊ नयेत, हीच सावरकरांची वर्तमानकालीन हिदुत्वाची पायाभूत व सारभूत भूमिका आहे. या हिदुत्वाची व हिदू संघटनाची सांगड घातली

जावी, असे त्यांना वाटते.

### व्याख्या एक, आशय निराळाच

आता आपण थोड्या वेगळ्या पद्धतीने याच प्रकारचा विचार करु. स्वतःच्या मनाला आपण असा एक प्रश्न विचारा की सावरकरांना हिंदुंचे तत्वज्ञान, त्यांची संस्कृती, त्यांची सांस्कृतिक जीवनमूल्ये याबद्दल, निदान आपल्या एवढी तरी, आपुलकी व आकर्षण वाटले नसेल काय? सारी जुनी जीवनमूल्ये व संस्कृती समूळ नष्ट करुन त्यांनी नवी मूल्ये व आचारपद्धती आणायची होती की काय? आपल्या हिंदु संस्कृतीबद्दल, त्या संस्कृतीतील अत्युदात्त असलेल्या जीवनमूल्यांबद्दल, सर्व जगाने आपल्याकडे आदराने पाहावे व आपल्यापासून त्यांनीही काही शिकावे असे वाटावे, अशा आपल्या जीवनपद्धतीबद्दल सावरकरांच्या अंतर्यामी कुठे तरी ओढ व श्रद्धा असणारच, असेच मानणे अधिक न्याय्य होईल. नवी जीवनपद्धती कितीही विज्ञाननिष्ठ असली तरी ती काही शुन्यातून निर्माण करता येत नाही. जुन्या जीवनपद्धतीला विज्ञाननिष्ठेच्या व उपयुक्ततेच्या कसोट्या घासून - पूसून घेणे त्यातील वाईट ते टाकणे नि नवीन चांगले ते त्यात समाविष्ट करणे याच मार्गाने व्यवहारात जाणे भाग असते. सनातन जीवनमूल्यांचा सिद्धांत मांडणाऱ्यांनाही याच मार्गाने जाणे भाग असते. सावरकरांची विज्ञाननिष्ठेची व उपयुक्ततेची कसोटी लावली तर, त्यानुसारही आज टिकणारे आपल्या जुन्या परंपरेत, संस्कृतीत व जीवनपद्धतीत खूपच काही आहे, हे सावरकरांनाही माहिती होतेच. आमची जीवनमूल्ये सनातन व चिरंतन आहेत, असा दावा करणाऱ्यांनाही काहीतरी नव्या मूल्यांचा व आचारपद्धतीचा स्वीकार करावाच लागेल. सावरकरांची कसोटी मान्य केली की, आपल्या सर्वश्रेष्ठ संस्कृतीचे, प्रामाणिक जीवनमूल्यांचे व आदर्श जीवनपद्धतीचे काहीतरी वाटोळे होणार आहे, असे आमचे हिंदुत्वनिष्ठ कशासाठी मानतात, हेच माझ्या लक्षात येत नाही. आमचे हिंदुत्वनिष्ठ स्वतःला असा प्रश्न का करत नाहीत की, हिंदुत्वनिष्ठ सावरकरांनी या संस्कृतीचा, जीवनमूल्यांचा वा जीवनपद्धतीचा संबध हिंदुत्वाशी का बरे येवू दिला नसेल? यासंबंधी ते एवढे अलिप्तपणे का वागतात?

या प्रश्नाचा आपण विचार करु लागलो की, आपल्या लक्षात येईल की, ज्या ज्या लोकांना हिंदू समाजात सावरकरांना समाविष्ट करायचे होते, त्या लोकांमध्ये धर्म, संस्कृती, भाषा, आचारपद्धती, जीवनमूल्ये या साऱ्या बाबतीत केवळ असमानता नव्हती तर मतभिन्नता होती, विविधता होती, विसंगती होती, काही बाबतीत परस्परविरोधही होता. आपापले ते वैशिष्ट्य टिकविण्याचा प्रत्येक समूहाचा आग्रह व कटाक्ष होता. असे असताना या सर्वांना आचारपद्धतीच्या एका सूत्रात गोवणे या लोकांना मानवणारे नव्हते, याची सावरकरांना जाणीव होती. या विसंगतीमध्येही सुसंगतीचा समान धागा कसा आहे, हे शोधून काढणे शक्य असले तरी तसे करणेच हिंदू लोकाना आवडणारे नव्हते. या साऱ्या विसंगतीतून सुसंगती शोधण्याच्या, सर्वांना समान सांस्कृतिक पद्धतीने समाविष्ट करण्याचा, व त्यालाच हिंदुत्व हे नाव देण्याच्या प्रयत्नाचे पर्यवसान अंतिमतः वैदिक धर्मातील तत्वज्ञानालाच व आचारालाच हिंदुत्व हे नाव प्रदान करण्यात होत असतो, याची सावरकरांना पूर्ण जाणीव होती. यासाठीच त्यांनी कोणत्याच धार्मिक तत्वज्ञानाचा, सांस्कृतिक मूल्याचा व जीवनपद्धतीचा कधीही पुरस्कार केला नाही. त्यांचा संबंध हिंदुत्वाशी दिला नाही. हिंदू संघटन करायचे तर सर्व हिंदुंना सर्वमान्य होतील अशाच बाबीवर ते करावे लागेल, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. गैरसमज, मतभेद, विसंवाद, टीका- प्रतिक्रिया अशा व्दंव्दामधून त्यांनी म्हणूनच हिंदुत्वाला बाहेर काढले. केवळ बुद्धिवादावर आधारलेल्या न्याय्य हक्काच्या पायावर त्यांनी हिंदुत्वाची उभारणी केली.

तेव्हा डॉ. हेडगेवारांच्या स्मरणाच्या निमित्ताने त्यांच्याच कल्पनेतील हिंदू संघटन प्रत्यक्षात यायचे असेल तर त्यासाठी ज्या हिंदुत्वाची आपल्याला गरज आहे, ते हिंदुत्व सर्वांना सर्वमान्य होईल असे करण्याचा विचार आपण का करु नये? सावरकरांची हिंदुत्वाची ही कल्पना आपण का स्वीकारु नये? येथे सावरकर महत्त्वाचे नाहीत तर हिंदू संघटन महत्त्वाचे आहे. हिंदुत्वासंबंधीचे हिंदुतील समज - गैरसमज कसे दूर होतील याचा आपण प्राधान्याने विचार केला पाहिजे. डॉ. हेडगेवारांसारख्या थोर पुरुषाची जन्मशताब्दी आपल्याला असा विचार करण्यासाठी प्रवृत्त करायला कारण पुरविण्यासाठी असते. शेवटी डॉ. हेडगेवारही महत्त्वाचे नसतात. महत्त्वाचे आपण हिंदू लोकच असतो. अशा थोर पुरुषाचे नाव घेतले की आपल्याला काही तरी प्रेरणा निर्माण होतात. हिंदुत्वाचा नव्याने विचार व मांडणी करण्याची प्रेरणा या निमित्ताने आपल्यात का निर्माण होवू नये? तत्वज्ञान, सांस्कृतिक जीवनमूल्ये, आदर्श जीवनपद्धती आदीच्या चक्रव्यूहातून बाजूला काढून हिंदू लोकांच्या न्याय्य हक्कांच्या भक्कम बौद्धिक पायावर हिंदुत्वाला आपण का उभे करु नये?

अशा हिंदुत्वाला सर्व हिंदू मानाचा मुजरा करण्याची शक्यता आहे. आक्षेपासाठी त्यांना कोणता मुद्दाच या हिंदुत्वात शिल्लक राहणार नाही. नानासाहेब गोरे यांच्यासारखे हिंदुत्व विरोधक, मनातून कितीही संतापून उठोत, पण उघडपणे या नव्या हिंदुत्वावर त्यांनाही न्यायतः नि तर्कतः टीका करण्यास कुठेही वाव राहणार नाही. आम्हीही हेच म्हणत आहोत, पण याला हिंदुत्व हे नाव कशाला देता, एवढीच रास्त तक्रार करण्याची संधी त्यांना राहील. आणि भारतीयत्व हे नाव देवून ते आपल्या न्याय्य मागण्या मान्य करणार असतील तर ते नाव ही स्वीकारायला आपण तयार होऊ. जनसंघाने हिंदुत्व सोडून भारतीयत्व नाही का स्वीकारले? परिस्थिती बदलली की त्या प्रमाणे बदलायला आपण तयार असले पाहिजे. हिंदुत्ववादी हे धर्मावर राष्ट्र उभे करायला निघाले आहेत अशी या नव्या हिंदुत्वावर टीकाच करता येणार नाही. विरोधक अशी टीका करतात व ती बहुजन हिंदुंना पटते. त्यांना हे पटण्यासाठी आपण मदत करण्याचे कटाक्षाने टाळले पाहिजे. हे टाळायचे तर हिंदुत्वाची आणि धर्माची, संस्कृतीची वा जीवनपद्धतीची पूर्णपणे फारकत केली पाहिजे. सावरकरांचे हिंदुत्व स्वीकारले पाहिजे.

ज्या सांस्कृतिक मूल्याविषयी आपल्याला ओढ व आत्मीयता वाटते, त्या मूल्यांच्या प्रसाराचे कार्य धार्मिक आचार्यांकडे द्यावे. त्यासाठी स्वंत्र धार्मिक व्यासपीठ उभारावे. सध्या अशी धार्मिक प्रवचने करणारी व्यासपीठे अनेक आहेत. धार्मिक प्रवचने, भजने, कीर्तने आदी व्दारे हे काम सध्याही चालू आहे. पुढेही असेच चालू राहावे. हिंदूतील दुसरा पंथ हे तत्वज्ञान वा आचार पद्धती बरोबर नाही,

आमच्या पंथाचीच बरोबर आहे, असे मांडील. त्याला ते स्वातंत्र्य राहील. अशा विविध वादातून, चर्चेतून समाजाचे प्रबोधन होईल. हे समाज प्रबोधनाचे कार्य स्वतंत्र व्यासपीठावरुन केले जावे. हिंदू संघटनाचे व्यासपीठ हे स्वतंत्र असावे. ते वर सांगितलेल्या हिदुत्वावर आधारित असावे. अशी विभागणी हाच सर्वोत्तम चांगला मार्ग आहे!

न्याय्य हक्काच्या जागृतीच्या बरोबरच हिंदू संघटनाच्या कार्यक्रमामध्ये समाजसुधारणा हा प्रमुख भाग असावा. चातुर्वर्ण्य, जातिसंस्था, अस्पृश्यता या साऱ्या समाजविघटक गोष्टींविरुद्ध गुळमुळीतपणा सोडून प्रखर हल्ले चढविले पाहिजेत. आम्ही जाती नष्ट करण्याची भाषा उच्चारली नाही, पण जातीची भावना क्षीण करण्याची व्यूहरचना केली, हा आपला अभिमान आता पुरे झाला. आता यापुढे यापैकी दोन्हीही केले पाहिजे. जातिसंस्थेविरुद्ध राणाभीमदेवी भाषणे करणारे पुरोगामी ठरले, पण काहीच न बोलता जाती नष्ट करण्याचा प्रयत्न करणारे चातुर्वर्ण्यवादी ठरले, हे आपल्याला माहीत नाही काय? या जाहिरातीच्या दुनियेत बोलणे नि करणे दोन्हीही पाहिजे. या दोन्हीत फरक पडला की गैरसमजाला आमंत्रण मिळते. हिदुत्व पराभूत होण्याचे कारण हा गैरसमजच आहे. खेड्यापाड्यात जावून समाजसुधारणेचे कार्यक्रम हिंदु संघटनावाद्यांनी हाती घेतले पाहिजेत. समाज सुधारणा करावी तर हिदुत्वनिष्ठांनीच, अशी प्रतिमा तयार व्हायला हवी. 'एक गाव एक पाणवठा' ही मोहीम डॉ. बाबा आढावांनी सुरु करावी व त्याच्या वशिल्यावर. हिदुत्वनिष्ठांना त्यांनी ढोंगी ठरवावे, हे हिंदुत्वाला परवडणारे नाही. एकजिनसी, एकरसी, समानतेवर आधारित असलेला विज्ञाननिष्ठ एकसंघ समाज उभे करणे हे आमचे ध्येय म्हणून प्रकटपणाने घोषित केले पाहिजे व कामाला लागले पाहिजे. समाज सुधारणेच्या वाळवंटातून 'हिदू संघटनेचा मार्ग जात असतो हे हिदुत्वनिष्ठांनी कधीही विसरु नये!

असे झाले तर हिंदू संघटन होण्याचा काहीतरी संभव आहे. हिंदू संघटनांच्या मार्गातील या दोन मुख्य समस्या सोडविण्यात जर आपण यशस्वी होवू, तर सर्व हिंदूंचेच भाग्य मानावे लागेल. पण हिंदुंच्या हितासाठी कार्यरत असलेल्या हिदुत्वनिष्ठांनी याबद्दल गंभीरपणे विचार केला पाहिजे. चिंता धर्माची नको, संस्कृतीची नको, जीवनपद्धतीची नको; तर चिंता हिदू लोकांची हवी; या दृष्टीने सारा पुनर्विचार केला पाहिजे. यासाठी प्रथमतः व आद्य कर्तव्य म्हणून हिंदुत्वाची मांडणी नव्याने करण्याचा विचार करावा लागेल.

डॉ. हेडगेवार जन्मशताद्बीच्या निमित्ताने मी येथे थोडेसे मुक्त चिंतन केले आहे. ते करु देण्याची संधी दिल्याबद्दल श्री. ग. माजगावकरांचा तर मी आभारी आहेच. मी काही विचारवंत नाही. हे सारे काही मला स्वतःला सुचलेले नाही. सावरकरांचा अभ्यास करताना त्यांच्यापासून मला ही दृष्टी मिळाली आहे. मी जर येथे कोणता मोलाचा मुद्दा मांडला असे आपल्याला वाटत असेल, तर सावरकरांचे आपल्यावर असलेले ऋण होय. माझ्या हेतूबद्दल व तळमळीबद्दल तरी आपला कोणाचाही मतभेद होण्याचा संभव नाही. माझ्या या हेतूमुळे व चितनामुळे डॉ. हेडगेवारांचा आत्माही प्रसन्न पावेल व त्याबद्दल मला आशिर्वाद देईल, अशी खात्री मला वाटल्यामुळेच हे चितनाचे चार शद्ब मी येथे लिहिले. हे शद्ब आपण विचारात घ्याल अशी आशा आहे!

●


मध्य रेल्वे व पश्चिम रेल्वेच्या दादर स्थानकापासून
५/१० मिनिटांचे अंतरावर भोजनाचे व राहाण्याचे
एकच ठिकाण म्हणजेच

'न्यू श्रीकृष्ण बोर्डींग हाऊस'
कोहीनूर सिनेमासमोर, रानडे रोड, दादर (पश्चिम)

# डॉ. हेडगेवार : स्थितप्रज्ञ योगी

**विद्याधर गोखले**

डॉ. हेडगेवार जन्मशताब्दी निमित्ताने संघाच्या कार्यकर्त्यांनी देशभर निरनिराळ्या प्रकारचे जवळजवळ २,००० संकल्प सोडले आहेत. मी या २००० संकल्पात आणखी एका प्रकल्पाची भर घालणार आहे. डॉ. हेडगेवारांची दोन, तीन चरित्रं उपलब्ध आहेत. एक नाना पालकर यांनी लिहिलेलं चरित्र, दुसरं म्हणजे चं. प. भिशिकरांचं - 'केशव - संघ निर्माता'; आणि तिसरं आहे त्यांनीच म्हणजे भिशीकरांनीच लिहिलेलं लघु चरित्र. शिवाय एक-दोन पुस्तकं डॉक्टरांच्या जीवनावर आहेत. त्यातील काही पुस्तकं या वर्षी पुनर्मुद्रित झाली आहेत. ही सर्व पुस्तकं घ्यावीत आणि जोडाक्षरेविरहीत अक्षरामध्ये म्हणजे अगदी लहान मुलांना सुद्धा वाचता येईल अशा भाषेमध्ये त्यातला भाग पुनर्लिखित करावा. सुमारे ६० ते ७० पानाचं हे माझं पुस्तक होईल. चष्म्याशिवायसुद्धा वाचता यावं, इतक्या बोल्ड टाईपात छापीन. आणि मग संघाच्या चांगल्या दोनशे कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन महाराष्ट्रातल्या राज्यकर्त्यांना आणि नेते मंडळीना रोज सकाळी हे चरित्र वाचून दाखवायचं, असा माझा संकल्प आहे. हे चरित्र 'सप्रेम भेट' म्हणून पाठविलं तर ते वाचलं जाणार नाही. तर असा हा माझा २००१ वा संकल्प!

डॉ. हेडगेवारांसारखा महापुरुष जो गरिबीतून वर आला, ज्यांना फार मोठी पार्श्वभूमी नव्हती - जशी पंडित नेहरुंना होती. पं. मोतीलाल नेहरुंचा पुत्रच तो. सोन्याचा गोकर्ण तोंडात घेऊन जन्माला आला - अशी काही परिस्थिती डॉक्टरांच्या बाबतीत नव्हती. प्रसिद्धीचा झगमगाट नाही, त्यांच्या चरित्रामध्ये सामान्य माणसाने दिपून जावे, असं काही नाही. अशा या वरवर दिसणाऱ्या माणसाचं आयुष्य किती? तर अवघं ५० वर्षांचं. इतक्या अल्पायुष्यात डॉक्टर कणाकणाने, चंदनासारखे झिजले. प्रसिद्धीच्या लखलखाट नाही, पैशाचं पाठबळ नाही, मोठ्या धनिकांचं, इंडस्ट्रियल हाऊसेसचं, टाटा बिर्लांचं पाठबळ नाही; असं असूनसुद्धा हिंदू राष्ट्र पुनरुत्थानाचं कार्य म्हणजे ईश्वरी कार्य आहे, ही एकच जिद्द अंतःकरणात ठेवून त्यांनी संघ स्थापन केला. आज त्यांच्या कार्याचा प्रसार विदर्भ, मध्यप्रांत, महाराष्ट्राची सीमा पार करुन तिकडे पंजाब, दिल्लीपर्यंत झाला आहे. त्यांनी रचलेल्या पायावर आज विशाल मंदिर उभं आहे. काश्मिरपासून कन्याकुमारीपर्यंत आज संघाचा बळकट दुर्ग उभा आहे. हजारो वादळं आली तरी त्या दुर्गाची एकटी चिरा ढळणार नाही, कारण बांधकाम पायातच पक्कं आहे. आज कोटी कोटी कंठातून हिंदुत्वाचा मंगल जयजयकार ऐकू येत आहे.

अशा महामानवाचं चरित्र आजच्या आपल्या राज्यकर्त्यांनी, राजकारण्यांनी रोज श्रवण केलं तर बराच फरक पडू शकेल. समाजाच्या विविध क्षेत्रात आजची निराशाजनक परिस्थिती दिसते, ती जाऊन तेथे आशादायक चित्र दिसेल. म्हणून मी हा संकल्प सुचविला आहे.

आज आपल्या देशात सर्वात गरज कशाची असेल (तशी गरज म्हटली तर बऱ्याच गोष्टीची आहे, त्या गोष्टीची यादी करायला बसलो तर सर्व जगातील शाई पुरायची नाही) तर योग्य, चारित्र्यवान नेतृत्वाची गरज आहे. असं नेतृत्व मिळालं तर डॉक्टरांनी जी स्वप्न पाहिली होती, ती फार लवकर साकारतील, असा विश्वास वाटतो.

हा विश्वास मी एका राजकारणी मित्राला बोलून दाखविला तर तो हताश होऊन म्हणाला, 'काही उपयोग नाही. हे सर्व पालथ्या घड्यावर पाणी आहे. आजचे नेतृत्व सुधारणे अवघड आहे. शिवाजी महाराजांच्या नेतृत्वाचे अचूक वर्णन करणारी रामदास स्वामीची एक उक्ती आहे -

निश्चयाचा महामेरु। बहुत जनांसी आधारु। अखंड स्थितीचा निर्धारु। श्रीमंत योगी।। याच चालीवर समर्थांची क्षमा मागून मी आजच्या नेतृत्वाचे वर्णन करतो '- भ्रष्टाचाराचा महामेरु। तयासी कृष्णकंचनाचा आधारु । अखंड खुर्चिचा निर्धारु । श्रीमंत ढोंगी।। - काही एक अपवाद सोडता आजच्या सत्ताधाऱ्यांना हे वर्णन अचूक लागू पडते. जे अपवाद आहेत ते इतके तुरळक आहेत की त्यांचा प्रभावच पडत नाही. पण नेमक्या याच समर्थांच्या उक्तीचा आधार घेऊन डॉ. हेडगेवारांच्या नेतृत्वाचे वर्णन करता येते - देशभक्तीचा महामेरु। तयासी हिंदुत्वाचा आधारु। अखंड भारताचा निर्धारु। स्थितप्रज्ञ योगी।।

डॉक्टरांचे चरित्र वाचल्यावर लक्षात येते की, हा माणूस तुमच्या आमच्यासारखा सामान्य कुटुंबातील होता. असामान्य नेतृत्वाची काही लक्षणं पोशाखात नव्हती - साधे धोतर, कोट, टोपी. - चालणं, बोलणं अगदी सामान्य माणसासारखे. पण व्यक्तिमत्व एखाद्या स्थितप्रज्ञ योग्यासारखं. वादळं अनेक आली. स्तुति, निंदा अनेकदा घोंगावून गेली. चित्रवृत्ती कधीही ढळली नाहीत. मोहाचे प्रसंग कित्येक आले. पण डॉक्टर त्यांना कधी बळी पडले नाहीत. माझ्या मते खरा स्थितप्रज्ञ म्हणजे डॉ. डेहगेवार! दूर हिमालयात जाऊन, कुठे तरी जंगलामध्ये आश्रम बांधून तपश्चर्या करायची - दिवसातून इतक्याच वेळा जेवू, हेच खाऊ वगैरे टाईम-टेबलं बनवायची, समाजापासून दूर जायचे -' मग मनःशांती ढळेल कशी? या उलट हे चित्र पहा. डॉक्टरांकडे रोज कोणी ना कोणी सामान्य माणूस स्वतःची दुःख, अडचणी घेऊन यायचा. डॉक्टर त्यांना मदत करावयाचे, त्यांचे अश्रू पुसायचे. अंगात १०४ अंश सेल्सियस ताप असतानासुद्धा डॉक्टर इतरांसाठी धावपळ करीत असत. त्यावेळी देखील त्यांची मनःशांती ढळली नाही. ज्यांना मोह ग्रासू शकत नाही; ते हेच लोक. म्हणून मी त्यांना खरा स्थितप्रज्ञ म्हणतो. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे अशा या डॉक्टरांची फारशी माहिती जनसामान्यांना नसते. इतर पुढाऱ्यांची मात्र तपशीलवार माहिती असते. कारण उठसुठ त्यांच्या प्रसिद्धीचे ढोल वाजविले जातात. पण डॉक्टरांची ती वृत्तीच नव्हती. ज्यांनी डॉक्टरांना प्रत्यक्ष पाहिले ते सांगतात की वर्णन करायला शब्द अपुरे पडतात. शेवटचा प्रसंग आठवतो मला. डॉक्टर अधिकारी प्रशिक्षण वर्गावर आले होते. त्या वर्गात मी

सुद्धा होतो. १९४० सालची घटना आहे ही. डॉक्टरांचं बहुधा शेवटचं भाषण होतं. त्यानंतर जून १९४० मध्ये त्यांचे देहावसान झाले. आजारपणामुळे ते या अधिकारी प्रशिक्षण वर्गाला उपस्थित राहू शकले नव्हते. मार्गदर्शन करु शकले नव्हते. ही गोष्ट त्यांच्या मनाला फार लागली होती. आजन्म सेवा करणे, हा ज्याचा धर्म त्या डॉक्टरांसारख्या व्यक्तीला या गोष्टीचे अतीव दुःख झाले. या अधिकारी वर्गासमोर भाषण करताना हात जोडून गदगदलेल्या सुरात हात जोडून ते म्हणाले, 'मैं आपकी सेवा न कर सका'. आम्ही सगळे हेलावून गेलो. गालीब माझा आवडता कवी आहे. कारण त्याने हिंदू तत्त्वज्ञान सुफी ढंगात सांगितले म्हणून. त्याच्या कवितेतील काही ओळी हा प्रसंग समर्पकपणे वर्णन करु शकतील. गालीब म्हणतो, 'जान दी, दी तो उसीकी थी। हक तो ये है की हक अदा न हुआ।।' म्हणजे अर्थ असा की जीव दिला, पण त्यात काय मोठेसे केले? तक्रार एवढीच की पुरेशा प्रमाणात सेवा करु शकलो नाही. अशा विचारांनी भारलेले डॉक्टर होते.

मेरा सुर मिला दो

डॉक्टरांनी प्रचंड सामाजिक कार्य केलं, राजकीय केलं, काँग्रेसमध्ये राहून स्वयंसेवक बनून काम केलं. काँग्रेस चळवळीत आपली हिंदुत्वविषयक मते मांडली. खरं तर डॉक्टरांनी काँग्रेसची किती सेवा केली हा स्वतंत्र विषयच आहे.त्यासाठी मी सर्व काँग्रेसवाल्यांची परिषद बोलावणार आहे. हा *माझा २००२ वा संकल्प आहे.* जे समाजसेवक पक्षातीत असतात, ते साऱ्या देशाचे असतात. वास्तविक पाहता डॉक्टरांची जन्मशताब्दी काँग्रेसने स्वतःच्या पित्याची समजून केली पाहिजे. डॉक्टरांचे अवघे आयुष्य ५० वर्षांचे! वयाच्या १६ व्या वर्षापासून ३५ व्या वर्षापर्यंत म्हणजे जवळजवळ २० वर्षे आणि संघ स्थापनेनंतर म्हणजे १९३२ पर्यंत जो जो म्हणून काँग्रेसचा आंदोलनाचा, असहकाराचा, निदर्शनांचा उपक्रम होता, त्यात डॉक्टरांनी 'वंदनाके इन तीन सुरोमें मेरा भी एक सुर मिला दो', या भावनेने सहभाग दिला आहे. अगदी गणिती हिशेबाने बघितले तरी डॉक्टरांनी संघापेक्षा काँग्रेसची सेवा अधिक केली आहे. त्यांच्या अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला महात्मा गांधीनीसुद्धा प्रशंसिलं होतं. हे मान्य करण्यासाठी इतिहासाकडे उघड्या डोळ्यांनी बघायला हवं. त्यांच्या कार्यावर आघात झाल्यावर मध्य प्रदेश विधानसभेत एक मुसलमान आमदार उभा राहिला आणि त्याने ठासून सांगितले की संघ जातीय नाही.

डॉक्टरांच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू होते. त्यापैकी एकेक पैलूवर स्वतंत्रपणे लेख लिहिता येईल, इतक्या बारकाईने त्यांनी प्रत्येक अंगाचा अभ्यास केला होता. डॉक्टरांनी जे एक संघटनेचं शास्त्र निर्माण केलं, त्यावर स्वतंत्र लेखच लिहिता येईल. त्यांचं संघटनेचं शास्त्र एकदम ओरिजिनल होतं, अभिनव होतं. कोणाची कॉपी नव्हती, असलीच थोडीशी तर समर्थ रामदासांची होती.

परवाच एके ठिकाणी मी एक फलक वाचला. त्यात डॉ. हेडगेवारांचा उद्‌गार आहे, 'हे राष्ट्र, हा देश हिंदुस्तान म्हणून ओळखला जातो.' मला काहीसं वाईट वाटलं. हा देश हिंदुस्तान म्हणून डॉक्टरांच्या काळात ओळखला जात असेल. आज नाही. आज आपल्या देशाचे अधिकृत नाव आहे 'भारत'. भारत या नावाबद्दल तशी तक्रार नाही. पण या बदलामागे जो ढोंगीपणा, भोगळपणा आहे, तो लक्षात घेण्यासारखा आहे. भारत हे भरत राजाचं, जो अत्यंत आदर्श राजा होता त्याच्या नावावरुन या देशाला भारत म्हणायला लागले. आणि आमची देववाणी भारती म्हणून ओळखली हा इतिहास आम्हाला माहीत असल्यामुळे 'भारत' या नावात काहीही आक्षेपार्ह नाही. पण मग हिंदुस्तानचा आग्रह *का? याचं कारण, तो स्वाभाविक शब्द आहे.* हा शब्द कसा आला त्याच्या काही गोष्टी तुम्हाला ठाऊक आहेतच. इराणी लोकांनी, अफगाण लोकांनी हे नाव या देशाला दिले. त्यालासुद्धा भौगोलिक कारणं आहेत. त्या काळी हे व्यापारी समुद्रमार्गे येत असत. या व्यापाऱ्यांना आपल्या देशाचा जो भाग, जी संस्कृती दिसली ती सिंधू नदीच्या तीरावरची दिसली. सिंधू नदीजवळचा मुलुख म्हणून सिंधुस्तान. पुढे त्याचा अपभ्रंश होऊन हिंदुस्तान म्हणू लागले. ही परंपरा आजपर्यंत म्हणजे अगदी १९८९ सालीसुद्धा सुरु आहे. आजही इराणमधील मुसलमान आपल्या देशातील मुसलमानाला हिंदूच म्हणतो! इथला मुसलमान तिकडे गेला तरी त्याला हिंदूच समजतात. म्हणजे मग हिंदुस्तान हा शब्द जातिवाचक, धर्मवाचक राहत नाही, तर राष्ट्रवादी शब्द म्हणून समजला जातो. हा शब्द केवळ आपल्या शेजाऱ्यांनी दिला म्हणून त्याज्य ठरावा का? केवळ त्यांनी दिला म्हणून निषिद्ध मानावा? हा शब्द योग्य आहे, म्हणूनच स्वीकारला पाहिजे, लोकमान्य टिळकांना चिरोल 'भारतीय असंतोषाचे जनक' म्हणाला तर हे बिरुद आपण गौरवाने मिरवतो. ज्या सिंधू नदीकाठी ऋग्वेद रचला गेला, जिच्या काठी मोहंजोदारो, हराप्पा सारखी सांस्कृतिक दृष्ट्या संपन्न शहरं उभी राहिली, ती सिंधू नदी आणि त्यावरुन प्राप्त झालेलं हिंदू हे नाव. या देशाचे वर्णन करण्यासाठी वर्षानुवर्षे हा शब्द वापरण्यात आला आहे. या नावाने आवश्यक ती विचारसरणी सूचित होते. म्हणून 'हिंदुस्तान' या शब्दाचा आग्रह! हा शब्द मी आता सतत वापरणार आहे. हा माझा २००३ वा संकल्प!

वास्तविक पाहता एका शब्दाचा एवढा आग्रह धरण्याचे कारण नाही. पण अशा छोट्या छोट्या बाबीतसुद्धा आपल्या नेतृत्वाचा अधःपात दिसून येतो, म्हणून हे विस्ताराने सांगावे लागले. अगदी सम्राट अकबरापासून तर सर महम्मद इक्बाल सांगतात की हा हिंदुस्तान आहे. पण आपले secularist नेते- - more loyal than the king himself - मात्र ही बाब मान्य करायला तयार नाहीत. ही मनोवृत्ती आजची नाही. फार पूर्वीपासूनची आहे. ही जर मनोवृत्ती नसती तर अलेक्झांडर पंजाबातल्या पाच नद्या तुडवून, ओलांडून आलाच नसता. जातीभेदांनी सडलेला, अंतर्गत भांडणांनी पोसलेला समाज जर नसता तर मुठभर सैन्याच्या जोरावर अल्लाउद्दीन खिलजी देवगिरीचे राज्य पादाक्रांत करुच शकला नसता. हा इतिहास डॉक्टरांनी काळजीपूर्वक अभ्यासला होता, सावरकरांनी अभ्यासला होता. त्यांच्या लक्षात आले की ही मनोवृत्ती, ही विचारसरणी घातक आहे, ज्या मनोवृत्तीला शिवाजी महाराज टोला देऊ शकले. नंतर ब्रिटिश आले. पण जुनाच पाढा सुरु. मुठभर ब्रिटिश आले आणि खंडप्राय देश जिकून राज्य करु लागले. याचं मुलभूत कारण म्हणजे दुही, विभाजन. इथला प्रत्येक मनुष्य कोणत्या ना कोणत्या जातीत विभागला गेला. हे विभाजन केव्हा होतं, जेव्हा मनुष्य स्वतःची अस्मिता विसरतो. असं का झालं? एकीकडे

आम्ही वेदांत बोलतो. सर्व प्राणीमात्रांच्या अंतर्यामी एकच आत्मा आहे, इतकं उच्च तत्त्वज्ञान बोलतो. पण दुसरीकडे व्यावहारिक पातळीवर आम्ही सर्व हिंदू एक आहोत, हा आमचा देश हिंदुस्तान आहे, ही साधी गोष्ट करु शकत नाही. ही एकी साधण्याऐवजी आमचे पुढारी हिंदु - मुस्लिम ऐक्याच्या मृगजळामागे धावले. आणि आणखीच अधःपात झाला.

हा सर्व अभ्यास डॉक्टरांनी केला. केवळ अभ्यासिकेत बसून नव्हे. तर प्रत्यक्ष जगण्यातून. इतिहासाचे प्रतिबिंब त्यांनी आजच्या जीवनात पाहिले. त्यांच्या लक्षात आले की या देशाचा पायाभूत समाज हिंदू आहे, जो स्वतःची अस्मिता विसरला, खरा वेदांत विसरला आणि ज्यामुळे हा समाज गुलामगिरीत सापडला. नुसता विचार करुन थांबणारे डॉक्टर नव्हते. त्यांनी लगेच त्यावर उपाययोजना सुरु केली. जी आत्मविस्मृती, स्वाभिमानशून्यता आहे, ती बदलून टाकली पाहिजे. त्यासाठी त्यांनी संजीवनी मंत्र दिला - 'हिंदू संघटन'! हे काम सोपं नव्हतं. प्रवाहाविरुद्ध पोहोण्याचा प्रकार होता. लोकांची टीका, उपहास सहन करावा लागला.

## खिलाफतचे मढे

यानंतरच्या घटना सुत्ररुपाने समजावून घेतल्या पाहिजेत. डॉक्टरांचा भ्रमनिरास पहिला झाला तो खिलाफत चळवळीच्या वेळेस. त्यांना फार मोठा धक्का बसला. पण डॉक्टर डरणारे नव्हते. त्यांनी लगेच प्रतिटोला देण्याचा विचार सुरु केला. खिलाफत प्रश्न वस्तुतः इथला प्रश्नच नव्हता. तिकडे तुर्कस्थानमध्ये केमाल पाशाने खलिफाचे बारा वाजविले. त्याने मुल्ला मौलवींना बजावले की राजकारणात लुडबूड कराल, तर खबरदार. म्हणजे तुर्कस्थानमध्ये खिलाफतचा मुडदा पडला आणि इकडे मात्र आम्ही ते मढं घेऊन ऐक्य साधण्यासाठी खिलाफत चळवळीचा नारा सुरु केला. इतर तत्कालिन विद्वानांना हा प्रकार मुळीच मान्य नव्हता. कै. साहित्यसम्राट केळकरांनी लिहिलं होतं की ही खिलाफत नव्हे आफत आहे. देशबंधू चित्तरंजनदास म्हणाले की अशा तऱ्हेने हिंदू - मुस्लिम ऐक्य शक्य नाही. मुख्य म्हणजे अशा पद्धतीने साधलेल्या ऐक्याची आवश्यकता नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा सडकून टीका केली होती. व पहिला धक्का डॉक्टरांना बसला.

नंतर मग प्रार्थनास्थलावरुन, मशिदीवरुन उद्भवणारे जातीय दंगे इत्यादिद्वारे त्यांनी मुस्लिम आक्रमकतेचा अभ्यास केला. त्यांना जाणवले की, हा देश बळकट व्हायचा असेल तर इथला जो पायाभूत हिंदू समाज आहे, त्यांचे संघटन अत्यावश्यक आहे. त्याशिवाय इतर गोष्टी व्यर्थ आहेत. स्वातंत्र्य मिळालं तरी टिकणार नाही. टिकलं तरी ते सुखकारक होणार नाही. डॉक्टरांची भविष्यवाणी किती खरी ठरली, हे आपण पावलोपावली अनुभवतो आहोतच. डॉक्टर हिंदू - मुस्लिम ऐक्याविरुद्ध नव्हते, तर कृत्रिम ऐक्याविरुद्ध होते, सौदेबाजीच्या विरुद्ध होते. एखादा समाज निर्माण कसा होतो, त्या समाजात विलगतेची भावना कशी निर्माण होते, ही विलगतेची भावना काढायची असेल तर काय करायला पाहिजे वगैरे अचूक निदान डॉक्टरांनी केले होते. त्यासाठी त्यांनी हिंदू संघटनेचा संजीवनी मंत्र दिला होता. तिचा प्रसार आणि प्रचार व्हावा म्हणून स्वतः झिजले. आज संघ कार्याचा जो वटवृक्ष दिसतो, तो त्यांच्या प्रयत्नातून.

डॉक्टरांचं हिंदुत्व नकारात्मक नव्हतं. ते केवळ मुस्लिम द्वेषावर आधारित नव्हतं. त्यांना पक्कं ठाऊक होतं की, द्वेषावर आधारित कोणतेच कार्य फार काळ टिकत नाही. डॉक्टरांना अभिप्रेत असलेलं हिंदुत्व स्वयंभू आहे. थेट अलेक्झांडरच्या स्वारीपासून हिंदुस्तानचा ऱ्हास डॉक्टरांच्या डोळ्यासमोर होता. तो जाऊन परत एकदा या देशाला वैभवाच्या शिखरावर नेण्यासाठी त्यांना हिंदुत्व अभिप्रेत होतं. मुस्लिम द्वेषावर त्यांचं तत्त्वज्ञान आधारित होतं, असं म्हणणं आपलं अज्ञान दाखविण्यासारखं आहे. कितीतरी सच्चे मुसलमान डॉक्टरांचे मित्र होते. बंगालचा क्रांतिकारक लियाकत हुसेन, त्यांचा चांगला मित्र होता. नागपूर पालिकेचा महापौर एक चांगला धर्मनिष्ठ मुसलमान झाला, तेव्हा डॉक्टर स्वतः हार घेऊन गेले होते. अशी अनेक उदाहरणं देता येतील. त्यांना मुसलमानांचा राग नव्हता. कारण खरं हिंदुत्व कोणाचाच द्वेष करु शकत नाही. औरंगजेबाशीसुद्धा आमचा झगडा नव्हता. शिवाजी महाराजांची औरंगजेबाला गेलेली पत्रं बघा. अत्यंत तळमळीनं त्यांनी औरंगजेबाला हिंदूंवर लावलेल्या जिजिया कराविषयी विचारले आहे. औरंगजेब जरा म्हणाला असता, की बहोत अच्छे, मी जातो जुम्मा मशिदीत तीनदा नमाज पढायला. तू ही जा, शंकराच्या देवळात आरत्या करायला, तर काय झगडा राहिला असता? इथल्या संस्कृतीला पहिला नमस्कार कर. इथल्या परंपरा तोडू नकोस. या समाजाशी एकरुप हो. म्हणजे मग तू आपोआपच हिंदू होतो. ही प्रक्रिया अलेक्झांडरच्या स्वारीपर्यंत होती. शक आले. ते येथे मिसळून गेले. आज आपल्याला शक कोण, हे दाखविताच येत नाही. हिंदुत्वाच्या या विशाल सागरामध्ये ते विलीन झाले. हुण आले. ते सुद्धा इथे मिसळून गेले. ही प्रक्रिया डॉक्टर जाणत होते. ऐक्यवाद त्यांना कळत होता. पण त्यांना सौदेबाजी मान्य नव्हती. या सौदेबाजीची जाणिव लवकरच आमच्या मुस्लिम बंधुंना होईल. तो दिवस दूर नाही. आणि पौरुषयुक्त संघ हाच राष्ट्राची हमी आहे, हे त्यांनाही पटेल. सच्चा हिंदुत्ववाद आपल्याला या देशात दिसेल. त्या मंगल दिवसाची प्रसादचिन्हं आपल्याला दिसत आहेत.

(शद्बांकन - दामू चव्हाण)

●


माणूस : मालकी व तत्संबधित इतर तपशिलाचे निवेदन (अधिनियम ४ व नियम ८ अन्वये)

१. प्रकाशन स्थळ : पुणे

२. प्रकाशन काळ : त्रैमासिक

३. मुद्रक, प्रकाशक, संपादक, नाव व पत्ता :
श्री. ग. माजगावकर, १०२५ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०

४. नागरिकत्व : भारतीय

५. प्रकाशन संस्थेच नाव व तिच्या मालकाचे नाव व पत्ता : राजहंस प्रकाशन,
श्री ग. माजगावकर, दिलीप माजगावकर, १०२५ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

जून १९८९.

प्रकाशकाची सही
श्री. ग माजगावकर

# मणिपुरला असताना

## फिरोझ रानडे

आपण सरकारी नोकरी धरली आहे तेव्हा आपल्याला खाजगी आर्किटेक्टना मिळतो तसा भक्कम पैसा काही मिळणार नाही, जे काही सरकारी स्केल असेल त्याप्रमाणे मिळणाऱ्या पैशात आपल्याला समाधान मानावं लागेल ह्याची मी मनाची तयारी केली होती. त्याबद्दल कुरकुर तर करायची नाहीच उलट सरकारी नोकरीचा जेवढा म्हणून फायदा होणार असेल तेवढा करुन घ्यायचा असं मी मनाशी ठरवलं होतं. भारत सरकारच्या नोकरीचा फायदा म्हणजे भारतात तुम्हाला कुठल्याही प्रदेशात पाठवलं जातं, अगदी काश्मिरपासून ते कन्याकुमारीपर्यंत अन् इकडे गुजराथपासून आसामपर्यंत. मात्र तुमची वृत्ती तशी लागते, सुदैवाने माझी तशी वृत्ती होती.

त्याच वृत्तीनं जेव्हा आमचा खात्याच्या प्रमुखांनी कलकत्त्याला कोणी जायला तयार आहे का? म्हणून विचारल्यावर मी हात वर केला होता व मला कलकत्त्याला पाठविलं गेलं,कलकत्त्याला असतानाच 'कुणी मणिपूरला जायला तयार आहे का?' अस विचारणारं परिपत्रक आलं. त्याला 'मी जायला तयार आहे' असं उत्तर दिल्यावर मला मणिपूरला पाठवल गेलं. ही काही तरी ५८-५९ सालची गोष्ट. कलकत्त्याला असतांना माझ लग्न झालं होतं. मणिपूरला आल्यावर मुलगी झाली. त्या वेळच्या मणिपूरच्या राणीसाहेबांचं नाव मनमंजरी होतं. तेव्हा आम्ही पण आमच्या मुलीचं तेच नाव ठेवलं. मणिपूर राज्य हे ब्रह्मदेशाच्या सरहद्दीवरचं राज्य. सुभाषबाबुंची आझाद हिंद सेना मणिपूरपर्यंत आली होती. त्या व मणिपुरी नृत्याच्या संदर्भात सगळयांना मणिपूर माहित असतं, तसच व तेवढच आम्हाला पण मणिपूरबद्दल माहिती होती. मणिपूर राजाची राजधानी इंफाळ. पण ते गावही मणिपूर म्हणून ओळखल जातं.

दोन बहिणी सारख्याच, सुस्वभावी आणि सुखरुप असतात तरी त्यातली एक जास्त आवडती असते. तसच काहीतरी काश्मिर व मणिपूरबद्दल झालं आहे. मणिपूरचा प्रदेश काश्मिरइतकाच नयनरम्य आहे. काश्मिर-सारखीच इथं मोठाली तळी आहेत. फक्त मणिपूरला काश्मिरसारखा बर्फ पडत नाही येवढच. कदाचित काश्मिर दिल्लीच्या जवळ आहे म्हणून त्याला जास्त लोकमान्यता मिळाली असेल.

मी मणिपूरला गेलो त्यावेळी ते भारत सरकारच्या अखत्यारीतील राज्य होतं. त्यामुळे भारत सरकारच्या योजना राबवण्याकरता आम्ही बरेच अधिकारी तिथं पाठवले गेलो होतो. माझ्याच खात्यात भानप नावाचे मराठी इंजिनियर होते, अष्टपुत्रे नावाचे कॉलेजमधले प्राध्यापक होते व इतर चार -दोन मराठी तरुण मंडळी होती. आमचा गप्पांचा अड्डा जमायचा, कधी एकमेकांकडे जेवायला जायचे, कधी सहलीला जायचे असे कार्यक्रम होत असत.

मणिपूर म्हणजेच इम्फाल दीड-दोन लाखाच्या वस्तीचं गाव, फार पसरलेलं नाही असं. कचेरी घरापासून जवळ. त्यामुळे मीच नाही तर सगळेच घरी दुपारचं जेवायला जायचे. सकाळी १० वाजता जायचं ते १ वाजता जेवायला यायचं, परत २ ला जायचे ते ५||-६ पर्यंत घरी येत असू. मला छोटासा बंगला दिला होता. त्याचं अंगणही छोटसच होतं घरी आलं की छोट्या मुलीबरोबर अंगणात खेळ खेळत असू. थोडक्यात म्हणजे मोठ्या आनंदात व सुखसमाधानात आमचे दिवस चालले होते. बघता बघता आमची दीड-दोन वर्ष निघून गेली. आता बऱ्याच ओळखी-पाळखी झाल्या होत्या व आम्ही स्थाईक म्हणता येईल असे स्थाईक झाली होतो.

कधी कधी भारत सरकारचे कुणी मंत्री मणिपूरला येत असत. मग त्या लहान गावात खूप -गडबड होऊन जात असे. मंत्री महोदयांकरता मणिपुरी नृत्याचे वगैरे कार्यक्रम ठेवले जात. असेच एकदा चितामणराव देशमुख मणिपूरला आले होते. संध्याकाळी त्यांच्याकरता एक खास कार्यक्रम ठेवला गेला होता. त्याला अर्थातच आम्ही गेलो होतो. मी त्यावेळी ज्युनियर असल्याने थोडा मागे बसलो होतो. पुढच्या रांगेत देशमुख, त्यावेळचा मणिपूरचा चीफ-कमिशनर रैना व बाकी वरिष्ठ अधिकारी बसले होते.

मी प्रतिभाला म्हटलं की मी पुढे जाऊन देशमुखांना भेटतो व चिठ्ठी पाठवतो. आपण त्यांना घरी चहाला बोलावू या. प्रतिभा स्वभावानं संकोची, त्यातून देशमुखांसारख्या मोठ्या माणसाला घरी बोलवायचं ही कल्पनाच तिला ग्राह्य वाटेना. 'अगं, एक तरुण मराठी माणूस मणिपूरसारख्या दूर ठिकाणी येऊन काम करतो ह्याचं त्यांना कौतुक वाटेल, बोलवायला काय हरकत आहे?' तरी पण प्रतिभाचा धीर होईना. तेव्हा तो विचार आम्ही सोडून दिला.

एक दिवस मला कुणीतरी गोळवलकर गुरुजी मणिपूरला दोन तीन दिवसाकरता येताहेत म्हणून सांगितलं. मी संघाचा स्वयंसेवक असा कधीच नव्हतो. लहानपणी कधी ८-१० दिवस शाखेवर गेलो असेन तेवढाच. त्यावेळी आम्ही खानदेशात होतो. आमच्या घरात कॉग्रेसचं वातावरण होतं. त्यामुळे आईनी व मोठ्या बहिणीनी शाखेत जायला चांगलाच विरोध केला. मोठा झालो तेव्हा राष्ट्र सेवादलात जायला लागलो. म्हणजे माझ्या अन संघाच्या नुसत्या वाटा बदलल्या नाहीत तर त्या अगदी विरुद्ध दिशेला झाल्या. स्वयंसेवकांच्या अन् सैनिकांच्या किरकोळ मारामाऱ्या होत, त्यात मी एक दोनदा सेवकांच्या काठ्यांनी मार पण खाल्ला होता.

त्यामुळे मणिपूरला आल्यानंतर मी कधीही संघ शाखेवर गेलो नव्हतो किंवा त्यांच्या कार्यकर्त्यांशी काही संबंध ठेवला नव्हता. गुरुजी येणार आहेत ही बातमी मला बहुधा कुणा मारवाडी दुकानदारानं दिली असावी. इथं मारवाडी दुकानदार मंडळी मोठ्या संख्येनं होती त्यातलाच हा एक होता. मी मराठी आहे म्हणजे बहुधा संघाचा स्वयंसेवक असेन असा त्यानं अंदाज केला असावा. त्यानं गुरुजी कधी येणार आहेत, किती दिवस रहाणार आहेत, कोणत्या दिवशी कोणत्या शाखेवर हजर रहाणार आहेत वगैरे सर्व सांगितले.

त्यानं हे सगळं सांगताच माझ्या डोक्यात

विचारचक्र सुरु झालं. आपण संघाचे असू किंवा नसू, अगदी विरोधात सुद्धा असू पण गुरुजीसारखा मोठा माणूस, एवढ्या मोठ्या संघटनेचा मुख्य आपल्या गावी येतो आहे, त्यातून ते मराठी, तेव्हा इथल्या मराठी लोकांनी त्याचं आगत - स्वागत करायला हवं. त्यांना निदान चहाला तरी बोलवायला हवं. लगेच ही कल्पना मी मराठी मित्रांना सांगितली. त्यांनाही कल्पना फार आवडली. *त्यांनी गुरुजी येतील त्यावेळी* यायचं कबूल केलं. अर्थात कार्यक्रम आमचे घरी होणार होता व गुरुजीना भेटण्याची, त्यांना आमंत्रण करण्याची, व त्याप्रमाणे तसं सगळ्यांना कळवण्याची जबाबदारी माझ्यावर टाकण्यात आली. आणि मग ती मी मोठ्या उत्साहानं व आनंदानं स्वीकारली.

## गुरुजीशी गप्पा

पहिल्या दिवशी गुरुजी कुठल्या शाखेवर हजर रहाणार आहेत हे कळलेले होतेच. त्यामुळे तडक त्या शाखेवर गेलो. बरीच स्वयंसेवक मंडळी जमली होती. प्रार्थना नेहमीप्रमाणे व नेहमीच्या शिस्तीनं झाली. पण प्रार्थना झाल्याझाल्या गुरुजी निघून गेले. त्यामुळे त्यावेळी काही भेट होऊ शकली नाही. तेव्हा ते कुठे उतरले आहेत व दुसऱ्या दिवशी केव्हा भेटता येईल म्हणून चौकशी केली. पत्ता तर मिळालाच पण संध्याकाळी ते भेटू शकतील ही माहिती पण मिळाली.

त्याप्रमाणे मी दुसऱ्या दिवसाच्या संध्याकाळी त्यांच्या निवासस्थानावर पोहोचलो. मणिपुरी पद्धतीच चांगलं मोठं असं ते घर होतं. *मणिपूरी पद्धतीचं म्हणजे कुडाच्या* भिंती व वाळलेल्या गवताचं छप्पर. घराच्या दोन बाजूला काटकोनात असे व्हरांडे होते. तिथं काही खुर्च्या टाकलेल्या होत्या. मी तिथं पोहोचलो त्यावेळी दोन नागा तरुण गुरुजीशी काहीतरी बोलत होते. संभाषण इंग्रजीत चाललं होतं. मी त्यांच्यापासून थोड्या दूर असा एका खुर्चीवर जाऊन बसलो. जरा बाजूला बसलो तरी त्यांचं बोलणं स्पष्टपणे ऐकू येत होतं.

संघ त्यांच्याकरता म्हणजे नागा लोकांकरता काय करणार आहे? अशा अर्थाचं काहीतरी त्या नागा तरुणांनी गुरुजीना विचारलं असावं.

'तुम्ही हिंदु आहात कां?' गुरुजीनी त्यांना विचारलं.

'नाही, आम्ही हिंदुही नाही आहोत, नाही आम्ही ख्रिश्चन. ज्याला इंग्रजीत पॅगन म्हणतात तसे आम्ही आहोत.'

'मग मला तुमच्याकरता काही करता यायचे नाही. मी हिंदुंची संघटना करतो आहे. समळ्या हिंदुंची एकी व्हावी असा संघाचा प्रयत्न आहे.' गुरुजी म्हणाले.

*'पण मग आमच्याकरता तुम्ही काही करणार नाही?'*

त्यातल्या एकानं परत विचारलं.

'मी तुम्हाला सुयश चिंतितो पण मी तुमच्याकरता काही करु शकणार नाही. सॉरी.' गुरुजींचं ठाम उत्तर.

आता पुढे काही बोलायचं राहिलच नाही आहे हे त्या नागा तरुणांच्या लक्षात आले. ते मोठ्या पडलेल्या चेहऱ्यानं उठले व नमस्कार करुन जाऊ लागले. त्यांचे पडके चेहरे बरंच काही सांगून गेले. ते गेल्यावर गुरुजी आपल्या खुर्चीवरुन उठून माझ्याकडे आले तसा मीही उठून त्यांना नमस्कार केला. आणि त्यांना समोरासमोर असं पहिल्यांदा पाहिलं.

तसं मी गुरुजीना पूर्वी एक दोनदा पाहिलं होतं. पण ते म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या दसऱ्याच्या कार्यक्रमात शिवाजी पार्कच्या भव्य सभेत. कार्यक्रमाकरता म्हणून मुद्दाम उभारलेल्या उंच अशा मचाणावर उभं राहून गुरुजी बोलत होते. मी कितीतरी अंतरावर दूर असा उभा होतो. त्या मचाणाच्या चारही बाजूने निळभोर कापड लावलं होतं. त्याच रंगाचं छतही होतं. *मचाणाच्या पुढच्या भागावर* सिंहाचं एक भलं मोठं रेखाचित्र काढलं होतं. व त्या चित्राच्या बाजुला 'स्वयमेव मृगेंद्रता' अशी मोठ्या आत्मविश्वासाची ओळ लिहिली होती.

गुरुजीचे कपडे नेहमीसारखे म्हणजे रेशमी कुडता व धोतरं असाच होता. पण त्या उंच मचाणावर विजेच्या *प्रकाशात* ते केवढे *भव्य* वाटत होते. आताही त्यांचा नेहमीचा वेष होता, म्हणजे रेशमी झब्बा व धोतर; पण ह्यावेळी ते मला अगदी साधे असे वाटले. एक तर ते फार उंच असे नव्हते, उंची माझ्या एवढीच म्हणजे साडेपाच फुट अशी असावी. शरीरयष्टीसुद्धा किरकोळ वाटावी अशी. मला वाटतं त्यांचं वजन जेमतेम शंभर पौंड सुद्धा असेल-नसेल, इतक्या मोठ्या व बलाढ्य संघटनेचा हा मुख्य सरसंघचालक किती साधा आहे नाही?

हे सगळे विचार काही सेकंदात माझ्या मनात येऊन गेले. त्या विचारातून जागं होताच मी गुरुजीना नमस्कार केला व येण्याचं प्रयोजन सांगितलं व आमचेकडे चहा प्यायला यावं म्हणून विनंती केली.

'पण चहाला म्हणजे केव्हा?' गुरुजीनी विचारलं. त्यांची *वाणी* स्पष्ट होती तरी करकरीत अशी नव्हती, त्यातला प्रेमळपणा जाणवत होता.

'केव्हाही या. तुम्हाला सोयीचं असेल त्यावेळी आम्ही सगळी मंडळी जमायला तयार आहोत.'

गुरुजींनी थोडा विचार केला व म्हणाले, 'नाही बुवा, रानडे, काही जमेल असं वाटत नाही. उद्या बरेच कार्यक्रम आहेत.' आपण काहीतरी ठरवावं व होणार नाही आहे असं कळलं म्हणजे मला खूप वाईट वाटतं व ते माझ्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसतं.

'आपले तर खूप कार्यक्रम असणारच. पण आम्ही इथं सात आठ मराठी मंडळी आहोत. तुम्ही चहाला यावं अस फार वाटत होतं. यायचं जमलं असतं तर फार छान झालं असतं. बराय येतो मी' म्हणून नमस्कार करुन मी पायऱ्या उतरायला लागलो. तेवढ्यात गुरुजीच्या मनात काय आले कुणास ठावूक. ते मला म्हणाले, 'हे बघा रानडे, सकाळी आठ वाजता येऊ शकेन मी. पंधरा एक मिनिटं थांबेन. पण चहा म्हणजे फक्त चहा, बाकी काही नको. अन् आठ वाजता म्हणजे ठीक आठ *वाजता*'

'अगदी आठ वाजता म्हणजे आठाच्या ठोक्याला आम्ही तयार आहोत'. आता मला आनंदाचे व उत्साहाचे भरते आले होते. मी त्यांचे आभार तरी मानले की नाही ते आत्ता आठवत नाही. तिथं बाजुला उभा असलेल्या स्वयंसेवकाला माझा पत्ता सांगितला. माझा पत्ता सोपा होता. तिथला चिफ-कमिशनरच्या बंगल्याच्या मागे दोन लहान बंगले होते. त्यातला एक मला दिला गेला होता. तिथून तडक निघालो. भानप, अष्टपुत्रे व बाकीच्या मंडळीना गुरुजीनी चहाला यायचं कबूल केलं असल्याची आनंदाची बातमी दिली व आठ वाजण्याच्या दहा पंधरा मिनिटं आधीच या

म्हणून सुचना पण केली.

दुसरे दिवशी सकाळी आठ वाजायला आधीच ती मंडळी आली. आठला ५-६ मिनिटं असताना तिथलाच एक स्वयंसेवक व गुरुजीचे एक मराठी निजी सचिव आमचं घर पहायला म्हणून आले. आम्ही सगळे तयार होतोच. ते परत गेले. बरोबर आठ वाजता गुरुजी, त्यांचे सचिव व तो स्वयंसेवक जीपनं आले. सचिव व तो स्वयंसेवक काही थांबले नाहीत.

मी जमलेल्या मंडळीची ओळख करुन दिली. गुरुजीनी त्यांना जुजबी प्रश्न विचारले, त्याची त्यांनी उत्तरं दिली. गुरुजीनी फक्त चहा करा म्हणून निक्षून सांगितलं होतं तरी तसं थोडच करता येतं? प्रतिभानं चहा बरोबर बटाटे पोहे केले होते, बिस्किटं होतीच. प्रतिभा हे सगळं घेऊन आली. तिच्या मागोमाग आमची दीड एक वर्षाची मुलगी होतीच. गुरुजीनी मुलीला उचलून घेतले. एक तर गुरुजी अनोळखी त्यातून त्यांना दाढी! ते बघून मुलगी मोठ्यांदी रडू लागली. त्यामुळे आम्हाला खूप कानकोंड वाटायला लागलं.

काही झालं तरी लहान मूल आहे ते. तुम्ही का त्याचं इतकं वाटून घेता? गुरुजी म्हणाले.

गुरुजी फक्त चहा घेताहेत पाहून मी त्यांना पाहे घेण्याचा आग्रह केला. त्यावर ते म्हणाले,'मी आजकाल माझं खाणं खूप कमी केलं आहे. मी फक्त चहा घेईन'.

'आम्ही तुम्हाला फार आग्रह करणार नाही. तुम्हाला प्रकृती सांभाळायलाच हवी. साऱ्या भारतभर फिरणार तुम्ही'.

नंतर परत बोलणं सुरु झालं. बिस्किटं पचायला हलकी असतात तेव्हा मी त्यांना बिस्किटांचा आग्रह केला. ' अहो रानडे, मला जर काही खायचं असतं तर मी ताजे केलेले पोहे नसते कां खाल्ले? ही फॅक्टरीत बनलेली बिस्किटं कसा खाईन?' ह्यावर ते हसले तसे आम्ही सगळेही हसलो.

बोलता बोलता मी त्यांना भाषावार प्रांतरचनेबद्दल विचारलं. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनं फार उग्र स्वरुप धारण केलं होतं. त्या सगळ्याबाबत संघाची भूमिका काय आहे? असा माझ्या विचारण्यामागचा रोख होता. भाषेच्या प्रश्नावर इतका कडवटपणा निर्माण व्हावा? त्याच्याकरता दंगेधोपे व्हावेत?

' रानडे, हे सगळं होत आहे ह्याचं कारण ह्या लोकांना आपलं ध्येय व ऊद्दिष्ट माहित नाही हे आहे. माझं उद्दिष्ट मला माहित आहे. मला हिंदुंची संघटना करायची आहे. ती ज्या भाषेमुळे लवकर होईल ती भाषा स्वीकारायची माझी तयारी आहे.. हिन्दी, कानडी, इंग्रजीच कां? उद्या मला असं वाटलं की अरबी भाषेमुळे हिंदुंची संघटना त्वरित व चांगली होईल तर मी अरबी भाषासुद्धा स्वीकारायला तयार आहे.'

मला गुरुजीचे विचार फार संयुक्तिक व योग्य वाटले. पंधरा मिनिटाकरता म्हणून आलेले गुरुजी चांगला अर्धा पाऊण तास बसले. अगदी मोकळेपणाने बोलले. पण त्या बोलण्यात कॉंग्रेस पुढाऱ्यांबद्दल कडवटपणा नव्हता की जाता जाता कुणाला कोपरखळी मारण्याची वृत्ती नव्हती. कोणतीही प्रचारकी धारणी नव्हती किंवा इंग्रजीत जास्त सरमंस म्हणतात तसे देण्याचा प्रकार नव्हता. एखादा जवळचा वयस्क नातेवाईक आपल्या घरी आला आहे असच आम्हाला वाटत होतं. थोड्या वेळानं गुरुजीना न्यायला कार्यकर्ते आले. त्यानंतर सरकारनं माझी शिलॉंगला बदली केली.

मणिपूरला असेपर्यंत नागा किंवा इतर आदिवासी लोकांशी आमचा फारसा संबंध आला नाही. माझी कचेरी जरी शिलॉंगला होती तरी मी आमच्या अरुणाचल प्रदेशाकरता म्हणजे त्या वेळच्या नेफा विभागाकरता काम करत होतो. तिथं नागा लोक तर होतेच पण इतरही टोळ्यांची म्हणजे ट्राईब्जची मंडळी होती. सरकारी नियमाप्रमाणं मला महिन्यातले पंधरा दिवस नेफात काढायला लागत. त्यामुळे त्या जमातीतल्या तरुण अधिकाऱ्यांशी, शाळा कॉलेजच्या इमारतींचं काम करत असल्यामुळे शिक्षक, विद्यार्थ्यांशी खूप संबंध आला.

नागालॅंडमधल्या लोकांनी आपली मातृभाषा इंग्रजी म्हणून नोंदवली होती. ती चौदा राष्ट्रभाषेबरोबरची एक म्हणून सरकारनं मान्यता द्यावी अशी त्यांची चळवळ चालू झाली होती. जी स्थिती नागालॅंडमध्ये होती, तशीच नेफामधेपण होती. जवळ जवळ ७० ते ८० वर्षापूर्वी इथं ख्रिश्चन मिशनरी लोकांनी येऊन शाळा हॉस्पिटल उघडली होती. मोठ्ठाली चर्चेस बांधली होती. ह्या काही पिढ्यांचं शिक्षणच मुळी इंग्रजीतून झालं होतं. त्यामुळे त्यांनी इंग्रजी ही मातृभाषा म्हणून स्वीकारणं पण साहजिकच होत. सरकारनं ही राष्ट्रभाषा म्हणून मान्य करावी असा त्यांचा आग्रह होता. ह्या नागा व इतर जमातींच्या लोकांशी बोलण्या भेटण्याचा प्रसंग माझ्यावर पुष्कळ वेळा आला. ही सगळी तरुण मंडळी मोठी स्वाभिमानी व बुद्धिमान असल्याचं माझ्या लक्षात आलं होतं. 'आम्ही मुळी भारतीय नाहीच आहोत' अशी त्यांच्या बोलण्याची सुरवात असे व त्याच पद्धतीचे त्यांचे विचार असत. अन त्यांचं बोलणं ऐकलं की मला हमखास गोळवलकर गुरुजीची व त्या दोघा नागा तरुणांची आठवण होत असे. गुरुजीनी 'मी हिंदुंची संघटना करतो आहे, तुमच्याकरता मी काही करु शकत नाही, सॉरी' दिलेल्या त्या उत्तराची पण आठवण येत असे.

गुरुजीनीच नाही तर सगळ्या भारतानचं ह्या लोकांना दूर ठेवलं होतं. त्यांना जवळ केलं होतं ते इटाली, फ्रान्समधल्या मिशनरी लोकांनी. गुरुजीनी ह्या पॅगन लोकांकरता काही करायची तयारी दाखवली असती तर त्यानंतर तिथं घडलेला इतिहास कितीतरी बदलला असता नाही?

●


# निर्माणपर्व

**श्री. ग. माजगावकर : ४० रुपये**

या पुस्तकाचा विषय आहे

**'विकसनशील भारत.'**

७० ते ८० या खळबळजनक कालखंडातील हे चितन. - शहादे चळवळ, जेपीचे बिहार आंदोलन, आणिबाणी, जनतापक्षप्रयोग, ग्राहक चळवळ, म्हैसाळ प्रयोग...

# ख्रिश्चन धर्म : वैचारिक परिवर्तनाच्या वाटेवर ---

डॉ. फेलिक्स मच्याडो

बाबा आमटे यांच्या पूर्वांचल भागातील 'भारत जोडो' अभियानात कोल्हापूर जिल्ह्याच्या शिरोळ तालुक्यातील जांभळीचे हसनसाहेब फत्तेखान देसाई हे सामील झाले होते. २५ मे च्या 'कोल्हापूर सकाळ'मध्ये लिहिलेल्या लेखात ते म्हणतात - '... आज अरुणाचलमध्ये सर्वात महत्वाचा प्रश्न धर्मांतराचा आहे. ईशान्येकडील सर्वच राज्यात हे प्रश्नचिन्ह आहे. १९६७ ते ७१ या काळात नागालँड, मणिपूर, त्रिपूरा, मेघालय, अरुणाचल व आसाम या सीमावर्ती भागात ख्रिश्चन धर्मात प्रवेश केलेल्यांची संख्या ६७ टक्के नोंदविली गेली आहे. मिशनऱ्यांची संख्याही वाढते आहे...'

एकीकडे ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या अशा कारवाया जोरात सुरु असताना वैचारिक पातळीवर मात्र ख्रिश्चन धर्मातील काहीजण समन्वयवादाचा, सहिष्णुतेचा पुरस्कार करीत आहेत. १९६५ साली व्हॅटिकन येथे तेव्हाचे पोप पॉल सहावे यांनी जगभरच्या कॅथलिक कार्डिनलांची एक परिषद बोलाविली होती. 'ईश्वर उपासनेचे अनेक मार्ग असू शकतात' हे या परिषदेत प्रथमच मान्य करण्यात आले. प्रत्येक व्यक्तीने स्वत:च्या प्रेरणा, प्रवृत्तीनुसार स्वत:चा धर्म, उपासनामार्ग निवडावा. ख्रिस्ती धर्मासारख्या संघटित धर्मात अशी सहिष्णुतेकडे जाणारी भूमिका अलिकडे मांडली जात आहे. १९६९ मध्ये बंगलोरच्या परिषदेत तर कॅथालिकांनी भूतकाळातील चुकांबद्दल भारतीय समाजाची जाहीर माफी मागितली होती. आणि नुकत्याच (४ ते ६ जून ८९) गोरेगाव, मुंबई येथे झालेल्या कॅथलिकांच्या राष्ट्रीय परिषदेतही धर्मांतर या मुद्यावर प्रामुख्याने चर्चा झाली. म्हणजे, एकीकडे राष्ट्रविरोधी धर्मांतराच्या कारवाया भारतात सुरु आहेत आणि दुसऱ्या बाजूला हा उदारमतवादी, पुरोगामी विचार मांडला जात आहे असे परस्पर विसंगत चित्र सध्या दिसते. असे असले तरीही ख्रिश्चन धर्मातील या बदलत्या विचारप्रवाहाची नोंद घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने डॉ.फेलिक्स मच्याडो यांचा हा लेख वाचकांना उद्‌बोधक वाटेल. लेखक हे मुंबईतील गोरेगाव येथे ख्रिश्चन सेमिनरीत तौलनिक धर्माभ्यासाचे प्राध्यापक आहेत.

देवनिष्ठा आणि परमेश्वरश्रद्धेतून धर्म जन्मतो असं म्हणता येईल. देव - धर्माचं नातं अतुट व अबाधित असल्याने धर्म जरी अनेक मानले तरी अंतिम सत्य : परमेश्वर एकच असायला हवा. अंतिम सत्याची व्याख्याच मुळी 'एक सत्य' आहे. अर्थात हा 'एक' गणितातला नाही. 'एकं सत् विप्रा बहुदा वदन्ती' ह्या वेदसाराप्रमाणे 'एक अंतिम सत्य' अनेक रुपांनी ओळखले पाहिजे तरच त्याला खरं 'शहाणपण' म्हणतात. एका सत्यातून अनेक धर्म उदय पावल्याने आज अनेक धर्मांना या सत्याची ओढ लागली आहे व ह्याच गोष्टीला सर्वधर्मसुसंवादाद्वारे आज गती आलेली आहे.

अंतिम सत्य विश्वव्यापक (universal) मानलं जातं. परंतु धर्म विशिष्ट मातीत, लोकात व काळात जन्मतो, असे धार्मिक व इतिहास व मानवशास्त्र शिकवते. परिणामत: अंतिम सत्याला मर्यादा पडतात व मर्यादित धर्म नेहमी विश्वव्यापकाचा आव आणू पहाते.

'आजचा काळ भयंकर बदललेला आहे' ह्या पोप सहावे पॉलच्या (१९६३-१९७८) शद्वात कॅथलिक ख्रिस्ती धर्माने उपरनिर्दिष्ट गोष्टीचा आढावा गेल्या काही वर्षात घेतला आहे व ह्या लेखात मी त्याचा उहापोह करु इच्छितो.

'जगाचे ख्रिस्ती धर्माशी काय नाते आहे?' असा प्रश्न भूमध्यीय समुद्राकाठच्या ख्रिस्ती जगात विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत विचारला जाई. परंतु आजचे आधुनिक जग हे 'अनेक धर्मांनी विणलेले जाळे आहे' असे पोप दुसऱ्या जॉन पॉलच्या शद्वात ख्रिस्ती धर्म मान्य करतो : म्हणून आजचा ख्रिस्ती धर्म 'धार्मिक व सांस्कृतिक विविधतेच्या विश्वात आमच्या धर्माचे स्थान काय?' असा प्रश्न विचारतो. आपले खरे स्वरुप म्हणजे सर्वांशी सुसंवाद असणे असे आज ख्रिस्ती धर्म मान्य करतो कारण 'प्रभू येशू ख्रिस्तामध्ये परमेश्वराने माणसांशी साधलेल्या सुसंवादाचा ख्रिस्तीधर्म संस्कार व आद्यचिन्ह आहे.'

इतिहास :- अंतिम-सत्याचे देहीक प्रकटीकरण (Incarnation) ह्या दृष्टीकोनातून ख्रिस्त स्वत:ला विश्वव्यापक समजत असे. म्हणून त्याने स्थापन केलेला धर्म कोण्या एका विशिष्ट जातीचा, संस्कृतिचा

किवा धर्माचा गुलाम नव्हता असे सुरुवातीला धर्मपंडितांकडून (Fathers of Church) मानले जाई. खिस्ताच्या धर्मानुयायाला 'कॅथलिक' (CATHOLIKOS) असे ग्रीकमध्ये संबोधिले जाई. कॅथोलिक म्हणजे, 'परिपूर्ण', 'सर्वसंपन्न', 'मनाने, अंतःकरणाने व बुद्धीने परिपूर्ण पावलेला माणूस'. परंतु रोमन साम्राज्याने आपला अधिकृत धर्म खिस्ती आहे असे जाहीर केल्यानंतर 'कॅथलिक' शद्वाला वेगळे वळण लागले. जसजसा हा धर्म खिस्ती समजल्या जाणाऱ्या रोमन साम्राज्याबरोबर वाढत गेला तसतसा 'कॅथलिक' शद्वाचा अर्थ म्हणजे संस्कृतिने, मनाने, विचारसरणीने मर्यादित असा झाला. विशिष्ट भाषा, विशिष्ट विचारसरणी, विशिष्ट उपासना- पद्धती, विशिष्ट संस्कृतीच्या शृंखला येशू खिस्ताच्या 'कॅथलिक' धर्माला बांधल्या गेल्या व मग 'आम्ही सांगतो ते फक्त सत्य', किवा 'फक्त आमचाच देव तो खरा देव' अशा बहुष्कृती (exclusivistic) गर्वाने खिस्ती धर्माला वेष्ठिले गेले.१४४२ साली फ्लॉरेन्स येथे झालेल्या खिस्ती धर्म सभेत 'खिस्ती धर्मा पलिकडली कोणीही व्यक्ती मुक्ती पावू शकणार नाही' अशी घोषणा करुन, इतरांशी सुसंवाद तर सोडून द्या, परंतु जे खिस्तीधर्माचे नाहीत त्यांना खिस्ती करण्याचा किवा त्यांचा छळ करण्याचा प्रयत्न खिस्ती धर्माकडून झालेला आहे हे खेदाने मान्य करावे लागेल. 'एकच धर्म, फक्त खिस्ती धर्म' ह्या ब्रीदवाक्याला पंधराव्या - सोळाव्या शतकात सुरु झालेल्या वसाहतवादाने (Colonialism) गतीच मिळाली. गैरसमजुतीने 'कॅथलिक' म्हणजे 'परिपूर्ण' व्यक्ती हे विसरुन भौगोलिक विस्ताराने जग खिस्ती करण्याचा ध्यास खिस्ती धर्माला लागला. अशा प्रकारे युरोपिअन खिस्ती धर्म प्रांताचा जगात इतरत्र भौगोलिक विस्तार झाल्याला काही काळ 'विश्वव्यापक' (Universal)१ समजले गेले. परंतु 'Universality is not extension of the determined partcularities' हे विसरता कामा नये.

स्वतःविषयी बदललेला समज : माणसाचे देवाशी नाते जोडायला शिकविणारा धर्म माणसामाणसात सुद्धा सलोखा निर्माण करावयास सांगतो. परंतु भिन्नता व आगळे वेगळेपणावर भर दिल्याने अखिल जागतिक मानवी कुटुंबात ऐक्य निर्माण होण्याऐवजी भेद व ताटातूट हा परिणाम अशा धर्माचा होतो. खिस्ती धर्माचा मूळ अर्क किंवा गाभा (essehce) जागतिक स्वरुपाचा आहे. म्हणजेच तो माणसाचे देवाशी नाते जोडायला शिकवतो व माणसामाणसात सलोखा व ऐक्य निर्माण करावयास व जोपावयास सांगतो. परंतु अर्क नेहमी विशिष्ठ आकारात (form) राहाते. उदाहरणार्थ, खिस्ती धर्माला पहिला आकार पॅलेस्टाईन संस्कृतीचा, भाषेचा व विचारसरणीचा लाभला. तद्नंतर संत पौलातर्फे रोमन हेलेनिस्टीक (Hellenestie) आकार खिस्ती धर्माला मिळाला. भूमध्य समुद्रकाठी वसलेल्या देशात खिस्तीधर्माचा अर्क फैलावत गेला, तसतसा त्या देशांच्या संस्कृतीचा, भाषेचा व विचारसरणीचा आकार त्या अर्काला मिळाला. सुरुवाती-सुरुवातीला ह्या अर्क आकारातील फरकाबद्दल लोक जाणून होते. म्हणूनच ज्या निरनिराळ्या ठिकाणी हे अर्क गेले त्या निरनिराळ्या ठिकाणच्या भाषा, संस्कृती व विचारसरणीप्रमाणे त्या अर्काने आकार मिळविला. खिस्ताविषयी अगोदर श्रद्धेत कमी पडलेला प्रेषित थॉमस भारतात आल्याचे मलबारी खिस्ती मानतात. तेथे काही प्रमाणात खिस्ती अर्क भारतीय संस्कृतीशी, भाषेशी व विचारसरणीशी एक होता. परंतु कालांतराने आकार अर्कामधला फरक (distinction) नाहिसा झाला. आकारालाच अर्क समजून आकार म्हणजेच विश्वव्यापक खिस्ती धर्म वसाहतवादाच्या काळात (colonialistic Period) भारतासारख्या निरनिराळ्या देशावर लादला गेला. वसई, मुंबई, गोव्याला पोर्तुगीज संस्कतीचा, भाषेचा व विचारसरणीचा आहे हा गैरसमज अर्क व आकार ह्यामधील महत्वाचा फरक (distinction) विसरुन गेल्याने झाला. ह्याचे परिणाम वसई, मुंबई व गोव्यासारख्या खिस्ती लोकांवर विपरित व भयंकर झाले. वास्तविक, खिस्ती अर्काला (essence) वसई, मुंबई व गोव्याचा आकार (form) मिळावयास हवा होता. तरच खिस्ती धर्माचा विश्वव्यापकपणा (Universality) शाबूत राखला गेला असता. वास्तविक भारत व चीनच्या संदर्भात अर्क आकाराच्या (distinction) विषयी डि. नोबोली, रिची ह्या सारख्या मिशनऱ्यांनी खूप प्रयत्न केल्याचे इतिहास नमूद करतो. चीनमध्ये खिस्ती धर्माच्या अर्काला चीनी आकार देण्याचे व भारतात भारतीय आकार देण्याचा डि नोबोली व रिची ह्या मिशनऱ्यांनी खटाटोप केला परंतु बलाढ्य युरोपिअन आकाराच्या खिस्ती धर्मापुढे त्यांना हार खावी लागली. अर्क आकार फरक (distinction) नाहीसा झाल्यावर आकारच संपूर्ण धर्म मानला जातो व परिणामतः धर्म जुलमी (oppressive) बनतो. विशिष्ट भाषेला, संस्कृतीला व विचारसरणीला प्राधान्य मिळून दुसऱ्या भाषेवर, संस्कृतीवर व विचारसरणीवर अन्याय कसा होऊ शकतो ह्याचे जिवंत उदाहरण आपणाला खिस्ती धर्माच्या इतिहासात पहावयास मिळते. आकार अर्कातील फरकाविषयी विसर पडू नये म्हणून अनेक थोर विचारवंतांनी प्रयत्न केल्याचे व त्यात यश मिळविल्याचे महत्वाचे उदाहरण अक्वीनाच्या संत थॉमसमध्ये पहावयास मिळते. ॲरिस्टॉटल ह्या प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञाची विचारसरणी अकराव्या शतकातील थॉमसने आत्मसात करुन त्याने खिस्ती धर्माच्या अर्काला आकार दिला. मला वाटते, शंकराचार्य किवा रामानुजांचे तत्त्वज्ञान थॉमससारख्या खिस्ती विचारवंतापुढे आले असते तर खिस्ती धर्माच्या अर्काला भारतीय विचारसरणीचा निश्चित आकार मिळाला असता.

बायबल व खिस्ती धर्म : आजचा भयंकर बदललेला काळ धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक विविधतेचा (Pluralism) आहे. बायबल, कुठल्याही धर्मग्रंथाप्रमाणे, जिवंत वचनाचा संग्रह आहे. जशी एखादी भाषा जिवंत बोली असते व बोलणारा त्या भाषेचा जणू जनक असतो त्याचप्रमाणे बायबल जिवंत वचन आहे व ते वचन अंगिकारणारा बायबलला जीवन देतो. भाषा जर बोलली गेली नाही तर ती कालबाह्य व निरर्थक बनते त्याचप्रमाणे प्रत्यक्षात व वर्तमानात बायबल न जगल्याने त्याचा 'बायबलपणा' नाहीसा होतो. आजच्या विविधतेच्या काळात (Multireligious and Pluricultural) बायबल प्रत्यक्षात व वर्तमानात जगले गेले पाहिजे तरच ते 'मुक्तीदायक' ठरेल. बायबल एका जमातीच्या भाषेत, संस्कृतीत व

विचारसरणीत लिहिले असले तरी त्याचा अर्थ काळ वेळ (Time) व व्यापकता (Space) ह्यांच्या मर्यादेपलिकडे विस्तारीत असला पाहिजे तरच त्याची जिवंत वचन म्हणून शान राखेल. स्वतःला समजून घेण्याच्या ह्या प्रयत्नात ख्रिस्ती धर्माला आज ह्या गोष्टीची जाणीव प्रखरतेने झाली आहे. गेल्या पन्नास वर्षात सर्वपंथीय ख्रिस्ती लोकांनी बायबलचा कसून अभ्यास केला व मला वाटते ख्रिस्ती धर्माप्रमाणे दुसऱ्या कुठल्याच धर्मांनी आपल्या धर्मग्रंथाचा असा बारकाईने व स्थूल दृष्टीकोनातून शास्त्रबद्ध अभ्यास केलेला आपणाला आढळणार नाही. त्या अभ्यासानुसार आपण केलेल्या अनेक चुकांची, गैरसमजाची व अतिशयोक्तीची जाणीव प्रामाणिकपणे ख्रिस्ती धर्म आज मान्य करतो.

समुदायरुपी ईश्वर : अल्लाने महम्मद पैगंबराला कुराण सांगितल्याप्रमाणे बायबलचा जन्म झाल्याचे ख्रिस्ती धर्म मानत नाही. एकंदर बहात्तर पुस्तकांचा बायबल संग्रह आहे व तो संग्रह पूर्ण होण्यास जवळ जवळ एक हजार वर्षांचा काळ (१००० वर्षे ख्रिस्तजन्मापूर्वी व १०० वर्षे ख्रिस्तानंतर). संपूर्ण संग्रहात आपणाला निरनिराळी वाङःमयशैली आढळते. उदा. पुराण कथा, इतिहास, कविता, मसुदे, प्रवचन इत्यादी. भाषाशैली बायबलमध्ये एकत्र आल्या आहेत. मूळ बायबल एकाच भाषेत नसून संग्रहापैकी काही पुस्तके हिब्रू भाषेत आहेत, काही अरेमिक भाषेत तर काही ग्रीक भाषेत आहेत. एका विशिष्ठ ओघाचा (Process) बायबल परिणाम आहे. जुना करार म्हणून गणला जाणारा बायबलचा एक भाग इजिप्शियन, मेसापोटेमियम, कनान, प्राचिन पूर्वराष्ट्र व इस्त्राएल ह्या सर्व जाती जमातीच्या संस्कृतीचा व विचारसरणीचा बनला आहे. स्वत्व न गमावता इस्त्राएलने प्रचलित संस्कृतीचा बराच भाग आपलासा केला व परमेश्वर मानव संवाद शद्बांकित केला. तरीपण बायबल म्हणजे येथून तेथून कसेबसे साहित्य (Matter) जमवून त्याची केलेली भेळपुरी नाही, हे लक्षात घेणे फार महत्वाचे आहे. खुद्द निर्गुण परमेश्वराशी बांधिलकी राखून, त्याच्याशी प्रामाणिक राहून बायबलचा संदेश शद्बांकित केला गेला. असे ख्रिस्तीधर्मीय मानतात. बायबलचा संदेश कोण्या एका जमातीसाठी मर्यादित नाही तर माणूस म्हणून जन्माला येणाऱ्या प्रत्येकासाठी आहे. हे सत्य उजेडात आणण्यासाठी गैरसमजुतीने एक संस्कृती, एक भाषा, एक विचारसरणी प्रत्येक माणसावर सक्तीने लादून चालणार नाही. बायबल घडण्याच्या ओघाविरुद्धच (Process) ते होईल! किंबहुना तो 'संदेशच' एक संस्कृती, एक जमात, एक भाषा, एक विचारसरणीच्या पलिकडे विस्तारीत करावा लागेल.

संपूर्ण बायबलमध्ये एक मूलभूत विचार मांडला आहे व तो म्हणजे : 'परमेश्वराने जगातील सारे लोक एकापासून उत्पन्न करुन त्यांनी सगळ्या भूपृष्ठावर राहावे असे केले, आणि त्यांचे नेमिलेले समय व त्यांच्या वस्तीच्या निश्चित सीमा त्याने अगोदरच ठरविल्या. हे सर्व करण्यात त्याचा एकच उद्देश होता की सर्व लोकांनी त्याचा शोध करावा, आणि चाचपडत चाचपडत त्याला कसे तरी प्राप्त करुन घ्यावे. वास्तविक तो आपल्यातील कोणापासूनही दूर नाही. कारण आपण त्यात जगतो, वागतो, आणि आहोत. आपण परमेश्वराची संतान आहोत' (बायबल, प्रेषि. कृत्य. १७:२६-२८)

तसे पाहू गेले असता बायबलवर कोण्या एका जाती-जमातीचा किवा धर्माचा बहिष्कृती (exclusive) हक्क नाही. एका जमातीबरोबर करार केला तरी बायबलचा परमेश्वर सर्व जनमानसांपर्यंत पोहचण्याचा उपक्रम आखतो. तसा वेळोवेळी आदेश देतो. बायबलमधील परमेश्वर इस्त्राएल जमातीबाहेरच्या संत-महात्म्यांचा उल्लेख करुन त्यांचे उदाहरण प्रमाण मानावयास इस्त्राएल जमातीच्या लोकांना उद्युक्त करतो. संपूर्ण मानवजातीचं भलं व्हावं हेच उद्दिष्ट बायबलच्या परमेश्वरात दिसून येते. परंतु इतरांपासून पारखं (isolation) होण्याचा मोह, 'आपणच देवाचे लाडके' मानण्याचा गर्व, दुसऱ्यांना हिणविण्याचा प्रयत्न इस्त्राएल जमातीकडून निश्चित झाल्याचे इतिहास सागतो.

'नवा करार' म्हणून गणला गेलेला बायबलचा दुसरा भाग खास ख्रिस्ती आहे. 'पूर्वजांशी परमेश्वर वेळोवेळी बोलला आहे परंतु आज स्वपुत्राद्वारे त्याचे आपल्याशी प्रत्यक्ष संभाषण घडून येत आहे' अशी बायबलमधील एका पुस्तकाची सुरुवात करण्यात येते. म्हणजेच प्रभू येशू आता 'नवीन परमेश्वर' बनून येत नाहीत तर आतापर्यंत घडलेल्या धार्मिक मानवी इतिहासाचा कळस बनून, धार्मिक मानवी इतिहासावर शिक्कामोर्तब करण्यासाठीच येत आहेत असे समजले पाहिजे. माणसाने प्राचीन काळापासून परमेश्वराचा अनेक मार्गांनी शोध घेतला. भारतीय संस्कृतीतील रुपावली किंवा नमुना (Paradigm)- घेऊन म्हणायचे म्हणजे, कर्म मार्गाद्वारे (पूजा अर्चा, विधी इत्या.), ज्ञान मार्गाद्वारे (धार्मिक ग्रंथ, शिकवण, तत्त्वज्ञान, ईशज्ञान) व भक्तीमार्गाद्वारे (सेवा, प्रेमभाव इ.) धार्मिक माणसाने (Homo Religious) परमेश्वराचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. परिणामी परत एकदा मला सांगावेसे वाटते की, प्रभू येशू ख्रिस्तावरील ख्रिस्ती लोकांची श्रद्धा बहिष्कृति वागणुकीची (exclusive) असता कामा नये. ख्रिस्त अनादिकालीन, सनातन परमेश्वराची 'पूर्तता' आहे. एका दृष्टीकोनातून पाहू गेले असता, ख्रिस्तापासून नवीन धर्माला सुरुवात होत नाही तर सर्व शाश्वत, सनातन व अनादिकालीन खऱ्या धर्माची अखंडता शिक्कामोर्तब केली जाते.

येशू ख्रिस्त परमेश्वराचा एकमेव अवतार आहे असे ख्रिस्ती धर्म ठासून सांगतो. हे विधान समजण्याचा आज खूप प्रयत्न केला जातो कारण हे विधान बहिष्कृती (exclusivistic) वागण्याचा कल दर्शवते हे प्रामाणिपणे मान्य करावे लागेल. परंतु येशू ख्रिस्ताला बायबल


**माधवाश्रम प्रा. लि.**

राहण्याची उत्कृष्ट सोय

१८, पारेख स्ट्रीट
गिरगाव, मुंबई ४०० ००४
फोन ३५ ८६ १३

आधारे ओळखण्याचा प्रयत्न केला तर बरेच प्रश्न सुटण्यासारखे आहेत. उदाहरणार्थ, येशू ख्रिस्ताने परमेश्वराचे 'नाव' आपल्या शिष्यांना कधी शिकविले नाही. फक्त परमेश्वर माणसातील 'नाते' त्याने बळकट केले. 'पिता' हणून परमेश्वराला संबोधून, परमेश्वर माणसाच्या किती जवळ असतो ह्याची जाणीव येशूला करुन द्यायची होती. त्या 'पित्या' विषयी तर्क-वितर्क काढून तत्त्वज्ञान शिकविण्याच्या भानगडीत येशू पडला नाही. निर्गुण परमेश्वराची मानवी भाषेत व्याख्याच करणे अशक्य आहे ह्याची पूर्ण कल्पना येशूला होती. अशा त्या 'निर्गुण' परमेश्वराचा ख्रिस्त 'सगुण' देहावतार परमेश्वर माणसामधला 'एकमेव' दुवा. परमेश्वरात व प्रत्येक माणसात निश्चित नाते असते व ते दृश्य-अदृश्य मिलन फक्त एकाच वेळेला (Simultaneously) दृश्य-अदृश्य असलेल्या दुव्यानीच माणसापुढे ठेवता येईल ह्याचे *प्रत्यक्ष उदाहरण ख्रिस्त आहे.* ह्याच संदर्भात इतर धर्माशी सुसंवाद ख्रिस्ती धर्म उत्तेजित करतो. परमेश्वराचा शोध घेताना त्याच्यातील नाते ओळखले तर परमेश्वर आपल्याला निश्चित पावेल ही ख्रिस्ती धर्माची शिकवण आहे. उदा. आईचे मातृत्व तिची तर्काने व्याख्या करण्यात नाही, तर तिचे प्रेम अनुभविण्यात आहे. येशू ख्रिस्त परमेश्वराचा अवतार आहे हे ठासून सांगताना ख्रिस्तीधर्मिय माणूस, तोच येशू ख्रिस्त पिता व परमात्मा ह्यांपैकी एक आहे हे बऱ्याच वेळला विसरतो. येशू ही व्यक्ती ऐक्यमय परमेश्वराचा अविभाज्य भाग आहे. ख्रिस्ती धर्मात, परमेश्वराचे अस्तित्व (Monism) म्हणून शिकविले जात नाही. परमेश्वर म्हटला म्हणजे ते अनेकवचनी (Plural) सत्य मानले जाते. परमेश्वर म्हणजे एक समुदाय (Community) आहे. सुसंवादामुळेच परमेश्वराच्या अनेक वचनी रुपाची (Trinitarian God) खरी ओळख आपल्याला मिळेल हे ख्रिस्ती माणसाला आज पटायला लागले आहे.

ख्रिस्ती धर्म संघटना व देवराज्य-घोषणा (Church and Kingdom of God) : रोमन साम्राज्याने इ.स. ३०० मध्ये ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करुन ख्रिस्ती धर्माला जोपासले व वाढविले. ही वाढ 'खोलात' होण्याऐवजी 'विस्तारातच' जास्त झाली. ख्रिस्ती धर्म रुजावा ह्या भावनेपेक्षा रोमन साम्राज्य बळकट व्हावे असाच सर्वसाधारण इतिहासाचा निष्कर्ष निघतो. आपल्या संपूर्ण साम्राज्यात एकी आणण्यासाठी, साम्राज्याचा सूर्य जगावर चमकावा ह्या स्वार्थ हेतूने कित्येक रोमन राज्यकर्त्यांनी ख्रिस्ती धर्माचा (दुरु)उपयोग करुन घेतल्याचे आपण वाचतो. परंतु बायबलचा आधुनिक अभ्यास आपल्या नजरेसमोर एक मूलभूत प्रश्न उभा करतो : येशूने ख्रिस्ती धर्म संघटना (Church) स्थापित केली काय? तसा त्याचा हेतू होता का?

बाराकोसापलिकडच्या परिसराबाहेर कधी न जाता, कुठल्याही प्रकारचे सामाजिक, धार्मिक किवा राजकीय पद व्याप्त न करता, फक्त बाराएक जण निरनिराळ्या पेशातून बोलावून ख्रिस्ताने तीन वर्षात आपले परमकर्तव्य पार पाडले. एखादा धर्म स्थापन करावयाचा आहे ह्यापेक्षा, लोकांचे भले करायचा ध्यास ख्रिस्ताला लागला होता. 'गरीबांना सुवार्ता सांगण्यास, भग्नहृदयी लोकांना बरे करण्यास, बंदिवानांची सुटका करण्यास, आंधळ्यांना दृष्टी देण्यास, पायदळी तुडविलेल्यांना जुलूम करणाऱ्यांपासून सोडविण्यास आणि देवाच्या प्रसादाचे वर्ष विदीत करण्यास नेमले आहे.' अशा शब्दात येशू आपल्या कार्याचा श्रीगणेशा करतो. येशूने देवराज्याची घोषणा केली. परमेश्वर ज्याला भेटला आहे, त्याचे परावर्तीत जीवन कसे असावे ह्याविषयी येशूने शिकविले. देवराज्याची चिन्हे म्हणजे सगळीकडे शांती प्रस्थापणे, परंतु खरी शांती न्याय, समानता, बंधूप्रेम जेथे असेल तेथेच मिळते; म्हणून 'न्यायासाठी जमतील त्यांनाच परमेश्वराची खरी जमात म्हणून ओळखले जाईल' असे येशू म्हणाला.

येशूने फक्त देवराज्याची घोषणा केली व ते आपल्यात आले आहे ते प्रत्येकाने शोधले पाहिजे म्हणून बजावले. देवराज्य देवाकडून येते; एकमेकाने एकमेकावर लादल्याने नाही. देवराज्य जगण्यात खरे ठरते, फक्त बुद्धीने मानण्याने किंवा तोंडाने उच्चारण्याने नाही. देवराज्य येणे म्हणजे सर्व माणसांची मुक्ती होणे शक्य ठरणे. देवराज्याचा विचार (Concept) सर्व माणसाच्छादित् व्यापक आहे. बाह्य बदलापेक्षा अंतरपरिवर्तनच देवराज्याचे चिन्ह आहे. संपूर्ण विश्व (माणसेच नाहीत, तर प्राणीमात्र, वनस्पती इ.) एका कुटुंबभावनेने नांदणे हेच ख्रिस्ताचे उद्दिष्ट होते; व ते शक्य आहे हे अधिकाराने सांगणे ह्यातच ख्रिस्ताचा परमेश्वरावतार दिसून येतो. अशा देवराज्याचे ख्रिस्त 'बीज' आहे - खऱ्या अर्थाने प्रेरणा आहे. जगात घडणारे प्रत्येक सत्कार्य, प्रत्येक सुविचार, प्रत्येक सद्भावना देवराज्याचे चिन्ह आहे.

ख्रिस्ती धर्म संघटना ख्रिस्ताचे देवराज्य घोषणेचे कार्य अखंडित तडीस नेण्यासाठी स्थापन झालेली संघटना आहे. आपला स्वार्थ *करुन घेण्यासाठी ह्या संघटनेने राबू नये.* देवराज्याची बीजे ह्या संघटनेने नेहमी पेरावीत; म्हणजेच जगात सत्कार्याचा, सुविचारांना व सद्भावनांना आळखावं, जोपासावं व वाढीस लावावं. सुसंवादाशिवाय देवराज्य घोषणा करणारा खरा ख्रिस्त ख्रिस्ती लोकांना भेटणे मला अशक्यच वाटते.

ख्रिस्ती धर्म संघटना (Church) व आधुनिक काळ : ख्रिस्तीधर्माच्या दृष्टीकोनातून १) इ.स. १९६२ पूर्वीचा प्राचिन काळ व २) इ.स. १९६५ नंतरचा आधुनिक काळ अशी आपणाला वाटणी करता येईल. माणसाशी झालेल्या परमेश्वराच्या सुसंवादातूनच ख्रिस्तीधर्म उदयास आला ह्याचा विसर ख्रिस्ती माणसाला पडलेला होता. जगाशी सुसंवाद राहिल्यानेच परमेश्वराचे सत्य पृथ्वीवर प्रस्थापेल व प्रस्थापलेले देवराज्य दिसेल याची जाणीव महान व थोर पोप तेविसावे जॉन ह्यांना होती. जवळजवळ सुसवाद थांबविलेल्या ख्रिस्तीधर्म संघटनेला त्यांनी जोरदार आव्हान केले व जागतिक पातळीवर सर्व ख्रिस्ती लोकांची चार वर्षे विस्तारित महासभा त्यांनी व्हॅटिकन येथे भरवली. धर्म कालाकालाने समूळ

**जीवनाला पारखं करतो तो धर्म म्हणजे अधर्मच**

अर्तःपरिवर्तीत (Renewal) झाला तरच तो खऱ्या अर्थाने जीवदायी ठरतो. त्याचेच दुसरी व्हॅटिकन परिषद हे एक बोलके उदाहरण आहे. जीवनाशी सांगड घालून देणे, जीवनाचा व माणसाचा मेळ बसवणे हे धर्माचे आद्यकर्तव्य आहे; जीवनाला पारखं (isolate) करणारा धर्म म्हणजे अधर्मच!

दुसऱ्या व्हॅटिकन परिषदेने सर्वप्रथम आर्तसंवाद (Intra dialogue) साधण्यासाठी स्वतःचे आत्मशोधन सुरु केले. 'धर्म कशासाठी आहे?' हा मूलभूत प्रश्न सर्वाआधी विचारला गेला. 'माणूस शद्वार्थासाठी आहे की शद्वार्थ माणसासाठी आहे' हे न समजल्याने येशू ख्रिस्ताच्या काळात धर्माचा गोधळ माजला होता. माणसाला जीवन देतो तो धर्म; माणसाला परिपूर्ण, सर्वसंपन्न करतो तो धर्म; माणसाला माणुसकी शिकवितो तो धर्म; माणसाची घडण परमेश्वरगुणात संपन्न पावण्यासाठी झटतो तो धर्म; परिणामी न्यायासाठी, समानतेसाठी, रंजल्या गांजल्यासाठी, सर्वांच्या समृद्ध-सुखी-जीवनासाठी झटतो तो धर्म!

प्रत्येक धर्मनियम (Code), वागणूक (Conduct) आणि विधी (cult) ह्यांनी आकारीत झालेला असतो. नियम माणसाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीच असतात, नियम नेहमी तारक असावयास हवेत, मारक नाही. नियमांचे उद्दिष्ट नियमापलिकडे असावयास हवे, नियमात नाही; म्हणजेच नियम फक्त मार्गदर्शक असावेत. उद्दीष्टांच्या जाणिवेनुसार नियम बदलू शकले पाहिजेत. उदा. जिवंत परमेश्वर हे जीवनाचे उद्दिष्ट व त्याचा शोध घेण्यासाठी धर्माचे काही नियम असतात. जिवंत परमेश्वराची दिवसेदिवस जाणीव होत राहाणे व त्या जाणीवेत वाढत राहाणे हेच उद्दिष्ट असावयास हवे. त्यानुसार नियम दुय्यम स्थानाचे व गरजेनुसार (in relationship to the knowledge of God) बदलले पाहिजेत. त्या संदर्भात दुसऱ्या ख्रिस्ती व्हॅटिकन परिषदेने आपल्या संपूर्ण धार्मिक जीवनाचा फेरविचार करुन १९८५ मध्ये आजच्या काळाला अनुरुप अशी नवी नियमावली काढली.

'नीती आणि धर्माचा काय संबंध आहे?' हा प्रश्न अनेकदा विचारला जातो. 'नैतिक वागणुकीसाठी धर्माची खरोखर आवश्यकता आहे का? मला वाटते धर्म व आध्यात्मिकता जीवनाची अत्यंत खाजगी बाब बनू शकते. 'मी आणि माझे' एवढेच जर बघितलं तर माणसाला सामाजिक बाजू (Social dimension of Human Life) म्हणून जी काही बांधिलकी आहे तिची तजवीज होणार नाही. मानवी जीवन स्वतःच्या देहापेक्षा मोठे रहस्य आहे; प्रत्येक व्यक्ती समाज आहे. धर्माची बाजू (Religious dimension) माणसाला हे सत्य आवर्जून सांगते. ह्याच संदर्भात, नैतिक वागणुकीचा (conduct) विचार व्हावयास हवा. नैतिक बाबतीत, धर्म 'स्वतः'पेक्षा 'दुसऱ्या'चा विचार प्रथम करावयास लावतो. संपूर्ण जनताजनार्दनाचे भले झाले पाहिजे, असे धर्म नीतीला (Morality) सांगतो. धर्माची जोड नसती तर नीती एकसारखेपणाची (Uniform) झाली असती व अन्यायाने कोणा एका जातीची, समाजाची नीती दुसऱ्यांवर लादी गेली नसती. सत्याच्या शोधातील यात्रेकरु विधी (cult or Ritual) हे माणसाच्या जीवनाचे एक महत्वाचे अंग (dimension) आहे. माणसाचे स्वतःबरोबरचे (Intra-personal) स्वतःपलिकडचे (Transpersonal) परस्परातले (inter-personal) व ब्रह्मांडातले (subpersonal) संबंध विधीद्वारा प्रकटित होतात. विधीशिवाय माणसाचा कुठलाच संबंध प्रत्यक्षात येऊ शकत नाही. विधीमुळे माणूस जोडला गेला पाहिजे, पारखा होता कामा नये. उदा. माझे दुसऱ्यावर प्रेम आहे हे सत्य प्रत्यक्षात मी त्या 'दुसऱ्याला' फुल देऊन दर्शवितो; परंतु प्रेम फुलात नाही. त्याचप्रमाणे विधी जीवनात माध्यम म्हणून गणले गेले पाहिजे. आज विधीना 'सत्य प्रतिक' (Real Symbol) म्हणून ओळखलं जातं. ज्या प्रमाणे माझी हाडा-मांसाची मूर्ती माझ्या खऱ्या स्वरुपाची 'सत्य प्रतिक' आहे, म्हणजेच, माझ्या हाडा-मांसाच्या मूर्तीतूनच माझ्या खऱ्या स्वरुपाचा शोध दुसऱ्याला लागेल, त्याच प्रमाणे जीवनातील खऱ्या मूल्यांची जोपासना अर्थपूर्ण विधीद्वारेच ओळखली जातील व जोपासली जातील.

सुसंवादाद्वारे ख्रिस्तीधर्म आत्मकेंद्रीततेपासून परकेंद्रीत होत आहे. परकेंद्रीत होणं सुसंवादाची अटच आहे. म्हणून ख्रिस्ताच्या तत्वाला अनुसरुन ख्रिस्ती धर्माने आपले नियम, आपली वागणूक व आपले विधी-संस्कार परकेंद्रीत केले. अशानेच ख्रिस्तीधर्म कोण्या एका व्यक्तीचा, कोण्या एका जातीचा, कोण्या एका संस्कृतीचा, कोणा एका भाषेचा गुलाम बनणार नाही, तर खऱ्या अर्थाने आपले विश्वव्यापकपण (Universality) जगेल. कारण ख्रिस्ताचे विश्वव्यापकपण, सेवेद्वारे तो सर्वांचा बनण्यात होतो.

जगाशी सुसंवाद साधताना, दुसऱ्या व्हॅटिकन परिषदेने जगात प्रचलित असलेल्या अनेक धर्मांची जाणीव ठेवली. त्यानुसार अठरा मसुद्यांपैकी एक मसुदा ख्रिस्तेतर धर्मविषयी विचार करतो. परमेश्वराच्या योजनेत सर्व धर्मीयांना परमेश्वर ज्याच्यात्याच्या इष्ट धर्माद्वारे प्रेरीत करुन त्यांची मुक्ती साधतो असा आशय त्या मसुद्यातून व्यक्त केला आहे. व्यक्ती व समाज अनेक असले तरी मानवी कुटुंब एक आहे. 'जे सत्य, सुंदर व पवित्र आहे त्याचा ख्रिस्तीधर्म कधी अव्हेर करीत नाही. सत्याचा सूर्य खूपदा सर्व धर्मात चमकतो... कुठल्याही धर्मात का असेनात, चांगली मूल्ये ओळखा जोपासा व वाढीस लावा' असा सल्ला ह्या मसुद्याद्वारे आम ख्रिस्ती जनतेला देण्यात येतो.

पोप सहावे पॉल १९६४ साली मुंबई दौऱ्यावर आले व उतरताक्षणी 'तमसो मा जोतिर्गमय, असतो मा सद्गमय, मृत्योर्मा अमृतगमय' ही उपनिषदातील प्रार्थना म्हणून आपल्या भारत भेटीला त्यांनी सुरुवात केली. 'आपण अंतःकरणाने एकमेकांजवळ येऊ या, एकमेकांना समजून घेऊ या, एकमेकांचा मान राखू या. पृथ्वीवर अंतिम सत्याच्या शोधात यात्रेकरुसारखे आपण एकमेकांचे हात हातात घेऊ या' ह्या शद्वात त्यांनी सर्वधर्मीय सभेसमोर बोलताना सांगितले. 'एकच' धर्म,

**दुसऱ्यांचा मान राखणे हे अंतिम मूल्य बनले पाहिजे.**

फक्त ख्रिस्ती धर्म' ह्या भूमिकेपासून 'एकमेकाजवळ येऊ या, एकमेकांना समजून घेऊ या, एकमेकांचा मान राखू या' कोण हे परिवर्तन? रोममधून एका सुसंवादावर जाहीर पत्रक काढून पोप सहाव्या पॉलनी खालील उद्‌गार काढले, 'आज सुसंवादाशिवाय पर्याय नाही. विविधता आणि अनेकता असे जगाचे व जीवनाचे खरे चित्र आहे. आजच्या शिकल्या - सवरल्या जगातील माणूस परिपक्व (mature) बनला आहे व सुसंवादाद्वारे धर्म जगण्यास तो लायक बनला आहे... सुसंवाद म्हणजे मनाचा मोठेपणा. सुसंवादात माणसाच्या अंतःकरणाची कवाडे उघडी असली पाहिजेत; दुसऱ्यांचा मान राखणे हे अंतिम मूल्य बनलं पाहिजे. दुसऱ्यांचा मान राखणं म्हणजे त्याच्या श्रद्धेचा व धर्माचा मान राखणे. नम्रता, सौजन्य, सहिष्णुता, दुसऱ्याचे बोलणे ऐकून घेण्याची ओढ हे सद्‌गुण प्रथम अंगी बाणले पाहिजेत.'

दुसऱ्या व्हॅटिकन परिषदेचे पडसाद जगाच्या कानाकोपऱ्यातील ख्रिस्ती धर्मीय लोकात ताबडतोब उमटले. भारतामध्ये बंगलोर येथे सर्व ख्रिस्तीधर्मीय संघटनेने एक परिसंवाद घडवून आणला व आपले आत्मशोधन, मूल्यमापन व उहापोह घेण्याचा प्रयत्न केला. 'आमच्या देशातील अनेक धर्मीयांबरोबर व धर्माबरोबर आम्ही संपर्क साधू इच्छितो. अनेक धर्मांनी मानवजातीच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी मोलाची भर घातली आहे. आमच्याच गैरसमजुतीमुळे गतकाळात आमचे इतर धर्मीयांबरोबरचे संबंध कधी कधी विस्कटले होते, त्याबद्दल आम्ही त्या सर्वांची पदर पसरुन क्षमा मागतो. माणसाने सर्वांगीण प्रगती करुन, सर्वांचे भले व्हावे म्हणून एकतेने आपण आता यापुढे झटू या' ह्या शब्दात १९६९ मध्ये ख्रिस्ती धर्माने आपला जाहिरनामा प्रसृत केला.

अखिल मानवतेच्या ऐक्यासाठी झटण्यात एखादा ख्रिस्ताचा खरा अनुयायी बनतो हे सत्य गंभीरपणे प्रत्यक्षात आणण्यास अधिकृत ख्रिस्ती संघटना कामाला लागल्या. आजचा मिशनरी परका ख्रिस्ती आकार एकीकडून दुसरीकडे नेण्यात गुंतता कामा नये. किंबहुना, प्रत्येक माणसाच्या जीवनात परिपूर्णता आणण्यासाठी झटण्यातच आजचा ख्रिस्ती मिशनरी झटला पाहिजे. खरी परिपूर्णता आणावयाची असेल त्या माणसाला त्याच्या संस्कृतीपासून, विचारसरणीपासून, भाषेपासून, समाजापासून परावृत्त किंवा पारखा करुन येणार नाही हे आजच्या ख्रिस्ती धर्माला पटले आहे. जसा परमेश्वरावर कुठल्याही धर्माचा हक्क असू शकत नाही तसा परमेश्वर अवतारावर म्हणजेच ख्रिस्तावर ख्रिस्तीधर्माचा सुद्धा हक्क नसावा. परमेश्वर जगात आपल्या नकळत कार्यरत आहे. त्याला आपल्या संरक्षणाची (Protection) जरुरी नाही. आपण त्याचा बचाव करण्याचा आव कधी आणू नये. आपण फक्त परमेश्वराच्या योजनेत सहभागी होऊ शकतो व इतरांना सहकार देऊ शकतो असे आज ख्रिस्ती धर्म मानतो व व्यापक अर्थाने ह्यालाच आजचे मिशनरी कार्य संबोधिले जाते. सुसंवाद माणसाची सर्व प्रकारच्या ऐहिक बंधनातून सुटका (Liberation) व प्रत्येकाची आपल्या संस्कृतीशी सांगड अशी व्यापक व्याख्या ख्रिस्तधर्मप्रसारास (Evangelisation) आज देण्यात येते.

आजच्या जगात निर्माण झालेल्या गंभीर समस्येला कोणी एक जात, धर्म किंवा संस्कृती वाचवू शकणार नाही हे निश्चित. सर्वसमावेशक किंवा खऱ्या अर्थाने 'विश्वव्यापक भूमिकेची' (approach) जगाला नितांत गरज आहे, हे सत्य ख्रिस्ती धर्माला पटलेले आहे. म्हणूनच पोप दुसरे जॉन पॉल १९८६ साली भारत भेटीला आल्यावर दिल्लीत त्यांच्या पहिल्याच भाषणात सर्व भारतीय बिशपना उद्देशून ते म्हणाले, 'तुमच्या सेवाकार्याचा अत्यंत महत्वाचा भाग म्हणजे इतर धर्मीयांबरोबरचा सुसंवाद. तुमच्या विशिष्ट परिस्थितीनुसार परमेश्वर तुम्हाला सर्वपरीने प्रयत्न करुन सुसंवाद साधायला प्रेरित करीत आहे. ख्रिस्ती धर्म संघटनेची ती बांधिलकी आहे. तुम्ही प्रचार करण्यापूर्वी, दुसऱ्याचे ऐकून घेण्याचा कसोशीने प्रयत्न केला पाहिजे. ऐकताना फक्त दुसऱ्याचा आवाज ऐकू नका तर त्यांच्या हृदयाचे पडसाद ऐका. सुसंवाद म्हणजे मैत्री... सुसंवाद म्हणजे निस्वार्थ सेवा!'

विज्ञानाशी सुसंवाद

उपननिर्दिष्ट बदललेल्या भूमिकेनुसार



सुरक्षित, जलद, खात्रीची

एसटी पार्सल सेवा

एसटी पार्सल सेवा महाराष्ट्रात सर्वत्र उपलब्ध असून शेतकरी, उत्पादक आणि व्यापारी यांना जलद आणि सुलभ मालवाहतुकीसाठी ती अत्यंत सोयीस्कर आहे.
वाहतुकीचे दर वाजवी आहेत व कार्यपद्धती सोपी आहे.

अधिक माहितीसाठी नजीकच्या
एसटी कार्यालयाशी संपर्क साधा

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ
महाराष्ट्र वाहतूक भवन
मुंबई ४०० ००८



ख्रिस्ती जगतात आज खूप परिणाम झालेला दिसतो. धर्माचा आधार व पाया परमेश्वर असतो परंतु कालांतराने परमेश्वराला पारखा झालेला धर्म आज जणू काय पुन्हा परमेश्वराकडे येण्याचा प्रयत्न करत आहे. सुसंवादाला साजेसे गांभीर्य प्राप्त व्हावे म्हणून स्वधर्माचा खोलात अभ्यास करण्यास उत्तेजन दिले जाते. स्वधर्माची अपुरी किंवा अर्धवट माहिती हे प्रथम कोत्या वृत्तीला (fundamentalism) व जातीय वादाला (communalism) जन्म देते. धर्माचे ईशज्ञान (Theollogy of Religion) असे शिकविते की ख्रिस्ती, मुसलमान किंवा हिंदु धर्मीय माणसाचा अभ्यास करण्याआधी आपण धार्मिक माणसाचा (Religious Anthropology) अभ्यास करणे फार जरुरीचे आहे. सुसंवादाच्या जगात एका धर्माचा अभ्यास इतर धर्मीयांच्या संबंधात राहूनच खरा होईल कारण माणसाला माणसांबरोबर राहाण्यास शिकविणे कोणत्याही धर्माचे आद्यकर्तव्य आहे. अनेक माणसे अनेक माणसांबरोबर माणूसकीने रहायला शिकणे म्हणजेच परमेश्वराची ओळख पटणे.

१९६५ नंतरच्या आधुनिक काळात, बदललेल्या भूमिकेनुसार, ख्रिस्तीधर्माचा परकेंद्रीपणा तिच्या अनेक उपसंघटनेत झालल्या आमुलाग्र बदलावरुन दिसून येतो. उदाहरणार्थ, स्वतःचे वर्चस्व राहाण्यासाठी व पैसा आणि प्रतिष्ठा (influential) मिळविणारी 'बड्या' लोकांसाठी चालविलेली इस्पीतळे सोडून ती होतकरु ट्रस्टीच्या हातात सोपवून 'मेडिकल मिशन सिस्टर्सची' संस्था खेड्यापाड्यात शिरुन "Preventive Medicine' किंवा 'Health care' लोकाना शिकवित आहे. नावाजलेल्या मुंबईतील श्रीमंत ख्रिस्ती शाळा लोकांच्या हातात सुपुर्द करुन जेसुईट फादर्स आता 'Rural Education' ला प्राधान्य देत आहेत. वसईत मराठी संस्कृती जोपासली जावी म्हणून ख्रिस्ती धर्म प्रांताने इंग्रजी माध्यमाच्या शाळा अधिकृतपणे चालवायच्या नाहीत हे धोरण आखून लोकांच्या नापसंतीस उतरलेले हे धोरण कणखरपणे उचलून धरले आहे. वरील उदाहरणे ख्रिस्ती धर्मात टप्प्याटप्प्याने झालेल्या स्वतःच्या बदललेल्या समाजाला धरुनच आहेत. म्हणजेच धर्माची समज फक्त कागदावरच बदललेली नाही तर कृतीत तो बदल घडून येतो आहे.

सुसंवादाचा आणखी परिणाम म्हणजे ख्रिस्ती लोकांनी चालविलेला इतर धर्माचा व्यासंग अभ्यास. ख्रिस्ती धर्माच्या उपसंघटना आपली संपूर्ण जीवनावली (Life-style) आमुलाग्र बदलीत आहेत. आतापर्यंत संपूर्ण पाश्चिमात्य झग्याखाली लपून बसलेल्या या उपसंघटना आपला जीवनक्रम देशी संस्कृतीवर आधारित आहेत. झांक्वाव व उणय ह्या गुजराथेतील खेड्यात ख्रिस्त मंदिरे आदिवासी कलेच्या आधारावर बांधली आहेत. उपासनेची लॅटिन भाषा जाऊन स्थानिक भाषा आलेली आहे. बऱ्याच जोगीणीचा व धर्मगुरुंचा बाह्य पेहराव साडी, कुडता व लेगा बनला आहे. जीवनक्रम देशी करण्यासाठी सर्वप्रथम देशी संस्कृतीचा, धर्माचा, विचारसरणीचा व भाषेचा सखोल अभ्यास होत आहे. *'ख्रिस्ती धर्म देशी तत्वज्ञानाच्या आधारावर समजला* पाहिजे; देशी ईशज्ञान तयार होणे ह्यालाच ख्रिस्ती धर्माने प्राधान्य दिले पाहिजे; अशी प्रतिज्ञा भारतीय बिशप-प्रतिनिधींनी १९७४ मध्ये भरलेल्या रोममधील एका सभेत ठामपणे मांडली. भारतात जेथे ख्रिस्ती धर्मगुरु प्रशिक्षित केले जातात (Seminaries) तेथे गेल्या वीस वर्षात अभ्यासक्रमात (syllbus) उपर्निदिष्ट प्रतिज्ञेला धरुन संपूर्णतः फेरबदल करण्यात आला आहे.

काही उपसंघटनांनी तर स्वतःच्या संपूर्ण घराचे रुपांतर 'सामुदायिक आश्रमां'मध्येच केले आहे. पुण्याचा ख्रिस्तप्रेम सेवा आश्रम, म्है सुरचा अंजली आश्रम, केरळमधील कुरुशीमाला आश्रम संपूर्ण देशी मठवासी जीवन जगतात. काही आश्रमात सर्वधर्मीय लोक प्रार्थना, संभाषण, सत्संग, मैत्री एकत्र जमून जगतात. सर्व धर्म ग्रंथातून वाचन होऊन जीवनाचा कार्यक्रम त्यानुसार आखला जातो.

युरोप-अमेरिकेत ख्रिस्ती धर्माने विज्ञानाशी सुसंवाद साधल्याने ख्रिस्ती धर्म अंधश्रद्धेच्या शृंखलातून बराच सुटला. (उदा. ट्युरीन मधील मानलेले ख्रिस्ताच्या प्रेतवस्त्राची विज्ञानाधारे कसून तपासणी झाली व अंती त्याचा खोटेपणा मान्य केला गेला) महाविद्यालयात स्वतःला प्रदर्शित (expose) केल्याने ख्रिस्ती धर्माने बऱ्याचशा गृहित धरलेल्या गोष्टीविषयीची कल्पना त्यांना आली व कधी कधी मुर्खपणाने वागण्याची जाणीव झाली. मार्क्सवादी विचारांची अवास्तव (Bias) टीका ख्रिस्ती धर्म मार्क्सवादाच्या सुरुवातीला करीत असे. परंतु बदललेल्या समजुतीने सुसंवाद साधताना ख्रिस्तीधर्माला कळून चुकले की ख्रिस्ताच्या सामाजिक बांधिलकीला अनुयायी विसरल्यामुळे चूक दुरुस्तीसाठी जणू (Corrective) मार्क्सवाद निर्माण झाला. पोप दुसऱ्या जॉन पॉलच्या 'कामगारांवर' व 'सामाजिक न्यायावर' लिहिलेल्या दोन जाहीर परिपत्रकावरुन ह्या गोष्टीची त्याचप्रमाणे, इतर धर्माशी सुसंवाद म्हणजे प्रत्येक धर्माचे *खऱ्या अर्थाने शुद्धीकरण आहे. सुसंवादाच्या* अनुभवामुळेच ख्रिस्तीधर्म आता 'खरा धर्म' किंवा 'सद्धर्म' होत आहे.

जीव वाढण्याला बदल हा अपरिहार्य आहे. ख्रिस्ती लोक धर्माला जिवंत गोष्ट मानतात. त्यानुसार त्यात बदल घडणे हे अवश्य समजतात. परंतु विरुद्धतेचं आव्हान स्वीकारल्याशिवाय वाढ अशक्य आहे. (Change impies rupture) आज ख्रिस्ती धर्मात देखील फुटण्याशिवाय कुठलाही बदल नाही. पुरोगामी व प्रतिगामी अशा दोन शक्ती आपापल्या समजानुसार ख्रिस्ती धर्मात कार्यरत आहेत व सामाजिक न्यायास बांधिलकी, इतर धर्मीयांशी सुसंवाद, स्त्रीमुक्ती, संस्कृतिकरण, विधीभाषा, राजकारण धर्म सांगड, इत्यादी अनेक प्रश्न चर्चीत आहेत. रोममधील बिशप हे ऐतिहासीक काळापासून परंपरेने जगातील स्थानिक ख्रिस्ती संघटनांना एकत्रित ठेवण्याचे

---

**ख्रिश्चन सामाजिक बांधिलकी विसरल्याने मार्क्सवाद निर्माण झाला.**

---

(service of unity) कार्य पहातात म्हणूनच त्याना पोप ह्या सन्मानाने संबोधले जाते. ते ख्रिस्ताचा पिटर ह्या प्रेषिताचा प्रत्यक्ष वारस म्हणून स्वतःला मानतात व जसा पिटर इतर प्रेषितांचा नेता होता तसेच पोप (रोमचे बिशप) हे जगातील सर्व बिशपांचे नेते गणले जातात. सध्याचे पोप दुसरे जॉन पॉल सामाजिक विचाराने पुरोगामी (Progressive) समजले गेले तरी धार्मिक विचाराने (Thedogically) प्रतिगामी (conservative) आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली असलेल्या Congragation of Faith and Doctrine) (श्रद्धा आणि धर्मतत्वपालन संघटना) ह्या संघटनेने कार्डीनल राटझिंगर ह्यांच्या अध्यक्षतेखाली आज हॅन्सकुंग, लेवोनार्डो बॉफ, इडवर्ड क्शीलीबेक्ष, मॅथ्यू फॉक्स, चार्लस कुरन अशा जगत्‌विख्यात धर्मपंडितांना त्यांच्या उघड टीकेसंबंधात दडपणाखाली आणले आहे. कुन्ग व करन ह्यांच्या कॅथोलिक महाविद्यालयातील जागा काढून घेतल्या आहेत तर बॉफ व फॉक्स ह्यांवर सक्तीचे मौन लादण्यात आले आहे. भारतात देखील पुण्याचे एक प्राध्यापक फा. बर्मेखो ह्यांना त्यांनी प्रसिद्ध केलेल्या संशोधनाबद्दल धर्मतत्व शिकविण्याचे बंद केले आहे.

संख्येने कमी असला तरी, एक भारतीय प्रापंचिक ख्रिस्ती लोकांचा पुरोगामी संघ ख्रिस्तीधर्माच्या बदलण्याला कडाडून विरोध करीत आहे. 'पाश्चिमात्य धर्म हाच खरा ख्रिस्ती धर्म' किंवा 'मध्यमयुगीन काळात भूमध्य समुद्रकाठी वाढलेला ख्रिस्ती धर्म हाच खरा ख्रिस्ती धर्म' अशी ह्या पुरोगामी संघटनेची भूमिका आहे.

●



त्यांनी आपल्या अण्वस्त्र कारखान्यावर बॉम्ब टाकायची धमकी दिली
तशी आपण त्यांचे छापखाने उध्वस्त करायची धमकी देऊ!


बलसागर

श्री. ग. माजगावकर : ३० रुपये

राष्ट्रवाद ही प्रभावी शक्ती मुठभरांच्या वर्तुळातच वंदिस्त राहिली तर ती पराभूतही ठरते. समाजातल्या सर्व वर्गांना, वर्णांना, धर्मपंथांना, विभागांना तिचा स्पर्श व्हायला हवा. आपल्याकडील हिंदी आणि हिंदू हे दोन्ही राष्ट्रवाद या कामी आजवर अपुरे पडले. म्हणूनच एवढी प्रदीर्घ सांस्कृतिक परंपरा आणि निसर्गसमृद्ध असा प्रचंड भूभाग असूनही आपला राष्ट्रवाद अद्याप पराभूत वाटतो; तो आत्मनिर्भर आणि स्वावलंबी होत नाही. राष्ट्रवाद आणि सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक समतावाद या दोन प्रेरणांचा मिलाफ आणि योग्य समन्वय घडून आल्याशिवाय 'बलसागर भारत' हे स्वप्न अपुरे राहील. राष्ट्रवादी भूमिकेतून नवी क्षितिजे शोधणाऱ्या सर्वांना हे पुस्तक म्हणूनच वाचावेसे वाटेल, यातील प्रतिपादनावर, मांडणीवर विचार करावासा वाटेल.

# संघधर्माचे निर्माते - डॉ. हेडगेवार

## रत्नाकर महाड

'कृण्वन्तो विश्वम् आर्यम्' याच अेकमेव ध्येयाने प्रेरित होऊन या देशातील प्राचीन द्रष्ट्यांनी मानवाच्या सर्वागीण उत्थानासाठी दीर्घ परिश्रम केले. ज्ञान आणि विज्ञान या दोन्ही अंगांचा विकास केला. मनुष्यजीवनांतील पशुंना नष्ट करुन 'नराचा नारायण' करण्यासाठी येथील संस्कृती विकसित कली. मानवी जीवनमूल्यांची प्रतिष्ठापना केली. जीवनाचे प्रत्यक्ष आदर्श उभे केले. नंतरच्या कालखंडात ज्या धर्माला हिंदू हे अभिधान प्राप्त झाले त्या मानव धर्माची संस्थापना केली. त्या धर्माची प्रेरणा आणि ईप्सीत हे जगत् कल्याणाचेच होते. अन्य सर्व राष्ट्रांपासून वेगळेपणाने उमटून पडणारी, प्रकट होणारी हिदूराष्ट्राची ही मनोधारणा नीट ध्यानांत घेतल्यास 'राष्ट्रीय स्वयंसेवक सघाचे कार्य हे ईश्वरी कार्य आहे' या डॉ. हेडगेवारांच्या विधानाची संगती लागेल.

हिंदू धर्माने मांडलेली 'मोक्ष' ही कल्पना म्हणज नाना प्रकारची उत्पन्न झालेली आवरणे व बंधने ही उचित प्रकारच्या संस्कारांनी व साधनामार्गांनी दूर करुन आत्मा विमुक्त व्हावा म्हणजेच तो विश्वात्म व्हावा या धारणेची आहे. या अर्थाने पाहिल्यास व्यक्तीजीवनातील 'मी' सर्वार्थाने विरघळून टाकून आपले जीवन प्रयत्नपूर्वक 'समष्टीरुप' करण्याचा सफल प्रयत्न करणारा महापुरुष म्हणून डॉ. हेडगेवारांचे नाव घ्यावे लागेल.

संघर्षग्रस्त मानवी जीवनाची पार्श्वभूमी लक्षांत घेता मानवी जीवनाचे देवजीवनात रुपांतर करणाऱ्या हिदू संस्कृतीचे पुनरुत्थान ही काळाची नितांत आवश्यकता आहे हे लक्षांत घेऊनच त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संस्थापना केली. डॉ. हेडगेवार वा संघाचा विचार करताना हा कल्याणमयी पैलू दृष्टीआड करुन चालणार नाही.

व्यक्तीच्या दृष्टीने आत्म्याची विमुक्ती ही जशी अेक स्वाभाविक प्रेरणा वा इच्छा असू शकते त्याचप्रमाणे परतंत्र समाजाला स्वातंत्र्याची आस असणे हे अत्यंत स्वाभाविक आहे. इंग्रजांची गुलामी नष्ट करुन देश स्वतंत्र करण्याचा प्रयत्न नानाविध मार्गांनी चालू होता. या प्रयत्नात डॉक्टरांचा सहभाग ही सहजच गोष्ट होती. ते जणू उपजतच देशभक्त होते. काही निमित्त झाले वा कशाची प्रतिक्रिया म्हणून देशभक्ती ही गोष्ट त्यांच्या जीवनात दिसत नाही. सज्ञान जीवनाचा पहिलाच पदन्यास हा त्यांच्या देशभक्तीचा परिचय करुन देणारा ठरला. अल्पवय असतानाही शाळेत मिळालेला खाऊचा पुडा ही इंग्रजी अधिसत्तेचीच आठवण करुन देणारा आहे असे समजून त्यांनी तो गटारात फेकून दिला. शालेय जीवनात विद्यार्थी सहकाऱ्यांना संघटित करुन 'वंदे मातरम्'चा उद्घोष केल्यामुळे त्यांना शाळेतून काढून टाकण्यांत आले. अन्य राष्ट्रीय शाळेत त्यांनी आपले शालान्त परीक्षेपर्यंतचे शिक्षण पुरे केले. कलकत्ता येथे जाऊन वैद्यकीय पदवी संपादन करण्यांतही त्यांचे दोन हेतू स्पष्ट दिसून येतात. कलकत्ता हे क्रांतीकार्याचे केंद्र असल्याने क्रांतीकारकांशी संपर्क येऊन क्रांतीचे धडे घ्यावे हा पहिला हेतू. तो लगेच साध्य झाला. इतकेच नाही तर त्यांना काहीसे भडक असे 'कोकेन'हे सांकेतिक नावही त्याच काळात मिळून 'अनुशीलन समिती' या क्रांती संघटनेचे ते सभासदही झाले. नागपूर येथे परतल्यानंतरही काही काळ ते क्रांतीकार्याशी संबंधित होते. कॉंग्रेसने चालविलेल्या सर्व प्रकारच्या आदोलनात ,त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. कारावासाचाही अर्थातच त्यांना अनुभव मिळाला.

संघपूर्व जीवनात हे सर्व चालू असतानाही त्यांचे निरीक्षण, सहकाऱ्यांचे स्वभाव परीक्षण, प्रचलीत विचारप्रवाहांचा सूक्ष्म अभ्यास आणि चितन सतत चालू होते. इंग्रजांचा विरोध म्हणजेच राष्ट्रवाद ही उत्पन्न झालेली समाजाची प्रतिक्रिया मन.स्थिती त्यांना मानवत नव्हती. स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रयत्नात अेका बाजूने चाललेला मुस्लिम अनुनय हा अंती देशाचा घात करील ही त्यांची भयशंका दुर्दैवाने पुढे खरी ठरली हे आपण पहातच आहोत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या नादात राष्ट्राची सर्व प्रकारची धारणा करणारी मूळ राष्ट्रीयत्वाची आधारशीलाच खिळखिळी होत आहे हे त्यांना जाणवत होते. भ्रांत राष्ट्रीयत्वाच्या कल्पनांनी ग्रासलेले नेतृत्व समाजाला शेवटी भलत्याच दिशेला नेईल या विचाराने ते अस्वस्थ होत असत.

याबरोबरच एकेकाळी वैभवशाली असलेल्या या राष्ट्राचे गेल्या हजार बाराशे वर्षापासून चाललेले अध:पतन नेमके कोणत्या कारणाने होत आहे याचा शोध त्यांच्या अंत:करणात सतत चालू असे. विदेशी संस्कृती श्रेष्ठ होती वा आपण अद्यावत् नाही म्हणून आपण पराभूत झालो ही काहीची कारणमीमांसा त्यांना मान्य नव्हती.

इतिहासाच्या परिशीलनांतून आणि मनातून चाललेल्या विचारमंथनातून त्यांना 'या देशात हिंदू राष्ट्र हेच सत्य आहे' याचा बोध अवश्य झालाय. पण तरीही एकेकाळी अस्तित्वात असलेल्या या 'समर्थ हिदूराष्ट्राची अवनती का होत गेली हा प्रश्न त्यांना सचिं करीत होताच.

... आणि एक दिवस त्यांना त्या उत्तराच जणू साक्षात्कार झाला. हिंदू समाजा संघधर्माचा अभाव आहे हे निखळ सत्‍ त्यांच्या डोळ्यांसमोर आले. समाजाची स प्रकारची दुरावस्था या संघभावनेच्य अभावामुळेच आहे याची त्यांना मनोमन खात्र झाली. राष्ट्राची प्राणज्योती म्हणजेच ही सघधर्माची जाणीव होय हे त्यांना उमगले.

### यशाचे रहस्य


हिदूराष्ट्राच्या अपजयाची ही कारणपरंपरा लक्षांत आल्यावर मात्र नंतर त्यांनी समष्टी जीवन निर्माण करण्याचा निदिध्यास घेतला व्यक्ती व्यक्तीचे हृदय संघभावनेने भारुन टाकण्याचा त्यांनी निश्चय केला. जाती, पंथ, संप्रदाय, भाषा, प्रांत, उच्चनीच इत्यादी भेदांच्या पलिकडे गेलेले अशा हिंदूराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी त्यांनी रक्ताचे पाणी केले. संघधर्म निर्माण करण्यासाठी त्यांच्या अलौकीक प्रतिभेला 'शाखा' हे तंत्र स्फुरले. एकोणीसशे पंचवीसच्या दसऱ्याला त्यांनी संघ शाखा सुरु केली. निष्कलंक व्यक्तिगत चारित्र्य आणि राष्ट्रीय सद्गूण उत्पन्न व्हावेत म्हणून शाखांमध्ये संस्कार

करण्याची योजना केली. शाखेतील पहिल्या-वहिल्या त्या बाल स्वयंसेवकांनीच सर्व प्रांतातून आपल्या कर्तृत्वाचे डोंगर उभे केले. आज संघाचा विस्तीर्ण वटवृक्ष पाहून मन स्तिमित होते. राष्ट्रजीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये जाऊन हिंदू जीवनमूल्यांच्या आधारे त्या त्या ठिकाणी विशुद्ध कार्याची उभारणी करण्यासाठी संघाचे हजारो कार्यकर्ते प्रयत्नरत आहेत.

संपूर्ण समाजांत अपेक्षेप्रमाणे अजून परिवर्तन घडलेले नाही हे जरी खरे असले तरी संघनिर्मित विश्वात तरी सर्व भेद नाहीसे करण्यात संघ निश्चित यशस्वी झाला आहे. एकाच विचाराची आणि दिलाची लक्षावधी माणसे हिंदूस्थानच्या कानाकोपऱ्यात संघाने उभी केली आहेत.

या यशाचे रहस्य काय? याचे मूळ कशात आहे? तत्वज्ञान आणि सिद्धांत यापेक्षाही खरे सांगायचे झाल्यास डॉक्टरांचे प्रत्यक्ष तपःपूत जीवन हेच याला कारणीभूत आहे. क्षणोक्षणी, कणाकणाने त्यांनी आपले जीवन चंदनासारखे झिजविले. डॉक्टर हे डॉक्टर झाले पण त्यांनी दवाखाना उघडला नाही. आजन्म अविवाहीत राहूनही त्याचे स्तोम त्यांनी माजविले नाही. कलकत्याला जाऊन पदवी संपादन करण्यातला त्यांचा दुसरा हेतू. लक्षात घेतला तर आश्चर्य वाटते. शद्बाला वजन आणि प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठी ते पदवीधर झाले. ते अत्यंत गरीब घराण्यांत जन्माला आले हे सत्यच आहे पण अनेकांप्रमाणे त्यांनी आपल्या गरीबीचे भांडवल केले नाही. देशासाठी मरणे हे निश्चित उदात्त आहे पण मला वाटते त्याहीपेक्षा अशा आदर्श स्थितीत क्षणोक्षणी जगणे हे अधिक महत्वाचे आहे. 'बोले तैसा चाले' हा वस्तूपाठ त्यांनी उभा केला आणि म्हणूनच त्यांच्या सहवाससात आलेला प्रत्येक माणूस त्यांनी भारुन टाकला. त्यांच्या निःशेष समर्पित जीवनाच्या परिसस्पर्शाने त्यांनी दुसऱ्याचे सोने नव्हे परिसच केले.

असामान्यत्व असूनही सामान्यासारखे ते राहिले. त्यांची रहाणी अत्यंत साधी होती. कपडे अगदी साधे असत. आकर्षक व्यक्तिमत्वाचा कोणताच पैलू त्यांच्याजवळ नव्हता. मात्र ते जगले ते तपस्वी जीवनासारखे. त्यांची महनीयता त्यांच्या त्या साध्या वागण्यांत, मृदू बोलण्यात आणि दुसऱ्यांविषयीच्या आत्यंतिक जिव्हाळयात होती. स्वयंसेवकांना ते परम पूजनीय झाले. अठराशे एकोणनव्वदच्या वर्ष प्रतिपदेला त्यांचा जन्म झाला आणि आत्यंतिक परिश्रमांमुळे धिप्पाड देह असूनही वयाच्या अवघ्या एकावनाव्या वर्षी, एकवीस जून एकोणीसशे चाळीस साली त्यांचे निधन झाले. त्यांच्या पुण्यपावन तपःपूत जीवनाला शतशः सश्रद्ध प्रणाम.



MANOOS : Marathi Periodical ( Licensed to post without prepayment of postage No. 11) Regd. No. PNC–W 28




काजूवडी के बाद अब




केसर, बादाम और
पिस्तोके स्वाद में
मिठी मजेदार

®
SWEETS

निर्माता
अनंत ॲण्ड आठवले प्रॉडक्टस्
दादर, मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी ४२२ ३९०९ - ४२२ ११८७

BYP/Mithila 88